Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

AYURME MANSA
1953 G. K. U.

AYURME MANSA
1953 G. K. U.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

amaj Foundation Che

nain. Gurukul Kangri

079418

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

Diamond Book Binding House

Stock Verification-2024

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

COMPILED

आयुर्मीमांसा

97

प्रमुख संपादक
वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

079418

जाने.-फेब्रु. १९५२

079418

वार्षिक वर्गणी ३ रु.
किरकोळ अंक ८ आणे

या अंकांत

स्नेहसाधन
— पु. वि. धामणकर

नृद्धरिय व संग्रहणी
— दा. द. जोशी

दोषधातुमलविज्ञान
— गो. आ. फडके

Rasa, Guna, Veerya, Vipaka, Prabhava

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आ. वै. महाविद्यालयाचा वार्षिक समारंभ

ना. आरोग्यमंत्र्यांचें आश्वासन

महाविद्यालयास शक्य ती मदत दिली जाईल.

आयुर्वेद प्रसारक मंडळी व तदंगभूत संस्था यांचा वार्षिक समारंभ दि. १२ जानेवारी १९५३ रोजीं मुंबई राज्याचे आरोग्यमंत्रि ना. शांतिलालजी शहा यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें साजरा झाला. समारंभाकरितां महाविद्यालयाचें आवार कमानी आणि पताका यांनीं सजविण्यांत आलें होतें व विद्यार्थी आणि नागरिक यांचा उत्साह अवर्णनीय होता. ना. शहा यांचें चार वाजतां संस्थेंत आगमन झालें त्यावेळीं त्यांचा पुष्पहारानें सत्कार करण्यांत आला व संस्थेचे सर्व विभाग त्यांना दाखविण्यांत आले. संस्थेच्या सेवाकार्याविषयीं आरोग्यमंत्र्यांनीं समाधान व्यक्त केलें.

कार्यकर्त्यांशीं चर्चा

दुपारीं अर्धा–पाऊणतास संस्थेच्या कार्यालयांत संस्थेच्या कार्यकर्त्यांनीं ना. आरोग्यमंत्र्यांशीं संस्थेची आर्थिक परिस्थिति व आयुर्वेदीय शिक्षणक्रम यांबद्दल चर्चा केली. या चर्चेंत डॉ. मो. ना. आगाशे, डॉ. वि. ल. आगाशे, डॉ. मे.ना. जोग, महाविद्यालयाचे प्रधानाध्यापक वैद्य फडके, श्री. जाजू वकील, श्री. शिवरामपंत भावे इ. कार्यकर्त्यांनीं भाग घेतला. सरकार पुढें पंचवार्षिक योजना व आकस्मिकपणें राज्यांत पडलेला दुष्काळ यासारखें अत्यंत खर्चाचे प्रश्न उभे असतांना याच वेळीं फॅकल्टीनें नवा शिक्षणक्रम अंमलांत आणला व सरकारवर अधिकच आर्थिक जबाबदारी टाकली गेली. शिवाय समाजाची आजची गरज लक्षांत घेतां जुना शिक्षणक्रम पुरेसा उपयुक्त होता. त्यामुळें घाई करण्याची आवश्यकता नव्हती. अशा आशयाचें निवेदन कार्यकर्त्यांनीं केलें. ना. मंत्र्यांनीं अतिशय मोकळेपणानें या चर्चेंत भाग घेतला.

'मी वैद्यकशास्त्राशीं अपरिचित आहें त्यामुळें मला निर्णय देणें अवघड आहे. तरीपण आज ग्रामीण भागांत सुलभ वैद्यकीय मदतीची आवश्यकता आहे. त्यासाठीं कमी कालावधींत व कमी खर्चांत सर्वसाधारण वैद्य तयार करणारा अभ्यासक्रम असावा असें माझें मत आहे. नव्या शिक्षणक्रमाच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असें कीं विद्यार्थी हा पारंगत व्हावा. पण दहा तज्ज्ञांपेक्षा व्यवहारांत सर्वसाधारण गरजा भागविणारे शंभर वैद्य तयार व्हावेत असें मला वाटतें. त्यासाठीं जरूर असलेलेच विषय अभ्यासक्रमांत असावे.' असे विचार नामदार मंत्र्यांनीं या चर्चेंत व्यक्त केले.

सर्वसाधारण वैद्य (general practitioner) तयार होण्याच्या दृष्टीनें जुन्या शिक्षणक्रमाची उपयुक्तता संपलेली नाहीं व हे वैद्य प्रामुख्यानें ग्रामीण भागांतच जनसेवा वजावीत आहेत हा मुद्दा या चर्चेंत स्पष्ट झाला. शिवाय प्रतिकूल परिस्थितींत ज्या संस्था हें शिक्षणकार्य करीत होत्या त्या केवळ नव्या शिक्षणक्रमाकरितां पैसा नाहीं म्हणून बंद पडूं नयेत अशी कळकळीची भावना ना मंत्र्यांनीं व्यक्त केली याचा कार्यकर्त्यांना संतोष वाटला.

समारंभांतील भाषणें

सायंकाळीं ठीक सहा वाजता वार्षिक समारंभाच्या सभेस प्रारंभ झाला. आपल्या प्रास्ताविक भाषणांत संस्थेचे अध्यक्ष श्री. शंकरराव साठे म्हणाले,

'नामदार आरोग्यमंत्र्यांनीं आमचें निमंत्रण स्वीकारलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. आमची संस्था सध्यां जीवनमरणाच्या झगड्यांत सांपडली आहे. अशा वेळीं संस्थेचें कार्य व आमच्या अडचणी समक्ष समजावून घेण्यासाठीं ना. आरोग्यमंत्रि आले याचा आम्हांला आनंद वाटला. गेल्या वर्षापासून आयुर्वेदीय शिक्षणसंस्थांना नवा अभ्यासक्रम शिकवावा लागत आहे. हा अभ्यासक्रम दीर्घ कालावधीचा व अधिक खर्चाचा आहे. तो मध्यमवर्गाला झेपण्यासारखा नाहीं. हा कोर्स घेतलेले विद्यार्थी अल्प मोबदल्यांत ग्रामीण जनतेला वैद्यकीय मदत देतील कीं नाहीं याबद्दल शंका आहे. त्यामुळें जनतेला सुलभ व स्वस्त वैद्यकीय मदत मिळण्याचा संभव दुरावला आहे. आतांपर्यंत या संस्थांतून शिकलेले वैद्य खेड्यापाड्यांतून जात होते. आमच्या मतें दोन्ही शिक्षणक्रम चालू राहावे. विद्यार्थी आपल्या कुवतीप्रमाणें त्यांची निवड करतील. आमच्या संस्थेसारख्या संस्थाहि काम करूं शकतील. ही योजना झाली नाहीं तर या चाळीस वर्षें चाललेल्या संस्थेस काम बंद करावें लागेल.'

(पुढील मजकूर कव्हर पान ३ वर)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदप्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

वर्ष १६ वें] जाने. फेब्रु. १९५३ [अंक १ ला

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्या-बद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महि-न्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक, आयुर्मीमांसा, अर्कशाला, बिल्डिंग, सातारा' या पत्त्या-वरच करावा.

अभिनंदन आणि आभार

१९५२ साल संपलें. या वर्षांत व्यापारक्षेत्रांत मंदी सुरू झाली व ती स्थिरावलीहि. याच काळांत गुणांचा कस लागतो व त्याच आधारानें उद्योगधंदे टिकतात. अर्कशाळा या कसोटींतून या वर्षी यशस्वीरीत्या पार पडली. अर्कशाळा फार मोठ्या प्रमाणांत जाहिरात करू शकत नाहीं, अन्य प्रसिद्धी–साधनेंहि तिच्या हाताशीं नाहींत. पण प्रामाणिक निष्ठा आणि औषधांची गुणकारिता हें अर्कशाळेचें भांडवल आहे. १९५२ सालींहि वैद्य व विक्रेत्यांनीं नेहमींसारखें सहकार्य केलें. किंबहुना अर्कशाळेच्या मालाला अधिकच मागणी आली. आम्ही या सर्व वैद्य व विक्रेत्यांचे आभारी आहों. १९५३ सालींहि त्यांचें असेंच यशस्वी सहकार्य मिळेल असा आम्हांला विश्वास आहे.

मकर–संक्रमण
दि. १४–१–५३

—विक्री विभाग

धर्मार्थ दवाखान्यांना विनंति

मुंबई राज्यांतील धर्मार्थ दवाखान्यांच्या व रुग्णालयांच्या चालकांनीं आपल्या संस्थेची माहिती अर्कशाळेकडे कळवावी अशी विनंति आहे. अशा संस्थांना अर्कशाळेकडून कांहीं औषधें देणगी म्हणून विनामूल्य देण्यांत येणार आहेत. या औषधांच्या चिकित्साविषयक अनुभवांचा संग्रह करण्याची अर्कशाळेची योजना आहे. तरी अशा दवाखान्यांवरील अधिकारी वैद्यांनीं सहकार्य करावें अशी विनंति आहे.

जानेवारी–फेब्रुवारी जोड अंक

हा अंक जानेवारी–फेब्रुवारी जोड अंक म्हणून प्रसिद्ध करीत आहोंत. पुढील अंक नियमितपणें दर महिन्याच्या पहिल्या तारखेस वाचकांकडे येतील. गेल्या कांहीं अंकांना उशीर होत गेला याची आम्हांस जाणीव आहे. ग्राहकांनीं क्षमा करावी.

—व्यवस्थापक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— स्ने ह सा ध न —

(ले. : वै. पु. वि. धामणकर, आयुर्वेदभूषण, पनवेल)

(लेखांक ३ रा)

मागील अंकीं– तैलांचे घटक, तैलनिष्कासन प्रकार व तैलांची रोगवार निवड ह्या विषयीं माहिती होती.

चालू अंकीं– मूर्च्छनविधी, स्नेह ..रण, स्नेहपाक विधी, स्नेहाचे उपयोग, स्नेहसेवनप्रकार, स्नेहपार्कप्रकार, नेहपाक अवस्था व त्यांचे उपयोग, सु .ध धारण, स्नेहसंरक्षण ह्या विषयीं माहिती पाहावयास सांपडेल.

मूर्च्छनविधि

अप्रिय अगर पक्के वास दूर करण्याचा प्रयत्न आयुर्वेद करतो. पण तो प्रयत्न तैलांतील कांहीं घटक कमी करून नव्हे तर तो गंध अन्य पदार्थांचे सहाय्यानें झांकून. उदा :–

(१) एका बळकट, जाड अशा स्वच्छ कढईत तैल घालून तें मंदाग्नीनें (क्वाथादिद्रव्यासह) पचन करावें. त्यांवर फेंस येण्याचें सुरूं झालें म्हणजे तें तैल पक्व झालें असें समजावें. नंतर तें अग्नीवरून थंड होऊं द्यावें. तदनंतर त्यांत मंजिष्ठा, हळद, लोध्र, नागरमोथे, दालचिनी, हिरडा, बेहेडा, आमलकी, केवडा, वडाच्या पारंब्या व वाळा ह्यांचें चूर्ण त्यांत सोडावें. कालांतरानें सिद्ध तैलाचा अप्रिय गंध आवृत होतो.

तैलाची दुर्गंधी जाण्याकरितां मंजिष्ठादि पदार्थ घालावयाचे ते तैलाचे सोळाव्या हिश्शानें घालावेत आणि त्रिफळा, नागरमोथे, हळद, वाळा, लोध्र, केवडा, वडपारंबी, गुलाबाचीं फुलें हीं द्रव्यें तैलाच्या चतुर्थांश घेऊन त्यांचा कल्क करून तो तैलांत घालून तैल पचन करावें. म्हणजे तैलाची दुर्गंधी दूर होते.

(२) आंबा, जांभूळ, कंवठ, महाळुंग, बेल ह्या पांच वृक्षांचीं पानें तिलतैलाचें शोधन करतात. पानांचा कल्क अगर रसानें तैल पचन करावें.

एरंडतैल मूर्च्छन

मंजिष्ठा, नागरमोथा, धणे, हिरडा, बेहेडा, आमलकी, ऐरण, वाळा, खजूर, वडाच्या पारंब्या, हळद, दारुहळद, नेद, केवडा, दहीं, कांजी, हीं द्रव्यें पावपाव तोळा व ६४ तो. तूप मूर्च्छन करणें.

कटुतैल मूर्च्छन

आवळकंठी, हळद, बेलवृक्षाची साल, डाळिंब फळसाल, नागकेशर, पिंपळी, जिरें, वाळा, बेहेडा प्रत्येकीं १।१ तोळा. १ प्रस्थ तैल.

घृतमूर्च्छन

६४ तो. तूप गरम करावें. फेंसरहित झालें कि त्यांत हिरडा, बेहेडा, आंवळा, हळद, १।१ तो. महाळुंग रसांत वाटून थोडा थोडा घालणें. तूप सिद्ध करणें, हे तूप आमदोषरहित, वीर्यवान व साफ होतें.

तैलमूर्च्छन

बेंझाइक व सिनॅमिक ॲसिड तैल एकत्र ऊन करावेत व नंतर ते सिद्धतैलांत मिसळावें म्हणजे सर्व तैल हवा, उजेड, सर्दी प्रतिबंधक होईल. व मायक्रो ऑर्ग्यानिझमनें होणारें ऑक्सिडायझेशन टळेल.

तैल खंवट होण्याचीं दोन कारणें:– (१) तैलांतील जलांश, चिक्कण पदार्थ आणि गळिताचे कांहीं कण. (२) हवा, उजेड नि सर्दी ह्यांचा संसर्ग.

तैलं कृत्वा कटाहे दृढतर विमले मन्दमन्दानले तत्।
पक्वं निष्केन भावं गतमिह हि यदा शैत्यभावं समेत्य।
मञ्जिष्ठारात्रि लोध्रैर्जल धरतनुकैः
सामलैः साक्ष पथ्यैः ॥
सूचिपुष्पांध्रिनीरैरुपहितमथ तैस्तैल गन्धं जहाति॥
—यो. र. नि. र.

तैलस्येन्दुकलांशकेन विकसा ग्राह्या तु मूर्च्छाविधौ।
ये चान्ये त्रिफला पयोदरजनी ह्रि बेरलोध्रान्विता॥ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूची पुष्पवटावसेह नलिकास्तत्स्याथ पादांशकाः।
पाच्यास्तैलजगन्धदोषहृतये कल्कीकृतास्तद्विदैः ॥

—यो. र. नि. र.

आम्रजम्बुकपित्थानां बीजपूरक बिल्वयोः ।
शोधनं तिलतैलस्य पल्लवानांतु पञ्चकम् ॥

—यो. र. नि. र.

घृत व तैल

कल्काच्चतुर्गुणाकृत्य घृतं वा तैलमेव वा।
चतुर्गुणे द्रवे साध्यं तस्य मात्रा पलोन्मिता ॥
निक्षिप्य क्वाथयेत्तोयं क्वाथ्य द्रव्या च्चतुर्गुणम्।
पादशिष्टं गृहित्वाच स्नेहं तेनैव साधयेत् ॥ २
चतुर्गुणं मृदुद्रव्ये कठिनेष्ट गुणं जलम्।
तथाच मध्यमद्रव्ये नीरं षोडशिकं मतम् ॥ ३
कर्षादितः पलं यावत् क्षिपेदष्ट गुणं जलम् ।
तदूर्ध्वं कुडवं यावत् क्षिपेदष्ट गुणं जलम् ॥४
प्रस्थादितः क्षिपेन्नीरं खारी यावच्चतुर्गुणम्।
अंबुक्वाथरसैर्यत्र पृथक् स्नेहस्य साधनम् ॥ ५
कल्कस्यांशं तत्र दद्याच्चतुर्थं षष्ठमष्टयम्।
दग्धे दध्निरसे तक्रे कल्को देयोऽष्टमांशकः ॥ ६
कल्कस्य सम्यग् पाकार्थं तोयमात्रचतुर्गुणम्।
क्वाथेन केवलेनैव पाकोयत्रेरितः क्वचित् ॥ ७
क्वाथ्यं द्रव्यस्य कल्कोपि तत्रस्नेहे प्रयुज्यते ।
कल्कहिनस्तु यः स्नेहः ससाध्यः केवलद्रवे ॥ ८
पुष्पकल्कस्तु यः स्नेह स्तत्र तोयं चतुर्गुणम्।
स्नेहे स्नेहाष्ट मांशश्च पुष्पकल्कः प्रयज्जते ॥ ९

शा. म. खं. अ. ९

स्नेहसंस्करण

तूप, तैल, वसा आणि मज्जा हे चार प्रकार आहेत स्नेहाचे. त्यांचा क्रमच असें दर्शवितो कीं ते उत्तरोत्तर वापरांत कमी आहेत. ते एकापेक्षां एक जड आहेत. तसेंच ते ह्याच क्रमानें दुर्मीळ व अल्पसात्म्यहि आहेत. तूप हें सर्वांत सात्म्य. परंतु तें थिजतें. ह्या गुणामुळें तें सूक्ष्म स्त्रोतोगामित्वांत तैलापेक्षां कमी दर्जाचें ठरतें. तैल हें थिजत नाहीं. तैल त्यांतले त्यांत तिलतैल सर्व तैलांत श्रेष्ठ, कारण त्यांतील घटक ओलेईन फामिटिन व स्टिरइन ह्याच क्रमांत असतात. त्यामुळें वनस्पती, तूप अगर साबणाकरितां तिल-तैल तितकेसें रास्त ठरत नाहीं. पण सूक्ष्म स्त्रोतोगामित्व व ओशटपणा ह्या गुणांत तिलतैल सर्वश्रेष्ठ आहे. ह्याचा रंग, ह्याची रुचि अत्यंत दृढ असतात. [illegible]डा अगर उष्णता दोन्हीहि त्याला पूरकच ठरतात. तसेंच तें कृशांना पुष्ट करतें, स्थूलांना कृश करतें. ह्यावर संस्करण लौकर होतें. टिकतेंहि बराच काळ. ह्या कारणानें स्नेहांत स्नेहतैल, नि त्यांतहि तिळाचें तैल अधिक संस्कारक्षम ठरलें आहे.

संस्करण म्हणजे काय

संस्करण म्हणजे मुलामा. एका द्रव्याचें गुण दुसऱ्या द्रव्यांवर चढविणें. गुण हे द्रव्याश्रयी आहेत. ते निजद्रव्यासह दुसऱ्या पदार्थावर बसतील किंवा स्वतःचें द्रव्य सोडून दुसऱ्या द्रव्याचाही आश्रय करतील, घेतील. ही जिल्हई किंवा कल्हई कायम टिकाऊ नसते. हवा, उजेड. इ. चे संसर्गानें ती उडते. किंवा स्नेहद्रव्याची विघटना होऊं लागते तेव्हां हा संयोग सुटतो. सारांश, स्नेहावर केलेलें हें संस्करण मूलतः टिकाऊ नसतें. कारण संस्करणप्रक्रियेंत मूळ स्नेहाची मूळ घटना कधींच बदलली जाण्याची योजना नाहीं. असिद्ध व सिद्ध तैलांची (केमिकल कांपोझिशन) रासायनिक घटना सारखीच असते. फक्त फरक होतो तो त्याचे गुणांत आणि हा संस्कार तितकासा दूर होत नसल्यानें तैलें, तुपें, ४ माहिन्यांनीं हीन वीर्य होतात असें म्हटलें जातें, तें युक्त आहे. ह्यांत घटक १ कल्क २ स्नेह ३ द्रव हे तीन आहेत.

हीनास्युघृत तैलाद्याश्चातुर्मासाधिक स्तथा।

—शा. पू. खं.

नित्योपयोगी अर्कशाला औषधें

एग्युमिक्श्चर

कोणत्याही ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, किंबहुना प्रारंभीं एकमेव औषध म्हणून एग्युमिक्श्चरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें येणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्नेहपाकविधि

प्रथम तैलाची निवड करावी. निवडींत तीन प्रकार आहेत. (१) प्राणिज, उद्भिज्ज (२) नवपुराण (३) रोगवारस्नेह.

स्नेहाचे उपयोग	स्नेहसेवन प्रकार	
१ स्वास्थरक्षण	अभ्यंग	तिलतैलं–बलार्थेस्नेहनेच अग्यम्
२ रोगपरिहार	नावन	
३ वास देणें	अंजन	एरंडतैलं–विरेचनेप्रशस्तम्
४ वास मारणें	कर्णपूरण	
५ मेद वाढविणें	गंडूष	सर्पि–पानार्थं श्रेष्ठंशरदि–जलमुष्णं
६ मेद कमी करणें	कवल	
७ वंगण	बस्ति	वसामज्जा–पानार्थे–श्रेष्ठं माधवे:भण्ड
८ मलम	शिरोबस्ति	
९ पारद बंधन	उत्तर ,,	तेल–पानार्थे श्रष्ठं प्रावृषि–यूष:
१० धातु मारण	मात्रा ,,	
११ पाचन	अनुवासनबस्ति	सर्पितैल वसामज्जा पैकीं सर्पि: श्रेष्ठं-
१२ भावना	स्नेहपान	
१३ भर्जन (परतणें)	मर्दन	संस्कारस्य अनुवर्तनात् ।
१४ तलन (तळणें)	अनुपान	
१५ आलोडन (घोळणें)	लेप (अभ्यंग)	च. सू. १३/३
१६ वीर्यरक्षणम् उदा. गंडमाला कंडनरस इ.		
१७ व्रणपरिसेचन		
१८ स्नान		
१९ अवगाहन		
२० पदार्थ किडूं नये अगर त्यास हवा लागूं नये म्हणून त्यास आवरण रूप संरक्षण, आधार, औषध, मांसवर्धक, व मार्दवकर म्हणूनही ह्याचा उपयोग होतो.		

नवम्	पुराणम्
यो. र. षट्पल–भा. भै. र. ७७५२	वृ. नि. र. अश्मरी नाशनम्–पानार्थे भा. भै. र. ७३०
च. चि. भर्जनार्थम्–(वस्तांडम्)	चरक द्राक्षाघृत–सिध्यर्थं भा. भै. र. ३०६८
अ. १ पा. २	वंगसेन–शतधौतघृत–लेपार्थ ४१६१ भा. भै. र.
२ २ पानार्थनम् ।	,, ग. नि. वसिष्ठ हरितकी–भा. भै. र. ६७०१
च. च. २१/९३ विसर्प चि. शतधौत	,, अभयादिवृत–सेवनार्थं भा. भै. र. ८८४६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पसंत केलेला स्नेह जो पाहिजे तोच आहे. निर्भेळ अच्छ, वीर्यवान, संस्कारक्षम आहे ना ह्याची खात्रीं करून घ्यावी. स्नेहपाचन नेहमीं मंद अग्नीवर करावें. तें एका दिवसांत पुरें न करतां रोज थोडें द्रव घालून ते जिरवावेत. ते जिरल्यावर तैल थंड होऊं द्यावें. व दुसरे दिवशीं तें तैल पुनः द्रव घालून पचन करावें. ह्या तैलाचें तपमान सारखें अगर वर्धिष्णु न ठेवतां थंड होणें व पुनः गरम होणें हें चालू ठेवावें. असें केल्यानें तैल कल्कांतील अर्कनिष्कासन अधिक होतें.

घृततैल गुडदींश्च साधयेन्नेक वासरे ।
प्रकुर्वंत्युषिता ह्येते विशेषादगुणसंचयम् ।।
—शा. नि. र.

कल्काकरितां घ्यावयाचीं चूर्णें अवशिष्ट पृथुद्रव्याची नसावींत. तीं स्वतंत्र व अखंड नि वीर्यवान असावींत. त्यांचीं चुर्णें चाळणी नं. ९० नें चाळावींत. उयशील तैलयुक्त द्रव्य कुटण्याऐवजीं भिजत घालून फुगवून घेऊन वाटणेंच श्रेयस्कर.

द्रव–पाणी, दूध, रस, काढा ह्यांपैकीं कांहींही असतो. ह्यांची परस्पर मानें. कल्क भाग तर स्नेह ४ भाग व द्रव १६ भाग असावा.

अर्कशाळेचीं
पेटंट व इतर सर्व प्रकारचीं औषधें
पुण्यांत
आतां सुलभतेनें मिळूं लागलीं.
प्रमुख विक्रेते
आदर्श एजन्सी,
३९५।७ सदाशिव पेठ, पुणें २.

स्नेहपाक प्रकार.

स्नेहपचन करण्याकरितां उष्णतेचें सहाय्य घेतलें जातें. ती उष्णता दोन प्रकारची असते. साक्षात अग्नि व सूर्य.

साक्षात अग्नीची उष्णता कमीअधिक होण्याचा संभव असतो. त्यामुळें केव्हां वेळ अधिक लागेल तर केव्हां तेल करपेल. ह्या दोन्ही आपत्ति टाळण्याकरितां व निश्चित वेळांत अपेक्षित पाक साधण्याकरितां बाष्प–वाफेचा उपयोग करणें सोयीचें होईल. त्यांतूनही व्हॅक्युअम् स्टीम बॉयलिंग पद्धतीनें तैल सिद्ध केलें तर त्यांतूनही कमी उष्णतेवर तैल पाचन होईल व कल्कांतील सुगंधी द्रव्यांतला गंध सिद्ध-तैलांत उतरेलही. खरोखरी त्याची फार आवश्यकता आहे.

दुसरा प्रकार सूर्यपाकाचा. ही गोष्ट शरद व ग्रीष्मांतच शक्य होते. कारण त्या वेळेला सूर्याचे किरण प्रखर असतात. ह्यांमध्यें उष्णतामान चढतें, उतरतें, लाभतें. दिवसा उष्ण-पाक, रात्रीं शीतपाक असा तो क्रम आहे. ह्या विधीनें सिद्ध केलेले स्नेह केवळ बाह्योपचारार्थच उपयुक्त ठरतात. ह्याचें कारण ते पाक खरप्रतीचे होतात हें नव्हे. पाक असतो मध्यमच. पण पोटांत घेणेस अप्रिय होतो तो स्नेह. उदाः—

सूर्यपाक कासीसादितैल शा. गुग्गुल्वादि तैल १३८५ भा. भै. र. (ग. नि.)

जात्यादिघृत रा. मा. दार्व्यादितैल ३१०४ भा. भै. र. (ग. नि.)

मंजिष्ठादितैल ५२७४ भा. भै. र. कासीसादिघृत ८३२ भा. भै. र. (च. चि. अ. २२ ग. नि.)

नरसिंहघृत ३३८०।८१ भा. भै. र. (वा. भ.। उ. अ. ३९। ग. नि.)

सूर्यपाक एका दिवसांत पुरा होतच नाहीं. अग्निपाक एका दिवसांत पुरा करूं नये असें सांगितलें आहे. सूर्यपा-काप्रमाणेंच अग्निपाकांत उष्णशीत हे दोन्ही पाक साधले जाण्यानें भावना द्रव्यांतील अधिकांत अधिक गुण स्नेहावर चढतात. एवढ्यावरही ज्यांचें भागत नाहीं ते तेंच तेंच संस्करण पुनःपुनः करतात. व तैलाची कार्यक्षमता वाढवि-तात. उदा.—

दशपाक–अणुतेल– च. सू. अ. १ श्लो. ६० ते ६४

शतपाक– सु. चि. अ. ४।२९ च. सं. वातरक्त चि.

सहस्रपाक– ,, ,, ,,

दशपाक–बलातैल वं. से. वृं. मा. च. द. वृ. नि. र. ग्. नि.

औषधाचे बलवर्धनार्थ अनेक पाक सांगितले आहेत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा उपयोग होतो हें निश्चित. पण रुग्ण वैज्ञानिकापेक्षां रासायनिक विज्ञान सोपें आहे. तेव्हां पाकसंख्यानिदर्शक कसोटी सांपडली तर ती हवी आहे.

१) स्नेहसाधन परिभाषा सांगितली आहे ती केवळ जेथें तें तें मान सांगितलें नसेल तेवढ्या वेळीं उपयोगांत आणावयाची आहे.

२) पाठांत सांगितलेली कल्क, स्नेह व द्रव ह्यांचीं मानें वरील भाषेहून विभिन्न असलीं तरी तीं जशीं जेथें सांगितलीं असतील तीं तशींच तेथें घेणें युक्त होय.

३) पाठांत सांगितलेलें एखादें द्रव्य मिळणें शक्य नसल्यास त्याचा प्रतिनिधि घ्यावा.

४) गोमूत्रादि क्षारयुक्तद्रवांत स्नेहसिद्ध करतांना तो फार फेंसाळतो, उतूंही जातो. अशावेळीं पात्र विस्तृत–मोठें घ्यावें आणि अग्नि मंद लावावा. किंवा द्रव जसजसा आटत जाईल तसतसा मिळवीत जावा.

५) दूधांत स्नेह सिद्ध करावयाचा असल्यास २ दिवसांत करावा.

स्वरसांत „ „ „ „ ३ „

क्षार व अम्लरसांत स्नेह सिद्ध करावयाचा असल्यास ५ दिवसांत करावा.

कै. वैद्य गोपिनाथ गुप्ता भा. भैं. र.

६) स्नेह संधानाकरितां माहेय पण महाराष्ट्रांत कार्यक्षम माहेय मिळत नाहीं. तुपानें राबलेलें माहेय घेतलें तर तें बाहेरूनच पेटायला लागतें. तेव्हां घृत सिद्धीकरितां कल्हईचें ताम्रपात्र व तैलसिद्धीकरितां लोखंडी कढई पसंत केली आहे. ह्यांत सोयी पुष्कळ आहेत. पाकही चांगला होतो.

७) विषयुक्त कल्क स्नेहसाधनानंतर जाळून टाकावा म्हणजे त्यापासून प्राणहानि होण्याचा संभव उरत नाहीं व त्या पात्रास पुनः कल्हई लावावी. अगर ते अग्निवर्ण करावें म्हणजे तें पात्र विषदोषांपासून मुक्त होतें.

स्नेहसाधनाकरितां माहेय पात्र प्राचीन काळीं वापरीत; तसेंच तें निमुळत्या तोंडाचेंही घेत. कोठल्याही धातूचा संस्कार तेलावर होऊं नये अगर मंद उष्म्यापेक्षां अधिक उष्णता तैलास बसूं नये ह्या हेतुनें मृत्तिकापात्र प्राचीनांनीं रास्त मानलें होतें. रुंद तोंडाच्या भांड्यांत उकळणें जोरांत होऊं शकतें. क्वथन व विस्तारमानानें सुगंधाचे उड्डुचन अधिक. निमुळत्या तोंडामुळें क्वथनाचा वेग अग्नीची तीव्रता नियंत्रित होतात. कारण क्वथन वेग व अग्नीमान वाढलें कीं निरुंद मुखपात्रांतील द्रवच उतू जाऊं लागतो. ती आपत्ति टाळण्याकरितां मनुष्य स्वाभाविकच अग्नि मंद ठेवतो. ह्यामुळें कल्कद्रव्यांतील गुण व गंध आस्ते आस्ते सुटे होतात तसतसे ते स्नेहांत विरतात. ह्या संस्करणाकरितां काल नि अग्नीची अपेक्षा असते ती योग्य साधली तर सिद्धतैल ग्रंथोक्त गुण अवश्य देईल.

सुवर्ण, ताम्र, लोह, कांस्य इ. पात्रें कांहीं कांहीं तैलपाचनांना इष्ट म्हणून सांगितलीं आहेत त्यांचा तपशील 'पात्र' परिशिष्ट पाहावा.

स्नेहपाक अवस्था

प्रथम स्नेह पुरा सिद्ध व्हावा लागतो. त्याचीं दोन लक्षणें दिलीं आहेत–(१) स्नेहांतील कल्क बोटांनीं वळविला असतां जेव्हां त्याची वात होते व तो कल्क अग्नीवर टाकला असतां फुरफुर शब्द होत नाहीं तेव्हां स्नेह सिद्ध झाला म्हणून समजावें.

(२) तैलाचे पाकावर फेंस आला व तुपाचे पाकावर फेंस येऊन गेला आणि त्या पाकांत चांगला गंध, उत्तम वर्ण-उत्तम रस हे उत्पन्न झाले म्हणजे तो स्नेह चांगला सिद्ध झाला म्हणून समजावें.

पहिली कसोटी तेल जलांशरहित झाल्याची दुसरी अच्छत्वाची आहे.

स्नेह उपयोगी होण्यास ह्या दोन कसोट्या आवश्यक होत. ह्याला मध्यपाक म्हणतात. (सर्वेषामेव पाकानां मध्यपाकः प्रशस्यते) सर्व प्रकारच्या पाकावस्थेंत ही अवस्था उत्तम गणली गेली आहे.

स्नेहपाक लक्षण

घृत तैल पाक लक्षणम्।

वर्तिवत्स्नेह कल्कः स्याद्यदांगुल्या विमर्दितः।
शब्दहीनोऽग्नि निक्षिप्तः स्नेहःसिध्दो भवेत्तदा॥
यदाफेनोद्भवस्तैले फेनशांतिश्च सर्पिषि।
गंधवर्ण रसोत्पत्तिः स्नेहसिद्धिस्तदा भवेत्॥
स्नेहपाकस्त्रिधाप्रोक्तो मृदुर्मध्यः खरस्तथा।
ईषत्सरस कल्कस्तु स्नेहपाको मृदुर्भवेत्॥
मध्यपाकश्च सिद्धिश्च कल्के नीरस कोमले।
ईषत्कठिन कल्कश्च स्नेहपाको खरोमतः।
तदूर्ध्वं दग्धपाकः स्याद्दाह कृन्निष्प्रयोजकः॥
आमपाकश्च निर्वीर्यो वन्हिमांद्य करो गुरुः।
नस्यार्थे स्यान्मृदुः पाको मध्यमः सर्वकर्मसु॥

घृतसिद्धी लक्षण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शब्दस्योपशमे प्राप्ते फेनस्योपरमे तथा ।
गंधवर्ण रसादीनां संपत्तौ सिद्धिमादिशेत् ॥

तैलसिद्धी लक्षण.

फेनोऽति मात्रं तैलस्य शेषम् घृतदादिशेत् ।
दूर्वायां पतिते विंदौ शुष्कतां याति तत्क्षणात् ।

८५१ कनकतैल भै. र. शि. रो.

भिन्न प क्वांचे उपयोग

मृदुर्नस्ये त्ररोयङ्गे पा वस्तौ च मध्यमः ।
सर्वेषामेव पाकानां मध्यपाकः प्रशस्यते ॥
दीरं पाको मृदुः कार्यः स्नेहस्य न खरोमतः ।
किंचिश्च वीर्यमादत्ते तञ्जहाति खरः सदा ॥

उपयुक्तता—

१) खरेऽभ्यङ्गे स्मृतः पाके ।
२) मदुर्नस्य क्रियासु च ।
३) मध्यपाकं तु पानार्थे वस्तौ च विनियोजयेत् ।

च. क. अ. १२। १०१

नंतर लांकडी वल्हयानें त्या यकृताचे लहान लहान तुकडे करावेत व बंद बाष्पपात्रांत ठेवून ८०° सेंटिग्रेड उष्णता द्यावी. म्हणजे यकृतद्रसा सुटी पडते. ही वसा सर्वांत उत्तम होय. हें पोटांत खुशाल द्यावें.

नंतर ते तुकडे पुनः बंद बाष्पपात्रांत अधिक उष्णतेवर तापवीतात. ह्या खेपेसही कांहीं तैल हातीं लागतें. पण तें दुय्यम प्रतीचें ठरतें. हें फक्त बाह्योपचारार्थंच उपयुक्त.

दोन्ही प्रक्रिया मिळून ४८ टक्के निघतें.

हें तैल काढलें कीं फ्लॅनेलमधून गाळतात. पिंपांत भरतात. तैलाचे पृष्ठभागावर अत्यंत शुष्क मीठ पेरतात. हा थर चाळणीनें देतात व भांडें बंद करतात. कालांतरानें मीठ तैलाचे बुडाशीं जाऊन बसतें. खालीं जातांना तें आपलेबरोबर तैलांतला जलांश खालीं नेतें. नंतर ह्या तैलाचे उष्णतामान ८°९ बिंदूपर्यंत खालीं नेऊन तें थिजवितात. थिजलेला भाग पिशव्यांत घालून खूप दाबतात. त्यांतून बाहेर निघेल तें अच्छ कॉ. लि. ऑईल होय. पिशव्यांत घालून मुख्यत्वेंकरून स्टिअरीन मागें राहतें त्याचा साबण करतात.

कांहीं वनस्पतींमध्यें हवेंत उडणारीं तैलें असतात. हीं तैलें उर्ध्वपातन यंत्रानें वाफेच्या सहाय्यानें काढतात.

पूर्वतयारी अथात् शुद्धी

(१) कांहीं लोक लोण्यांत मेदांची भेसळ करतात. (२) तुपांत मार्जेरीन, कोकोजेम, व्हिजिटेबल घी चरबी किंवा तैलही मिसळतात. म्हणून औषधांकरितां घ्यावयाच्या लोणी-तुपाबावत तें निर्भेळ असल्याची खात्री प्रथम करून घ्यावी.

नैसर्गिक तैलांत रस, गंध, अम्ल द्रव्यें असतात. त्यांचे योगानें तैलाचे स्वाभाविक गुण लाभतात पण ह्या तैलांवर कांहीं विशिष्ट संस्कार करतांना ह्या गोष्टी नडतात. ती अडचण दूर व्हावी म्हणून प्रथम हे घटक दूर करतात. त्यालाच शोधून म्हणतात.

प्राचीन पद्धतीनें हे घटक इतर द्रव्यांनीं आवृत होत असत, त्यामुळें स्नेह पोटांत घेतांना त्याचे निजधर्म जाणवले नाहींत तरी ते पोटांत गेल्यावर त्यांचा लाभ होत असे; तो उपकारकही असे. पण अर्वाचीन रसायनशास्त्र हे घटकच मुळांत दूर करतात. त्यामुळें तो स्नेह स्वाभाविक गुणांचा राहत नाहीं. ह्याचें नेहमींच्या परिचयांतलें उदाहरण म्हणजे डाल्डा. ताज्या तैलांत तळलेले पदार्थ पचन पोषणाचे दृष्टीनें डाल्डांतल्या पदार्थापेक्षां कितीतरी वरच्या दर्जाचे ठरतात. ह्याचें कारण रस, गंध, रंग, अम्ल घटकांची उपस्थिति हें होय. हे घटक विरहित तैलांतले पदार्थ

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता यांबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन—चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः—अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पचायला जड, व मलावष्टंभक होतात. म्हणून आधुनिक विश्लेषणात्मक शुद्धि आयुर्वेदीयांना हितावह होत नाहीं.

परंतु एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे ती अशी कीं हवा उजेड आणि सर्द हवा ह्यांच्या संसर्गानें तैलांतील ईस्टर्सचें रूपांतर फ्री फॅटी एसिडमध्यें होतें. तसेंच कांहीं अंशानें मायक्रो ऑर्ग्यानिझममुळें तैल ऑक्सिडाइज्ड होतें. त्यामुळें उत्तम तैल कालांतरानें खंवट होतें. तैलाचा साबण तयार करावयाचा म्हणजे साबणांत free faty acid राहून शुद्ध तैल बाहेर येतें. असें जरी झालें तरी एकदां विघडलेलें तैल पुनः खाण्याचे अगर औषधांचे कामीं उपयुक्त ठरत नाहीं. तेव्हां घाण्यांतून पहिल्यानें निघणारें तैल तें औषधी जाणावें आणि तें हवा उजेड सर्दी ह्यांपासून दूर राहील अशी काळजी घ्यावी.

निरम्ल करणें:–अम्लें निसर्गतःच कांहीं तैलांत कमीअधिक असतात. हें अम्ल ज्या मानानें अधिक त्या मानानें तें तैल साबणाचे कामीं अधिक उपयुक्त. कारण ह्यांना फेंस प्रचुर येतो. हीं तैलें औषधींचे कामीं फारशीं उपयुक्त ठरत नाहींत. कारण अम्लें दूर करणें परवडत नाहीं व राहूं दिलीं तर तीं तैलें लौकर खंवट होतात. तिलतैलांत हे घटक कमीत कमी असतात म्हणूनच आयुर्वेदानें

तिलतैलंस्थावरेषु जंगमेषु घृतं वरम् ।

नि. र. भा. १ पा. ३२७

किंवा

तिलतैलंस्थावरजातानाम् स्नेहानाम् हिततमम् ।

च. सू. २५।३७ असें म्हटलें असावें.

रंगविरहित करणें :– गडद रंगाच्या तैलांबाबत ह्या धावन कृतीचा फारसा उपयोग होत नाहीं. पण फिकट रंग असला तर कांहीं रासायनिक प्रक्रियेनें तो रंग दूर करतां येतो.

निर्गंध अथवा गंध दूरीकरणम् :–

प्रथम ऑटोक्लेव्हमध्यें तैल घालायचें. नंतर तेंथें निर्वात प्रदेश (vaccum) तयार करायचा नि मग त्या तैलावर सुपरहीटेडस्टीम थोडा वेळ सोडायची.

तैलांत थंडीनें घट्ट होणारे कांहीं घटक (Stearin) असतात. तें दूर करणें. पण ही गोष्ट फक्त कॉ. लि. ऑ. बाबतच करतात. इतरांत ती केल्यानें गुणांचे अवमूल्यन होतें.

आधुनिकांनीं पूर्वतयारींत अम्ल, रंग, गंध, घनीभाव हे धर्म दूर करणें इतक्यांचा समावेश केला. आयुर्वेदाचे दृष्टीनें स्नेहांतले हे स्वाभाविक धर्म आवश्यक होत. तेव्हां आयुर्वेदापुढें केवळ आर्थिक नजर नसल्यानें हे भाग दूर करण्यास आर्यवैद्यक संमति देणार नाहीं हें उघड आहे.

मात्र थंड घाण्यांतले थंड दाबानें उष्णतेचें सहाय्य न घेतां काढलेलें प्रस्तुत तैल (filtered) औषधी उपयोगांत व आहारांत घेणें युक्त. ही एवढी त्यांची सूचना आयुर्वेद मान्य करूं शकतो. आणि एवढी दक्षता सिद्ध करण्याकरितां घ्यावयाच्या तैलाबाबत घेतली म्हणजे ती पूर्वतयारी पुरेशी समजावी.

गंधधारणम्

सिद्ध स्नेहास रंग, रस, गंध मनोज्ञ यावेत असा आयुर्वेदीय औषधीकरणाचा हेतु नि तो साधण्याची व्यवस्था बहुतेक ठिकाणीं असतेच. तरीपण पंचगव्य, वातप्रशमन अशा तुपांना जवळ जवळ घाणच येते. असें जोरदार गंध दडपणें अशक्यच. तेव्हां हीं तुपें (Capsule) अवगुंठनांतून द्यावींत. म्हणजे गंध व रसाचा प्रश्न मिटतो. इतर तैलें सुगंधित करण्याचें प्राचीन उपाय म्हणजे सिद्धतैल गरम असतांनाच त्यांत कपूरकाचरीसारखीं सुगंधी द्रव्यें त्यांत टाकून ठेवायचीं. आज बाजारांत उयशील तैलें व अत्तरें विकत मिळतात. त्याचे उपयोग आयुर्वेद दृष्ट्या हितावह असल्यास त्याचा उपयोग गंध धारणास करावा. उदा. वातनाशक किंवा नारायण तैलांत थोडें टरपेंटाईन घालून मर्दन केल्यास (पेनिट्रेशन) तैल जिरण्यास व वातशमनास मदत होते, असा अनुभव आहे.

संरक्षण (टिकवण क्रिया)

हीनास्युर्घृत तैलाद्याश्चातुर्मासाधिकासास्तथा । —शा.

चार महिन्यांनंतर तूप व तैलें हीनवीर्य होतात असें आयुर्वेदाचें म्हणणें आहे पण त्यांना दूषित करणारी हवा, पाणी आणि प्रकाश हीं जर सिद्ध स्नेहांपासून दूर राखूं शकलों तर कालही टिकूं शकतील. जुनें तूप येतेंच कीं नाहीं उपयोगाला.

आतांपर्यंतच्या व प्रचलित वैद्यकांत स्नेहसाधनाबाबत आयुर्वेदानेंच वरेच परिश्रम घेतलेले दिसतात. असें जरी आहे तरी सिद्धस्नेहाची गुणाधिक्यता, प्रामाण्य, संरक्षणक्षमता व वैविध्य ह्या दृष्टीनें संशोधन होण्यास पुष्कळच वाव आहे. विद्वान, कुशल, गुणवान विद्यार्थ्यांना हें एक नवें व मोठें क्षेत्र आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मृद्वस्थि व संग्रहणी

(लेखक- वैद्य दामोदर दत्तात्रय जोशी, 'आयुर्वेद विशारद', म्युनि. दवाखाना, सांगली .)

सांगली नगरपालिका धर्मार्थ आयुर्वेदिक दवाखान्यांत खालील मृद्वस्थि व संग्रहणीचा रोगी शुद्ध आयुर्वेदिक औषधानें पूर्णपणें बरा झाला. त्यासंबंधीं खालीलप्रमाणें चिकित्सोपक्रम चालू होता.—

रोगी—मुलगी, वय ९ महिने, ब्राह्मण, रुग्णकाल २ महिने.

इतिहास—रोग्यास आमचे दवाखान्यांत औषधास आणण्यापूर्वी सुमारें २ महिन्यांपासून ५।६ वेळां भसरट व सशूल पाण्यासारखे जुलाब होत असत. व मुलगी अगदीं फिकट पांढरी व बरगडयांचीं हाडें वर येऊन अस्थिपंजर सुस्पष्ट दिसत असलेली व अतिशय कृश दिसत होती.

रोग्याची सर्वांगीण तपासणी करितां नाडी अतिशय क्षीण, जिव्हा लाल, डोळयांच्या पापणीच्या आंतील भाग रक्तहीन व पांढरे दिसले. यकृतवृद्धि १ अंगुळ वाढलेली व चेहऱ्यावर काळेपणा व फिकटपणा सुस्पष्ट दिसत होता. व मुलगी अतिशय चिरचिऱ्या स्वभावाची दिसली.

निदान—२ महिन्यांची दीर्घकालीन चिरकारी सद्रव मलप्रवृत्ति, मुखपाक व भसरट मलनिस्सरणांमुळें संग्रहणीचें निदान सुष्पटच झालें व भयंकर कृशता, अस्थिधातूच्या कमतरतेमुळें बरगडयांच्या अस्थिपंजरांची दिसणारी सुस्पष्टता व यकृतवृद्धि वगैरे लक्षणांमुळें मृद्वस्थींचें निदान होण्यास मुळींच विलंब लागला नाहीं.

चिकित्सा—तारीख १९-२-५२ ला रोग्यास सकाळ, दुपार व संध्याकाळीं चारचार तासांच्या अंतरानें मृगशृंगभस्म १/४ गुंज + दाडिमाष्टकचूर्ण १ गुंज व मंडूरभस्म १/४ गुंज या तिहींचें मिश्रण मध व डाळिंबाच्या पिकलेल्या दाण्यांच्या रसांतून चाटण्यास दिलें. वरील औषध ३ दिवस चालूं केलें. तारीख २२-३-५२ ला औषधांत थोडा फरक केला. शौचास आतां पूर्वीपेक्षां १।२ वेळां कमी होऊं लागलें, थोडें शौच्याचे वेळीं प्रवाहण होत असल्याचें आढळलें म्हणून सकाळीं दुपारीं व रात्रीं ३ वेळां चार तासांच्या अंतरानें लोहभस्म १/३ गुंज + नवायसचूर्ण १ गुंज + मृगशृंगभस्म ४ गुंज आणि दाडिमाष्टक १ गुंज असें चाटण वरील प्रमाणेंच अनुपानांत चालूं ठेवलें. वरील उपक्रम ५ दिवस चालूं ठेवल्यावर मल थोडा घन होऊं लागला व प्रवाहण कमी झालें. तारीख २७-३-५२ ला वरील औषधाखेरीज यकृतवृद्धि कमी होण्याकरितां म्हणून दुपारीं २ वाजतां व रात्रीं निजतांना वज्रक्षार १/३ गुंज ऊन पाण्यांतून घेण्यास दिलें. वरील योजना ४ दिवस तशीच चालूं ठेवली.

तारीख ३१-३-५२ ला मलप्रवृत्ति अद्याप ४।५ वेळां होत असल्याचें व थोडा कासउद्भव होऊन खोकतांना मुलगी कण्हते असें परीक्षणांतीं कळून आलें. म्हणून सकाळ, दुपार व संध्याकाळीं लोहभस्म १/३ गुंज + मृगशृंगभस्म १/२ गुंज व शंखोदर १/४ गुंज यांचें मिश्रण मध व अडूळशाच्या पुटपाकांतून चालूं केलें वरील हमखास चिकित्सेनें ४ च दिवसांत ४।५ वेळां होणारी सद्रव मलप्रवृत्ति कमी होऊन १ च वेळ घन मलप्रवृत्ति सुरूं झाली. कण्हणें थांबलें, कास गेला व मुलीस थोडें बरें वाटूं लागून तोंडावर तेज येऊं लागलें. वरील औषधीयोजनाच आणखी चार दिवस तशीच पुढें चालू केली.

तारीख ९-४-५२ ला वरील औषधांच्या जोडीला यकृतवृद्धीवरील वज्रक्षार नंबर २ हें औषध दुपारीं व रात्रीं १/२ गुंजप्रमाणांत १ चमचाभर डाळिंब रसांतून चालूं केलें. व वरील सर्व औषधीयोजना पुढें १० दिवस चालूं ठेवली. पण मुलगी आईच्या अंगावर पीत असल्यामुळें व आई सांगितलेल्या पथ्यानें वागण्यांत मधूनमधून चुका करीत असल्यामुळें मुलीस पुनः ४।५ वेळां सद्रव व भसरट मलप्रवृत्ति होऊं लागली. म्हणून तारीख १९-४-५२ पासून औषधांत खालीलप्रमाणें फरक केला. सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्रीं चार चार तासांच्या अंतरानें ग्रहणीवज्रकपाट १/३ गुंज + दाडिमाष्टकचूर्ण १ गुंज दाडिमावलेहातून चाटण्यास दिलें. वरील औषध १० दिवस दिल्यावर अतिसृती थांबली. पण अशक्तता फार व यकृतवृद्धि अद्याप कमी नव्हती. आतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शौचास १।२ वेळां मळ वांधून होऊं लागलें. कृशता कमी करण्याच्या दृष्टीनें तारीख ३०-४-५२ पासून खालील औषधीयोजना सुरूं केली. सकाळ–संध्याकाळ मंडूरभस्म १/२ गुंज+मृगशृंगभस्म १/२ गुंज व गुळवेलसत्व १ गुंज गाईचें दूध व खडीसाखर यांतून चालूं केलें व दुपारीं व रात्रीं वज्र-क्षार नंबर २ १/४ गुंज प्रमाणांत कुटजारिष्ट १ चमचा यांतून सुरूं ठेवलें. ही योजना पुढें १ महिनाभर तशीच चालूं ठेवली. यामुळें मलप्रवृत्ति १।२ वेळां पण मधूनमधून सद्रव होई म्हणून मृद्वस्थि कमी होण्यास वेळ लागूं लागला. याचें कारण आईचें अपथ्य हेंच आहे असें मुलीच्या वडिलांकडून कळून आलें. या योजनेनें महिन्यांत यकृतवृद्धि मात्र पूर्णपणें कमी झाली व कृशता थोडी कमी होऊं लागली. बरग-ड्यांचीं हाडें पूर्वीं सुस्पष्ट जणुं अस्थिपंजरच मांसविहीन दिसत आहे असें वाटे. आतां हीं हाडें थोड्याशा मांसवृद्धिनें दिसेनाशीं होऊं लागलीं व मुलीस थोडें बाळसें येऊं लागलें. चेहरा टवटवीत दिसूं लागला: चिरचिरणें कमी होऊं लागलें.

तारीख ३।६।५२ पासून खालीलप्रमाणें औषधीयोजना सुरू केली. सकाळ-संध्याकाळ मंडूरभस्म १/२ गुंज + सुवर्ण-माक्षिकभस्म १/४ गुंज + मृगशृंभस्म १/२ गुंज यांचें मिश्रण मधां-तून सुरूं केलें व मलास घनता यावी म्हणून दुपारीं व रात्रीं दाडिमाष्टक चूर्ण दाडिमावलेह १ चमचा यांतून चारण्यास दिलें. ही योजना १५ दिवस चालूं ठेवली. यामुळें सुमारें आठ दिवसांनंतर दिवसांतून १ च वेळ घनमल प्रवृत्ति सुरूं झाली व कृशता झपाट्यानें कमी होऊं लागली. रक्तवाढीमुळें वरगड्यांचीं हाडें आतां बाहेर दिसेनाशीं झालीं. संग्रहणी आतां पूर्णपणें कमी झाली. व मुलगी दिवसेंदिवस सशक्त होऊं लागली.

तारीख १९। ६। ५२ पासून रक्तवाढ जोरांत व्हावी व मुलीची पचनशक्ति वाढावी म्हणून औषधीयोजनेंत खालील-प्रमाणें बदल केला. सकाळीं–संध्याकाळीं दिवसांतून २ वेळां लघुमालिनी वसंत १/२ गुंज + मंडूर भस्म १/२ गुं. व. गुळवेल सत्व १ गुंज यांचें मिश्रण दाडिमावलेह १ चमचा यांतून चालूं केलें व दुपारीं व रात्रीं भास्करलवण १ गुंज गोड ताजें ताक व पादेलोण १/२ गुंज यांतून पिण्यास दिलें. या नवीन योजनेनें रक्ताची वाढ झपाट्यानें सुरूं झाली. जुलाब तर पूर्वींच थांबून संग्रहणी रोगाचा निरास झालाच होता. आतां भास्करलवणानें अग्निवर्धनाचें उत्कृष्टपणें काम सुरूं होऊन पचन सुधारलें.

तारीख ४। ७। ५२ पासून सकाळ–संध्याकाळ लोहभस्म १/२ गुंज + नवायस १ गुंज व दाडिमाष्टक १ गुंज असें चाटण दाडिमावलेहांतून सुरूं केलें व दुपारीं व रात्रीं लोहासव हें शक्तिवर्धक व अग्निदीपक औषध १ चमचा प्रमाणांत दुप्पट पाण्यांतून घेण्यास दिलें. औषधी योजनेनंतर तारीख २५।७।५२ ला मुलीचें वजन करून पाहिलें तें १३ पौंड भरलें. मुलगी गुटगुटीत होऊं लागली व हिला पूर्वीं संग्रहणी व मृद्वस्थि झाली होती हें इतर लोकांस सांगितलें तर खरें वाटेना, असे मुलीचे आईबाप उद्गार काढूं लागले. वरीलच औषधीयोजना तारीख १४। ९। ५२ अखेर चालूं ठेवली व पुढें येथें औषधें चालूं ठेवण्याचें कारण नसल्यामुळें औषधो-पचार बंद करण्याचा रोग्याच्या आईबापांस सल्ला दिला व घरीं १ महिनाभर च्यवनप्राश अष्टवर्ग १/२ चमची सकाळ-संध्याकाळ चाटवून वरती गाईचें कढत दूध व खडी-साखरपूड घालून १ पळीभर पाजण्यास सांगितलें. आमच्या दवाखान्यांतील औषध बंद करण्याच्या शेवटच्या दिवशीं मुलीचें पुनः वजन करून पाहिलें तें १८ पौंड भरलें. म्हणजे सुमारें १।। महिन्यात मुलीचें पूर्वीपेक्षां ५ पौंड वजन वाढलें. जवळजवळ ६ महिन्यांच्या दीर्घकालानंतर संग्रहणी व मृद्वस्थि या दोन महान व्याधींतून आयुर्वेदीय दिव्यौष-धींच्या प्रभावानें जवळ जवळ असाध्यावस्थेस पोहोंचलेली ही रुग्ण मुलगी पूर्णांशानें बरी झाली. हा आयुर्वेदीचा केवढा मोठा विजय!

मुलीस याच्या निम्या काळांतच बरें झालें असतें पण मुलीच्या आईनें खाण्यापिण्याच्या बाबतींत आम्ही सांगित-लेलें पथ्य तंतोतंत पाळलें नाहीं म्हणूनच इतका दीर्घ काळ लागला.

वसंत मिश्रण
सुवर्णयुक्त टॉनिक
४० गोळ्या किंमत ४ रुपये
पोस्टानें मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातस्थानानि

लेखकः—गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

वातस्थानानि--

(२) कटी—श्रोणिमंडल—हें वाताचें दुसरें स्थान आहे. नाभीखालील पोटाचा भाग, व मागें नितंबाचा भाग या सर्वांचा समावेश यांत होत असतो. नितंब, किंवा श्रोणिफलक, व त्रिकास्थि यांच्या संधीनें—कटीमंडल, तयार झालें आहे. प्रत्येक नितंबास्थि कपालास्थि वर्गांत येतात, बाल्यावस्थेंत यांचे तीन भाग असतात.

त्रयः कटीकपालेषु। सु. शा.

पैकीं वरील भाग रुंदट व चापटका असतो. तरुणपणीं तीनही एकमेकांस जोडले जातात. व त्यावर तुन्नसेवनी संधी दिसतात. या श्रोणिमंडलाचे आश्रयानें, पोटांतील अनेक अवयव राहतात.

वस्ति बस्तिशिरोमेढ्रकटी वृषण पायवः।
एकसंबंधनाः प्रोक्ता गुदास्थिविवराश्रयाः।
—वा. नि. ९

कटीकपालास्थि जोडून जी एक पोकळी तयार होते, तींत, बस्ति (मूत्राशय), वस्तिशिर (वृक्क व गविनी), शुक्रवाहिनी, शुक्राशय, पक्वाशय आणि गुद इतके अवयव असतात. शिवाय स्त्री--शरिरांत गर्भाशय, बीजकोश, फल वाहिन्या, हेहि अवयव श्रोणिमंडलांतच असतात. या अवयवांचें पोषण करणाऱ्या, अधोगामी धमन्या, रसवाहिन्या, शोणितवाहिन्या, स्नायु—पेशी—स्त्रोतसें ही एकमेकांस संबंधित असतात. मांड्याच्याकडे-पायाच्याकडे जाणाऱ्या शिरा, स्नायु, धमन्या याच भागांतून जात असतात.

श्रोणि मंडळांत जे अवयव आहेत त्यांचे व्यापार मुख्यतः वातप्रधान आहेत. उत्सर्जन अथवा वियोजन हीं वाताची क्रिया प्रामुख्यानें शरीरांतील या अवयवांतच आधिक्यानें दिसून येतें.

तत्र समासेन वातः श्रोणिगुदसंश्रयः।—
सु. सू. २१

वायूच्या प्रेरणेनें यांतील सर्व अवयवांचे व्यापार चालतात.

अधोगमास्तु धमन्यः वातमूत्र पुरीष शुक्रार्तवादीन्यधो वहन्ति॥ —सु. शा. ९

सर्व शरिरांतील अंतर्भागांत निर्माण होणारा मल शरीर उदकांत विद्रावित करून तो द्रव मल, कटीमधील मूत्राचें आशयांत आणून पोंचवावयाचा, व तो आशय मूत्रानें पूर्ण भरावयाचा, भरला म्हणजे, त्याची जाणीव बुद्धीला करून तो मूत्रनाली, व मेहनद्वारें शरीरांतून बाहेर उत्सर्जित करावयाचा. ही अंतरभागांतील अवयवांची शुद्धि करावयाची म्हणजे अनेक गोष्टी यांत घडतात. धातूपासून मल सोडवावयाचा त्याचें पृथक्करण करावयाचें, त्याला योग्य मलायनाकडे त्या मलायनांतील योग्य त्या चाळणींतून काढावयाचा. त्यांतही पुनः विवेक असतो. कुणाला बाहेर जाऊं द्यावयाचें, कोणाला जाऊं द्यावयाचें नाहीं अशा अनेक क्रिया कराव्या लागतात. पूरण, विवेक, धारण, चलन, उद्वहन—या पांच क्रियेंत सर्व क्रियांचा समावेश होतो. या कार्यावरून वाताचे कार्याची कल्पना येते. मूत्राशय भरला, म्हणजे एक प्रकारची गति अथवा चालना सुरूं होते. एक खोल श्वास आंत घेतला जातो. नाभी खालील पोटाच्या व विटपाच्या स्नायूचें आकुंचन होऊन त्यांचा दाब मूत्राशयावर पडतो. मूत्राशयांतील स्नायू संकुचित होतात. त्यांचा दाब मूत्रावर पडतो. याच वेळीं, अधोभागीं असलेले वस्तिमुख विस्तृत केल्यानें मूत्र, मूत्रनालीवाटे बाहेर पडतें. या सर्व क्रियेवरून वाताची कल्पना केली जाते.

मूत्र उत्सर्जनाप्रमाणें शुक्र उत्सर्जनाची क्रिया येथेंच चालते. सर्व शरीर धातूंतील सारवान. घटक बीजरूपानें, वृषणाकडे आणून त्यांना शुक्राचें रूप देऊन, हें शुक्र, शुक्राशयांत संचित करून स्त्री संभोगकाळीं, किंवा स्वप्नावस्थेंत या शुक्राशयावर दाब घालून त्यांतील रेताचे स्खलन करण्याचें कार्य होतें. ही क्रिया वातामुळेंच होत असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्वयंगुले दक्षिणे पार्श्वे बस्तिद्वारस्य चाप्यधः।
मूत्रस्रोत पथाच्छुक्रं पुरुषस्य प्रवर्तते॥

—सु. शा. ४

याच प्रमाणें, स्त्री-देहांत, रजोत्पादन, मासिक रज-प्रसेक, बीजोत्पादन, ऋतुकालीं, बीजप्रसेक गर्भसंभव, गर्भपोषण, व योग्य काळीं गर्भ निष्क्रमण या सर्व क्रिया या श्रोणि मंडळाच्या विवरांच घडून येतात. मल, मूत्र, शुक्र, आर्तव, गर्भ यांचें उत्सर्जन करण्याची क्रिया कटीकपालामधील अवयवां मार्फत वायु घडवून आणतो. उत्सर्जन-अथवा विक्षेपण ही वाताची मुख्य क्रिया. ती येथें आढळून येते. यास्तव कटी अथवा श्रोणि हें वाताचें स्थान म्हटलें जातें. हे व्यापार करण्यांत वातशक्ति पुष्कळ प्रमाणांत खर्ची पडते. कटीमधील भावांचे उत्सर्जन करणाऱ्या वाताला अपान वायु असें नांव आहे. श्रोणिमंडलांत पश्चात भागी त्रिकास्थि म्हणून त्रिकोणाच्या आकाराचें हाड आहे. या अस्थिमधून अपानाच्या वातवाहिन्या निघतात, त्या श्रोणिमंडळांतील अवयवाकडे जातात. व त्या त्या अवयवांचे व्यापार सुसूत्र घडवून आणतात. त्याच प्रमाणें या त्रिकास्थीचे पोकळींत मज्जा आहे. तिला योगशास्त्रांत कदाचित् "कुंडलिनी" म्हणत असतील. त्रिकांतील मज्जा हें प्रमुख वातस्थान आहे. कोणत्याही प्राण्याच्या क्रिया पाहिल्या तर त्यांतील विक्षेपण ही वातक्रिया येथील वातवाहिन्याद्वारा घडून येते असें दिसून येतें. प्राणी जसजसा उत्क्रांत होत होत गेला तसतशी त्याला वुद्धि प्राप्त झाली, व तदनुसार त्याला मस्तिष्क प्राप्त झाला. मानव प्राण्याला सर्वांत अधिक वुद्धिमत्ता आली-त्याचा मेंदू वाढला; पण प्राणी म्हणून पाहतां, त्याला लाभलेली चालनाशक्ति, या त्रिकास्थी मधील वातचक्रांकडूनच निघालेली आहे. ज्या प्राण्यांचा मेंदु उत्क्रांत नसतो त्याचे उत्सर्जनादि व्यापार पाठींतील त्रिकास्थीमधील वातचक्रावरच चालतात. गर्भ-शरिरांत याच अवयवाची वाढ प्रथम होते. व पुढें पुढें वुद्धि-केंद्रांची वाढ प्रथम होत असते. यासाठीं श्रोणि हें प्रमुख वाताचें स्थान म्हटलें जातें. प्राणी म्हणून जगण्यास या स्थानांची अत्यंत आवश्यकता आहे. मनुष्य हा प्राणी आहे.' शिवाय बुद्धीमुळें तो आणखी कांहींतरी आहे हे निश्चित. पण प्रथम प्राणी आहे. प्राणी म्हणून जगण्यास चालना-शक्ति येथून मिळते. पुढें बुद्धीच्या विकासानुसार या सर्व गोष्टी त्याला त्याच्या ताब्यांत येऊं शकतात. मस्तिष्का-कडून निघणाऱ्या वाहिन्यांमार्फत वातकार्य दिसून येतें. सर्व वातचालना बंद ठेवून कुंडलिनी जागृत झाली म्हणजे सर्व शक्ति आपल्या ताब्यांत आपणांस आणतां येतात. सर्व शक्तींचें उगमस्थान कुंडलिनी हें आहे, असें योगशास्त्रहि सांगतें. यावरूनहि आयुर्वेदीयांना श्रोणी हें वातस्थान वाटलें असावें. पूर्व काळीं वैद्य हे योगीहि असावेत.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस
लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्टौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच
आमचें वैशिष्ट्य!!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.
टे. नं. ३१७९६ Telegrame-AYURVED.

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० कियतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विक्रीस मिळतें अगर

कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस्. एम्. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

RASA, GUNA, VEERYA, VIPAKA, PRABHAVA

(continued from the last issue)

VIPAKA

Having noted the impossibility of explaining the conception of the sixty-three different combinations of 'Rasas' or the mention of the 'rasas' of metals like gold and silver as sweet or sour, both of which appear to be fundamental concepts in the practical application of the theory of the "Rasa, Veerya, Vipaka, and Prabhava", we have had to conclude that the 'rasa' of a substance was not its 'taste' (alone) but was possibly a "SWA-SAMDNYA" of Ayurveda which defined the probable preponderant 'bhootas,' which entered the body when certain food or drug substances were 'crudely' tested by the organ of taste. The Charcha-parishada, in my view, would do well to consider the basic nature of this question and determine whether it would be justifiable to continue the old interpretation that 'rasa' was the 'taste' of a substance.

[As a matter of fact modern physiology has established some very interesting facts in this connection. (i) That the 'taste' is a sensation of a special kind caused by the stimulation of the end organs of taste by 'sapid' —having a taste; The fact that not all substances have a 'taste' is obvious enough—— substances. (ii) That these taste end—organs have a limited capacity or range for getting stimulated. Very cold or very hot substances will diminish or destroy the sensitiveness. (iii) that the taste sensations are very numerous but they are combinations of four *fundamental* taste sensations; Sweet, Sour, Salty and Bitter; (Just as the Nyaya-Vaisheshika commentators did away with the seventh taste 'Kshara'—alkaly—by calling it a desquamatory process and no 'taste', so also modern physiology, with perhaps far more justification, has done away with the ayurvedists' 'Ushana' (Pungent) and 'Kashaya' (Astringent) tastes (Rasas ?) by defining the former as caused by odour and common sensibility, and the latter by salty taste and common sensibility. (The incongruity in the idea of FOUR Fundamental *tastes,* and SIX Rasas, is too patent to be glossed over.) (iv) that there are chemically pure substances like Sodium sulphate which will 'taste' differently when placed on different portions of the tongue.—salty on the tip and bitter on the posterior part; —(v) that stimulation of the nerve carrying the sense of taste..the Chorda tympani..by mechanical or electrical means also causes *taste* sensations; (showing that the 'rasa' is not a 'rasana-matra-grahya-guna' but is also a 'guna' (property), of the specific nerve energy, of an individual nerve). Likewise, Ayurveda itself has stated the "sweetness", "bitterness" etc. of the mouth when particular 'doshas' are predominantly imbalanced in the body, a fact borne out by the 'sweet' taste which may be experienced by the diabetic patient, or the 'bitter' taste in a patient with Jaundice, but these 'tastes' are those of sugar and bile respectively, circulating in the patient's blood. The coneeption of 'Taste' as 'Rasa' will therefore seem to be inadequate and in some cases at least will lead to very inaccurate conclusions.]

We may also consider the descriptions of the rasas given in Ayurveda of a simple food stuff like meat; One wonders whether the 'tastes' given could be applicable to the

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

meat eaten by itself, raw or roasted; (For preparations of meat must obviously have the 'tastes' of the condiments used. and the method of cooking adopted;) Yet one would find a careful classification made and different properties described of not only common flesh like beef, pork or mutton, but of various rodents and amphibians and underwater life; The habitat of animals, dry or marshy, and, in the case of birds, the way of getting their prey, whether by gnawing with the beaks or after killing the prey, would seem to cause different properties in the flesh. The flesh, is madhura, guru, snigdha and ushna in cases where it is taken from life which is accustomed to overcome its prey and then eat it, whereas it is madhura laghu and sheeta in the case of birds, who eat their meals by morselling it with their beaks.

What could have been the 'tests' used to determine these varying properties? Were they merely matters of wild conjecture, or of hard, prolonged and wide experience, or had they any scientific basis? The flesh of the goat is described to have properties different from that of a very similar variety of animal the sheep (?) : (the goat with the curly hair is styled as the 'Avi' and the sheep with the longish but comparatively thinner coat of hair is called the 'Aja'). "Although their habitat' is difficult to be classified definitely they being found both in marshy and dry lands,' states Charaka, (Soo : 27/61-2-3), "the flesh of the 'Avi' is madhura and guru and therefore a strong nutrient (Brinhana) while that of the 'Aja' being slightly (not too) sheeta, guru, or snigdha (fatty), as well as having a close similarity to the flesh of the human being, does not produce any 'watery swelling' (abhishyanda) of the tissues, and is not productive of any 'doshas' (substances capable of producing pathological changes)."

Leaving aside this imposing detail of the different properties of a simple substance like meat, what are we going to say about the 'gradations' of 'taste' found in substances like 'Curds, Honey, Grapefruit and Sugar' as described in the popular verse? Or of substances like lead-acetate, saccharine and sugar which are all 'sweet' but will have obviously different reactions in the body, or of ghee and starch which are really 'tasteless', but are described in Ayurveda as 'Swadu', that is having a 'sweet' taste ?

[In the absence of accurate experimental data,——I have no knowledge of any experiments performed to determine the exact nutritive and metabolic values of the above described varieties of flesh—one can only make a conjecture which may be right or may be proved to be wrong; I would personally like to believe that these 'gunas' have a scientific meaning ascribable to them; We all know that the food substances of modern Physiology, Proteins, Fats and Carbohydrates, have all got a specific dynamic action which is highest in the case of proteins. It will be very interesting to see whether the flesh of these different animals and birds, described above, (Sushruta even recognises a difference in the flesh of Sakthi, Skandha, Kroda, thighs shoulders, chest etc.—" Sakthi-skandha-kroda-yakrit antrani uttarottara gurutaraha" Su : Soo : 46/130) exhibit different proportions of protein and other constituents, or different degrees of specific dynamic action. (That lean beef, fat beef and egg have 82, 51 and 56 per cent. protein, respectively, in the dried state, may justify an inference that

CC-0, In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

at least for equal quantities consumed, their specific dynamic action will be different :) Then one might perhaps be able to verify whether the 'sheeta' (cold) and 'ushna' (hot) properties are accurately described; One may then perhaps, also be in a better position to explain how two substances which are both 'madhura' can have different 'potencies' (Veerya).]

अर्थ—रस पारदाला हीरक सुवर्णगंधक यांचें जारण न करतां त्याच्यापासून महत्फलाची म्हणजे गुणाची जे अपेक्षा करतात ते वैद्य शेतांत बी पेरल्याशिवाय पुष्कळ धान्याची अपेक्षा करणाऱ्या मूर्ख शेतकऱ्याप्रमाणें मूर्ख होत. यावरून रस हृदयकार यांच्या दृष्टीनें केवळ अष्टसंस्कार केलेल्या पारदानें विशेष गुण मिळणें शक्य नाहीं. तर मग रसायनांतहि त्यापासून मिळणें केव्हांहि शक्य होणार नाहीं. इतकेंच काय पण व्याधीविध्वंसनाचें कार्य करण्याची शक्ती पारदांत येण्याकरितां समगुण गंधक जारणाची अत्यंत आवश्यकता आहे.

श्लोक—रस गुण बलिजारणं विनाऽयं न खलु रुजा हरणक्षमो रसेंद्र (रस. चिंतामणी)

अर्थ—रसेंद्र हा समगुण गंधक जारण केल्याखेरीज व्याधीहरण करण्याला समर्थ होत नाहीं. केवळ व्याधी नाशाकरतां जरी पारदाचा उपयोग करावयाचा असला तरीसुद्धां समगुण गंधक जारणाची आवश्यकता शास्त्रकारांनीं मानली आहे. अष्ट संस्कारांत कोणत्याहि जारणाचा अंतर्भाव होत नाहीं. म्हणून औषधी क्रियेला अष्ट संस्कार पुरे आहेत. असें प्रतिपादन करणें चुकीचें आहे. रसायनाचे दृष्टीनें विचार करतां पारदाला सुवर्ण अभ्रक सत्व यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जारण झाल्याशिवाय रसायनत्व येत नाहीं. इतकेंच नव्हे तर पारदाचे जे समगुण आहेत त्याचासुद्धां प्रकाश जारणाखेरीज तो करूं शकत नाहीं.

श्लोक—अजारितो रसो देवि नैव कुर्यान्निजं गुणं ।

रसकामधेनू

पारदाला जारणसंस्कार झाल्याखेरीज त्याचे स्वतःचे गुणसुद्धां तो उत्कटत्वानें देऊं शकत नाहीं. रसायन हा गुण पारदामध्यें स्वयंसिद्ध नाहीं; तो अन्य पदार्थांच्या जारणांनीं मात्र निःसंशय उत्पन्न होतो, अशी शास्त्रकारांची प्रतिज्ञा आहे.

श्लोक–न जलद कलधौत पाकहीनः स्पृशति रसायनतामिति प्रतिज्ञा । –रसहृदय

वरील रसहृदयाच्या वाक्यावरून शास्त्रकार पारदाचे रसायनत्व सिद्ध होण्याकरितां जारणादि संस्कार करणें अत्यंत अवश्य आहे. अष्ट संस्कारानें पारद निर्दोष होण्यापलिकडे कांहींही होत नाहीं. जारणेंतसुद्धां महत्त्वाच्या पदार्थांचा समावेश केल्याखेरीज पारद महत्त्वाचीं कार्यें करूं शकत नाहीं. इतर उपायांनीं असाध्य व्याधी बरें होत नसल्यानें व संस्कारित पारदाचा उपयोग असाध्य व्याधीवर होतो म्हणूनच पारदाला औषधी शास्त्रांत अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे.

श्लोक—असाध्येष्वपि दातव्यो रसोऽतः श्रेष्ठ उच्यते।

यावरून व्याधीवर सर्व प्रकारची चिकित्सा केल्यानें यशस्विता न आल्यानें निराश झालेल्या स्थितींत जारण संस्कारित पारद कल्पाच्या चिकित्सेनें यशप्राप्ती झाल्याशिवाय रहात नाहीं.

श्लोक—समाभ्रजीर्णः शिवजस्तु बालः संसेवितो योग युतो जवेन रसायनो भावि गदापहश्च सोपद्रवारिष्ट गदान्निहन्ति ॥

र. र. स.

वरील श्लोकांत अभ्रक सत्व समप्रमाणांत जारण केलेल्या पारदाचे गुणवर्णन केले आहेत. त्यांतल्या त्यांत शेवटच्या चरणावर वाचकांचें लक्ष आम्ही वेधीत आहोंत ! त्यांत उपद्रवानें युक्त रिष्ट लक्षणांनीं युक्त अशा व्याधीचा पारद सम अभ्रक जीर्ण पारद कल्प नाश करितो असें शास्त्रकारांचें म्हणणें आहे. एवढ्याकरितां तरी वैद्यांनीं पारदाचे पुढील संस्कार अवश्य करावेत, म्हणजे रसायन गुणधर्माबरोबर असाध्य व्याधीचा नाश करणारें औषध वैद्यांचे हातीं येईल, परकीयांच्या नित्य नव्या शोधांनीं जनतेची वृत्ति आयुर्वेदाला प्रतिकूल होत चालली आहे. अशा वेळीं

हैद्राबाद शहरांतील
अर्कशाला औषधांचे
प्रमुख विक्रेते
आयुर्धाम मेडिकल हॉल
★
रेसिडेन्सी बस स्टँड समोर
सुलतान बझार, हैद्राबाद,
यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि.,
सातारा यांचीं सर्व औषधें मिळतात.

नित्योपयोगी अर्कशाला औषधें
एग्युमिक्श्चर
कोणत्याही ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, किंबहुना प्रारंभीं एकमेव औषध म्हणून एग्युमिक्श्चरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें येणारा ताप, एन्फ्लूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाभिमान्यांनीं चुकीच्या समजुतीनें कांहीं उत्तमोत्तम रसायनास जन्म देणाऱ्या पारद संस्काराला विन्मुख व्हावें ही अत्यंत खेदाची गाष्ट आहे. म्हणून सूज्ञ वैद्यांनीं रस-शास्त्राचें सूक्ष्म अवलोकन करून महत्त्वाचे संस्कार केल्यानें अमृतमय अशा रसकल्पाची निर्मिती करून जनतेला असाध्य अशा व्याधीपासून मुक्त करण्याचें श्रेय घ्यावें.

आर्या—अमृतत्वंहि भजन्ते हर मूर्तौं योगिनो यथा लीनाः। तद्वत् कवलित गगने रसराजे हेम लोहाद्याः।

—र. स. हृ.

अर्थ—योगी लोक शंकराच्या ठिकाणीं देहात्मभाव विरहित होऊन शरण गेले असतांना ते अमृतत्वाला पावतात; त्याचप्रमाणें सुवर्णादि सर्व धातु अभ्रक सत्वग्रासानें स्थिर झालेल्या पारदांत जीर्ण झाले असतांना ते अमृतत्वाला प्राप्त होतात, म्हणजे तो रसकल्प अमृतच होतो. या वचना-प्रमाणें अशीं अनेक वचनें काढून दाखवितां येतील कीं अर्थवादात्मक न राहतां प्रत्यक्ष फलदायी होतील म्हणून 'न ते वैद्योपयोगिनः' हें वचन चुकीचें आहे, असें म्हणावें लागतें. यावरून जबाबदार माणसांनीं या विषयाचें प्रतिपादन करावयाचें असतां चरकाचार्यांनीं सूचीत केल्या-प्रमाणें (शास्त्रमेवादी परीक्षेत) रसशास्त्राचे योग्यायोग्य असें ग्रंथकार निवडावे ते खालीप्रमाणें—रसार्णव, आनंद-कंद वगैरे आद्य रसग्रंथ. त्यानंतरच्या कालांतील रस हृदयादि व त्यानंतरच्या अलिकडच्या कालांतील आयुर्वेद प्रकाश रसराज सुंदर वगैरे तृतीय श्रेणीचे ग्रंथ. न ते वैद्यो-पयोगिनः हें वचन तृतीय श्रेणीच्या ग्रंथकारांनीं अंगिकार-लेलें आहे. त्याचा वरील दोन श्रेणींच्या ग्रंथकारांनीं मुळींच अंगिकार केलेला नाहीं इतकेंच नव्हे तर त्याचें विवेचन सर्व संस्कार संग्रहात्मकच आहे, सोप्यासोप्या गोष्टी करून आधिक श्रेय मिळविण्याची कल्पना ही अगदीं अलीकडील ग्रंथकारांत आहे व ती कल्पना त्याज्यच आहे. एवढ्या विवेचनावरून उत्तम रसकल्प (औषधीकरणाचे) ज्यांना हवे असतील त्यांनीं पारदाचे संपूर्ण संस्कार करणें भाग आहे आतां पुढील संस्कारांना द्रव्योपयोगिताच कशी आली याचें विवेचन सवडीनें पुढें केव्हांतरी कर-ण्याचें आश्वासन देऊन हा लेख येथेंच पुरा करीत आहें.

———

संपादक,

'आयुर्मीमांसा'

सातारा.

कृ. सा. न. वि. वि.

सोबत वैद्य दुधगांवकरांचा लेख व त्यावरील माझें उत्तर पाठविलें आहे.

"१।४।५२ चे आयुर्मीमांसेचे अंकांत पारदाच्या अठरा संस्कारासंबंधानें:—

"धातुविद्येंत पारदाचे अठराही संस्कार करावे लागतात. औषधी प्रक्रियेंत मात्र पहिले आठ संस्कार पुरेसे होतात. जसें:—

इत्यष्टौ सूत संस्काराः समाद्रव्ये रसायने।
शोषा द्रव्योपयोगित्वान्नते वैद्योपयोगिनः॥

—वृ. र. रा. सुं.

असा मजकूर छापला आहे. परंतु वै. स. व कुलकर्णी दुधगांवकर कोल्हापूर ह्यांनीं ह्याबाबत जेष्ठत्वानें खुलासा केल्यावरून त्यांनीं संमत केलेला खालील मजकूर पूर्वीच्या ठिकाणीं घेतला पाहिजे.

"कांहीं ग्रंथकारांनीं त्या अठरा संस्काराचे दोन भाग केले आहेत. त्यांचे मतें पहिलें आठ संस्कार औषधोपयोगी; तर दुसरे दहा संस्कार रसायन व द्रव्योपयोगी होत. ही विभागणी तारतम्यानें समज-ण्यास हरकत नाहीं. वर सांगितलेले अठराही संस्कार देहलोह सिद्धीकरितांच उपयुक्त आहेत. असें रसार्ण वांतील विवरणावरून दिसतें.

वै. स. ब. कुलकर्णी ह्यांनीं ही चूक नजरेस आणून दुरुस्ती मान्य केली ह्या बद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. क लो अ. ही विनंति."

—पु. वि. धामणकर

वैद्य धामणकर यांनीं पारदा संबंधींचा मूळ लेख दुरुस्तीसह छापण्याची सूचना केली आहे. तो पुढील अंकीं छापीत आहोंत.

—संपादक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

RASA, GUNA, VEERYA, VIPAKA, PRABHAVA

(continued from the last issue)

VIPAKA

(Chakradatta's interpretation of Dridhabala's view : An alternative interpretation suggested.)

Let us then state what Dridhabala wrote about the matter.

" Annasya bhuktamatrasya shadrasasya prapakataha;

Madhuradyat Kapho BHAWAT phenabhoota *udeeryate;*

Param tu patchyamanasya vidagdhasyamla–BHAVATAHA,

Ashayat chyawamanasya Pittam achcham *udeeryate;*

Pakwashayam tu praptasya shoshyamanasya vanhina,

Paripindita pakwasya Vayuhu syat katu BHAVATAHA."

I will first give a free translation of the above verses according to what seems to be Chakradatta's view :

" *Immediately* on the eating of *food* of all six rasas, from the preliminary *sweetness* an effervescent Kapha is secreted in the first stage of digestion; (' Prapakataha it prathama pakataha) * But later, (' param tu ') or, according to another reading, ' but ' (parantu), from the (acidity) sourness of the partly digested and partly undigested food which is undergoing digestion and which is *descending from the stomach* (ashayat chyawamanasya) a clear pitta is secreted; § Having reached the large bowel, being dried by the fire and fully digested to form massses of formed scybala however, the pungent character of the food *may lead* to the production of Vayu (Wind ?)"

The absence of any reference to ' rasa ' in the original verses should really have been noted by commentators, and some attempt made by them to explain the use of the word ' Bhawat ' (Constitution or composition or character); Chakradatta seems to have taken note of the fact that this description is applicable only to changes brought about in ' food '—and, inferentially has no reference to pharmacology or changes brought about in drugs,—since the preceeding verses forming the context describe the mechanism of ' food ' entering the bowel. ("Annam adana-karma tu pranaha koshtham prakasrhati"—the food is drawn into the bowel by ' Prana ' of which the function is that of ' taking '). Yet there is an absence of any clear-cut definition distinguishing ' food ' and ' drugs ', at least in the present texts of Ayurveda, and this recognition has not prevented him from causing a confusion about ' inferred changes peculiar to certain

* The use of the verbs ' udeeryate ' in connection with Kapha and Pitta is construed by some to suggest the intention of the author to say that these were ' secretions ' and the ' phenabhoota ' and ' achcham ' refer to the fluid part and ' enzyme ' content of the secretions ! The verb ' syat ' (may be), in their view, suggests ' inference ' which is very apt, since Vata is only ' sookshma ', that is subtle or intagible, in Ayurveda; Quite a majority, however, believe that the fundamental Kapha, Pitta and Vata are stated by these verses to be *produced* in these places and from there govern processes in the rest of the body.

§ ' Becomes operative as a digestive fluid ' is a translation preferred by some people since " Udeeryate " appears to have a relation to " Udaryaha " which means the body-fire.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

substances' (dravya–niyata nishthapaka') and routine changes—which are supposed to be capable of being appreciated by the sense of 'taste'—during the three *stages* of digestion (Awastha-paka). He clearly seems to hold the view that 'Bhawat' stands for a change in 'taste', for he states : Amlabhawataha iti Jatamlaswaroopataha? that is, 'from the amla-bhawa means from the acquired sour character'; Indeed one who reads his commentary with a view to get some added light on the matter under discussion in the text, becomes only more perplexed after reading it, since he does not himself seem to be sure of what he is stat-ing. In the beginning he seems to doubt whether all the six 'rasas' are convert-ed into a 'sweet' taste, especially *immediately* on food being eaten, and states that this statement may be taken as an adorning, i. e. general statement ('prashastyena abhi-dhanam') only. But he immediately goes on to correct his incredulity by saying: "or it *may be* that it IS meant that all six 'rasas' manifest sweetness first! ('athawa prathamam madhurata nirukta bhawati iti'). He has no doubts about the 'sour' character of the food descending from the *stomach* giving rise to the 'Pitta', for he states, 'ashayat' stands for 'amashayat'! Similarly he tries to explain the statement 'shoshyamanasya vanhina' (being dried by the fire) which sounds unconvincing since the 'fire' can only 'burn' upwards (!), and the food here has already arrived below the 'fire', that is in the large bowel. He draws attention to the fact that the author, Dridhabala, changed the verb 'patchyamanasya' (being digested) to 'shoshyamanasya' (being dried) since the action of fire is not *efficiently carried below it* ('yatashchadhogamane samyagvan-hivyaparo nasti ataha 'patchyamanasya' iti padam parityajya 'shoshyamanasya' iti kritam').

Having described these 'three stages' of digestion Chakradatta indulges in a scholarly discourse on the apparent contradiction between the 'rasas' described in these 'stages' and those described in defining the Vipakas, by the verse,

"Katu-tikta-kashayanam vipakaha praya-shaha katuhu;
Amlomlam patchyate swadurmadhuram lavanastatha;"

and tries to explain the differences in *tas-tes* of the 'dravyaniyata' (peculiar to the substance) paka (digestion), and the general 'taste' according to the stage of digestion of the whole meal (awastha-paka).

His comparison of the body-fire to the physical fire of the outside world, and his arguments about the 'awastha-paka' not affecting the 'nishtha-paka' but creating more or less Kapha, Pitta etc. depending upon a sort of algebraic sum of these 'pakas'—yadi awasthapakasya shleshmajanaka rasa anuguna bhawanti tada sa bahu shleshmanam janayati, yada vipareeta katukadi parigriheeto bhawati tada stokamatram kapham janayati ewam pittajanaka awasthapake api vachyam"—would show that the guiding principle of this commentator was not 'scientific' but more or less, quasi-philosophical or conjec-tural. His controversy with the view expounded by other authors that the 'awas-tha-pakas' lead only to a 'stimulation' of the Kapha-Pitta-Vatas but does not bring on any increase in them quantitatively, which only occurs at the time of the Nishthapaka, which he styles as baseless, ("yattu anena

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

awasthapakena kapha–pittayoreeranamatram kriyate natu vridhdhihi, vridhdhihi nishtha-pake ewa bhawateeti wadanti, tadutpattish-oonyam bhati") and his emphasis on his own view that the Kapha–Pitta (etc.) *increase* due to awastha—pakas, by Nishtha—Pakas they are produced in the nature of *excretions*: ("awasthapakat Kapha--pittayorvridhdhihi; tatha nishthapakat cha malaroopataya utpada iti yuktam pashyamaha") is in a line with the general trend of his arguments.

All commentators who have followed Wagbhata would seem to have been influenced by his having changed Dridhabala's 'BHA-WATAHA' into 'Rasas'; Wagbhata wrote:—

"Adau shadrasam api annam MADHU-REEBHOOTAM eerayet phenibhootam Kapham,

yatam vidahat AMLATAM tataha Pittam *amashayat* kuryat chyawamanam

chutam punaha agnina shoshitam pakwam pinditam KATU marutam" Wagbhat: Sh: 3/57–8

It can be easily seen that Wagbhata has changed the 'Madhuradyat Bhawat' of Dridhabala into 'Madhureebhootam' and likewise the other 'bhawataha' into 'amlata' and 'katu', thus attributing 'tastes' to the Kapha, Pitta and Vata; What was the result? Wagbhat's influence led the commentators who suceeeded him to create a wholly imaginery contradiction between the 'tastes' produced during the *stages of digestion*, and the inferential change in the 'operative guna' (Vipaka–rasa) observed in certain drugs.

In my view the discussion on these three verses written by Dridhabala has proved to be the greatest misfortune of the Ayurvedic doctrines. The commentators have shown a tendency to over-simplification of the 'Bhawataha' of Dridhabala, thus creating a wholly unnecessary confusion. None of them, unfortunately, seems to have given any thought to the peculiar meaning which the word 'Bhawa' seems to have had at the time of Agniwesha. A reference to Charaka Shareerasthana 4/13 and 5/5 should provide a clue to the meaning of 'Bhawa' and also to the way in which the original doctrines tried to explain the working of the whole *human* bio–physical machine with the similar 'cos-mic' machine of which it merely formed a facsimile. But it would seem that already between the time of Agniwesha and Dridha-bala the partisans of the Nyaya–Vaisheshika school of philosophy had unwittingly succee-ded in obscuring the 'fundamental' thought of the science and replacing it by 'dialecti-cal' and 'grammatical' discourses; In Sha-reerasthana 5/3 Agniwesha is credited to have asked Atreya:

"We do not understand the implied mean-ing of this sentence merely by statement of the sentence; we would like, therefore, to listen to its elaboration, made by your wor-ship, with intelligence." ("Naitawata waky-enoktam wakyarthamawagahamahe, Bhaga-wata budhdhya bhooyastaramatonuvyakhya-yamanam shushrushamaha iti")

The sentence was:

"Just as many cognisable things are there in the Cosmos as there are in Man (Life); as many in Man (Life) as there are in the Cosmos;" ("Yawanto hi loke...moortimanto... bhawawisheshastawantaha purushe, yawanta-ha purushe tawanto loke")

and Atreya detailed the 'things' or fact-ors forming the Cosmos and man as 'incal-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

culable' (aparisamkhyeyaha) in the ultimate analysis, yet gave a description of the gross ones. If, forgetting this 'basic' subtle character of the principles, some one were to make an attempt to find out all the '92' 'elements' of the modern sciences into the human body or else hold the sentence as wrong, he would only be guilty of committing a mistake just similar to the one made by these commentators. (Modern 'Authorities' in the science of Ayurveda have been observed to pose the question: "If there was a division like Tridhatus, Tridoshas, and Trimalas acceptable to the authors why have not they mentioned it explicitly at any place?" This inspite of the fact that Charaka—as extant—clearly defines the 'Object' (Prayojana) of the science as "Dhatu-Samya" ("Dhatusamya kriya chokta tantrasya asya prayojanam" Cha: Soo: 1/53), that is rendering the 'Dhatus' normal. Perhaps these worthies think that the samya mentioned here is that of the blood flesh–marrow types of Dhatus and *not* of the Tridhatus, however absurd such an argument would make the science of Ayurveda!)

The 'Bhawat' of Dridhabala perhaps might have referred to the Prithiwee Apaha Tejo Wayuhu Wiyat (Earth, water, Fire, Wind and Void) which are clearly stated to have stood for Grossness, Keeping together, Optimum temperature, Motion and Room in interior ("Tasya purushasya prithiwee moortihi, apaha kledaha tejo-abhisantapaha wayuhu pranaha, wiyat sushirani..." Ch: Sh: 5/5) and *not* for the 'tastes'. Indeed Sushruta in Soo: 40/11-2 "dravyeshu patchyamaneshu yeshu ambu-prithiwee *gunaha* niwartante adhikaha—etc." and Charaka (Dridhabala himself) in Chikitsasthana 15/13 "Bhoumapyagneyawayavyaha panchoshmanaha sanabhasaha panchaharagunanswanswanparthiwadeen pachanti hi" are still seen to make a reference to the 'ultimate metabolism' without reference to a 'rasa'. The Samkhya philosophy postulated that the Cosmos (inanimate part of it) was formed by five sub-material fundamentals called 'tanmatras' and attributed the formation of 'moortimant' 'bhawas' (gross matter) of the body to a peculiar inherited group of 'tanmatras' of the body. The Void-Wind tanmatras acting in unison forming the first, the Teja tanmatra acting by itself the second, and the Water-Earth tanmatras acting in unison forming the third tanmatric combination. This was the 'Trivrit-karana' of the five tanmatras and, in the body of a living thing, they came to be known as the Vata, Pitta and Kapha respectively. They controlled the very subtle unformed and continuous motions (a-sanghatawant and anawasthita Vayu), which were necessary to bring on the dis-assimilation of gross products in the body which led to the production of 'heat' (teekshna—Pitta), and also the assimilative processes which stored energy in the body (Sheeta-sthira Kapha), and therefore received the names of Vata (motion), Pitta (heat) and Kapha (cold). Perhaps this shows us what might have been meant by Dridhabala, but no thought having apparently been given to it a gross anatomical interpretation was attempted. We might examine with advantage how the meanings attributed to the verses by the commentators appear very unfortunate and fanciful in the light of modern knowledge about the subject.

The verses are supposed to state:

(i) All food, *immediately after having been*

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

eaten,–bhuktamatram ewa–becomes SWEET madhurata nirukta bhawati—in the *stomach* (Amashaya).

It is argued in support of this too obviously absurd view that if bread becomes 'sweet' in the mouth why should all 'rasas' not be doing the same? Even apart from the fact that bread is initially 'sweet' in Ayurveda, I fail to grasp how this is applicable to *all* food, and / or further *in* the *stomach* (chillies do not become sweet even in the mouth!).

That the Kapha is 'secreted' here from the 'sweet' *taste* of *all* the food is a statement which a student of modern physiology will justifiably scoff at as crude. He knows that the gastric juice secretion is a continuous process, and, moreover, it is augmented, even before the meal, by the thought and sight of food and thus can have little connection with the food *in* the stomach.

He also knows that the food in the stomach becomes 'acid' (amla) in about a hour or a hour and a half, while *digestion* still goes on in it for a further two hours.

(ii) When the partially digested food is *descending* from the *stomach* its *acidity* (sourness) produces Pitta which is sour in taste.

Every student of modern physiology is taught that the pancreatic proteolytic enzyme Trypsin, can only act at an optimum pH value on the *alkaline* side (pH 8. 0), and, therefore, food in the duodenum is fast rendered alkaline by the neutralising action of the pancreatic juices and bile. 'In the process of dropping' (chyawamana) the food may be acid, but it does not remain so for long. On the other hand, it becomes definitely acid as it progresses along the small bowel, where, according to Wagbhata it starts getting pungent and produces Vata. ('chutam punaha—kuryat—katu marutam').

(iii) When the food arrives in the large bowel, in the form of fully digested and formed masses of faeces ('paripindita pakwa') it becomes *pungent* in taste and forms —*produces*—Vata; (Or, if the alternative meaning, which is possible, is to be accepted, may form wind!)

Here again, according to modern knowledge, faeces are 'undigested–food–residues', that is, have nothing to do with fully digested food. In fact easily digestible and absorbable food is *NOT* found in the faeces. Also, the faeces formed during a period of starvation—when obviously no eaten *food* is involved,—have approximately the same composition as those passed during normal feeding. By the application of the 'Anwaya-vyatireka' method—the modern scientific student would find reasoning akin to this method of argument adopted to establish the truth of Koch's postulates—it will be seen that the 'food' could not have been the thing that got 'pungent' in the large bowel, even if we concede for the sake of argument that the 'taste' of the 'food' in the large bowel *was* pungent!

Thus it shall be seen that Chakradatta's interpretation of Drishabala's verses merely serves to cause a confusion. Something clearly undemonstrable has been supposed by him to have been stated in these verses; I have already suggested how these interpretations possibly came to be made without reference to the original fundamental concepts of this science. These interpretations have always appeared to me as supreme examples of what short-sighted

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

partisans without a profound grasp of the fundamentals of a science can do to it, once the direct continuity of teaching from preceptor to pupil is broken. The Nyaya-Vaisheshika commentators having done away with the 'Tridhatus', which were congenital, had come to think of the Tridoshas as panchabhautika *substances;* (NOT sub-material like the 'tanmatras'). Naturally 'seats' ('sthanani') had to be described for their production, and the stomach, small bowel and large bowel came in handy for the purpose ! ¶ It is difficult to say who was responsible for giving this gross anatomical rigid interpretation to the subtle doctrines. To day one can not do better than recording these interpretations as they stand, showing that they are palpably incorrect and inconsistent with observed facts, and pleading that they have not only served to create a confusion about the doctrine of Vipaka,—a matter of detail—but have also brought on a wholly undemonstrable rigid enunciation of the fundamental doctrine of Ayurveda, the Vata-Pitta-Kapha, which serves to make a discerning student of modern scientific medicine conclude that the whole science of Ayurveda is a structure built on sand. Ask any orthodox Vaidya where the Kapha-Pitta-Vata of Ayurveda are *produced*, and with his thorough grounding in the above interpretations he will answer :

"Why of course, in the stomach, the small bowel and the large bowel respectively."

Confronted with experiments on dogs in which the entire stomach was removed, the oesophagus being sutured to the duodenum, resulting only in a change of habit of eating their food, that is, that they 'consume it very slowly over a number of hours instead of bolting it', or of operations of colostomy performed on some individuals, † and

¶ Forgetting the congenital character of the Indriyas according to the Samkhya philosophy, Chakradatta states in his commentory on the next verse that only 'Palatable *and* good', *not* palatable and vitiating, food would lead to the 'satisfaction' (preenana) of the senses (indriyas), since in Ayurveda even the Indriyas are material, and get disintegrated every minute. ('Indriyanyapi panchabhautikani asmaddarshane; tani cha pratikshanam ksheeyamanani') The verse could better have been translated as stating that the correct and beneficial Shabda etc. (tanmatras), of food would lead to production of similar tanmatras in the body-materials and the satisfaction of the senses, which would have been more consistent with the 'excessive' (ati) or 'pervert' (mithya)—use–of–senses-leading to–disease, doctrine of Ayurveda, (" Annamishtam hupahitamishtairgandhadibhihi prithak, dehe preenati gandhadeen ghranadeeneendriyani cha " Cha : Chi : 15/12) which Chakradatta's translation ignores. Would good food prevent eye diseases if such 'uses' (Yogas) take place ?

† These operations, it will be seen, remove, or throw out of use, the stomach and large colon respectively, and thus leave no place or 'Sthana' where the Kapha or Vata of these individuals (dog or man) could now be produced. The animals continue to live without such supplementation of the Kapha or Vata thus conclusively refuting the theory that these are the places where the 'panchabhautika' Kapha and Vata are produced, since their presence is obviously essential for life.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

asked whether the Kapha and Vata were not *produced* in the dogs and men respectively, or asked why the 'tridoshas' are disturbed during prolonged starvation although no 'food' has entered the 'Koshtha' (bowel) during the starvation, they will make an attempt to evade the issue by saying that these dogs and men are no longer 'purushas' according to Ayurveda !

Let us then note that a very unfortunate interpretation of these verses has been made by traditional Pundits, perhaps as a result of Wagbhata having changed Dridhabala's BHAWATAHA' into 'tastes'; We have already seen that a similar change made by Wagbhata in the definition of Vipaka, namely, a *change in taste* ('Rasantara') is Vipaka, is also not quite consistent with the original conception which defines Vipaka as an inferred 'operative guna' (Rasa) ("Vipakaha karmanishthaya"). The definitions of Vipaka given by different commentators would unmistakably show Wagbhata's influence.

(i) Shiwadasasena :'Awasthapakapekshaya wishishtaha pako vipakaha'; A change in 'taste' (paka) which is different from that of the stage of digestion;

(ii) Gangadhar–kaviraj : 'Pachanam dravyanam swaroopa–rasayoho paravrittihi ; tasya wishesho vipakaha". Digestion means a change in form and taste of substances. When this is 'special'—not usual—it is known as Vipaka;

(iii) Chakradatta: 'Wishishto naishthikaha pako vipakaha" ; A special and specific—peculiar to the drug—digestion is Vipaka.

(iv) Hemadri :–Kayagnipakajo wishishto raso vipakaha; A specific taste produced by digestion by body–fire.

Almost all these authors have themselves recognised at one time or another the method and manner of recognising 'Vipaka' according to the original definition which had no reference to 'taste'; Witness Shiwadasasena's comment: "This 'taste'" he states, "known by the term Vipaka is *not perceptible by the tongue*, but is only recognised from action, by inference. For example ginger being of a pungent taste, and 'hot' potency, is yet called sweet in *digestion* because of its action on (male) virility" ('Ayam cha vipakadheyo (raso) na rasanendriyagrahyaha, kintu tatkaryenaiwonneeyate; yatha katurasaya ushnaveeryaya api shunthya vrishyatwena madhuraha pako anumeeyate" Su: Soo: 40/10 Teeka); He also recognises that the vipaka' takes place at the time when the 'rasa (absorbed food juice) is being separated from the 'mala' (excretable portion) and takes place at a place different from the bowel and so even if it is of the same taste as that of the awastha–paka it is so at a different time and need cause no confusion. ("ityadinoktascha nishthapako Rasa–mala–viveka–samakalo bhinnkala ewa awasthapakaihi samam iti na virodhaha"—Su: Soo : 40/10 Teeka);

If Drishabala's reference to Ashaya and pPakwashaya really referred to anatomical laces,—which I do not think is the case, for the word 'ashaya' is sometimes used in Ayurveda to denote a subtle container as in the definition of the 'Kalas', "dhatvashayantarmaryadaha' (limitations of the stote of the different dhatus)—even *his* description of the digestive processes must be stamped as being inconsistent with modern recognisee facts. But his other verse to which I have made a reference in the foot-note on page 8, and his next verse, which follows, and

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

describes clearly the 'guna—pachana' (creation of properties, as for example human meat from amino—acids of wheat,) would seem to show, when considered with his use of the word 'BHAWAT', that he intended making a reference to the digestion of a 'Pancha—bhautika' substance from the gross to the subtle stages. Read with the definition of the composition of the 'rasas' in this terminology (Kshmambhogni kshmambutejaha etc) Dridhabala's verses assume a more intelligible meaning; I invite the attention of the Charcha—Parishada to this possible meaning; Thus:

(i) All food which, when eaten, is Panchabhautik–vikara,

(ii) Is brought to the bowel by 'Prana' whose specific motion is 'taking in' ("Annam adana–karma tu pranaha koshtham Prakarshati");

(iii) The body–fire stimulated by motions of a 'proper' character—peristaltic etc.—brings on a correct chemical digestion of it, after it has been already rendered soft by lipoids and broken into fragments by fluids in a proper time, for the continuance and prolongation of life...

("Taddravairbhinnasanghatam snehena mridutam gatam, Samanenavadhooto agnirudaryaha pawanodvahaha Kale bhuktam saman samyak pachatyayurvivridhdhaye" Cha : Chi : 15/6–7)

This description is quite correct and consistent with facts known to modern medicine. It refers, in its own peculiar terminology, to the deglutition reflex, the churning, segmentation and peristaltic movements of the bowels under control of the intrinsic nerve-plexuses of the digestive tracts, and refers to the time factor which is important. This reference should really have disuaded Chakradatta from rendering 'Bhukta–matrasya' of the next verse into 'immediately after eating'; The three verses which we have studied upto now would indeed appear to be a more elaborate description of the general purpose and method of digestion described in the preceding verses. Let me give a free translation of these verses, this time without the unjustifiable bias about a 'change in taste' as created by Wagbhata;

"All food (bhukta–matra) which consists of six 'operative–gunas', on complete digestion (prapakataha) leads to :

(i) First the Earth and Water bhavas which cause the Madhura rasa are digested and these stimulate (udeeryate) the subtle (phenabhoota) formative processes (Kapho).

(ii) When it is thus partially acted upon a further action takes place on the Earth and Teja (Amla) bhavas of the food which stimutate the subtle cleavage processes of the body; (Pittam achcham),

(iii) Later...(when the absorbable bhavas have been acted upon)..from the Teja and Wind bhavas of this food, (Katu) which is now so digested that the undigestible 'bhawas' alone remain behind (paripindita pakwa) appropriate motions (impulses) may be stimulated. ("Vayuhu pranaha" Cha : Su : 5/5)

If we remember the Ayurvedic doctrine that all pancha-bhautik substances have the Akasha–Vayu–Teja–Apa–Prithwi (Void-wind Fire-Water-Earth) sub-material principles entering into one another, ..parasparanuprawishtani..we shall find that the verses are a very consistent description of what must take place in the three stages of digestion, without reference to any gross *organ* of dig-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

estion; I would like to emphasize that the further verses which state that the 'sub-material tanmatras of the food must be such as are both 'palatable' and 'useful' in order that they should produce the sub-material tanmatras of the individual animal's tissues and senses, and his further reference to the 'ultimate' metabolism of the food into the respective gunas lends support to my view that he originally intended to give a description of the whole process without any reference to gross anatomical structures and had not the least idea of stating that at particular places the *whole* of the food turns Sweet, Sour or Pungent: Indeed his description would seem to be an admirable paraphrase of the mechanical and molecular digestion of the modern sciences, as also of the final metabolisms of the proximate principles of food, and also why one animal's food is, or may be, inadequate or unabsorbable to another animal. What is more it takes the stages of digestion to the level where the hardness of keratin, or the elasticity of elastin are referred to the peculiar property-of arrangement..?--of the original aminoacids. His descriptions of the Prithwi-Jala combination and of Prithvi-Teja combination (Amla) next, (the Jala-Teja combinations are soluble and 'charged', which may be compared with electrolytes of the modern sciences,) and later of the Teja-Vayu combination, fits in like a hand to a glove with the descriptions of the huge colloids, the charged interfaces, and the final electrical impulses of the modern sciences. Thus the attempt made by some commentators of the olden times, and a few modern Vaidyas, to read in these verses a description of the 'gross' digestion at *anatomical* levels, is not only inconsistent with modern knowledge but would seem to be inconsistent also with the fundamental doctrines of the science of Ayurveda.

(to be continued)

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्टौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद आणि मोरावळा हे ठोक ंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.
टे. नं. ३१७९६ Telegrame-AYURVED

अर्कशाळेचीं
पेटंट व इतर सर्व प्रकारचीं औषधें
पुण्यांत
आतां सुलभतेनें मिळूं लागलीं.
प्रमुख विक्रेते
आदर्श एजन्सी,
३९५।७ सदाशिव पेठ, पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकट आभार

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, आयुर्वेद प्रसारक मंडळीचे आश्रयदाते, देणगीदार व ठेवीदार या सर्व हितचिंतकांना कळवितांना आनंद वाटतो कीं, मुंबई सरकारनें संस्थेनें नवीनच बांधलेल्या डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाच्या इमारतीकरितां नुकताच ग्रँटचा दुसरा हप्ता म्हणून रु. अठ्ठेचाळीस हजारांची देणगी दिली. या बहुमोल सहाय्याबद्दल मुंबई सरकारचें मंत्रिमंडळ व आरोग्य खात्याचे मंत्री आणि अधिकारी यांचे मी व्यक्तिशः मनःपूर्वक आभार मानतों. वस्तुतः ही देणगी गतवर्षींच मिळावयाची; पण ती मिळूं शकली नाहीं. त्यामुळें संस्थेला गेले वर्षभर अत्यंत कष्टमय परिस्थितीला तोंड द्यावें लागलें. या देणगीमुळें डॉ. मो. ना. आगाशे यांच्या सत्कारानिमित्त निधी उभारून रुग्णालय बांधण्याच्या कल्पनेला यशाचें समाधान लाभत आहे. या कल्पनेचा पुरस्कार करण्यांत मी मनःपूर्वक भाग घेतला होता व गेल्या वर्षी ही अपेक्षित देणगी हातीं न आल्यामुळें मला मानसिक चिंतेचा आणि विषादाचा त्रास सोसावा लागला. पण या उपक्रमाची 'गोड' सांगता आतां झालेली आहे म्हणूनच मला हें प्रकट निवेदन करावेसें वाटलें. आतां संस्थेतील कार्याला नवी चालना मिळेल अशी मला खात्री वाटते. संस्थेची भविष्यकाळांत भरभराट होवो व निःस्वार्थी आणि परिश्रमी कार्यकर्त्यांच्या निर्मल सहकार्यानें संस्था सतत यशस्वी होत राहो असें मी चिंतितों.

— वि. ल. आगाशे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No B. 5225

अनुभवसिद्ध
अर्कशाला औषधें

युटोन
गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन
रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण
जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन
बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन
मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृद्धिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं पद्मा प्रिंटिंग प्रेस ३९५।५ व ३९५।७ सदाशिव, पुणें २. येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रचारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

प्रमुख संपादक
वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य
कार्यकारी संपादक
य. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद

जून १९५३

वार्षिक वर्गणी ३ रु.
किरकोळ अंक ८ आणे

या अंकांत

वायोः प्रकाराः
— गो. आ. फडके

मातृपदापूर्वी
— दत्तात्रेयशास्त्री जळूकर

अनुभवसिद्ध अर्कशाला-औषधे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदप्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

वर्ष १६ वें] जून : १९५३ [अंक ४ था

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक, आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

संपादकीय

गेले कांहीं महिने आयुर्मीमांसेचे अंक नियमितपणें निघूं शकलेले नाहींत याची आम्हांस जाणीव आहे. मुद्रणाच्या व इतर अडचणीमुळें हा अनियमितपणा निर्माण झालेला आहे. या बाबतींत सुव्यवस्था आणण्याचे आमचे प्रयत्न चाललेले आहेत. तरी कांहीं काळ वाचकांनीं व ग्राहकांनीं सहानुभूतिपूर्वक आम्हांला क्षमा करावी अशी विनंति आहे.

या अंकांत आयुर्मीमांसेचे जुने व नामवंत लेखक वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांची 'मातृपदापूर्वी' ही लेखमाला चालू झालेली आहे. वैद्य जळूकर यांचा व्यासंग व लेखनशैली याचा वाचकांना परिचय आहेच. ही लेखमाला वाचनीय होईल अशी आमची खात्री आहे.

अभिनंदन—

आ. वै. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, संस्थेचे एक जुने कार्यकर्ते व कांहीं वर्षें महाविद्यालयाचे प्रधानाध्यापक असलेले आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांची नागपूर विद्यापीठाच्या आयुर्वेद शाखेचे प्रमुख म्हणून निवड झाली, याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. ते अंगीकृत कार्यांत यशस्वी होतील व आयुर्वेदाच्या उर्जितावस्थेस हातभार लावतील अशी आमची खात्री आहे.

दुःखद निधन—

बेळगांवचे डॉ. सावनूर हे नुकतेच दिवंगत झाले हें लिहिण्यास दुःख वाटतें. डॉ. सावनूर हे आयुर्वेदाचे अभिमानी आणि अभ्यासू होते. त्यांच्या निधनानें आयुर्वेदाच्या कार्याची निःसंशय हानि झाली आहे.

लातूर वैद्यसंमेलन—

लातूर येथें दि. १३ व १४ जूनला भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर यांचें नेतृत्व महाराष्ट्रीय वैद्यवर्गास लाभलेलें आहे हें सद्भाग्य होय. वैद्य जळूकर यांचें भाषण आयुर्मीमांसेच्या येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परीक्षेचा निर्णय

[फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक युनानी व तिब्बी सिस्टिम ऑफ मेडिसिन मुंबईतर्फे घेतलेल्या परीक्षांपैकीं आयांग्ल वैद्यक महाविद्यालयांतील उत्तीर्ण विद्यार्थी.]

वर्ष १ लें:—

१. भूपाल दादासाहेब बरगाले.
२. गणपतराव मारुतराव धुमाळ.
३. भालचंद्र हरी जोशी.

वर्ष २ रें:—

१. नेमिनाथ दादा भोमाज.
२. नारायण पांडुरंग डांगे.
३. दत्तात्रय नीळकंठ देशपांडे.
४. कु. उषा रामचंद्र धामणस्कर.
५. रामचंद्र दत्तात्रय एकसवेकर.
६. शांतीकुमार फुलचंद गांधी.
७. षडानन एकनाथ गवसणे.
८. भालचंद्र हरी जोशी.
९. गणेश चिंतामण कोल्हटकर.
१०. चंद्रकांत भीमराव मणूरकर.
११. प्रेमराज केसरलाल मुगड.
१२. नारायण भीमाचार्य नाडपुरोहित.
१३. दामोदर पांडुरंग पलंगे.
१४. कु. विद्युल्लता मोरेश्वर पंडित.
१५. कामगोंडा सत्यगोंडा पाटील.
१६. नारायण आबाजी पोरे.
१७. पांडुरंग व्यंकटेश उचगांवकर.
१८. कु. भागीरथी रामचंद्र वेलणकर.
१९. भालचंद्र आप्पाजी येलगुडकर.

वर्ष ३ रें:—

१. श्रीकृष्ण माधव अभ्यंकर.
२. दीनानाथ विष्णु आफळे.
३. नारायण श्रीधर भागवत.
४. प्रभाकर गणेश भावे.
५. श्रीनिवास गोपाळ भिसे.
६. श्रीहरी दत्तात्रय देशपांडे.
७. नारायण हरी देशपांडे.
८. भास्कर वामन खोत.
९. श्रीनिवास दत्तात्रय जळूकर.
१०. वसंत भाऊराव कुलकर्णी.
११. कु. गोदावरी जीवराज मारवाडी
१२. अबाराम जगन्नाथ पंडित.
१३. कृष्णाजी रामचंद्र राजपुरोहीत.
१४. जनार्दन दत्तात्रय थत्ते.

वर्ष ४ थें:—

१. यशवंत महादेव गर्गे.
२. वसंत आत्माराम भुसारी.
३. विठ्ठलराव वामनराव नोरंगीकर.
४. माधव रामचंद्र दातार.
५. कृष्णाजी विश्वनाथ गोरे.
६. प्रभाकर गोपाळराव कुलकर्णी.
७. एकनाथ काशीनाथ माजगांवकर.
८. श्रीकृष्ण दत्तात्रय साने.
९. सौ. नलिनीबाइ नारायण साठे.

महाविद्यालय-वार्ता

नेत्रदानयज्ञ— गेल्या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत सरकारच्या आरोग्य खात्यातर्फे आयांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या आवारांत नेत्रदानयज्ञ साजरा करण्यांत आला. या उपक्रमाचा फायदा जिल्ह्यांतील बऱ्याच रुग्णांनीं घेतला.

उदय क्लबाची नवी इमारत— संस्थेच्या विद्यार्थ्यांकरितां वसतीगृहास जोडून भोजनगृहाची नवी इमारत बांधण्यांत आली आहे.

नवे वर्ग— महाविद्यालयाचे नवे वर्ग नुकतेच सुरू झालेले असून यंदा पहिल्या वर्षांत सुमारें वीस विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

★ वायोः प्रकाराः ★

लेखक : गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

वाताचें स्वरूप गतिस्वरूपानें सर्वत्र एकच असलें तरी त्याच्यामागें ज्या अनेक उपाधी लागतात, त्यामुळें त्या वाताचे अनेक प्रकार वा भेद पडतात. शरिराचे बरे वा वाईट व्यापार वायूच करितो. शरीराचे मूळ कारण तोच आहे. शरिराचे स्वास्थ्य वायूच टिकवितो. तोच दुष्ट झाला म्हणजे शरिराचा नाश घडवून आणतो. सर्वाचें कारण वायू हाच आहे.

स विश्वकर्मा विश्वात्मा विश्वरूपः प्रजापतिः ।
स्रष्टा धाता विभुर्विष्णुः संहर्ता मृत्युरंतकः ॥
वा. नि. १५।२

आपल्या शरीराचें जनन, वर्धन, धारण तो करितो, म्हणून त्याला विश्वकर्मा असें म्हणतात. शुभ किंवा स्वास्थ्य टिकविण्याचें मूळ कारण तोच आहे म्हणून त्याला (विश्वेषां शुभानां आत्मा हेतुः) "विश्वात्मा" असें म्हणतात. वायु विविध रूपानें नटलेला आढळतो. तो कधीं वाहक, तर कधीं चालक. कधीं शब्द निर्माण करितो, कुठें प्रकाश दाखवितो. अशा विविध रूपानें दिसतो म्हणून त्याला विश्वरूपा असें म्हणतात. सर्व जगांत व त्याचप्रमाणें या देहांत तो विविध रूपें घेऊन नटला आहे. अशा विविध स्वरूपांवरून व कर्मांवरून वाताचे अनेक भेद व अनेक नांवें आहेत.

वैद्यक व्यवहारांत स्थूल रूपानें पुढील भेद पाडलेले आहेत.

१ वायूचे स्थानतः भेद

पक्वाशय, कटि, सक्थि, श्रोत्र, अस्थि, स्पर्शनेंद्रिय अशी या देहांत वाताची सहा प्रमुख स्थानें आहेत. अशा सहा स्थानांत देहस्थ वाताचें सहा भाग पडतात. पक्वाशयस्थ वायु, कटिस्थ वायु, सक्थिस्थ वायु, श्रोत्रस्थ वायु, अस्थिस्थ वायु, त्वक्स्थ वायु असे वाताचें स्थानतः सहा भेद पडतात. त्यांत पक्वाशयस्थ वायु हा प्रमुख समजला जातो.

२ वायूचे कर्मतः भेद

शरीररूपी यंत्राचे विविध व्यापार चालतात. श्वासप्रश्वास, रसाभिसरण, मूत्रपुरीषादिकांचे बहिर्मार्गानें निःसरण, बोलणें चालणें इत्यादि व्यापार, शब्दस्पर्शादिकांचें ग्रहण, विचार, चिंता, ऊहापूह इत्यादि मनोव्यापार असे विविध तऱ्हेचे व्यापार या देहांत चालतात. या कार्यावरून वायूचे भेद पाडतां येतात.

१) प्रस्पंदक वायू—

प्रस्पंदन म्हणजे चलनवलन. घेणें, देणें, चालणें, ह्या बाह्य क्रिया करणारा, तसेंच श्वासप्रश्वास, अभिसरण, इत्यादि जे चलनव्यापार दिसतात, ते ज्या वायूच्यामुळें होतात त्याला प्रस्पंदक वायू असें म्हणतात.

२) उद्वाहक वायु—

कानाकडे आलेला शब्द हा विषय, नेत्राकडे आलेला रूपविषय, नाकावर आदळलेला गंध, त्वचेला लागलेला स्पर्श, जिव्हेवर ठेवलेल्या पदार्थाचा रस, अशा रीतीनें त्या त्या इंद्रियांचे अर्थ, त्या त्या इंद्रियांचे मार्फत, मनाचे संयोगानें, बुद्धीकडे ते ते विषय घेऊन जाणें व हा अमका शब्द आहे किंवा अमका रस आहे हें ज्ञान करून देण्यास सहाय्य करणारा हा वायु आहे. या प्रत्येक इंद्रियाचे व्यापारांत बाह्य इंद्रियांच्या विषयाचें एक प्रकारचें आंतल्या बाजूला वहन आहे. जिभेवर आपण खडिसाखर, चिंच असा कोणताहि खाण्याचा पदार्थ ठेवला, तर जिव्हेंद्रियामार्फत विशिष्ट संवेदना अथवा ज्ञान वाहून नेलें जातें, व मग बुद्धीवाटे, विशेष संवेदनेला मधुररस, अम्लरस असें नांव दिलें जातें. त्यांत बाह्य विषयाचा झालेला स्पर्श आंत अंतःकरणांत वाहून नेण्याची प्रक्रिया होत असते. असें वहन करणारा जो वायु त्याला उद्वाहक वायु असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३) पूरक वायू—

शरीर जगण्याला बाह्य सृष्टींतील अनेकविध वस्तूंची गरज या देहाला आहे. असें पदार्थ आंत घेतल्याखेरीज शरिराचे जीवनव्यापार चालत नाहींत. शरिराबाहेर पसरलेली हवा दर मिनिटाला अठरावीस वेळां आपण नाकावाटें आंत घेतों. आपणांला रोज अन्न पाणी घ्यावें लागतें. अन्न, पाणी, हवा हीं प्राणद्रव्यें आहेत. या बाह्य प्राणद्रव्यावर शरिराचे आंतील प्राण अवलंबून असतात. हीं प्राणद्रव्यें आंत घेऊन प्राणद्रव्यांचा पुरवठा करणारा जो वायु त्याला पूरक वायु असें म्हणतात. शरीर सप्तधातूंचें बनलें आहे. किंवा शरिरांत हृदय, फुफ्फुस, अंत्र यकृत, प्लीहा, वृक्क इत्यादि लहानमोठे अनेक अवयव आहेत. या प्रत्येकाला आहाराची जरूरी आहे. त्यांचेकडे आहाररस पुरविणारा हा वायु आहे. शरीरअवयवांत असंख्य स्रोतसें आहेत. त्या दर एक सूक्ष्म स्रोतसांत आहाररस पूरण करणारा हा वायू आहे. त्या त्या आशयाकडे तो तो प्राणसमान पदार्थ पुरवावा लागतो. त्याशिवाय अंतर्व्यापार चालत नाहींत. बाह्य प्राणवायु, आहार्य पदार्थ सर्व अवयवांना लागतात. ते घेऊन सर्व परमाणू जगत असतात. ह्या बाह्य प्राणद्रव्यांचा संबंध शरिराशीं, शरिरांतील दरएक परमाणूशीं संबंध जोडून देणारा, पूरण करणारा जो वायु त्याला पूरक वायु असें म्हणतात. हे एक इतर कर्मांपेक्षां निराळें स्वतंत्र कर्म आहे. त्यावरून याला हें नांव पडलें.

४) विवेचक वायू—

शरीर-व्यापार सुरलीत चालण्यास विवेचनाची अथवा पृथक्करणाचीं जरूरी आहे. अन्न पोटांत गेल्यानंतर तसेंच्या तसेंच तें शरीरस्थ धातूकडे जाणें इष्ट नसतें. बाह्य जगतांतील पंचमहाभूतांचे कोश मोडून बदलून त्या अन्न म्हणून घेतलेल्या द्रव्याला बदलून घ्यावें लागतें. त्यांत शरीराला नको असलेले कांहीं टाकाऊ घटकही असतात. कोणते अंतःस्रोतसांत जाऊं द्यावयाचे, कोणते नाहीं याचा विचार या सजीव देहांत चालतो. विवेचन चालतें. याला पृथक्करण किंवा पचन म्हणतात. पाकांत रूपांतर असतें. आलेल्या आहाराचें रूपांतर करून त्यापासून अन्नरस तयार करणें व मलमूत्र असे टाकाऊ पदार्थ निराळे करणें हें विवेचन करावें लागतें. हें कार्य वायू करतो. आहाररस धातूंचेकडे आल्यावर, त्या रसांतून आलेल्या घटकांना, स्वधातूचें रूप द्यावयाचें म्हणजे पृथक्करण अथवा विवेचन आलेंच. त्या घटकापैकीं सार तें घ्यावयाचे व त्यांतील किट्ट मल म्हणून टाकून द्यावयाचें ही पचनक्रिया धातूंतही चालते. तेथेंहि हा वायु आहेच. त्यामुळेंच अन्नापासून रस, रक्त, मांस, शुक्रादि पदार्थ निर्माण होतात. एक कांहीं दुसऱ्यासारखा नसतो. मात्र दरएक आहारापासून बनतो. या प्रत्येक ठिकाणीं रूपांतर आहे. कोणाला वाव द्यावयाचा कोणाला नाहीं असा विवेक दरएक ठिकाणीं चालू आहे. या क्रिया करणारा जो वायु त्याला विवेचक वायु असें म्हणतात.

५) प्रवर्तक वायु-धारक वायु—

आहार, पचन, या क्रियांप्रमाणें प्रत्येक सजीव परमाणूला आपले मल बाहेर टाकणें ही क्रिया तितकीच आवश्यक आहे. शरीरव्यापारांत उत्पन्न झालेली झीज बाहेर टाकून देणें व नवीन आहार घेऊन ती झीज भरून काढणें या गोष्टी जीवनाला आवश्यक आहेत. पाकांत निर्माण झालेले किट्ट पदार्थ ज्यांना शरीराबाहेर टाकणें आवश्यक आहे. कारण जे राहिले तर अपाय करतील. त्यांची योग्य कांहीं विल्हेवाट लागणें आवश्यक असतें. असे विविध टाकाऊ पदार्थ बहिर्मुख स्रोतसांतून बाहेर टाकून दिले जातात. त्वचेंतील स्रोतसांतून स्वेद हा मल बाहेर पडतो. मूत्र, पुरीष, नाक, तोंड, डोळे, कान यांतून मल बाहेर पडतात. हे मल बाहेर

नित्योपयोगी अर्कशाला औषधें

एग्युमिक्श्चर

कोणत्याही ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, किंबहुना प्रारंभीं एकमेव औषध म्हणून एग्युमिक्श्चरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें येणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टांकून देण्याची क्रिया एका वायूलाच करावी लागते. मात्र ही क्रिया योग्य कालीं व्हावी लागते. मूग, पुरीष, शुक्र, गर्भ, यांचें योग्यकालीं बहि:प्रवर्तन हा वायु करितो व ती योग्य वेळ येईपर्यंत यांचें धारण करितो. कांहीं काळ म्हणजे यांना पूर्ण पक्वावस्था येईपर्यंत, त्यांचें शरीरांत धारण करणें हीहि गोष्ट अत्यंत आवश्यक असते. नाहींतर पक्वाबरोबर आमहि बाहेर पडूं लागतील. हें धारण करणारा जो वायु त्याला धारक वायु असें म्हणतात. मल, मूत्र, शुक्र, गर्भ किंवा खमल यांचें कांहीं काळ धारण व्हावें लागतें. नाहीं-तर सारखी मलमूत्रादिकांची प्रवृत्ति सुरू झाली असती. मध्यें कांहीं काल धारण होते, म्हणून सतत प्रवृत्ति नाहीं. मध्यें वेळ जातो. ते ते आशय पूर्ण भरले. त्यांतील पाकानें पूर्ण पक्वता आली म्हणजे योग्य कालीं त्यांचें कर्षण केलें जाते. ही नि:सरणाची क्रिया करणारा जो वायु त्याला प्रवर्तक वायु असें म्हणतात.

३ अवस्थेनुसार वाताचे भेद

क्षय, स्थान व वृद्धि अशा दोषांच्या तीन अवस्था अथवा प्रकार असतात. प्रमाणतः व गुणतः दोष कमी होणें अथवा असणें याला क्षयावस्था असें म्हणतात. याच्या उलट प्रमाणतः व गुणतः दोषाची वाढ होणें या अवस्थेला वृद्धि असें म्हण-तात. या दोन्हीखेरीज निराळी, दोषाची जी स्वमानावस्था असते तिला 'स्थान' असें म्हणतात. ही प्राकृत अवस्था अथवा समावस्था म्हटली जाते.

(१) प्रकृतिस्थ वा स्थानस्थ वात—

वायु प्रकृतिस्थ असला म्हणजे शरिराचे सर्व व्यापार व्यवस्थित चालतात. प्रकृतिस्थ वायूचे पुढीलप्रमाणें व्यापार असतात.

उत्साहोच्छ्वासनिःश्वासचेष्टा धातुगतिः समा ।
समो मोक्षोगतिमतां वायोः कर्माविकारजम् ॥

च. सू. १८।४९

श्वासप्रश्वासादि क्रिया, पोष्यधातूंचेकडे रसादिकांचें गमन, पुरीषादिकांचें बहिर्गमन इत्यादि कर्में प्रकृतिस्थ वायु करितो.

(२) क्षीणवात—

वाताची प्रमाणतः व गुणतः हानि झाली म्हणजे त्याला क्षीणवात किंवा क्षीण अवस्थेंतील वात असें म्हणतात. त्याची पुढील लक्षणें असतात.

कर्मणः प्राकृताद्धानिवृद्धिर्वापि विरोधिनाम् ॥

च. सू. १८

उत्साहादि जीं वाताचीं प्रकृतस्थितींतील कर्में सांगि-तलीं, तीं कमी होतात. श्वासप्रश्वास कमी होतात. पोषक रसाचें पोष्य धातूंकडे वहन कमी होतें. विरोधी कर्माची वाढ होते. उत्साह कमी होतो, किंवा त्या विरोधी जो विषाद याची वाढ होते. भाषण कमी होतें. आलस्य येतें. चापल्य जाऊन गौरव येतो. या लक्षणावरून वाताची क्षीणावस्था ओळखावयाची असते.

(३) वाताची वृद्धावस्था—

कित्येक वेळां वात वृद्ध स्थितींत असतो. त्यावेळीं त्याची प्रकृत स्थितींतील लक्षणें वाढलेलीं असतात.

दोषप्रकृतिवैशेष्यं नियतं वृद्धिलक्षणम् ।   च. सू. १९

वाताचा जो स्वभाव त्याचे वृद्ध स्थितींत आधिक्य होतें. रुक्ष, शीत, लघु, चल इत्यादि जी प्राकृत स्थिति असते तिची वाढ होऊन, अधिक रूक्षत्व, शीतत्व, लघुत्व, चलत्व प्राप्त होतात. यावरून वात वाढला आहे असें ओळखलें जातें.

क्षीण, वृद्ध व प्रकृतिस्थ अशा वाताच्या तीन अवस्था असतात. या तीन अवस्थेनुरूप हा क्षीण वायु आहे हा वृद्ध वात आहे किंवा हा प्रकृतिस्थ आहे अशी परिभाषा या वैद्यकांत बोलली जाते. त्यांतील प्रकृतिस्थ ही वातस्थिति स्वास्थ्य टिकण्यास आवश्यक असते. क्षीण वा वृद्ध यांनीं आरोग्य बिघडतें.

समाः स्वं कर्म कुरुते ।

समदोष आपापलीं प्राकृतिक कर्में करितो. क्षीण दोष आपलीं कर्में करीत नाहीं.

क्षीणा जहति लिंगं स्वं ।

क्षीणावस्थेंतील दोषाला प्रकृतिस्थित कार्याव्यतिरिक्त म्हणजे वैचारिक कर्में करितां येत नाहींत. प्राकृतिक कर्में तींच कमी होतात. पण दोष वाढला म्हणजे मात्र तो आपल्या सामर्थ्यानुसार वैकारिक लक्षणें दाखवितो.

दोषाः प्रवृद्धाः स्वलिंगं दर्शयन्ति यथा बलम् ॥

च. सू. १७

वातदोष अति वाढला (वृद्धतम) म्हणजे विकृतीचीं लक्षणें अधिक दाखवितो. मध्यम (वृद्धतर) वाढला म्हणजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यम स्वरूपाचीं रोगलक्षणें दाखवितो. वृद्ध असला म्हणजे थोडीं लक्षणें असलेला व्याधी उत्पन्न करितो. असें रोगकर्तृत्व क्षीणस्थितींतील वातांत नाहीं. ते वृद्ध स्थितींतील वातांत असतें. वृद्धवायु प्रत्यक्ष रोग दाखविण्यापूर्वी अनेक अवस्थेंत असतो. व्याधि कांहीं एकदम होत नाहीं. त्याची पूर्वतयारी दोषाकडून क्रमाक्रमानें झालेली असते. रोगोत्पादक वृद्ध दोषाच्या पूर्व पूर्व अवस्था संप्राप्ति शास्त्रांत येत असतात. त्या अवस्थेनुरूप वातदोषाचे प्रकार पडतात.

१ चित वायु—

या स्थितींत वाताची वृद्धि असते. पण ती रोगोत्पादनाला अपुरी पडते. अगदीं अल्प असते. वातवर्धक आहारविहाराचा परिणाम शरिरस्थ रसावर झालेला असतो. पण तो अत्यंत अल्प असतो. या स्थितीला चयावस्था असें म्हणतात.

२, प्रकुपित वायु—

चयावस्थेंत वातशामक आहारविहार घडला नाहीं, उलट वातवर्धकच कारणें जास्त घडत गेलीं तर त्या वाताला प्रकोप ही पुढली अवस्था प्राप्त होते. यांत वाताचे रूक्षादि गुण वाढलेले असतात, व त्यांचा परिणाम शरिरांतील एकाद्या स्थानावर होऊं लागतो. व हा वृद्ध झालेल्या प्रशम करण्याचा प्रयत्न त्या स्थानामार्फत चालू असतो. अशी वातदोषाची वर्धिष्णु जी अवस्था तिला प्रकोप म्हणतात.

३ प्रसृत वायु—

प्रकोपावस्थेंत वाताचा प्रतिकार केला गेला नाहीं तर ही त्या पुढली अवस्था वाताला प्राप्त होते. एकाद्या विशिष्ट स्थानांत चालू असलेल्या प्रतिकाराला न जुमानतां तो वायु अधिक वाढतो व तो सर्व शरीरभर आपला प्रसार करितो. त्याला प्रसृत वायु असें म्हणतात. याही स्थितींत वातदोषाची अधिक पुढली अवस्था असते. यांत स्थानिक प्रतिकार जो वायूला तो वाढलेल्या वायूनें उल्लंघित केला एवढाच त्याचा अर्थ असतो.

४ स्थानसंश्रित वायु—

प्रकुपित झालेला वायु ज्यावेळीं एकाद्या विशिष्ट स्थानीं जाऊन रोगलक्षणें दाखविण्यास प्रारंभ करितो त्या स्थितींतील वायूला स्थानश्रित वायु असें म्हणतात.

५ व्यक्त वायु—

ज्यावेळीं वाढलेला वायु प्रत्यक्ष अमुक एक व्याधी म्हणून त्याचीं लक्षणें दाखवितो, व हा अमुक व्याधी असें ज्यावेळीं स्पष्ट होतें त्यावेळीं त्या अवस्थेला व्याधीची व्यक्तावस्था असें म्हणतात व त्या अवस्थेंतील वायूला व्यक्त वायु असें म्हणतात.

६ भेदावस्थित वात—

वाढलेला वायु नुसता व्याधी उत्पन्न करून किंवा व्याधीचीं लक्षणें दाखवून प्रशम पावला नाहीं. परंतु उलट पुढें वाढतच गेला तर त्याचा शरीरधातूवर अनिष्ट परिणाम होऊन त्या धातूचा त्या दुष्टपातानें पाक नाश होतो. व अशामुळें जीवित चालणें अशक्य होतें. किंवा हा दुष्ट वायु अन्य स्थानीं जाऊन दुसरे व्याधी निर्माण करूं लागतो. अशा स्थितींतील वायूला भेदाज स्थितींतील वायू असें म्हणतात. ही सर्वांत वर्धिष्णु अवस्था होय. चयापासून अशा या क्रमाक्रमानें अवस्था असतात. चयादि अल्पावस्थेंत योग्य उपक्रम केला गेला नाहीं तर या पुढल्या अवस्था प्राप्त होतात.

४ हेतुतः वाताचे भेद

वात वाढण्याचीं विविध कारणें असतात. त्या कारणानुरूप वाताचे अनेक भेद पडतात. मुख्यतः वातप्रकोपक कारणांचे तीन भेद पडतात. त्यावरून वाताचेहि तीन भेद होतात.

(१) मिथ्यायोगप्रकुपित वायु—

काल, इंद्रियाचे अर्थ व कर्म यांच्या मिथ्या योगामुळें जो वायु प्रकुपित होतो तो मिथ्यायोग प्रकुपित वात होय. तो महादारुण असतो.

(२) अतियोगकुपित वायु—

कालादिकांच्या अतियोगानें हा वायु प्रकुपित होतो.

(३) हीनयोगकुपित वायु—

कालादिकांच्या हीन प्रवृत्तीमुळें हा वायु प्रकुपित होतो. असे हेतुतः वाताचे तीन प्रकार पडतात.

५ आकृतितः वायूचे भेद

वात हा प्रत्यक्ष दिसत नसला तरी तो जीं विकृत शरिराचीं विविध रूपें उत्पन्न करितो त्यावरून वाताचे भेद पडतात.

हनुस्रंस व हनुस्तंभ हे वातानेंच होतात. पण स्रंस व स्तंभ या आकृतींत भेद आहे. स्रंसरूपी वायु निराळा. स्तंभरूपी वायु हा निराळा असतो. याप्रमाणें व्यास, व्यध, स्वाप, साद, रुक्, तोद, भेद, संग, भंग, संकोच, वर्त, हर्ष, कंप, पारुष्य इत्यादि विविध स्वरूपानें वायु दृष्टीस पडतो. कित्येक वेळां तो कंपरूपानें, तर कित्येक वेळां संगरूपानें पहावयास मिळेल. असे आकृतितः वायूचे अनेक भेद पडतात. आकृतिभेद तितके हे वातभेद मानावे लागतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मातृपदापूर्वी

लेः—वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर

— १ —

" हस्तारविन्देन पदारविन्दम् ।
मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ॥
वटस्य पत्रस्य पुटे शयानम् ।
बालं मुकुन्दं मनसा स्मरामि ॥ "

भक्तिभावनेनें वेडावलेल्या सहृदय भक्ताला भगवंताचें बालस्वरूप पहात राहण्यानेंच नव्हे तर त्याचें तें मनोहर ध्यान सदैव मनश्चक्षूपुढें कल्पनेनें रेखाटण्यांतसुद्धां निरतिशय आनंद होतो.

" अपि लालाविलमुखं, हृदयाल्हादकारकम्
अपत्यं तुल्यता केन, दर्शनस्पर्शनादिषु ॥
किं पुनर्यद्यशोधर्ममानश्रीकुलवर्धनम् ? " ॥

वाग्भट्ट, उ. स्था. ४०

ह्या श्लोकांत श्रीमद् वाग्भट्टाचार्यांनीं वर्णन केल्याप्रमाणें लाळेनें भरलेल्या व धुळीनें माखलेल्या अपत्याच्या आलिंगन-चुंबन व क्रीडावलोकांतील ब्रह्मानंदाला सोडून कोण संसारी जन अथवा कोणत्या जनक-जननीचें अंतःकरण अन्य सुखाची लालसा करील ? फार काय, संसारी जनाला अपत्य म्हणजे काय हें जणूं कृतीनें कळलें तरी तत्त्वानें समजलें नव्हतें. म्हणून कवींनीं त्याचीहि व्याख्या करून समजावून देतांना म्हटलें आहे—

अपत्य म्हणजे काय ?

अन्तःकरणतत्त्वस्य दम्पत्योः स्नेहसंश्रयात् ।
आनन्दग्रंथिरेकोऽयमपत्यमितिकथ्यते ॥

पतिपत्नींच्या अंतःकरणांतील परस्परांवरील नितांत प्रेमाचें प्रतीक अथवा त्या उभयतांना आयुष्यभर एकत्र संबद्ध करणारी ग्रंथि म्हणजेच अपत्य होय. राक्षसी वृत्तीच्या जोडप्यांचे कांहीं अपवाद वगळल्यास संसारांत दोन अंतःकरणें स्नेहसूत्रानें एकत्र बांधणारी ग्रंथि म्हणजेच अपत्य, ही व्याख्या किती यथार्थ आहे हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

' दारीं मूल कोण ग ? ' ' दारीं मूल पति ग ? '

आश्विन मासांत मुली बुलाबाईची स्थापना करून टिपऱ्यांचे तालावर गाणीं म्हणतात. त्यांतील एका गाण्याचा ' दारीं मूल कोण ग ? ' ' दारीं मूल पति ग ' असा प्रश्नोत्तरात्मक संवाद ऐकून बुचकळ्यांत पडलों. हें प्रश्नोत्तराचें कोडें उलगडण्यासाठींच विचारचक्र चालू असतां पत्नीला ' जाया ' हा शब्द असल्याचें ध्यानीं आलें. उपनिषदांत " पतिः जायां प्रविशति गर्भोभूत्वेह मातरम् । तस्यां पुनर्नवोभूत्वा दशमे मासि जायते ॥ तज्जाया जाया भवति यदस्यां जायते पुनः ॥ " या सूत्रांतून पति गर्भरूपानें नवीन देह धारण करून जिचे ठिकाणीं दहाव्या महिन्यांत जन्म घेतो ती ' जाया ' असा अर्थ शास्त्रकारांनीं सांगितला आहे. अर्थातच बालविवाह रूढ असतां दारीं बसलेल्या लहान मुलाकडे बोट दाखवून नवपरिणीत बालवधूच्या मैत्रिणी तिला हा प्रश्न विचारीत असतां तिनें लाजून अज्ञानतः दिलेल्या उत्तरांतहि सत्यांश गोवणाऱ्या कवीची धन्य होय असेंच वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

स्त्रीचें पूर्णत्व म्हणजेच मातृत्व

ज्याप्रमाणें वेलीला पुष्प व फळांनीं पूर्णत्व येतें, त्याप्रमाणें स्त्रीदेह किंबहुना स्त्रीजीवनाचें साफल्य म्हणजेच पूर्णत्व अपत्यप्राप्तीनें होत असतें व तें अपत्यच दोघांच्याहि संपूर्ण जीवनास आधार बनून राहतें. या दृष्टीनेंच

" स्त्रीषु प्रीतिर्विशेषेण स्त्रीष्वपत्यं प्रतिष्ठितम् ।
धर्मार्थौ स्त्रीषु लक्ष्मीश्च स्त्रीषु लोकाः प्रतिष्ठिताः ॥

चरक सं. चि. अ. २

भगवान् चरकाचार्यांनीं स्त्रीचें महत्त्व वर्णिलें आहे. अपत्यास जन्म दिल्यानंतर स्त्री ही माता बनते.

मातृत्व हेंच स्त्रीजीवनाचें वैभव कां ?

स्त्रियोंको निंदो मत स्त्रियाँ रतनकी खान ।
स्त्रियोंहीसे पैदा हुओ भीष्म राम हनुमान ॥

— सन्त कबीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संतश्रेष्ठ कबिरांनीं आपल्या ह्या 'दोहा' वचनांत म्हटल्याप्रमाणें स्त्री ही विश्वभूषण रत्नांची खाण आहे. अशा नररत्नांना जन्म देणारी माता त्रिकाळ वंद्य होय. 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी, तीच जगा उद्धरी' हें सुभाषितसुद्धां याच अर्थास पुष्टी देत आहे. वात्सल्य, सहृदयता, स्नेहासवित, स्वाभिमान्, निरपेक्ष प्रेम, स्वार्थत्यागाचा कडेलोट ह्या सर्वहि सद्गुणांची मूर्ति म्हणजेच माता! कोणत्याहि जाति, धर्म, पंथ देशांतील माता फार काय मानवेतर पशु व तिर्यग् योनि प्राण्यांतहि मातेच्या ठिकाणीं हे गुण आपणांस आढळून आल्याविना राहणार नाहींत.

गौतम, बौधायन, आपस्तंबादि धर्मसूत्रकारांनींहि मातेचा गौरव पुष्कळच केला आहे. स्मृतिकार 'मनु' तर उपाध्याय आचार्य व पिता यांहूनहि माता श्रेष्ठ होय असें म्हणतो. **"उपाध्यायान्दशाचार्य आचार्याणां शतं पिता । सहस्रं तु पितॄन् माता गौरवेणातिरिच्यते"** —मनुस्मृति २–१४५. याज्ञवल्क्यमुनींनींहि **'एते मान्या यथापूर्वेभ्यो मातागरीयसी'** (याज्ञवल्क्य स्मृ. १–३५) या सूत्रद्वारें मातत्वाचाच गौरव केला आहे.

अशाप्रकारें 'मातृत्व' ह्या गौरवाच्या उच्च शिखरावर पोंचण्याचा अधिकार स्त्रीचाच आहे, ही गोष्ट आणखी अधिक स्पष्ट करण्याची आतां आवश्यकता मुळींच उरली नाहीं. परंतु उच्च शिखरावर पोंचायला क्रमशः कांहीं ठरीव टप्पे ओलांडणें अपरिहार्य आहे. व त्यांतील सर्वांत महत्वाचा पहिला टप्पा 'मातृत्वाचें प्रसादचिन्ह' म्हणजेच 'गर्भधारणा' हा होय. त्यांतल्या त्यांत मग 'गर्भधारणेचे पहिले तीन महिने' हा काळ बराच खडतर असून तो सुरक्षितपणें ओलांडल्यावर अपत्यजननापर्यंतच्या 'सहामाहीचा चौथा टप्पा' ओलांडून शेवटीं प्रसूतीच्या दशाहाच्या भयंकर दिव्यांतून एकदां पार पडल्यानंतरच तें यशस्वी मातृत्वाचें गौरवपद लाभतें.

– २ –

'मातृत्वा'च्या भव्य प्रासादांत प्रवेश करण्यासाठीं प्रत्येक स्त्रीला 'गर्भधारणे'च्या दिंडीदरवाज्यांतूनच शिरावें लागतें. अपवाद म्हणून कांहीं प्रसंग वगळले तर सामान्यतः आपल्या देशांत १२ व्या वर्षी रजोदर्शन झाल्यानंतरच 'गर्भधारणा'-काल स्त्रियांचे बाबतींत निश्चित असलेला आढळतो, तथापि 'गर्भधारणा' होऊन पति-पत्नी व भावी संतति यांच्या आरोग्याच्या दृष्टीनें बारावें वर्ष हें गर्भधारणेस इष्ट नाहीं. कारण गर्भधारणकार्यासाठीं स्त्रियांचे ठिकाणीं निसर्गदत्त जे कटीर, गर्भाशय, बस्ति, बीजकोश, बीजवाहिनी इ० अवयव ते ह्या वयांत पूर्ण संक्षम असतातच असें नाहीं व म्हणून ह्या वयांत गर्भधारण होणें अनिष्ट मानलें गेलें आहे.

> "पूर्ण षोडशवर्षा स्त्री पूर्ण विंशेन संगता ।
> शुद्धे गर्भाशये मार्गे रक्तेशुक्रेऽनिले हृदि ।
> वीर्यवन्तं सुतं सुते" ॥ वाग्भट्ट, शारीर.

अर्थात् वयाचीं सोळा वर्षें पूर्ण झालेल्या स्त्रीला वीस वर्षें पूर्ण वयाच्या पतिसमागमानें गर्भधारणा होणें ही पूर्ण शास्त्रीय दृष्टि होय. याहून कमी वयांत गर्भधारणा होऊन जी संतति होते ती "ततो न्यूनाब्दयोः पुनः रोग्यल्पायुरधन्यो वा गर्भो भवति नैव वा ॥" अशा प्रकारची म्हणजे रोगी अल्पायुषी विकृत होते. क्वचित् गर्भधारणा होतहि नाहीं असेंहि वाग्भटाचार्यांनीं सांगितलें आहे.

वरील विवेचनावरून एक गोष्ट सिद्ध आहे कीं पूर्वकालीं बालविवाहाचा स्पष्ट निषेध असे. सुश्रुतसंहितेच्याकाळीं तर ह्याहूनहि हें वयोमान स्त्रीच्या बाबतींत १६ च्या व पुरुषाचें २० च्या पुढें पंचवीसपर्यंत असल्याचें आढळतें. त्याचा इत्यर्थ हाच कीं जननेंद्रियांची अंतर्बाह्य पूर्ण वाढ होणें गर्भधारणेस अत्यावश्यक मानलें आहे. अस्तु !

निर्दोष गर्भधारणा

गर्भधारणा निर्दोष होण्यासाठीं केवळ वयोमर्यादाच फक्त पाळण्याची आवश्यकता आहे असें नव्हे; तर प्रत्यक्ष स्त्री-पुरुष समागमाचा योग्य काळ व गर्भधारणेस अनुकूल शारीरिक भूमिका निर्मिण्यासाठीं उभयतांनीं आहारविहारदृष्ट्या घ्यावयाची दक्षता आणि कदाचित् गर्भधारणेसाठीं इष्ट असे जे मुख्य दोन घटक म्हणजे स्त्रीचें रज व पुरुषाचें शुक्र त्यांत कांहीं दोषविकृति असेल तर ती दूर कशी करावयाची हाहि विचार करणें क्रमप्राप्त आहे.

> ध्रुवं चतुर्णां सानिध्यात् गर्भःस्यात् विधिपूर्वकः ।
> ऋतुक्षेत्रांबुबीजानां सामग्र्यादंकुरो यथा ॥
>
> —सुश्रुत शा. अ. २

अंकुर चांगला निर्माण होण्यासाठीं ज्याप्रमाणें योग्य ऋतुकाळीं, योग्य क्षेत्रांत, व्यवस्थित वृष्टि होऊन चांगलें बीजहि पेरणें आवश्यक असतें, तद्वत् स्त्रीचाहि ऋतुकाळ तिचा देह (क्षेत्र), अंबु म्हणजे योग्य आहारजन्य रसादि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धातु आणि बीज म्हणजे स्त्रीचें रज व पुरुषाचें शुक्र हे दोन्ही शुद्ध असणें ह्या चारही गोष्टींची सुप्रजानिर्मितीस आवश्यकता असते असें सुश्रुताचार्यांनीं सांगितलें आहे. तेव्हां त्यासंबंधीं थोडा अधिक सविस्तर विचार करणें इष्ट आहे.

१ शुद्ध शुक्राचीं लक्षणें—

स्फटिकाभं द्रवं स्निग्धं मधुरं मधुगन्धिच ।
शुक्रमिच्छन्ति केचित्तु तैलक्षौद्रनिभं तथा ॥
—सु. शा. अ. २

तारुण्यांत पुरुषशरिरांतून जननेंद्रियद्वारां शुक्रधातु बाहेर येऊं शकतो. याचा वर्ण सामान्यतः पांढरा असतो. पण हा धातु शुद्ध नसेल तर त्याचा परिणाम स्वतःच्या व पत्नीच्याहि शरिरावर होऊन शिवाय भावी अपत्यासमुद्धां त्याचे बरे-वाईट परिणाम भोगावे लागतातच. निर्दोष शुक्राचा रंग स्फटिकाप्रमाणें पांढरा असून तें पाण्यासारखें पातळ किंवा घट्ट गोळचासारखें नसतें तर सामान्यतः मधाप्रमाणें असतें. त्यांत स्निग्धत्व म्हणजे चिकटपणा असून मधाप्रमाणें त्याचा वासहि असतो व त्याचा रस मधुर असतो.

शुक्रदोषशुद्धिः— सामान्यतया प्रत्येक मनुष्याचा आहार 'षड्रसं मधुप्रायम्' सर्व रसांनीं युक्त परंतु मधुर रसाधिक्य पदार्थांचा असावा असा सिद्धांत आहे. रसरक्तादि धातुपरंपरेंत शुक्रधातु सर्वांत शेवटीं निर्माण होतो. अर्थातच ज्यांचा आहार मधुररसप्रधान असेल त्यांच्या त्या आहाराच्या परिपाकाचें रूपांतर शास्त्रांत वर्णिल्याप्रमाणें 'मधुर' होणार हें निश्चित व इतरहि शुद्ध शुक्राचे गुण त्यांत असणारच! ह्यावरून हेंहि उघडच आहे कीं इतर राजस–तामस आहार वर्ज्य करून सात्त्विक ("रस्याः स्निग्धा स्थिरा हृद्याः आहारा सात्त्विक प्रियाः" भ. गी.) आहारसेवन हें शुक्रदोष नाशनाच्या अनेक उपायांतील पहिलें गमक होय. या शिवाय त्रिदोष दुष्टचा शुक्रांत जे अवगुण निर्माण झाले असतील ते नाहींसे करण्यासाठीं त्या त्या कुपित दोषांना नष्ट–शांत करणाऱ्या औषधींनीं सिद्ध असें दूध, तूप खाण्यांत, पिण्यांत, औषधींच्या अनुपानांत, बस्ति अभ्यंग इ. साठीं वापरणें हितावह होईल हें सांगणें नकोच.

शुक्ररक्षण हीसुद्धां सुप्रजाजननक्षम शुक्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. आहारामुळें जसे शुक्रांत दोष निर्माण होतात. तसेच विहारामुळेंहि दोष निर्माण होतात हें विसरून चालणार नाहीं. कुसंगतीमुळें बालवयांतच हस्तमैथुनादि वेडचावाकडचा क्रियांनीं अपक्व शुक्रनाश केल्याचा परिणाम जननेंद्रियांत विकृति व शुक्रधातूचा क्षय या रूपानें प्रौढवयांत भोगावा लागून अकालीं वृद्धत्व प्राप्त होतें. त्याचप्रमाणें खानपानांतील अनिर्बंध स्वैराचाराचेहि परिणाम शुक्रधातु दुष्टीच्याद्वारें भोगावे लागतातच.

पुरुष शुक्राचे मुख्य घटक दोन; गर्भोत्पादक बीजें हा एक घटक आणि त्याचा परिपोष करणारा द्रव हा दुसरा घटक होय! बीजरूप घटक हा सजीव असतो. शुक्राच्या एका बिंदूतसुद्धां असंख्य बीजें असतात.

"आत्मना अधिष्ठितः स बीजरूपोधातुः । पुरुषशरीरात् अभिनिष्पत्य उचितेनपथा गर्भाशयमनुप्रविश्य आर्तवेन अभिसंसर्गमेति ॥" —चरक सं. शा. अ. ४

शुक्र क्षीण व कमी झालेला असेल त्यांनीं शुक्रवर्धक द्रव्यें सेवन केलीं पाहिजेत. या दृष्टीनें क्षीरीवृक्षांपैकीं वडाचा चीक हें उत्कृष्ट द्रव्य आहे. साखरेबरोबर हा चीक सेवन करावा; शतावरी, आस्कंद, भुइकोहळा, सफेत मुसळी, गोखरू. आवळे, गुळवेल, ज्येष्ठमध हीं सर्वंहि औषधें शुक्रवर्धकच आहेत. ओली मिळाल्यास यांचे ताजे रस व शुष्क

रोगांवर जादूप्रमाणें तात्काळ प्रभाव करणारी
व स्थिर गुणकारी

आयुर्वेदिक इंजेक्शन्स

उच्च शिक्षित अशा देशी व विदेशी विज्ञानतज्ज्ञांच्या देखरेखीखालीं व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज अशा रसायनशाळेंत हीं इंजेक्शन्स तयार झालेलीं असून तीं त्वरित प्रभावशाली आहेत. शुद्धता व शीघ्रगुणकारित्व यांकरितां विख्यात असलेल्या या इंजेक्शन्सनीं वैद्यवर्गांत नवी आशा निर्माण केली आहे.

शास्त्रीय माहिती व सूचिपत्र मोफत मागवा.
आमच्या इंजेक्शन्सवर कसलाहि प्रतिबंध नाहीं.

मार्तंड फार्मास्युटिकल्स,
बडौत, S. S Rly. (उत्तर प्रदेश).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळाल्यास त्यांचीं वस्त्रगाळ चूर्णें वर निवेदन केल्याप्रमाणें मधुर रसयुक्त व सद्यः शुक्रकर अशा दूध, तूप, मध, साखर यांचेशीं. मिश्र करून ३ मासे प्रमाणांत घ्यावींत. अवष्टंभ प्रवृत्ति असल्यांस शौचास पातळ होणार नाहीं. इतक्या प्रमाणांत हिरडा किंवा त्रिफळा चूर्णाचाहि उपयोग करावा. दुधातुपाचा यथेच्छ प्रयोग खानपानांत करणें हें यांतील तत्त्व होय. मौल्यवान् औषधांत सुवर्णमालिनीवसंत, लक्ष्मीविलास, चंद्रप्रभा, लक्ष्मीनारायण ह्यासारख्या उत्कृष्ट औषधांचेंहि सेवन शुक्रवर्धक म्हणून करणें चांगलें.

अशा औषधांचें सेवन करण्यापूर्वीं एक गोष्ट मात्र अवश्य लक्षांत ठेवली पाहिजे कीं ज्याप्रमाणें कोणत्याहि भिंतीला किंवा वस्तूला रंग देण्यापूर्वीं ती स्वच्छ घासूनपुसून तिच्यावरील मळ खरडून काढावा लागतो. त्याप्रमाणें ह्या शरीररूपी वस्तूलाहि अंतर्बाह्य शुद्ध केल्यावांचून अशा वृष्य, शुक्रवर्धक औषधांचा उपयोग करूं नये.. वमन, विरेचनद्वारा कोष्ठशुद्धि करून घेऊन नंतरच हे सर्वहि योग वापरावेत.

शुक्र रक्षणाच्या दृष्टीनें यद्यपि १६।१७ व्या वर्षापासून तारुण्यास आरंभ होत असला, तरी स्त्रीसमागमास हा काळ अनुकूल नव्हे, आणखीहि निदान ४ वर्षें तरी व्यायाम व युक्त आहार-विहार करून ब्रह्मचर्य पाळणें हेंच हितावह आहे. असें केल्यानें पूर्ण पक्व अशा त्या शुक्रधातूंत आपली प्रतिकृति म्हणजे दुसरें शरीर निर्माण करण्याची पूर्ण पात्रता येते. शरीरांतर्गत शुक्रस्थानें जीं वृषण, शुक्रनाडी व पौरुष ग्रंथि त्यांचीहि यथेष्ट वाढ झाल्यामुळें तीं कार्यक्षम होतात. मग पुढें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें आणखी पन्नास वर्षें म्हणजे वयाच्या सत्तराव्या वर्षापर्यंत त्याची कार्यक्षमता नष्ट होत नाहीं म्हणजेच अकालीं वृद्धत्व येत नाहीं.

गर्भधारण व्यवस्थित होण्यासाठीं स्त्रीपुरुषांची शुद्धबीजें, विशिष्ट तरुण वयें, स्त्रीपुरुषांची परस्परांवरील अनुरक्तता आणि फलघृत, कल्याणघृत यांच्याप्रमाणें गर्भधारणा पात्रता निर्माण करणारे अन्य औषधीयोग ह्यांच्या सेवनाची आवश्यकता असते.

या लिहिण्यावर शंका घेणारे अशीहि शंका घेतील कीं "ह्या आवश्यक गोष्टींपैकीं कांहीं किंवा कोणतीहि गोष्ट अनुकूल नसतां गर्भधारणा होऊंच शकत नाहीं कीं काय ?" यावर उत्तर एवढेंच देतां येईल कीं, शुक्रशोणित संयोगानें गर्भधारण होणें हा निसर्गनियम आहे. तथापि 'सुप्रजा निर्माण' हें एक शास्त्र आहे व त्याचे सर्वहि नियम निसर्गनियमावरच आधारलेले आहेत. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें योग्य काळ, योग्य प्रमाणांत वृष्टि, भूमीहि उत्तम व बीज शुद्ध असलें तरच त्या जमिनींतून पीक मनासारखें येतें. हा दृष्टांतच येथें उत्तरादाखल देतां येईल. ह्या गोष्टी जितक्या प्रमाणांत चांगल्या अथवा वाईट असतील तितक्याच प्रमाणांत पीक म्हणजेच भावी प्रजा बरी–वाईट निर्माण होणार आहे.

गर्भधारणा न होण्यास क्षेत्रशुद्धि म्हणजेच स्त्रियांचे गर्भाशयाचे ठिकाणीं निरोगीपणा नसणें अर्थातच त्यासंबंधीं निरनिराळ्या विकृति असणें ही गोष्ट फार महत्त्वाची गणली पाहिजे. म्हणून त्या विकृतीविषयीं अधिक स्पष्टीकरण करून हें प्रकरण संपवूं—

१ गर्भाशयाचें शैथिल्य, २ गर्भाशय शोथ (सूज), ३ गर्भाशय भ्रंश ह्या गोष्टी सामान्यतः अशा वेळीं विचारांत घ्याव्या लागतात. कारण यांमुळेंच श्वेतप्रदर, रक्तप्रदर, कष्टार्तव (पाळीचे वेळीं पोट दुखणें), न्यूनार्तव (विटाळ कमी होणें), अनियतार्तव (पाळी व स्रावाचें प्रमाण अनियमित असणें) ह्या पीडा स्त्रियांच्या पाठीमागें नित्याच्या लागतात अर्थातच तत्संबंधीं योग्य चौकशी करून (१)

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्टौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक. गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.

टे. नं. ३१७९६ Telegram–AYURVED,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अश्वगंध (आस्कंद), शतावरी, अशोक यांसारख्या गर्भाशयास पुष्टी देऊन अंतस्त्वचेचें शैथिल्य नष्ट करून कार्यक्षम बनविणारीं सेंद्रिय द्रव्यें किंवा त्यांचें संयुक्त कल्प, (२) वेदनानाशक व सूजनाशक अशी पारसीकयवानी, उपळसरी सदृश द्रव्यें आणि (३) धायटी फुलें, लवंग, काटेमाठ, अशोक, उंबराचीं फळें यासारख्या कषाय रसयुक्त, वातनाशक, शीत व स्तंभक या द्रव्यांचा यथाप्रमाण उपयोग करणें हितावह होतें. अर्थातच विकृतिनिश्चय व ती नष्ट करण्याकरितां ह्या एक, अनेक वा याच गुणधर्मांच्या अन्य औषधांचें सेवन यांविषयीं तज्ज्ञांकडून अभिप्राय घेणें हें अधिक हितावह होईल हें सांगणें नको !

गृहस्थाश्रमांत पदक्षेप केल्यानंतर विशिष्ट कालावधीनंतर 'मातृत्वाचें प्रसादचिन्ह' अशी गर्भधारणा न झाल्यास त्या दांपत्याकडे जगहि साशंक नजरेनें पाहूं लागतें; व त्याबरोबरच स्वतः स्त्रीलाहि आपल्या समवयस्क मैत्रिणी मातृपदारूढ झालेल्या व होणार असल्याचें पाहून एक प्रकारची आंतरिक हुरहूर लागतेच लागते. त्याचप्रमाणें पुरुषहि आपल्या पत्नीला 'अभिव्यक्त सत्त्वलक्षणा' म्हणजेच 'गर्भवती' पाहाण्यासाठीं आतुर असतोच असतो. जरा कालावधी उलटतांच उभयतांच्याहि अंतःकरणांत कालवाकालव होऊन दोघेहि औषधपाणी व देवधर्म धुंडूं लागतात, असा देखावाहि सर्वत्र पहाण्यास मिळतो. अशा दंपतींनीं हें प्रकरण अत्यंत लक्षपूर्वक वाचावें व आचारावें म्हणजे त्यांची आशा सफळ होईल. परंतु त्यांनीं हेंहि पूर्ण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, त्यांच्या आशेच्या साफल्याचीं प्रसादचिन्हें दिसूं लागल्यानंतर हुरळून न जातां यापुढें अधिक सावधानतेनें पावलें टाकण्याची जबाबदारी आपल्या शिरावर आतां आली आहे हें ओळखून या पुढच्या प्रकरणांकडेहि चित्ताची एकाग्रता करूनच लक्ष दिलें पाहिजे. कारण गर्भधारणा झाल्यानंतर स्त्रीच्या शरिरांत व मनांत फार मोठी क्रांति होत असते व कांहीं नैसर्गिक शारीरिक घडामोडी होत असतां निरनिराळ्या प्रकारचे त्रास होत असल्याचें अनुभवास येतें. कित्येक स्त्रियांना तर हे त्रास इतके जाणवतात कीं त्यांना जीव नकोसा होऊन घरांतील जबाबदार व्यक्तींनाहि काळजी उत्पन्न होते. त्यांतल्या त्यांत 'गर्भवतीचे पहिले तीन महिने' तर विशेषच काळजीचे असतात. प्रथमतःच गरोदर राहिलेली स्त्री व तिचा पति "मातृत्वाचें हें प्रसादचिन्ह दुश्चिन्ह तर ठरणार नाहीं ना ?" अशा कुशंकेनें व्याकूल होऊन जातात. म्हणून अशा अननुभवी पतिपत्नीसाठींच पुढील प्रकरण 'गर्भवतीचे पहिले तीन महिने' लिहिलें आहे.

गर्भवतीचे पहिले ३ महिने

'गर्भधारणा' होऊन मातृत्वाचें प्रसादचिन्ह प्राप्त झालेल्या स्त्रीस 'गर्भवती' हो संज्ञा प्राप्त होते. धर्मशास्त्रानुसार 'फलशोभन' संस्कार ऋतुमती स्त्रीचा झाल्यानंतर गर्भिणीस निश्चयें करून पुत्रप्राप्तीच व्हावी म्हणून करावयाचा जो संस्कार त्याला 'पुंसवन' संस्कार म्हणतात. या बरोबरच वैद्यकशास्त्रानेंहि ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या विशेष सावधानतापूर्वक पाळण्याची फार मोठी जबाबदारी गर्भधारणा झाल्यापासून गर्भवती स्त्रीवर आणि त्या बरोबरच त्या कुटुंबांतील जबाबदार व्यक्तींवर असते. त्यांतल्या त्यांत अगदीं पहिल्यांदांच गर्भवती असलेल्या स्त्रीच्या बाबतींत हो दक्षता तर फारच कटाक्षानें पाळावयाची असते.

गर्भवती स्त्रीचीं लक्षणें

स्तनयोः कृष्णमुखता, रोमराज्युद्गमस्तथा।
अक्षिपक्ष्माणि चापस्याः संमील्यन्ते विशेषतः॥
अकामतः छर्दयति, गंधादुद्विजते शुभात्।
प्रसेकः सदतंचापि गर्भिण्या लिंगमुच्यते॥

सुश्रुतशरीर अ. ३

म्हणजे स्तनाग्रें काळीं पडणें, बेंबीचे खालीं ओटीपोटाकडे केसांची बारीक रेषा उमटणें, डोळ्याच्या पापण्यांची उघडझांप सावकाशीनें होणें किंबहुना पापण्या मिटलेल्याशा दिसणें, कारण नसतां वांत्या होऊं लागणें, सुगंधित पदार्थांच्या वासाचा तिटकारा वाटणें, तोंडाला वारंवार पाणी सुटणें, आणि थकवा वाटणें या लक्षणांवरून सामान्यतः स्त्री गरोदर असल्याचा निश्चय करतां येतो. व तेव्हांपासूनच उदरांत रुजूं घातलेल्या भावी वंशांकुराची वाढ नीट व्हावी म्हणून जपणूक करूं लागावें. गेल्या प्रकरणांत मातेची थोरवी वर्णन करतांना आपल्या तान्हुल्याच्या सुखासाठीं माता किती स्वार्थत्यागाची पराकाष्टा करते तें सांगितलें. तिच्या ह्या स्वार्थत्यागाची सुरवात खरोखर याच क्षणापासून व्हावयाची असते.

गर्भरक्षण, पोषण, संवर्धन.

देवाच्या दयेनें उदरीं अवतीर्ण झालेला हा गर्भ नऊ महिन्यानंतर जन्मास घालण्याचा मान अथवा भाग्य आपणांस प्राप्त व्हावयाचें आहे तेव्हां त्या गर्भाचें नीट संगोपन झालें पाहिजे. इतकेंच नव्हे तर तो पोषणाचे अभावीं सुकून जाऊं नये अथवा आपलें दुर्लक्ष होऊन वेड्यावाकड्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहार–विहारांमुळें तो गर्भ चांगलें मूळ धरण्यापूर्वीच गळून पडूं नये व उत्तरोत्तर त्याची नैसर्गिक वाढ नीट होत रहावी इतक्या गोष्टींसाठीं गर्भवती स्त्रीनें जपावयास हवें. अर्थातच त्यासाठीं तिनें आपला आहार, विहार व्यवस्थित ठेवला पाहिजे. आणि इतकेंहि करून कांहीं न्यून पडत आहे असें आढळलें तर तें पूर्ण करण्यासाठीं औषधादि शास्त्रीय उपचारांचेंहि वेळींच साहय घेतलें पाहिजे.

गर्भधारणा झाल्यानंतर गर्भवती स्त्रीनें काय करावें, काय करूं नये, काय खावें, काय खाऊं नये, कसें वागावें, कसें वागूं नये हें फार उत्तम प्रकारें आयुर्वेदांत सांगितलें आहे. एकत्र कुटुंबपद्धति असतां यांपैकीं किती तरी नियम आपोआपच गर्भिणीकडून न कळत पाळले जात होते व त्यामुळें एकच काय पण दहादहा बाराबारा बाळंतपणें होऊनहि स्त्रियांची प्रकृति सुदृढ राहात असे. आजकाल मियाबिबीचे संसार बहुसंख्य झाल्यामुळें व सर्व जीवन यांत्रिक बनत चालल्यामुळें शास्त्रीय आज्ञा समजावून सांगण्यासाठीं अशा लेखांची जरुरी भासूं लागली आहे.

"नदा प्रभृति व्यवायं व्यायाममतितर्पणमतिकर्षणं दिवास्वप्नं रात्रिजागरणं शोकं यानावरोहणं भयमुत्कटुकासनं चैकान्ततः स्नेहादि क्रियां शोणितमोक्षणं चाकाले वेगविधारणं च न सेवेत॥ दोषाभिघातैर्गर्भिण्या यो यो भागः प्रपीडयते। स स भागः शिशोस्तस्य गर्भस्थस्य प्रपीडयते॥ सु. शा. ३

म्हणजे मैथुन, व्यायाम, तृप्तिकारक पदार्थांचें अतिसेवन, किंवा निकस अन्न अल्पाहार अथवा उपोषणें इ० नीं शरीर कृश करणें, दिवसां झोंप, रात्रीं जागणें, शोक करणें, वाहनावर बसून हिंडणें, भीति, उकिडवें बसणें, स्नेह स्वेदादि पंचकर्मे वारंवार एकसारखीं करीत राहाणें, रक्तमोक्षण भलत्याच वेळीं करणें, आणि भूक, तहान, शिंक, जांभई, मल, मूत्र इ० नैसर्गिक वेग आले असतां अडवणें किंवा त्यांचें मुद्दाम प्रवर्तन करणें ह्या गोष्टी स्त्रीनें गर्भवती झाल्यावेळेपासून वर्ज्य कराव्या. या सर्व गोष्टींच्या योगानें वात-पित्तादि दोष वाढून गरोदर स्त्रीच्या ज्या ज्या अवयवाला त्रास होईल तो तो भाग पुढें उत्पन्न होणाऱ्या व आज अंशभूत गर्भाचे ठिकाणीं असणाऱ्या अवयवालाहि घातक होत असतो.

व्यायामाच्या बाबतींतहि एक गोष्ट गर्भवती स्त्रीनें ध्यानांत ठेवली पाहिजे ती म्हणजे जेणें करून अत्यंत थकवा येईल अशीं शारीरकष्टाचीं कामें तिनें करूं नयेत हें जसें खरें त्याचप्रमाणें केवळ खाणें व बसणेंहि हितावह होणार नाहीं. गर्भाच्या वाढीच्या विशिष्ट अवस्थेपर्यंत दळण, कांडण, धुणें, भांडीं इ० सारखीं घरगुती व अल्पश्रमाचीं कामें करण्यांत घडणारा व्यायाम हा हितावह असतो, इतकेंच नव्हे तर त्यामुळें शरीर हलकें, चपळ राहून अंतरावयवहि कार्यक्षम राहातात व अगदीं कोणताहि त्रास न होतां योग्य वेळीं सुखरूप प्रसुति होते. परिस्थिति, इच्छा, आवड, वैभवाचा अहंकार, मोठ्यांचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति, इ० अनेक कारणांमुळें सध्यां घरगुती कामांतील स्त्रियांचा व्यायाम कमी झाला हें स्त्रीरोगाच्या अनेक कारणांपैकीं एक महत्त्वाचें कारण आहे असें म्हटलें तरी चालेल. व्यायामाच्या नांवाखालीं स्त्रियांचे क्लब कांहीं ठिकाणीं निघालेले आपण पाहातों, तथापि स्त्रियांना उपयुक्त अशा व्यायामाच्या गोष्टींकडे अशा क्लब्समधून फारच क्वचित् लक्ष दिलेलें आढळून येतें. मातृत्वाची जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीनें योग्य अशा अंतर्बाह्य महत्त्वाच्या अवयवांना व्यायाम घडावा अशी पद्धति किंवा दृष्टि फारच क्वचित् ठेवलेली असते व त्यामुळेंच बहुधा १।२ बाळंतपणानंतर स्त्रीचें स्त्रीत्व नष्ट होतें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं.

गर्भवतीचे पहिले तीन महिने तर खूपच शारीरिक घडामोडीचे असल्यामुळें वर सांगितल्या गोष्टींशिवाय खाण्यापिण्याच्या बाबतींतहि विशेष दक्षता गरोदर स्त्रीनें घेणें अवश्य आहे. सुश्रुताचार्यांनीं सुद्धां "विशेषतस्तु गर्भिणी प्रथम द्वितीय तृतीय मासेषु मधुर शीतद्रवप्रायम् आहारम् उपसेवेत" (शा. अ. १०) म्हणजे पहिल्या तीन महिन्यांत गर्भिणीनें मधुर रसात्मक शीतवीर्य व पातळ स्वरूपाचा आहार ग्रहण करावा असें स्पष्ट सांगितलें आहे. त्यांतहि 'विशेषतस्तु तृतीये षष्ठिकौदनं पयसा भोजयेत्" (शा. अ. १०) म्हणजे तिसऱ्या महिन्यांत तर विशेषतः साठे तांदळाचा भात दुधाशीं खावा. हें मुद्दाम अगदीं बजावून सांगितलें आहे. असा आहार सांगण्याचा हेतु हाच आहे कीं, अगदीं पहिल्या महिन्यापासूनच गर्भाचें पोषण व्यवस्थित होणें जरूर असतें आणि तें सर्व पोषण मातेच्या आहाररसावरच अवलंबून असतें. मातेच्या नित्य आहारावर या पुढें मातेचें स्वतः पोषण होऊन शिवाय गर्भाचेंहि पोषण व्हावयाचें असतें. तेव्हां दोघांच्या पोषणास जर आहाररस कमी पडला तर गर्भाचें पोषण होणार नाहीं व गर्भिणीहि उत्तरोत्तर कृश होईल.

डोहाळे

सगर्भावस्थेंत गर्भिणीला ज्या निरनिराळ्या इच्छा होतात त्यांना डोहाळे म्हणतात. संस्कृत शास्त्रीय परिभाषेंत यालाच दौहृदत्व म्हणतात. गर्भ हा जसजसा वाढत जातो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसतसें त्याचें हृदयहि वाढतें. हृदय हा अवयव गर्भाला मातेकडूनच प्राप्त होत असतो. या हृदयांतच गर्भाचें मन व चेतना वाढूं लागते व गर्भ स्वतःला हव्या असणाऱ्या वस्तूंची इच्छा करूं लागतो. गर्भाचें हृदय हें गर्भिणीच्या म्हणजेच मातेच्या हृदयाशीं गर्भनाडीच्या द्वारें संबंधित असल्यानें व गर्भाला स्वतःच्या इच्छा व्यक्त करतां येत नसल्यानें गर्भिणीच्या हृदयामार्फत गर्भनाडीरूपी तारायंत्राच्या मध्यस्थीनें ह्या इच्छा गर्भहृदय व्यक्त करीत असतें. हाच तो डोहाळे होण्याचा काल होय. सामान्यतः तिसरे महिन्यापासून क्वचित् दुसऱ्याहि महिन्यापासून पांचव्या महिन्यापर्यंत हा काळ असतो. गर्भदेहाच्या पोषणास ज्या घटकाची जरुरी किंवा उणीव राहिली असेल तो घटक त्या त्या रसात्मक खाद्यपेय वस्तूंचे द्वारा भरून निघावा अशी नैसर्गिक इच्छा गर्भहृदयांत होते व म्हणून आम्ल, तिखट, खारट इ० पदार्थांवर गर्भिणीची इच्छा होते. अर्थातच त्या त्या रसांचे परंतु अपाय न करणारे असे पदार्थ गर्भिणीला खाण्यासाठीं देणें या वेळीं इष्ट असतें. मात्र तारतम्यानेंच हे डोहाळे पुरविले गेले पाहिजेत. उदाहरणादाखल सूचना म्हणून येथें असेंहि सुचवून ठेवतां येईल कीं विदाही म्हणजे जळजळ करणारे, तीक्ष्ण, मोहरी मसाल्यासारखे किंवा शिळें ताक, दहीं इ० दोष प्रकोप करणारे पदार्थ गर्भिणी खाऊं म्हणत असेल तर असे पदार्थ न देतां ह्याच रसाचे पण हितकर असे सुंठ, मिरें, डाळिंब इ० पदार्थ देऊन तिची इच्छा म्हणजेच गर्भाची इच्छा तृप्त करून गर्भशरीरांतील उणीव भरून काढण्यास साह्य केलें पाहिजे.

गर्भस्थापक औषधें

वर सांगितल्याप्रमाणें गर्भिणीनें आहार-विहार ठेवल्यास सहसा कोणतीहि आपत्ति उत्पन्न न होतां गर्भाची क्रमशः वाढ होऊन योग्य काळीं सुखरूप प्रसुती झाल्यावांचून राहात नाहीं. तथापि सामान्यतः शें. ३० ते ४० स्त्रियांना तरी कांहीं ना कांहीं निमित्त उत्पन्न होऊन गर्भपातासारख्या कठिण परिस्थितीला तोंड द्यावेंच लागतें असें आढळून येतें. व ही परिस्थिति बहुधा दुसऱ्या तिसऱ्या महिन्यांतच होत असते ('द्वयोः त्रिषु मासेषु वा'–चरक). यांतच पुन्हां जर फिरंगोपदंश, गर्भाशयाचा चिरकालिन दाह किंवा वृक्क म्हणजे मूत्रपिंडाचा दाह वगैरे भानगड प्रकृतींत असली तर मग गर्भपाताची कायमचीच खोड स्त्रियांना लागल्यावांचून राहात नाहीं हें ठरलेलेंच ! अर्थातच मग अशा प्रसंगासाठीं उपाययोजना केल्यावांचून गत्यंतर नाहीं. हे असे उपाय २ प्रकारचे होऊं शकतात. (१) प्रतिबंधक (२) रोगहारक. यांपैकीं प्रतिबंधक चिकित्सा वास्तविक आरंभींच सांगितली गेली आहे. गर्भपात होऊं नये यासाठींच गर्भिणीनें अगदीं प्रथम दिवसापासून कोणकोणत्या गोष्टी करूं नयेत. मित व हितकारक आहारविहार करावा इ० हीच ती चिकित्सा होय, अर्थात् आतां वर्णन करावयाचें राहिलें तें फक्त गर्भपातचिकित्साच होय. भगवान् चरक मुनींनीं शारीरस्थानांतील ८ व्या अध्यायांत या बाबतींत फारच उपयुक्त आदेश दिला आहे. गर्भपाताचीं पूर्वलक्षणें कंबर, जांघ, ओटीपोट या ठिकाणीं शूळ होऊन रक्तस्राव योनिमार्गानें सुरू होणें हींच होत. (सुश्रुत शारीर अ. १०) तीं दिसूं लागतांच "शयनं तावत् मृदुसुख शिशिरास्तरणसंस्तीर्णमीपदवनत शिरस्कं प्रतिपद्यस्व इति एनां (स्त्रियं) ब्रूयात्" म्हणजेच सुखकारक मऊ शय्येवर डोक्याकडील भाग उतरता राहील अशा स्थितींत स्वस्थ पडून राहाण्याबद्दल स्त्रीला सक्त ताकीद द्यावी. डोक्याकडील भाग उतरता ठेवण्यांत रक्तप्रवाह अधोमार्गाकडे जाऊं नये हाच हेतु होय यांत शंकाच नको. शिवाय 'क्रोध शोकायास व्यवाय व्यायामेभ्यश्च अभिरक्षेत । सौम्याभिश्चैनां कथाभिः मनोनुकूलाभिरुपासीत यथा अस्याः गर्भस्तिष्ठति ।' म्हणजे राग, शोक, श्रम, मैथुन, व्यायाम इ० शारीरिक व मानसिक गोष्टींपासूनहि तिला अलिप्त ठेवण्याची दक्षता घ्यावी म्हणजे पडूं पाहाणारा गर्भ स्थिर होतो ही सुश्रुताचार्यांची सूचनासुद्धां अगदीं आधुनिक वैद्यकाच्या तोडीचीच आहे व ती यथार्थ आहे असेंच म्हणावें लागतें.

औषधें

औषधांत सुद्धां बाह्य व आभ्यंतर असे २ प्रकार उपचार दृष्टीनें संभवतात. रक्तस्तंभन हा प्रधान हेतु दृष्टीपुढें ठेवून थंड औषधांच्या काढ्यानें देहसिंचन, शरिराचा अधोभाग बुडवून ठेवणें, थंड व स्तंभक औषधांचे पिचु (बोळे) योनिमार्गांत धारण करणें व अशा प्रकारच्या शीत व शामक औषधांनीं रक्तप्रवाह बंद होऊन गर्भ पडण्याची भीति नाहींशी झाल्यावरहि ७/८ दिवसपर्यंत गर्भिणीला स्वस्थ पडून विश्रांति घेण्यास भाग पाडणें अवश्य असतें असें शास्त्रानें अगदीं निक्षून सांगितलें आहे.

(१) जीवनीय गणांतील औषधांनीं सिद्ध केलेलें दूध पिण्यास द्यावें. रक्तस्राव अत्यंत होत असेल तर कुंभारीण नांवाच्या किड्यानें केलेल्या घरांची माती, लाजाळू, धायटीचीं फुलें, मोगऱ्याच्या किंवा जास्वंदीच्या फुलाच्या कळ्या, गेरू, राळ, रसांजन यांचें चूर्ण मधांतून चाटवावें (२) किंवा वड, उंबर, पिंपळ, लोध्र इ० पैकीं मिळतील त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वृक्षांची साल आणि प्रवाळ यांचा कल्क (वाटलेला गोळा) दुधाशीं पिण्यास द्यावा. (३) जेष्टमध, वाळा, कमळ, नागरमोथें, चंदन, वडाचे कोवळे अंकुर, उसाचीं मुळें यांचा कल्क किंवा कषाय द्यावा. एवंच शीत व रक्तस्तंभक उपचार करावेत.

परंतु केव्हां केव्हां अशीच पाळी येऊन ठेपते कीं शेवटीं गर्भपात घडवून आणण्याचीच पाळी येते व तरच गर्भिणीचें जीवित सुरक्षित राहाण्याचा संभव असतो. परंतु हें कार्य शस्त्रवैद्याचे साहाय्य असल्यावांचून करणें इष्ट नसतें. अर्थातच हा प्रश्न शस्त्रकर्म विशारदांचे क्षेत्रांतील असलेमुळें त्या बद्दल येथें कांहींहि लिहिणें अप्रस्तुत ठरतें.

गर्भपाताची कित्येक स्त्रियांना अगदीं खोडच लागलेली आढळते. अशांचाहि विचार येथें केला पाहिजे. त्या दृष्टीनें सुश्रुताचार्यांनीं 'मासानुमासिक' चिकित्सा वर्णन केली आहे ती अवश्य लक्षांत ठेवून योग्य वेळीं तिचा प्रत्यक्षांत उपयोग केला पाहिजे. पहिल्या महिन्यापासून सातव्या महिन्यापर्यंतची ही चिकित्सा वर्णिलेली आहे. आपण तूर्त या प्रकरणापुरती १ ते ३ महिन्यांचीच चिकित्सा पाहूं—

(१) प्रथम महिन्यांत गर्भस्राव होत असतां— मोहाच्या वृक्षाची साल, सागाचें बीं, भुइकोहळा व देवदार यांचा कल्क दुधाशीं द्यावा.

(२) दुसऱ्या महिन्यांत गर्भस्राव होत असल्यास—आपटा, काळे तीळ, मंजिष्ठ, व शतावरीमूळ यांचा कल्क दुधाशीं द्यावा. (२) गर्भस्राव होतोसें वाटलें तर कमळाचे कोवळे तंतू व नागकेशर वाटून दुधाशीं द्यावें. शूळ असेल तर तगर कमळ, बेलफळ, कापूर शेळीच्या दुधांत वाटून पिण्यास द्यावें.

(३) तिसऱ्या महिन्यांत गर्भस्रावाची खोड असेल तर—

१. बांडगूळ, आस्कंद, पांढरी व काळी उपळसरी यांचा कल्क दुधांतून द्यावा. २. गर्भस्राव होतोसें वाटल्यास नागकेशर दुधांत वाटून दूधसाखर घालून पिण्यास द्यावें. ३. शूळ असेल तर पद्मकाष्ठ, वाळा, चंदन, कमळनाल, थंड पाण्यांत वाटून दुधांत कालवून पाजावें.

या नंतरचे पुढील सहा महिने म्हणजे प्रथम गर्भवती मुलीच्या सुखद भविष्याचा निर्णयच होय. ह्या सहा महिन्यांतहि गर्भवतीच्या आहारविहाराकडे लक्ष देऊन गर्भपोषक अशा औषधांचा उपयोग करावा लागतो व नंतरच 'मातृत्वा'च्या प्रसादचिन्हास मूर्तस्वरूप आणणारा तो भाग्याचा दिवस उजाडतो. म्हणून गर्भवतीस आपण म्हणूं या का ?

'भविष्य पाही मुली ! रातदिन
तव हांकेची वाट मनीं'

"आफालि"
रक्त-दोषांतक
अत्यंत विश्वासनीय रक्तशुद्धीकारक
आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.
EVEREST R. 53.1
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यूटोन :

प्रमुख घटक– उदुंबरफल, अश्वगंधा, शतावरी, अशोक, उपळसरी, इंद्रजव, काटेमाठ, ज्येष्ठमध, मनुका, पारसिक यवानी, लवंग, वेलची, दालचिनी, धातकीपुष्प, शर्करा.

गर्भरक्षक, गर्भपोषक आणि गर्भाशयाच्या विविध विकारांत गुणावह अशा आयुर्वेदीय वनस्पतींचा यूटोन हा संयुक्त कल्प आहे. उदुंबरफळें हीं गर्भरक्षक व गर्भस्थापक आहेत. अश्वगंधा व शतावरी या गर्भपोषक व गर्भाशयाला पुष्टी देणाऱ्या वनस्पति आहेत. अशोक हे महिलांच्या गर्भाशयविकारांवरील सर्वश्रेष्ठ आयुर्वेदीय औषध यूटोनमध्यें समाविष्ट आहे. काटेमाठ, ज्येष्ठमध, मनुका हीं द्रव्यें शीत, रक्त-प्रसादक व रक्तस्रावप्रतिबंधक असल्यानें प्रदरादि विकारांत तीं उपयुक्त ठरलेलीं आहेत. या निवडक व श्रेष्ठ गुणकारी औषधांचा यूटोनमधील संयोग निरोगी स्त्री-जीवन आणि मातृपदप्राप्ती या दृष्टीनें अत्यंत परिणामकारक ठरलेला आहे.

गर्भाशयाचें शैथिल्य, सूज, स्थानभ्रष्टता, विकृति व त्यांतून निर्माण होणारे श्वेत-रक्तप्रदरादि उपद्रव, अनियमित मासिक ऋतुस्राव, अत्यार्तव इ. दोषांमुळें स्त्रियांची प्रकृति बिघडते. वैवाहिक जीवन दुःखी होतें. मातृपदप्राप्तीचा संभव दुरावतो. गर्भधारणा झाली तरीहि गर्भस्राव वा गर्भपाताचा धोका असतो. गरोदर-पण सुखावह होत नाहीं, आणि प्रकृति कित्येक वेळां कायमचीच खालावते. गर्भाचें पोषण नीट होत नाहीं. या अवस्थेंत यूटोन हा एक उत्कृष्ट उपाय आहे. आरोग्य-रक्षणासाठीं तें स्त्रियांनीं अवश्य घ्यावें. गर्भाशयविकारांत तें निश्चित गुणावह आहे आणि गरोदरपणीं तें सतत घेत राहिल्यानें गर्भाचें रक्षण व पोषण नीट होतें.

यूटोन हें द्रव औषध आहे. तें स्वादिष्ट, रुचकर, सुगंधी, हृद्य व लज्जतदार आहे. चार चमचे औषध समभाग पाण्यांतून सकाळीं व सायंकाळीं अगर वैद्याच्या सूचनेनुसार घ्यावें.

लोहीन :

प्रमुख घटक– ताज्या आवळ्यांचा रस, रौप्यभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म, लोह-भस्म, शुद्ध शिलाजित, त्रिफळा, शुंठी, पिंपळी, वंशलोचन, ज्येष्ठमध, वावडिंग.

लोहीन हा संयुक्त कल्प मधुर, अम्ल, शीत व धातुवर्धक रसायन आहे. विविध कारणांनीं होणाऱ्या सर्व प्रकारच्या पांडुरोगांत तो गुणकारी आहे. लोह व रक्तो-त्पादक इतर घटकांची आहारांत उणीव भासल्यानें पांडुरोग झाला असल्यास लोहीन-मध्यें या घटकांचा भरपूर प्रमाणांत समावेश आहे. आहारांत रक्तोत्पादक घटक असूनहि त्यांचें नीट पचन व शोषण होत नसल्यामुळें झालेल्या पांडरोगांत लोहीन वापरल्यास पचन व शोषणक्रिया त्वरित सुधारते. यकृत, प्लीहा, अस्थिमज्जा यांच्या आश्रयानें रक्तोत्पादनाचें कार्य करणाऱ्या रक्तधरा कलेच्याच कार्यांत बिघाड उत्पन्न झाला असल्यास त्यामुळेंहि पांडुरोग होऊं शकतो. लोहीनमुळें रक्तधरा कलेचें मालिन्य दूर होऊन ती स्वाभाविक रक्तोत्पादनक्रियेस समर्थ होते. लोहीन कांहीं काळ नियमित घेतल्यास त्वरित रक्तवृद्धि होऊन रक्तांतील गोलक व रंजित द्रव्यें यांची यथाप्रमाण वाढ होते व शरीर प्रतिकारक्षम व बलवान बनतें. फिकेपणा जाऊन त्वचेवर रक्तिमा येतो, उत्साह वाटूं लागतो आणि मानसिक समतोलता येते.

रक्तक्षीणतेमुळें येणारी तोंड, पाय, सर्वांग यांवरील सूज, जडता, वेदना, हृदयदौर्बल्य व मानसिक क्षीणतेचीं, ओजक्षयाचीं लक्षणें लोहीन नाहींशी करतें. तें ओजोवर्धक व पुष्टीतुष्टिकर आहे. पांडुरोग, रक्तक्षय, राजयक्ष्मा, ज्वर अशा कोण-त्याहि दीर्घकालीन रोगाचा परिणाम म्हणून रक्तवह स्रोतसांच्या अशक्ततेचीं लक्षणें ज्यावेळीं दिसूं लागतात त्यावेळीं या कल्पाचा उपयोग फलदायी ठरतो. यांतील औषधें रक्त[illegible] यांचेंहि [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषमज्वर, शीतपूर्वक ज्वर येऊन गेल्यानंतरचा अशक्तपणा, जीर्णज्वर, प्लीहा व यकृतवृद्धि, अग्निमांद्य, अरुचि हीं लक्षणें असतां लोहीनचा उपयोग करावा. या विकारांचा परिणाम म्हणून हृदय, मेंदू, बस्ती हे अवयव कमकुवत होतात. या अवयवांना बल देऊन त्यांचे व्यापार प्राकृतिक करण्याचें कार्य लोहीन करतें. यास्तव कोणत्याहि आजारानंतर पूर्ववत् शक्ति प्राप्त होण्यासाठीं लोहीनचा रसायनकल्प या नात्यानें अवलंब करावा.

धातुदौर्बल्याचा परिणाम म्हणून आंत्राची शक्तीहि पुष्कळ वेळां कमी होते. अन्नाचें पचन बरोबर होत नाहीं. मलविसर्जनक्रियेंत व्यत्यय येऊन बद्धकोष्ठतेची संवय जडते. पोटफुगी, पोटांत गुबारा धरणें, छातीची धडधड, शूल अशीं लक्षणें होतात. त्यावेळीं लोहीन घेतल्यास आंत्रांना बल मिळून भूक लागते, अन्नपचन व्यवस्थित होतें, मलविसर्जन प्राकृतिक होऊं लागतें. लोहकल्पानें मलावरोध होण्याचा कित्येक वेळां संभव असतो. पण लोहीनमध्यें अनुलोमक धर्म असल्यानें पोटांत वात कोंडण्याची किंवा मलावरोधाची भीति नसते.

लोहीन सकाळीं व रात्रीं दर वेळीं अर्धा तोळा घेऊन वर दूध प्यावें.

स्तन्यशोधन :

प्रमुख घटक– शतावरी, गुळवेल, काडेचिराइत, कुटकी, पाठा, सारिवा, देवदार, सुंठ, नागरमोथा, इंद्रजव.

स्तन्यशोधन हा कल्प मातांचें दूध निर्दोष व्हावें व अंगावर पिणाऱ्या बालकाचें आरोग्य सुधारावें या हेतूनें निर्माण करण्यांत आला आहे. 'मातुरेव पिबेत् स्तन्यम्' हा आयुर्वेदशास्त्राचा आदेश आहे. आईचें दूध हेंच पहिल्या वर्षांत बालकाचें स्वाभाविक अन्न असतें. कोणत्याहि कृत्रिम आहारापेक्षां तेंच बाळाला मानवतें व त्याची निरोगी वाढ होते. हें मातृस्तन्य पुरेसें व निर्दोष असावें यासाठीं मातांनीं स्तन्यशोधन हें औषध घ्यावें.

दुधांत असणारा द्रवांश, त्यांतील मधुरता अथवा शर्करा, स्निग्ध भाग हीं सर्व प्राकृतिक असावीं लागतात. पहिल्या वर्षांत बालकाचें आरोग्य मातेच्या दुधाच्या निर्दोषपणावर अवलंबून आहे. हें दूध बिघडलेलें असेल तर बालकाला विविध विकार होतात. हे विकार दूर होण्यासाठीं बालकावर औषधोपचार करण्यापेक्षां त्याचा आहार म्हणजे मातृस्तन्य निर्दोष करण्यासाठीं मातेसच औषध देणें इष्ट ठरतें. अंगावरील दूध बिघडण्याचें मुख्य कारण आईचा मिथ्या आहार हेंच बहुधा असतें. विकृत आहारामुळें तिच्या शरिरांत विकृत अन्नरस निर्माण होतो. तिच्या शरिरांतील वातादि दोष बिघडतात. शरीरधातूहि विकृत होतात त्यामुळें स्तन्यहि विकृत होतें. 'स्तन्यशोधन' कल्पांतील घटकद्रव्यें मातेची दोषदुष्टी दूर करून दूध निर्दोष होण्यास मदत करतात. मातेच्या दुधांतून स्तन्यशोधनांतील द्रव्यांची क्रिया मुलावर होते. यामुळें मुलाचा अग्नि प्रदीप्त होऊन त्याला मातृस्तन्य सहज पचतें व धातुपरिपोषण व्यवस्थित होऊन मूल निरोगी व बाळसेदार बनतें.

बिघडलेलें मातृस्तन्य मुलाच्या पोटांत गेल्यानें त्या मुलाला पचनमार्गाचे विविध विकार जडतात. त्याचें तोंड येतें. वांत्या होतात. दूध पचत नाहीं. पोट फुगतें पोटांत गुबारा धरतो. शौचाला आणि लघवीला साफ होत नाहीं. या उलट, जर शौचास होऊं लागलें तर भसरट, दुर्गंधियुक्त जुलाब होतात. अशा वेळीं मातेस स्तन्यशोधन देत जावें. चार-सहा दिवसांत तिचें दूध सुधारून मुलाला तें पचूं लागतें व त्याची प्रकृति सुधारते.

मुलाला स्तन्यदुष्टीमुळें कित्येक वेळां वारंवार पडसें येतें, खोकला येतो किंवा प्रत्यक्ष श्वासाचाच आवेग येतो. मुलाचें पोट उडूं लागतें. याहि अवस्थेंत मातेनें स्तन्यशोधन घेतल्यास हा विकार दूर होतो. यकृत व प्लीहावृद्धि या विकारांचा संभव टाळण्याच्या दृष्टीनेंहि स्तन्यशोधन गुणकारी आहे.

चार चमचे औषध समभाग पाण्याबरोबर सकाळीं व सायंकाळीं मातांनीं घ्यावें. वैद्यांच्या सल्ल्याप्रमाणें अवश्य तो फेरबदल करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No B. 5225

अनुभवसिद्ध
अर्कशाला औषधें

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन

रक्तवर्धक, पौष्टिक, येंद्रिय बलदायक

वसंत मिश्रण

जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन

बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन

मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृध्दिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

• हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं पद्मा प्रिंटिंग प्रेस ३९५१५ व ३९५१७ सदाशिव, पुणें २. येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य
: कार्यकारी संपादक :
ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

जुलै–ऑगस्ट
१९५३

वार्षिक वर्गणी ३ रु.
किरकोळ अंक ८ आणे

या अंकांत........

१ मातृपदापूर्वी –दत्तात्रेयशास्त्री जळूकर
२ अथ प्राणाः –गो. आ. फडके
३ धनुर्वात व अळूचा कंद
–दि. वि. साठे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

— आयुर्मीमांसा —

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १६वें] जुलै–ऑगष्ट १९५२. [अंक ५वा.

वार्षिक वर्गणी	किरकोळ अंक
३ रुपये	८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व व्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा. अर्कशाला बिल्डिंग, सातारा.' या पत्त्यावरच करावा.

संपादकीय

मीमांसेचें नियमित प्रकाशन

आयुर्मीमांसेची मुद्रणव्यवस्था आतां ठीक झालेली आहे. यापुढें मीमांसेचें प्रकाशन नियमितपणें होऊं लागेल. ज्यांची वर्गणी यापूर्वींच संपली आहे त्यांनीं नव्या वर्षाची वर्गणी पाठवून सहकार्य करावें अशी विनंति आहे.

अभिनंदन

पुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे पदवीधर वै. राजाभाऊ वैद्य, आयुर्विद्या विशारद हे उच्च शिक्षणासाठीं जर्मनीमध्यें म्युनिच येथें जात आहेत; पदवी घेतल्यानंतर त्यांनीं त्याच संस्थेच्या ताराचंद रामनाथ रुग्णालयांत शल्यविभागांत यशस्वी रीतीनें कार्य केलें. आतां ते अस्थिव्याधि, व त्यावरच्या शस्त्रक्रिया या संबंधीचें प्रात्यक्षिक घेण्यासाठीं जर्मनीस जात आहेत. तेथला कोर्स वास्तविक ५॥ वर्षांचा आहे. पण वैद्य राजाभाऊ यांच्या पूर्वप्रगतिमुळें त्यांना तो २ वर्षांत संपविण्याची परवानगी मिळाली आहे; रा. वैद्य यांना हें भूषणावह आहे. रा. वैद्य यांच्या अंगीकृत कार्यांत सुयश येवो हीच प्रार्थना ! मीमांसा वैद्य यांचें अभिनंदन करीत आहे !

शोचनीय निधन

अमरावतीचे विख्यात वैद्य व आयुर्वेदाचे गाढे पंडित श्री. वैद्यभूषण पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर हे दि. ३ जुलै रोजीं कालवश झाले. त्यांच्या निधनानें आयुर्वेदाचा एक खंबीर पुरस्कर्ता व विद्वान वैद्य नाहीसा झाला आहे, आयुर्वेदाची ही मोठी हानीच होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहारः–

सप्रेम सादर वंदे वि. विः–

आपल्या महाविद्यालयाचा, 'आयुर्मीमांसा" मासिकाचा जून १९५३ चा अंक, काल रोजीं मिळाला. त्यांतील "वायोः प्रकाराः" हा आपला लेख २ वेळां वाचला. आनंद वाटला व समाधान झालें.

त्यांतील मित्रवर्य व विद्वद्वर, वैद्यराज जळूकर शास्त्री यांचा लेख, "मातृपदापूर्वी" हा ही वाचला. चित्तीं परम संतोष वाटला. त्यासबंधानें, मी त्यांस परस्पर माझें मत पत्रद्वारें कळवीतच आहे.

आपले परमपूज्य गुरुवर्य, व आमचे स्नेही वैद्यराज वेणीमाधव जोशी, यांची नेमणूक नागपूरास झाली. हें मासिकावरून समजलें. त्यांचे हातून आयुर्वेद संशाधनाचें कार्य उत्तम यशस्वीपणें पार पडो असें मी ईशपदारविंदीं मनःपूर्वक इच्छितों.

पुढील आपल्या मासिकाचा अंक V. P. नें पाठवावा.

चालू मासिकाच्या अंकाच्या शेवटीं, स्तन्य शोधन या औषधांतील घटक द्रव्यें दिलेली वाचली. हा पाठ मी पुष्कळ वर्षे वापरीत आहे. मला असें वाटतें कीं त्यांत वाळंतशोफ हें एक आणखी द्रव्य घालावें. त्यानें चांगला गुण येतो असा अनुभव आहे.

लोहिन यांतील घटक द्रव्यें पाहिलीं. पाठ चांगला गुणदायी आहे हें तर खरेंच. पूर्वी गुरुवर्य दादासाहेब भडकमकर डॉक्टर येथें हरहमेशा येत असत. त्यावेळीं हें औषध तें पुष्कळच वापरीत. तें मजकडूनच करवून घेत. व येथें रोग्यास देत. त्यांत ते वंशलोचनाचे ऐवजीं सारिवामूळ वापरीत असत. वंशलोचन अस्सल मिळत नाहीं. तें फार महाग पडतें. तें पूर्णपणें औषधी मिश्रणांत एकजीव होत नाहीं, व यांत त्याची चांदीभस्मामुळें जरुरी नाहीं, असें ते नित्य म्हणत. फार ते सारिवा वापरीत. आपल्या समोर मीं माझें मत ठेविलें आहे. योग्य वाटल्यास वापरून पाहावें, अशी विनंती आहे.

पेटंट औषधांतील घटक द्रव्यें, उघड करून प्रसिद्ध करणें, फारच उत्तम. त्यामुळें तीं वापरणारास विचारपूर्वक फारच सोईचें पडतें. ही प्रथा आपण सुरू केलीत याजबद्दल सहर्ष धन्यवाद.

पत्राचें उत्तर येणें बरें. आपला

रा. म. रुद्रभटे
भिषग्वर.

वसंत मिश्रण
सुवर्णयुक्त टॉनिक
४० गोळचा किंमत ४ रुपये
पोस्टानें मागवा.

अर्कशाळा माहितीपत्रकें

कोणाहि ग्राहकास व वैद्य आणि डॉक्टर यांना अर्कशाळा औषधांची शास्त्रीय माहितीपत्रकें पाठविली जातात.

कार्डावर आपला सुवाच्य पत्ता लिहा व मागणी करावी.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य
यांस लागणारीं औषधी द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद व मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.
टे. नं. ३१७९६ Telegram-AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथ प्राणः ....।

(ले०– आयुर्वेदाचार्य, गो. आ. फडके)

प्राणवायोः निरुक्तिः ।

प्राणयति इति प्राणः ।

"प्राण्" (जगणें, या अर्थी) धातूपासून प्राण शब्द होतो. किंवा "अन्" या गत्यर्थक धातूच्या पुढें प्र हा विसर्ग लागून "प्राणयति" हें रुप होतें.

प्राणाचें स्वरूपः– जीवन चालूं राहण्यास पांचहि वायूंची जरुरी असते. त्यांतल्या त्यांत ज्या वायूच्या क्रियेवर हृदय, शिर या अत्यंत महत्वाच्या व जीवनाला अवश्यक असणाऱ्या अवयवांचे व्यापार अवलंबून असतात त्या शरीरस्थ वायूला प्राण वायु असें म्हणतात.

"विशेषाज्जीवित प्राणः ।" वा. नि.

फुप्फुस, हृदय, मस्तिष्क, यांचे व्यापार नियमित चालणें जीवनाचे दृष्टीनें आवश्यक असतें. त्यांना चालविणारा वायू, तो प्राणवायु असें म्हटलें जातें. या वायूचे कार्यावर जीवित अवलंबून असतें.

प्राणवायोः स्थानंः–

स्थानं प्राणस्य मूर्धोरः कर्णजिव्हास्यनासिकाः |

च. चि. २८|६

प्राणोऽत्र मूर्धगः

उरःकंठचरो बुद्धिहृदयेंद्रियचित्तधृक् ॥ वा. सू. १२|६

शिर, उर, (फुप्फुस) हृदय, कर्ण, जिव्हा, तोंड, नाक हीं प्राणाचीं स्थानें आहेत. तसेंच शरिरांतील सर्व मर्में हींहि प्राणस्थानें आहेत. त्या सर्वांत प्राणाचें प्रमुख स्थान शिर हें असल्यानें सर्व गात्रांत शिर हें प्रधान समजलें जातें.

शिरसिच इंद्रियाणि इंद्रियप्राणवहानि च। स्रोतांसि सूर्यमिव गभस्तयः संश्रितानि॥ च. सि. ९|४

प्राणवहस्त्रोतसेंः–

प्राणवहे द्वे, तयोर्मूलं हृदयं रसवाहिन्यश्च (प्राणवाहिन्यश्च) धमन्यः। सु. शा. ९|१२

प्राणवहस्रोतसाचें मूळ (उत्पत्तिस्थान) हृदय हें आहे.

प्राणवायोः कार्यम् ।

वायुर्यो वक्त्रसंचारी सप्राणो नाम देहधृक्।
सोन्नं प्रवेशयत्यन्तः प्राणांश्चाप्यवलंबते ॥ सु. नि. १
उरःकंठचरो बुद्धिहृदयेंद्रियचित्तधृक्।
ष्ठीवनक्षवथूद्गारनिश्वासान्नप्रवेशकृत् ॥

वा. सू. १२

१ देहधृक्

देहधारण करण्याचें कार्य पांचहि वायूंचें आहे. पण विशेषतः तें या वायूचें कार्य आहे. देहांत जी जीवनज्योत चालू आहे ती तशीच चालू ठेवण्यास अंतर्बाह्य मदत हा वायू करितो.

२ प्राणांश्चाप्यवलंबते

शरीरस्थ प्राणांना आपापलीं कार्यें करण्यास लावणें, हें प्राणवायूचें महत्वाचें कार्य आहे. आपल्या देहांत जी जीवनकला आहे तिला बाह्य जगतांतील द्रव्यांची एक–सारखी जरुरी असते. हवा, पाणी, अन्न, ही शरीरबाह्य द्रव्यें घेऊन शरीर धारण होत असते. शरिरांत एक–सारखी झीज चालू आहे. झालेली झीज परत आहारांतून भरून निघते. जीवन जगण्यास हीं बाह्य द्रव्यें सारखी घ्यावी लागतात. हवा मिळाली नाहीं कीं लगेच आपण मरूं. हवेखालोखाल पाणी व अन्न मिळालें नाहीं. तरीहि तीच स्थिति होईल. यासाठीं, हवा प्राण आहे. अन्न प्राण आहे, पाणी प्राण आहे. (पानीयं प्राणिनां प्राणः) हवा, पाणी व अन्न हीं सेवन केल्यानें आपल्या शरिरांतील जीवन ज्योत सतत चेतत राहते. ही ज्योत सतत चालू राखण्यास जे बाह्य पदार्थ मदत करितात त्यांना प्राण, किंवा प्राणद्रव्यें असें म्हणतात. यावरून प्राणाचे दोन भेद पडतात. एक अंतरप्राण व दुसरें बाह्यप्राण.

अग्निः सोमो वायुः सत्वं रजस्तमः पंचेंद्रियाणि भूतात्मा इति प्राणाः। सु. शा. ४|३

यांना अभ्यंतर प्राण असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१) एक कायाग्नि भूताग्नि पांच, व सप्तधातूंचे सात धात्वग्नि, असे एकूण तेरा अग्नि मुख्यत: या देहांत आहेत. ते घेतलेला आहार पचवितात व त्यांत जो ऊष्मा निर्माण होतो त्यावर शरीर जगवितात. शरीर जगण्यास विशिष्ठ ऊष्णतेची जरूरी असते. म्हणून अग्नि हा एक प्राण म्हटला जातो.

(२) अन्न खाल्यावर अग्निसंस्कारानें, त्यापासून "आप्यरस" तयार होतो. तो खाऊनच सर्व धातु पुष्ट राहात असतात. शरिरांतील प्रत्येक परमाणूला आहार पाहिजे. हा सोमरस घेऊनच ते जगतात. झीज भरून काढून पुन: शरिराचें सातत्य चालुं ठेवण्यास हा रस उपयोगी पडतो. यास्तव आप्यरस, किंवा सोम हा प्राण म्हटला जातो.

(३) वायु :– प्रस्पंदन, उद्वहन, विवेक, धारण, पूरण हे व्यापार शरीर जगण्यास अवश्यक आहेत. ते वायूमुळें चालतात. यास्तव शरीरस्थ वातांना प्राण असें म्हणतात.

(४) सत्वगुण. (५) रजोगुण. (६) तमोगुण. हे मनाचे तीन गुण आहेत.

भूतात्म्यानें देह धारण करावा किंवा सोडावा याला कारणीभूत हे मनाचे गुण आहेत. बंध अथवा मोक्ष याला सहाय्यक म्हणून त्यांचाहि प्राणांत समावेश केला आहे.

(७) कर्ण, (८) त्वक्, (९) नेत्र, (१०) जिव्हा, (११) घ्राण, हीं पांच ज्ञानेंद्रियें बाह्य जगतांतील शब्दादि विषयांचें ग्रहण करून जीवनव्यापार चालविण्यास मदत करितात म्हणून, शरीरस्थ पंच इंद्रियांना प्राण असें म्हणतात.

(१२) भूतात्मा

सर्वांत मोठा प्राण हा आहे. शुभाशुभ कर्मांनीं सांपडला गेलेला कर्मपुरुष सर्वांच्याच चैतन्याला कारण समजला जातो.

आयुष्य ही स्थिति चालूं राहण्यास वरील बाराहि गोष्टी अवश्यक असल्यानें या सर्वांना प्राण असें म्हटलें जातें. ह्या अभ्यंतर प्राणांना बाह्य द्रव्यांची जरूरी असते. आहार्य म्हणून घेतलेला पदार्थ अग्निपासून आत्म्यापर्यंत जाऊन पोचावा लागतो, म्हणजे प्राणांची तृप्ति होते.

अन्नमिष्टं ह्युपहितं इष्टैर्गन्धादिभि: पृथक्।
देहे प्रीणाति गंधादीन् प्राणादीनिन्द्रियाणि च॥
च. च. १५

इंद्रियें पांचभौतिक असल्यानें त्यांचें पोषण पांचभौतिक आहारानें होतें. सात्विक, राजस, तामस ज्याप्रमाणें आहार असेल त्याप्रमाणें त्या त्या गुणाचा परिपोष होतो. देह पुष्ट झाला म्हणजे त्याच्यावर आश्रय करून राहणारा आत्मा संतुष्ट होतो. अभ्यंतर प्राणांची झीज बाह्य प्राणद्रव्यांनीं भरून काढावी लागते.

प्राणो ह्यभ्यन्तरो नॄणां बाह्यप्राणगुणान्वित:।
धारयत्यविरोधेन शरीरं पांचभौतिकम्॥
सु. सू. १७।१४

आग्नेय, सौम्य, व वायवीय द्रव्यें, प्रत्यक्ष बाहेर असलेला वायू (हवा), दिवस, रात्र, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हीं शरीराबाहेरचीं द्रव्यें आहेत. पण त्यांवर शरीररस्थ प्राण अवलंबून असतात. ह्या बाह्य वस्तूंना प्राण-बाह्य प्राण असें म्हणतात. त्यांचे गमागम सारखे या देहांत चालू आहेत. कटू, अम्ल, लवण पदार्थांत अग्नीचे गुण असतात, ते सेवन केल्यामुळें अंतराग्नीचे व्यापार वाढतात व अंतराग्नि प्राणधारक होतो. मधुर, शीत पदार्थांमुळें कफ वाढतो, व तो शरीर पुष्ट करून देहधारण करितो. या प्रमाणें देहधारण करण्याला जे जे पदार्थ लागतात त्यांना बाह्य प्राण अथवा प्राण द्रव्यें असें म्हणतात. त्या प्राण द्रव्यांचा शरिराशीं संबंध जोडून देणारा जो वायू त्याला प्राण वायु असें म्हणतात. अन्नमार्ग, श्वासमार्ग नाक, कान, डोळे, मुख, जिव्हा, त्वचा या मार्गें बाह्य जगांतील वस्तूंचा संबंध शरिराशीं येत असतो. ते पदार्थ घेऊन त्यांना प्रवेश देऊन त्यांच्या सहाय्यानें अंतरप्राणस्थानांचे व्यापार चालूं ठेवण्याचें कार्य हा प्राणवायू करीत असतो.

३ अन्नप्रवेशकृत्।

देह धारण करण्यासाठीं अत्यंत आवश्यक अशी गोष्ट म्हणजे अन्न ही होय. तें तोंडांत दातांनीं चावणें, त्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुखरस मिश्र करणें व नंतर तो अन्नाचा गोळा कंठामधून अन्ननलिकेवाटें आमाशयांत – अंतःकोष्ठांत – नेवून पोंचविण्याचें कार्य, या प्राणवायूमुळें होतें. व त्यानंतर पुढील अन्नपचनाचें कार्य समान वायू करूं लागतो. पण प्रथम अन्नवह स्रोतसांत अन्नप्रवेश प्राण वायूच्या सहाय्यानें होतो.

५ निश्वासकृत्–

अन्न व पाणी यापेक्षांहि हवा हें द्रव्य जीवनाला अत्यंत आवश्यक असें आहे. शरीराबाहेर असलेली हवा नाकावाटें, कंठमार्गानें श्वास नाडींतून फुप्फुसांत जात असते. हवा आंत जाण्यासाठीं ज्या उरःस्थ स्नायूंची हालचाल होते ती प्राणवायूनें होते. ही हवा आंत जाण्याची क्रिया आपल्या जाणिवेंत येतेहि नाहीं. कित्येक वेळां व्यायामासारख्या क्रियेंत श्वासाची ही क्रिया अधिक जोरानें होतें, किंवा ऐच्छिक तऱ्हेनें आपण करूं शकतों. बाह्य हवा हें प्राण द्रव्य आहे. ती आंत घेणें ही निश्वासाची क्रिया म्हणजे शरीरस्थ प्राणाची क्रिया होय.

५ ष्ठीवनकृत् :–

तोंडांतील लाळ आपण कित्येक वेळां बाहेर थुंकून टाकतों. या थुंकण्याचे क्रियेंत तोंडाचे स्नायूंची व जिभेची विशिष्ट प्रकारची हालचाल करावी लागते. ही हालचाल प्राणवायूच्या कक्षेंतील आहे. त्याचप्रमाणें फुंकणें, शीळ घालणें, या वरवरच्या क्रिया प्राणवायूमार्फत होतात. (जोरानें फुंकण्याची क्रिया करण्यास उदानाचें सहाय्य घ्यावें लागतें.)

शिंक, उद्गार–याहि क्रिया प्राणाच्याच आहेत. तोंड उघडून जीभ बाहेर काढणें, व "हा हा" असा आवाज काढणें ही क्रिया करणारे स्नायू प्राणाच्या प्रेरणेनेंच चालतात.

सामान्यतः जत्रूच्या वरच्या भागांत कंठ, मुख, चेहरा नाक, कपाळ यांचेमधील हालचाली प्राणामुळें होतात.

६ हृदयधृक्–

शरीरस्थ कांहीं बाह्य व्यापाराप्रमाणें कांहीं अंतर्गत महत्वाचे जीवनाला आवश्यक असे व्यापार प्राणवायू करीत असतो. त्यांत हृदयधारण करणें हें प्राण वायूचें महत्वाचें कार्य आहे. हृदय [illegible] प्राणांची एकसारखी जरूरी असते. हवा, पाणी व अन्न ही यत्किंचित् जर कमी पडली, तर त्याचा परिणाम सर्वांत जास्त हृदयावर होतो. या साठीं प्राणद्रव्यांची सारखी गति हृदयाकडे ठेवावी लागते. ही गति ठेवण्याचें कार्य शिरस्थ प्राणवायु करीत असतो. यांत जर कांहीं हयगय झाली तर ज्या हृदयावर सर्व शरिराचे जीवन व्यापार अवलंबून असतात ते सर्व एकदम ढासळतील. यासाठीं प्राण वायूचे मोठे क्षेत्र म्हणजे हृदयपूरण हें आहे हृदयाकडे प्राण द्रव्यांचा सतत पुरवठा ठेवला जातो.

नाकावाटें आलेली बाहेरील स्वच्छ हवा फुप्फुसांत रूपांतरित होऊन हृदयाकडे येते. तसेंच तोंडावाटें वातलेलें शरीरपोषक अन्न, पाणी, यांचें पचन मार्गांत रूपांतर होऊन तेंहि हृदयाकडे येतें. अशा रीतीनें सर्व बाह्य प्राणद्रव्यांचे आश्रयस्थान हृदय हें म्हटले जाते. "हृदि प्राणः।" हृदयाकडून या प्राणद्रव्यांची वांटणी सर्व शरीरभर केली जाते. सर्व शरीराचे जीवन चालण्यास मध्यवर्ति शक्तिस्थान हृदय हें (नाभ्यामस इव) आहे. त्या हृदयाकडे धातूंचे सम्यग् गमन राखणें ही महत्वाची कामगिरी प्राण वायूची आहे.

" हृदयं चेतना स्थानम्। " चेतनेचें अधिष्ठान हृदय हेंच आहे आत्मा व शरीर यांचा संयोग दिसण्याचे महास्थान हृदय हें आहे. तें नीट असलें तर जिवंतपणा असतो. यासाठीं हृदय धारण करणें आवश्यक असतें.

७ बुद्धिधृक्, इंद्रियधृक्, चित्तधृक्:–

इंद्रियें, मन व बुद्धि यांचे धारण करण्याचें कार्य प्राण वायू करितो.

षडंगमंगविज्ञानमिंद्रियाण्यर्थपंचकम्।

आत्मा च सगुणश्चेतश्चित्यंच हृदि संश्रितम् ॥ च. सू

सूक्ष्म इंद्रियें, मन व बुद्धि यांचे अधिष्ठान हृदय हेंच आहे हृदयाचें धारणाप्रमाणें, त्याच्या आश्रयीं असणाऱ्यांचेहि धारण प्राणवायूलाच करावें लागतें.

बाह्य इंद्रियाचा बाह्य विषयांशीं संबंध आल्यानंतर तेथून हे अर्थ, किंवा त्यांची विशिष्ट संवेदना आंत अंतःकरणाकडे वाहून नेण्याची क्रिया या वायूला करावी लागते. जिव्हेवर एकादा पदार्थ ठेवला गेल्यावर, ज्या विशिष्ट संवेदना अथवा लाटा निर्माण होतात, त्या आंत, मनाकडे बुद्धिकडे घेऊन जाव्या लागतात. ज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशिष्ट रसाचें हें द्रव्य असेल त्या प्रमाणें हृया विशिष्ट व विविध संवेदना निर्माण होतात. त्या सर्व नेणें हें कार्य प्राण करितो. मग आलेल्या संवेदनेवरून हृया उपयुक्त आहेत किंवा नाहींत हें मन ठरवितें, व विशिष्ट संवेदना घ्यावी, घेवूं नये, हें ठरविलें जातें. प्रिय संवेदनेला मधुररस, अम्लरस, अप्रिय संवेदनेला कटुरस, अशीं नांवें दिलीं जातात. बाह्य विषय, इंद्रियें मन, बुद्धि, आत्मा, यांची साखळी जोडावी लागते. ती जोडून देण्याची क्रिया या वायूची आहे.

इंद्रियेणेंद्रियार्थो हि समनस्केन गृह्यते ।
कल्प्यते मनसा तूर्ध्वं गुणतो दोषतोऽथवा ।
जायते विषये तत्र या बुद्धिर्निश्चयात्मिका ।
व्यवस्यति तथा वक्तुं कर्तुं वा बुद्धिपूर्वकम् ।।

च. शा. १–२२

अर्थात् इंद्रियांकडून ग्रहण, इंद्रियाकडून आलेल्या विषयाचें मनामार्फत ग्रहण होणें, मनानंतर त्या विषयाचें बुद्धिकडून ग्रहण होणें, यांत बाह्य विषयाचें ज्ञान आंत घेऊन जाण्याची परंपरा आहे. तो घडवून आणून मन व बुद्धि यांना कार्यप्रवृत्त करणें ही क्रिया होत असते. त्यांत बाह्य विषय म्हणजे प्राण आंत नेणें ही क्रिया हा वायू करितो. नेत्र, कर्ण, त्वचा, नाक, कान हीं इंद्रियें सारखी बाह्य जगांतील विषयाशीं संबद्धित होत असतात. त्यांचा संबंध अंतःकरणाशीं नेहमीं तयार ठेवण्याची जबाबदारी वायूची आहे. तसेंच आंत्र. बस्ति, यांच्याकडूनहि संवेदना मनाकडे जात असतात. मल किंवा मूत्र यांचा स्पर्श त्या त्या आशयांतील त्वचेला होतो व मग मूत्राशय भरला आहे ही संवेदना मनाकडे जाते. असें आंतील त्वग् इंद्रियावाटें आलेलें स्पर्श ग्रहण करण्याचें कार्यहि हाच वायू करितो. शब्दादि अर्थ घेण्याची क्रिया करणें हें प्राणाचें मुख्य कार्य आहे. असे अंतरबाह्य स्पर्श एकसारखे मनाकडे जात असतात. व शरीरसंरक्षणाचे दृष्टीनें हे स्पर्श अथवा संवेदना कळणें हें आवश्यक असते.

अमुक एक गोष्ट करावी, किंवा अमुक एक गोष्ट करूं नये हा विचार मन करितें. बाह्य विषयांच्या गुणावगुणाचा विचार मनाला करावा लागतो. यासाठीं मन त्या विषयांशीं संलग्न व्हावें लागतें. ही जोडून देण्याची क्रिया प्राणाची आहे. मनाचें धारण याला म्हटले जाते. मनामार्फत आलेला विषय, चांगला आहे, किंवा वाईट आहे, त्यानें सुख होईल कां दुख होईल हा व्यापार बुद्धीचा आहे. समदर्शन बुद्धीमुळे होते. पण बुद्धीचा संबंध विषयाबद्दल यावा लागतो. हा संबंध आणण्याचे कार्य प्राणवायू करितो. मन व बुद्धि यांचा प्राणाशीं असलेला संबंध सुटला तर विषयाचें ज्ञानच होत नाहीं; कांहीं समजतच नाहीं. निद्रावस्थेंत बाह्य विषयाशीं संबंध तुटलेला असतो. तेवढा प्राणव्यापार बंद असतो. सूक्ष्म इंद्रियें मन बुद्धि यांचा व्यापार चालू राहिला तर स्वप्नसृष्टी निर्माण होतो; मोह, उन्माद, अपस्मार हे विकार इंद्रियें, मन, बुद्धि, यांचे प्राणाचे व्यापार बिघडल्यामुळें होतात. मूर्च्छा, हा विकार हृदयधृक् प्राणवायु बिघडल्यामुळें होतो. अर्दित, कास हे व्याधी जध्र्वूर्व भागांतील प्राण दुष्टीनें होतात. श्वास, हा विकार, हवेला आंत जाण्यास अडथळा आल्यानें हवा आंत घेणाऱ्या प्राणप्रकोपानें होतो. अन्न तोंडावाटें गिळले जात नाहीं, ही दुष्टी अन्न नाडीच्या आश्रयानें असणाऱ्या प्राणप्रकोपाची आहे. अशा रीतीनें प्राणाचीं विविध क्षेत्रें व विविध कार्यें आहेत.

त्वरित वर्गणीदार व्हा ..!
– मीमांसेचा –
★ राजयक्ष्मा विशेषांक ★
लवकरच निघणार आहे.

नित्योपयोगीं अर्कशाला औषधें
एग्युमिक्श्चर
कोणत्याही ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, एग्यूक्श्चिरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें येणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण वृत्तांत—

प्लीहोदर :–
रुग्ण नांव श्री. वि. कृ. ख. लिंग पुरुष.
वय वर्षें २५. धंदा शेती.
प्रवेश दिनांक २९-५-५३.

प्रमुख तक्रारी:– पोट मोठें झालें आहे; पायावर सूज आहे. चालतांना धाप लागते. अन्न पचत नाहीं. भूक लागत नाहीं, व शौचास साफ होत नाही.

रुग्ण परीक्षण :– रुग्ण हा चांगला उंच व अस्थि-धातुसारवान आहे. शिर, स्कंद व हस्तपादगत अस्थि सुस्थित आहेत. नेत्र पीत वर्ण, निष्प्रभ. उरस्थान विस्तृत. उदर आकृतीनें वाढलेलें होतें; सूक्ष्म परीक्षणांत उदराचे वरील व डावीकडील भागीं उन्नतता दिसत होती. नाभी उथळ व उदरावर सिरा विस्तृत दिसत होत्या; पायावर व विशेषत: गुल्फ संधीचे ठिकाणीं सूज होती; टेप पट्टीनें उदराचीं मापें घेतलीं, त्याचें वर्णन पुढें येईल. रुग्ण त्वचा मंद, ऊष्म, रूक्ष होती. पाण्डुता नेत्र व तालूचे ठिकाणीं दिसत होती; उदरावर पीडन परीक्षेमध्यें जलास्तित्व व प्लीहावृद्धि व्यतीत होत होती. नाडी अल्पबल व ८० प्रति मिनिट याप्रमाणें चालत होती. अग्नि अल्पबल, विदाह, आध्मान, दृढपुरीष, अल्पनिद्रा व अल्प धातुबल प्रत्ययास आले.

रुग्णाचा आहार हा स्निग्ध, अभिष्यन्दि दधि, अति-शीतोदक व कटुरसप्रधान होता. सदर व्याधिसंभव हा गेले ८ महिन्यांतला आहे.

रुग्ण शेतकरी असल्यानें तिखट, दही भाकरी प्राधा-न्यानें खाई. अतिशीत जलपान व उन्हांतून काम करणें असा रक्तप्रकोपक व कफपित्तप्रकोपक आहारविहार घेई, त्यामुळें प्लीहोदर असें निदान केलें.

“ विदाह्यभिष्यन्दिरतस्य जन्तोः
प्रदुष्टमत्यर्थमसृक् कफश्च ।
प्लीहाभिवृद्धिं सततं करोति
प्लीहोदरं तत् प्रवदन्ति तज्ज्ञाः ।
सु. नि. ८| १४-१५

चिकित्सेचें स्वरूप :–
१) एरंडेल तेल २ तोळे. + गोमूत्र १ तो.
रोज सकाळीं सहा वाजतां.
२) विडंग, चित्रक, सुंठ, पिंपळी, हिंग हे पदार्थ समप्रमाणानें घेऊन घृतभ्रष्ट केले, व त्यांत सैंधव थोडया प्रमाणांत घातलें; हा विडंगादि क्षार १ माशा प्रमाणानें तीन वेळां.
३) हरीतकीचा गोमुत्रांतून उदरावर लेप.
४) उदरपट्टबंधन.
५) आहार:– केवळ दूध, मांस रस. मीठ व पाणी वर्ज.

ता. २९-५-५३ ते २९-६-५३ मधली
–रुग्णाची प्रगती–

ता.	उदर नाभिसमंतात	प्लीहा वृद्धि	मुत्र प्रवृत्ति	पुरीष प्रवृत्ति
२९-५-५३	३३"	पर्शुकाखाली ५ अंगुळें	२५ औंस	दिवसांतून १ वेळां.
५-६-५३	३०"	४॥ अंगुळें	३० औंस	२ वेळां द्रवप्रवृत्ति
२९-६-५३	२८"	४ अंगुळें	३५ औंस	३ वेळां द्रवपुरीष प्रवृत्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. १-७-१९५३ रोजीं चिकित्सा पुढीलप्रमाणें ठेवली; मागली सर्व तशीच चालूं ठेऊन शिवाय ताप्यलोह १ गोळी (गुंज) – शंखभस्म १ गुं. याप्रमाणें २ पुड्या सकाळीं ७ वाजतां व दुपारीं ४ वाजतां मोरावळचांतून दिल्या.

या चिकित्सेनंतर ता. १५-७-१९५३ रोजीं तपासतां रुग्णाचा अग्नि वाढला आहे. उदरशोफ जवळ जवळ पूर्णपणें गेला आहे. पाद शोफ, गुल्फ शोफ नाहीं. उदरगत लाघव आहे. मूत्रांत अॅल्ब्युमिन नाहीं. रुग्ण रुग्णालयांत फिरूं शकतो; अशी प्रगति आढळली व पुढीलप्रमाणें रुग्णांत फरक आढळला.

१५-७-५३	उदर नाभिसमंतात	प्लीहावृद्धि	मूत्रप्रवृत्ती	पुरीष प्रवृत्ति
	२५½"	४ अंगुळें	४० औंस	३ वेळां
				द्रव पुरीष

संकलन
आयुर्वेदाचार्य दि. वि. साठे

वेस्टर्न इंडियाचें यशस्वी कार्य

१९५२ साल मंदीचें असतांहि भरीव काम व निश्चित प्रगति करून आपली उज्ज्वल परंपरा
वेस्टर्न इंडियानें कायम राखली आहे.

* १९५२ मधील कांहीं वैशिष्ट्यें *

एकूण नवीन काम : रु. २ कोटी ७० लाखावर
एकूण चालू काम : रु. १८॥ कोटीवर
एकूण हप्त्यांची आवक : रु. ८९ लाखावर
एकूण आयुर्निधि : रु. ५॥ कोटीवर
एकूण क्लेम्स दिले : रु. २ कोटीवर

दर हजारीं आकर्षक त्रैवार्षिक बोनस.

हयातींतील विमा रु. २३|- हयातीनंतरचा विमा रु. २७|-

हप्त्याचे दर पूर्वींचेच अत्यंत माफक.. आपला विमा व प्रतिनिधित्वासाठीं एक सर्वोत्कृष्ट आदर्श विमा संस्था:
सविस्तर माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

मॅनेजर, **वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मातृपदापूर्वी

ले. :- वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

-४-

गर्भवतीचे पुढील ६ महिने.
आहार, विहार व गर्भपोषक औषधें.

पहिल्या तीन महिन्यांतील विकृति, आहार-विहार व गर्भस्थापक औषधांनंतर आतां पुढील उरलेल्या सहा महिन्यांच्या गरोदरपणाच्या काळासंबंधीं विचार करावयाचा आहे. या काळांत गर्भवाढीच्या दृष्टीनें गर्भाशयांतलें स्थिरत्त्व हें पहिल्या तीन महिन्यांपेक्षां पुष्कळच अधिक असतें. गर्भाचें पोषण सम्यक् होत राहाणें हीच एक महत्त्वाची गोष्ट या काळांत इष्ट होय. गर्भाचें पोषण अपरा व गर्भनाडीमार्फत चालू झालेलें असतें. या क्रियेंतच अडथळा आला तर पोषणाभावीं गर्भाची वाढ नीट होत नाहीं व गर्भांत कांहीं विकृतीहि निर्माण होतात.

गर्भपोषण कमी होण्याचीं कारणें- १) योग्य पोषक आहाराचा अभाव, राग, शोक इ. मानसिक कारणें, उपवास, लंघन इ. मुळें मातेच्या रसधातूंत क्षीणता निर्माण होते. याच रस धातूवर भावी अपत्याचें गर्भांत पोषण होणार असल्यानें तो रस कमी निर्माण झाला तर गर्भिणीच्या शरीरास पुरून गर्भाच्या पोषणाला अपुरा पडणें साहजिक आहे. २) आहार विहारादि विकृतीं- मुळें प्रकुपित वायु पित्तकफासह, अपरा व गर्भनाडीमध्यें संकोच दाह व विबंध निर्माण करून गर्भाच्या पोषण-क्रमांत व्यत्यय उत्पन्न करतो. त्यामुळें गर्भाची वृद्धि नीट होत नाहीं. त्याची हालचाल कमी होते किंवा अजिबात बंद होते, व एकंदरींत उपविष्टक, नागोदर (सल) वगैरे सारख्या विकृति सुद्धां पुढें गर्भांत निर्माण होण्याची पाळी येते. अर्थातच ही आपत्ति न येण्यासाठीं योग्य प्रकारचा आहारविहार व गर्भपोषक औषधांचें सेवन गर्भिणीनें करणें इष्ट आहे.

आहार-विहार

चतुर्थे मासि स्थिरत्वमापद्यते गर्भः। तस्मात्तदा गर्भिणी गुरुगात्रत्वमविकमापद्यते विशेषेण ॥ चरक शा. ४

चवथ्या महिन्यांत गर्भ गर्भाशयामध्यें स्थिर होतो, व त्यामुळें गेल्या तीन महिन्यांत न भासणारें जडत्व गर्भिणीला सर्वांगाचे ठिकाणीं भासूं लागतें. अर्थातच अशा अवस्थेंत पचनास हलके परंतु शक्तिक्षीण करणार नाहीं असेंच अन्न आहारासाठीं गर्भिणीला देणें बरें. या दृष्टीनें दूध-लोणीयुक्त सिद्ध अन्न किंवा मांसाहारी गर्भिणीसाठीं जांगल प्राण्याचें म्हणजे बकरी, हरीण, सांबर, ससा, लाव, तित्तिर, कोंबडा, इ. प्राण्यांचें मांसान्न खाण्यास उपयुक्त म्हणून द्यावें.

पांचव्या महिन्यांत गर्भांत मांस व रक्त या धातूंची समृद्धि होते. अर्थातच हे दोन्ही धातु मातेकडूनच त्याला आहाररसद्वारां मिळत असल्यानें मातेच्या शरिरांतील रक्त व मांस त्या मानानें या महिन्यांत कमी झालें आहे व गर्भिणी कृश झाली आहे असें आपणांस दिसून येतें. यासाठीं या महिन्यांत गर्भिणीच्या आहारांत रक्त-मांस-वृद्धिकर अशा दूध, तूपप्रचुर पदार्थांचा यथावत् भरपूर उपयोग करावा. पांचव्या महिन्यांत गर्भशरीरस्थ चैतन्य गर्भिणीला साधारण प्रतीत होऊं लागण्यास आरंभ होतो.

सहाव्या महिन्यांत गर्भाचे शरिरांत शिरास्नायूंची वाढ होऊन त्वचेवर केंस येऊं लागतात तसेंच नखेंहि येतात; बुद्धि, मन, बल, वर्ण वाढतात, ओजोवृद्धि होते व त्यामुळें मातेला ग्लानि व थकवा भासत असतो. तो नाहींसा व्हावा म्हणून हलकें पण पौष्टिक व बस्ति-शुद्धिकर अशा गोखरूनीं सिद्ध केलेलें दूध किंवा तूप, इ. युक्त मधुररसाचा आहार द्यावा. किंवा कण्हेरी द्यावी.

सातव्या महिन्यांत सुद्धां आहार अशाच तऱ्हेचा ठेवणें इष्ट असतें. ह्या महिन्यांत मुलाचें जाऊळ बांधलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातें व त्यामुळें आईला घशाशीं विदाह म्हणजे जळजळ इ. होते अशी स्त्रियांची कल्पना असते; परंतु तें तसें नसून गर्भ वाढून वराच वरपर्यंत भासत असल्यानें सहजच दोषांची गति अनुलोम होण्यास थोडासा प्रत्यवाय उत्पन्न होतो व त्यामुळें अडवले गेलेले दोष उरः-स्थानाकडे जाऊन विदाह उत्पन्न करीत असतात. तळहात, पाय, अंस म्हणजे खांद्याचे ठिकाणीं, तसेच डोळ्यांची व सर्वांगाची आग किंवा दाह झाल्याचा भास होतो; खाज सुटते; मांड्या, स्तन, व उदरावर वलयें दिसतात या लक्षणांना शास्त्रांत 'किक्किस' अशी संज्ञा दिलेली आहे. अशा वेळीं खाज येते म्हणून खाजवणें बरें नव्हे. खाजवल्यानें त्वचा फाटते व विरूपता येते. अशा वेळीं दाहशामक व कंडूनाशन असे कफ पित्त दोषनाशक उपचार करावेत. मनुका, बोरें उकळून तें पाणी प्यावें. लोणी व मधुर द्रव्यें भक्षण करावींत. भोजन अल्प प्रमाणांत व विशेष तिखट खारट नसलेलें करावें. कंडू-शम नासाठीं वाळा, हळद, चंदन, कमळ, धायटी, करंज, कडुनिंब, तुळस, मंजिष्ठ इ. द्रव्यें वांटून अंगास लावण्यास हींच द्रव्यें पाण्यांत उकळून त्यानें स्नान करण्यासाठीं वापरावींत. अंगावर जी वलयें दिसतात त्यांवरहि चंदन, वाळा, त्रिफळा, यांचा मांड्या व स्तन, उदरावर लेप करावा. वातनाशक व मधुर रसात्मक भोजन ह्या वेळीं इष्ट असतें. खाज अनिवार्य असेल अशा वेळीं नखांनीं न खाजवितां तळहातांनीं किंवा जाडसर रुमालानें हळूहळू घर्षण करावें म्हणजे खाज शमते. द्रव पदार्थांचें सेवन तसेंच तेल इ. कमी घ्यावें.

आठव्या महिन्यांत गर्भिणीचें ओज हें अस्थिर होतें व तें क्वचित् गर्भाकडे क्वचित् गर्भिणीकडे असें असतें. एवढ्यासाठीं ओज स्थिर होण्याकरितां व वातानुलोमन व्हावें म्हणून दुधांतच तयार केलेली पेज तूप घालून द्यावी, मधुररसद्रव्यांनीं सिद्ध केलेल्या तुपाचा अनुवासन बस्ति द्यावा. ह्या महिन्यांत गर्भिणी प्रसूत झाल्यास ओज स्थिर झालेलें नसल्यामुळें गर्भाचा नाश होतो. इतकेंच नव्हे तर गर्भिणीच्याहि जीविताला धोका उत्पन्न होण्याचा संभव असतो. ह्या महिन्यांत ओज स्थिर नसल्यानें गर्भिणी फारच पिंगट दिसत असते. मलसंचय होऊं नये, व सांचलेल्या मळाची शुद्धि व्हावी यास्तव घाळलेले मुळे, आंबट बोरें यांचा काढा व बडीशेपेचा कल्क (वाटलेला चटणीसारखा गोळा), तेल, तूप व शेंदेलोण एकत्र करून बस्ति द्यावा. किंवा चिकणामूळ, बडीशेप, दूध, दही, भाताची पेज, गेळफळ, मध, तूप या मिश्रणाचा बस्ति द्यावा म्हणजे जुन्या मळाची शुद्धि होऊन वायूची गति अनुलोम होते व पुढें प्रसूति सुखरूप होण्यास फार मोठी मदत होते. या नंतर तूप घातलेल्या कण्हेरीसारखें हलकें अन्न व मांसाहारी स्त्रीस पूर्वी सांगितल्याप्रमाणें जांगल प्राण्यांचें मांसरसानें युक्त असें भोजन द्यावें.

सुखप्रसूतीची ही सर्व पूर्वतयारी म्हणण्यास हरकत नाहीं.तरी पण प्रकरण ३ मध्यें गर्भस्रावाची भीति वर्णन केली आहे तशी ३ महिन्यानंतरहि गर्भिणीनें केलेल्या वेड्यावाकड्या आहार-विहारामुळें उत्पन्न होते. कित्येकींना तर ती एक प्रकारची खोडच लागते म्हणून त्याबद्दलहि येथें थोडा उल्लेख करणें जरूर आहे.

चौथ्या महिन्यांत गर्भस्राव होत असेल तर– धमासा, उपळसरी, रास्ना, मंजिष्ठ, जेष्ठमध हीं औषधें वाटून तो गोळा (कल्क) दुधांतून द्यावा. गर्भ चलन पावून तहान, दाह, ज्वर इ. वाटल्यास केळीचा कांदा, निळें कमळ, वाळा वाटून दुधाशीं देणें योग्य आहे.

पांचव्या महिन्यांत- १) डोरलीमूळ, रिंगणीमूळ, शिवणमूळ, वड, उंबर, पिंपरी, नांदरुखी यांचे कोवळे अंकूर किंवा साल वाटून किंवा काढा करून दूध मिश्र करून पिण्यास द्यावा. २) गर्भपतन होणारसें वाटलें तर डाळिंबाचीं पानें व चंदन वाटून दूध व दहीं मिश्र करून द्यावें. ३) शूळ होऊन गर्भ पडतोसें वाटल्यास निळें कमळ, कमळाचे कोवळे अंकूर, बोरीचीं पानें, नागकेशर, पद्मकाष्ठ पाण्यांत वाटून किंवा काढा करून दूध घालून द्यावा म्हणजे शूळ बंद होतो व गर्भ पडत नाहीं.

सहाव्या महिन्यांत– १) पिठवण, शेवगा, चिकणा, गोखरू, व शिवणमूळ यांचा कल्क किंवा काढा दूधयुक्त द्यावा. २) गर्भ पडतोसें वाटल्यास गेरू, गाईच्या शेणाची राख, पिंपळी, मुलतानी माती यांचा काढा थंड झाल्यावर दूध, साखर व पांढऱ्या चंदनाचें गंध घालून द्यावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सातव्या महिन्यांत-१) शिंगाडे, कमळाचे देंठ, मनुका, कचोरा, जेष्ठमध, यांचा काढा किंवा कल्क दूध, खडी साखर घालून द्यावा. २) गर्भ पडतोसें वाटल्यास वाळा, गोखरू, नागरमोथे, लाजाळूमूळ, नागकेशर, पद्मकाष्ठ यांचा काढा दूधसाखर घालून द्यावा.

आठव्या महिन्यांत- १) कवठ, बेलफळ, रिंगणीमूळ, कडू पडवळ, उसाचें मूळ, डोरलीमूळ, यांचा कल्क किंवा काढा दूध घालून पुन्हा उकळून दूध शिल्लक राहिल्यावर देणें. २) गर्भपात होतोसें वाटल्यास लोध्र व पिंपळी चूर्ण मधांतून द्यावें.

नवव्या महिन्यांत– प्रसूतीची सर्व व्यवस्था ठेवून उपळसरी, घमासा, आस्कंद, जेष्ठमध यांचा कल्क किंवा काढा दूध घालून द्यावा.

कांहीं ठळक विकारांची योजना.

गरोदरपणीं कांहींना कांहीं अल्प स्वल्प निमित्त होऊनहि गर्भिणीला कांहीं विकार होतात व वेळींच त्यांना पायबंद न घातल्यास तेहि तिला व गर्भाला त्रासदायक होतात म्हणून आतां फार विस्तार न करतां त्याबद्दलच थोडीशी कल्पना देऊन हें प्रकरण संपवूं

१ **ज्वर**– मोह, चंदन, वाळा, उपळसरी, जेष्ठमध, पद्मकाष्ठ, यांचा काढा मध घालून द्यावा. किंवा लघुमालिनी वसंत हें तयार औषध दूधसाखर किंवा लिंबाचे सरवताबरोबर द्यावें.

२ **ताप व हगवण**–मंजिष्ठ, जेष्ठमध, लोध्र, यांचें चूर्ण किंवा कनकसुंदर रस मधांत साखरेच्या पाकांतून द्यावें.

३ **आमांशजन्य शूळ**– बडिशेप, सुंठ, सैंधव, संचळ यांचें चूर्ण पाण्याशीं.

४ **वांती**– कवठाचा गीर साखर घालून सरबतासारखा पाजावा.

५ **सूज**– नुसतें दूध पिऊन राहिल्यास सूज उतरते.

६ **तोंडावर सूज**– सौम्य रेचक द्यावें; कडूनिंब व एरंडपत्रांचा वाफारा द्यावा.

७ **खोकला**– कात, मायफळ, जेष्ठमध यांचें अडुळशाचा रस, मधांत वारंवार चाटण करावें. किंवा कट्फलादि चूर्ण, सीतोपलादि चूर्ण यांपैकीं कोणतें तरी तयार चूर्ण द्यावें.

८ **मलावष्टंभ**– शक्य तों बस्ति द्यावा. अथवा त्रिफळा किंवा सोनामुखी पानें, गुलाबकळी पाण्यांत भिजवून वाटून तें पाणी द्यावें. एरंडेलहि बरें.

९ **श्वास, दमा– खोकला**– आंब्याच्या पानांच्या डेखांचा किंवा अडुळशाचे पानांचा काढा मध, साखर घालून द्यावा. अथवा श्वासकुठार हें तयार औषध विड्याचे पानांचे रसांतून द्यावें; विड्यांतून किंचित् कस्तुरी द्यावी. प्रसूतीची वेळ आली म्हणजे आपोआपहि हा विकार शमतो.

१० **मुखपाक-तोंड येणें**– कडुनिंबाच्या बिया सोलून १० तोळे, जिरें १ तो. कुटून ठेवावें; व या १ तोळा मिश्रणाचा अर्धा शेर पाण्यांत अष्टमांश काढा द्यावा. अथवा शुद्ध टाकणखार, संगजिरें मध तुपांतून लावावें.

११ **स्वर पडणें**– बाभूळ व खैराची मुळी पाण्यांत उगाळून साखर घालून द्यावी. किंवा काढा करून द्यावा. अथवा सोनगेरू तुपांत परतून दूध साखरेशीं द्यावा.

उग्र स्वरूपाच्या विकारांत तज्ञांचे सल्ल्यानेंच उपचार करावेत.

विशिष्ठ रोगांचें निवारण करून गर्भिणीची शक्ति कायम ठेवणें व गर्भाचें पोषण व रक्षण या दृष्टीनेंहि वर लिहिलेलीं व आणखीहि १ उंबराचीं फळें (ऊष्णताशामक, रक्तप्रसारक व स्तंभक); २ अशोक (रक्तसंग्रहण व गर्भाशयाच्या अंतस्त्वचेचें शैथिल्य निवारक); ३ काटेमाठ (गर्भाशय पीडा दूर करणारें, त्याला बलदायक, प्रदरासारख्या विकारांना दूर करून गर्भस्थैर्यकर असें) ४ इंद्रजव (शूलनाशक, व स्तंभक आणि स्तन्य व रजःशुद्धिकर); ५ पारसीक यवानी (गर्भाशय वेदनाशामक, मेंदूला शांत ठेवणारें) ६ लवंग (गरोदरपणींच्या वांत्या थांबविणारें, वातनाशक, दीपक, पाचक); ७ वेलची (अग्निदीपक, पाचक, वांती व ढेकर करपट येतील तर ते थांबविणारें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ दालचिनी (शामक, पोटशूळ, पोटफुगी दूर करणारें
९ धायटीचीं फुलें (थंड, रक्तस्तंभक, प्रदरनाशक)
अशा औषधांचाहि यथालाभ वा समुच्चयेकरून उपयोग चालू ठेवण्यानेंहि गरोदरपण निर्विघ्न पार पडून पुढील प्रसूति कालहि बिनधोक ठरण्यास साहृय होतें.

या प्रमाणें नऊ महिन्यांपर्यंत गर्भिणी व गर्भ यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें नातिसंक्षेप निवेदन झालें. आतां यापुढें अत्यंत महत्त्वाचा व शेवटचा टप्पा – म्हणजे प्रसूतीचा–गाठणें आहे. त्यांतहि ' प्रसूतीचे पहिले दहा दिवस 'च अत्यंत महत्त्वाचे असल्यानें त्यासंबंधीं स्वल्प दिग्दर्शन पुढील प्रकरणीं करून ' मातृपदापूर्वी ' या पुस्तिकेची परिसमाप्ति करूं या.

—∞—



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(आयुर्वेद प्रसारक मंडळीचे रुग्णालयांत धनुर्वाताचे अनेक रुग्ण येतात. त्यांवर अळूकंदाची चिकित्सा केली जाते. त्या चिकित्सेची माहिती वैद्य गो. आ. फडके यांनीं दिली आहे. वैद्यांना विशेषत: खेड्यांतल्या वैद्यांना या माहितीचा उपयोग होईल असा भरंवसा वाटतो. –संपादक

धनुर्वात व अळूचा कंद

ले.– गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

कोणता अळूचा कंद उपयोगी:– अळवाचे निरनिराळे प्रकार उपलब्ध आहेत. त्यापैकीं ज्याची आपण भाजी करून खातों तें अळू यांत उपयोगीं आणतां येतें. सामान्यत: काळें व पांढरें व गोल पानांचें अळू आपण भाजीसाठीं वापरतों. त्यांपैकीं कोणतेंहि वापरलें तरी चालतें.

या अळवाच्या भाजीचे कंद (गड्डे) ताजे काढून ते नीट पाण्यानें धुऊन स्वच्छ करावेत. दगडी खलवत्त्यानें ते कुटावेत किंवा वाटावेत. व मग त्याचा अंगरस 'स्वरस' काढावा व तो फडक्यांतून गाळून घ्यावा. असा रोज ताजा स्वरस काढावा लागतो.

कंदाच्या स्वरसाचें प्रमाण (मात्रा):– प्रौढ वयाचे रुग्णास एका दिवसाला ५ तोळे (२ औंस) व दहा वर्षाचे आंतील मुलास २ तोळे. तीन ते चार वर्षांपर्यंतचे मुलास एका दिवसाला १ तोळा. हें सामान्यत: प्रमाण ठेवलें आहे.

संयुक्त कल्प:– अळूच्या कंदाचा स्वरस नुसता देतां येत नाहीं. नुसता तसाच पाजला तर जिभेला, घशाला फार खाज सुटते जीव कासावीस होतो. यासाठीं या अळूच्या कंदाच्या स्वरसांत तितकेंच (५ तोळे) तूप मिसळावें व हा कल्प अपायकारक होऊं नये म्हणून त्यांत तितकाच लिंबूरस व तितकीच (५ तोळे) साखर त्यांत मिसळून त्या सर्व मिश्रणाचे चार भाग केले व त्यापैकीं एक एक भाग २४ तासांतून ४ वेळां द्यावा.

देण्याचा काल 'सामुद्ग':– दुपारच्या व रात्रींच्या आहारापूर्वी व आहार घेतल्यानंतर लगेच असें जेवण्यापूर्वी व नंतर सामुद्गकालीं प्राय: हें औषध दिलें.

धनुर्वाताच्या रोग्यास नीटसें तोंडहि उघडतां येत नाहीं. दांतखिळी बसलेली असते, अन्नपाणी कांहींच जाऊं शकत नाहीं. त्यांतच झटक्याचा वेग असतो. झटक्याचा वेग जरा ओसरला म्हणजे त्यांतच मधल्या कालांत ओठाच्या कडेनें थोडा थोडा हा रस पोटांत जाण्याची शक्यता असते. रस पाजून थोडा द्रव आहार व मग पुन: औषध असा प्राय: क्रम ठेवला होता.

औषधाची कालमर्यादा:– सामान्यत: जास्तींत जास्त २१ दिवस हा कल्प द्यावा लागला. पहिले सात दिवसांनंतर लक्षणांची तीव्रता कमी कमी होत गेल्यावर हयाचें प्रमाण निम्में व पुढें त्यांहूनहि निम्में केलें गेले

धनुर्वाताच्या लक्षणांवर परिणाम:– अळूच्या गड्डयाचा रस रोग्याला देऊं लागल्यापासून धनुर्वातांतील झटक्यांचा जोर कमी पाडण्यास सामान्यत: पुरे ३ दिवस तरी लागतात. लक्षणें मध्यम तीव्र असतील तर आवेग लवकर कमी पडूं लागतात. असें सामान्यत: दृष्टीस आलें. उलट रोगाची तीव्रता असल्यास अळूचा रस देत असूनहि पहिले तीन दिवस तीव्रता कमी न होतां ती उलट वाढतीच दिसली या कालांत झटक्यांचें प्रमाण कमी होऊं शकलें नाहीं. अशा वेळीं न डगमगतां, ही कंद–रस चिकित्सा चालूच ठेवली गेली. एक एक दिवस असे सात दिवस तरी पदरांत पडले तेव्हां प्राय: लक्षणांत उतार आढळत गेला. ७ ते ८ दिवसांत झटक्यांची तीव्रता कमी होते व झटक्यामधील काल बराच लक्षांत येण्याइतका वाढतो. व उशिरां उशिरां आक्षेप आलेले आढळले. आठ दिवसांनंतर तोंड थोडें उघडतां येऊं लागलें. मानेचा ताठपणा, चेहऱ्याच्या स्नायूंचा संकोच, शाखांतील स्नायूंचा संकोच, पोटाच्या व पाठीच्या स्नायूंचा स्तंभ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसाच चालू असलेला आढळला. त्यांत कांहीं फरक पडला नाहीं. अळूच्या कंदाचा रस देऊन १० ते १२ दिवस लोटल्यावर उर्ध्वशाखेचे स्नायू सैल झालेले आढळले. पुढें ४ दिवसांनीं (१५ दिवसांनंतर) अधःशाखेचे स्नायू व पोटापाठीचे स्नायू यांत ढिलेपणा आढळला. व शेवटीं २० ते २५ दिवसांनंतर मान व चेहरा यांचे स्नायू यांतील संकोच कमी झालेला आढळला. सामान्यतः पूर्ण महिन्याने स्नायूंचा सर्व ताठपणा जातो. कित्येक रोग्यांत पुढेंहि ६ महिन्यांपर्यंत छातीचा बाक राहिलेला आढळला.

जोडीला इतर चिकित्साः– शाकूटकंदरस देऊन केवळ भागले आहे असें क्वचितच आढळलें. बहुतेक सर्व रोग्यांत इतर अन्य चिकित्साहि केली गेली त्याचाहि निर्देश करणें अवश्यक आहे. त्यांत विशेषतः बाह्य चिकित्सा करावी लागली. सर्वांगाला अभ्यंग तैल लावणें ही चिकित्सा बहुतेक सर्व रोग्यांत जोडीला केली गेली. त्याचप्रमाणें कर्णपूरण, नस्य यांचाहि अवलंब केला गेला. अनुवासन, निदान मात्रा बस्ती तरी, रोज दिला गेला. बहुतेक सर्व मार्गांनीं स्नेह चिकित्सा केली. यासाठीं माषसैंधव तैल, सहचर तैल, नारायण तैल, बला तैल, यांचा कालमान व लक्षणांचा क्रम पाहून जोडीला उपयोग केला आहे.

स्नेहनानंतर दुसरी महत्वाची चिकित्सा म्हणजे स्वेदन हीहि बहुतेक सर्व रोग्यांत अवलंबिली गेली. रोज रात्रीं झोपण्यापूर्वीं व पहाटें जागे झाल्यावर हा स्वेद दिला गेला. उष्मस्वेद त्यांत अधिक होता. निर्गुंडीक्वाथ यासाठीं वापरला गेला.

आहार चिकित्साः– या कालांत प्रायः घनान्न पोटांत जाऊं शकत नाहीं व देणेंही धोक्याचें असल्यानें प्रथम पहिले २१ दिवस द्रवान्नावरच ठेवावें लागलें. पहिले कांहीं दिवस केवळ दूधच दिलें गेलें त्यांत जोडीला साखर होती. सामान्यतः मोठ्या माणसाला १॥ ते २ शेर दूध दिलें गेलें. दूधाचा कंटाळाच किंवा तिटकारा एकाद्या रोग्यांत आढळला तर त्यास संत्र्या मोसंब्याचा रस, द्राक्षांचा रस देण्यांत आला. तहान लागत असल्यास क्वोष्ण जल दिलें.

आठ दिवसानंतर जरा तोंड उघडें करतां येऊं लागल्यावर रव्याची दूध, साखर, तूप घातलेली खीर, भाताची खीर दिली गेली. २१ दिवसांनंतर पातळ भात, तूप, जाडी रव्याची खीर, आमटीचें पाणी असा आहार दिला. एक महिना पुरा झाल्यावर लक्षणांचा जोर हाटल्यावर स्वाभाविक भोजन पण ज्यांत तूप लोणी अधिक आहे असा आहार घन स्वरूपाचा घेण्यास सांगितला. शिंबीधान्य कधींच सांगितलें नाहीं

अळूच्या कंदाच्या रसानें बरे होणारे रोगी व त्यांचें शेंकडा प्रमाणः– या चिकित्सनें प्रायः ५० ते ६० टक्के रोगी बरे झालेले आतांपर्यंत आढळले. ज्यांची लक्षणें मध्यम प्रतीचीं आहेत त्यांना बहुतेकांना या चिकित्सेपासून चांगला आराम वाटला असें आढळलें. पण ज्यांच्या लक्षणांची तीव्रता वाढती आहे, झटक्यांचा वेग अति तीव्र आहेत, हे आवेग वारंवार येतात अशांना या चिकित्सेचा उपयोग झालेला नाहीं. हृदयाची गति अति जलद असतां किंवा अनियमित झाली असतां, किंवा श्वासोश्वास वाढलेले आहेत, दांतखिळी पक्की असून औषध पाणी तोंडांत जाऊं शकले नाहीं अशा रोग्यांना कांहीच उपयोग आढळला नाहीं. ज्वरवेग अति तीव्र, अतिस्वेद, महाश्वास, हिध्मा असे उपद्रव ज्यास आढळले असे रोगी या चिकित्सेनें बरे झालेले नाहींत.

धनुर्वातांतील उपद्रव व त्यांची चिकित्साः– अळूच्या कंदाचा रस चालू असतांना तीव्र व आशुकारी अवस्थेंत कांहीं विशेष उपद्रवांची चिकित्साहि करावी लागली ती सामान्यतः पुढें देत आहे.

१ ज्वरः– कित्येक धनुर्वाताच्या रुग्णांत ज्वर तीव्र प्रमाणांत आढळला. अशा वेळीं बहुतेक सर्व रोग्यांत अळूकंदरसाची चिकित्सा चालू असतांनाहि काडेचिराईत, गुळवेल, चंदन, सुंठ हा मेदोगत कषाय सघृत दिला. कित्येक ठिकाणीं प्रवाळ, कामदुधा, चंद्रकला यांचाहि अवलंब केला.

मलावरोध असो वा नसो, दुधांतून एरंडेल दिलें असतां शोधन होऊन यांतील ज्वर कमी होतो असेंहि आढळलें.

२ श्वासः– घुर्घुर व सकफ श्वास लागला असतां मल्लसिंदुराची मात्रा आल्याचा रस व मध यांतून वारंवार चाटायला दिली [illegible]ताच ठसका अथवा शुष्क

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कास असतां समीरपन्नगाचें चाटण दिलें. यामुळें श्वास कमी झालेले आढळले.

६ मलावष्टंभः- हा धनुर्वातांत अति तापदायक उपद्रव असतो. व मलावरोधावरोबर मूत्राचा अवरोधहि अशा रुग्णांत आढळला. अशा वेळीं अवपीडक स्नेहपान, एरंड स्नेहपान, व तैल बस्ती या सर्वांचा उपयोग करावा लागला.

४ अनियमित नाडीः- नाडी अनियमित आढळल्यास या सर्व चिकित्सेबरोबर हेमगर्भाचेंहि वारंवार चाटण दिलें गेलें.

विनंतिः- आतांपर्यंत सुमारे ५० रुग्णांवर या प्रमाणें उपचार केले गेले. आणखी फार मोठ्या प्रमाणावर अशा रुग्णांवर चिकित्सा केली गेली पाहिजे. त्याशिवाय अळूच्या गड्डयाचा उपयोग कोणत्या अवस्थेंत व किती होतो हें निश्चित सांगतां येणार नाहीं.

रुग्णांतील व्रणस्राव तपासून किंवा त्याचें कल्चर करून पाश्चात्य पद्धतीनें याचें निदान धनुर्वात असें झालेलें नाहीं. तेंहि करणें अगत्याचें आहे. पण ज्या रुग्णांवर ही चिकित्सा केली गेली ते सर्व रुग्ण पाश्चात्य तज्ञांकडून 'टेटॅनस' धनुर्वात म्हणून निदान करून आलेले होते. व उपरुग्ण पद्धतीनें (क्लिनिकली) हें रुग्ण धनुर्वाताचेच आहेत असें येथें काम करणाऱ्या पाश्चात्य वैद्यक जाणणाऱ्या तज्ञांचें मत आहे. हे सर्व रोगी येथें येणाऱ्या डॉक्टरवर्गांनीं पाहिलेले आहेत.

एकूण सहा महिन्यांतील १० रुग्णांचा तक्ता सोबत जोडला आहे.

धनुर्वाताच्या सहा महिन्यांतील दहा रुग्णांचा तक्ता.

	नांव	वय	प्रवेश तारीख	व्याधीचा चा दिवस	कारणें	लक्षणें	शेरा
१	अशोक व. साळुंखे	२	२९-१०-५२	दुसरा	कान फुटका	तीव्र	३रे दिवशीं मृत.
२	लक्ष्मण पां. कणसे	५	१-१२-५२	तिसरा	पायाला व्रण	मध्यम	२१ दिवसांत बरा झाला.
३	मारुती रा. माने	६०	२२- १ -५३	चौथा	हाताचे तर्जनीला व्रण	तीव्र	१८-२-५३ ला उत्तम बरा झाला.
४	हौसा सि. रोमण	४०	२४- १ -५३	चौथा	पायाला व्रण	मध्यम	११-२-५३ला उत्तम बरी झाली
५	बावा रा. रोडगे	९	३१- १ -५३	दुसरा	"	तीव्र	२रे दिवशीं मृत
६	पुतळा कारबळ	४०	११-१२-५२	दुसरा	व्रण महिन्यापूर्वी	तीव्रतम	त्याच दिवशीं मृत
७	बकुळा शेलार	४५	१६- १ -५३	पहिला	जानुव्रण	तीव्र	रुग्णालय सोडून गेली.
८	कृष्णा मेंगडे	५	८- २ -५३	तिसरा	पादव्रण	तीव्र	२५-२-५३ ला उत्तम बरा झाला.
९	प्रल्हाद कांबळे	८	२१- १ -५३	दुसरा	पादव्रण	तीव्र	१३-२-५३ ला उत्तम बरा झाला.
१०	मुक्ताबाई खटावकर	२२	१४- ३ -५३	पहिला	अनिश्चित लक्षणें व ज्वर श्वासादि उपद्रव	तीव्र	१५-३-५३ला मृत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाविद्यालय वार्ता—

पहिल्या वर्षामध्यें डिग्रि-कोर्ससाठी २५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे; महाविद्यालयाचे सर्व विभाग उत्साहानें कामास लागले आहेत.

उदयक्लब संस्था:-या संस्थेची नवी इमारत गेल्या महिन्यांत पूर्ण झाली व तिचें उद्घाटन संस्थेचे आजीव सेवक डॉ. गो. ह. फाटक यांचे हस्तें गेल्या महिन्यांत मोठ्या थाटानें झालें. उदयक्लब आतां आधुनिक सोयींनीं सुसज्ज झालें आहे.

विद्यार्थी मंडळ:- चालू वर्षी वै. दि. वि. बोडस हे जिमखान्याचे कार्याध्यक्ष झाले आहेत. चालू वर्षांतल्या पदाधिकाऱ्यांची निवड झाली असून, त्यांचीं नांवें पुढील प्रमाणें आहेत; निवडून आलेल्या उमेवारांचें अभिनंदन!

चंद्रकांत भी. मणूरकर		प्रमुख कार्यवाह
पां. वि. सोनवलकर		क्रीडा मंत्री
ने. दा. भोमाज		वादविवाद मंत्री
ल. क. च्यूरी		वाचनालय मंत्री
म. गो. कानडे		अभ्यास मंत्री
अभ्यंकर	चतुर्थ वर्ग	प्रतिनिधी
कोल्हटकर	तृतीय वर्ष	वर्ग प्रनिनिधी
बरगाळे	द्वितीय वर्ष	D. A. S. F. तृतीय अधिवेशन
जैन	प्रथम वर्ष	G. F. A. M.

रुग्णालय वृत्तांत:— जून १९५३ या महिन्यांत एकूण ४५ रुग्णांना प्रवेश दिला. त्यांत पुरुष २६, स्त्रिया १४, व मुलें ५ होतीं. कायविभागांत १७ व शल्यविभागांत २८ रुग्ण होते; प्रवेशित रुग्णांची २३ शस्त्रकर्में व न प्रवेशित झालेल्या रुग्णांचीं १२ अशी एकूण ३५ शस्त्रकर्में झालीं.

कायविभागांत—

सान्निपातिकज्वर	२	कास	१
ज्वर	३	जलोदर	२
गृध्रसी	२	धनुर्वात	२
वातव्याधि	२	शूळ	३

असें एकूण १७ रुग्ण होते.

प्रमुख शस्त्रकर्में खालीलप्रमाणें झाली.

बद्धोदर	१	छिद्रोदर	१
स्तनार्बुद (रक्तार्बुद)	१	विद्रधिभेदन	३
मूत्राश्मरी	२	गिलायुछेदन	२
मोतीबिंदू	२	अर्बुद	१
भगंदर	२	शुक्रवाहिनी बंधन	१
व्रणलेखन	२	नासार्श	३
कुशाबंधन	२		

व दन्तोत्पाटनादि किरकोळ १२ अशी एकूण ३५ शस्त्रकर्में झालीं.

प्रसूति विभाग:—

यांत एकूण २३ स्त्रियांना प्रवेश दिला.

नैसर्गिक प्रसूति १७; विप्रसव १; गर्भपात ३; मूढगर्भ १ याप्रमाणें एकुण प्रसव २२ झाले. योनिरोग १.

कै. रा. ब. काळे दवाखाना:—

यांत एकूण ४३२ नवीन रुग्णांवर उपचार करण्यांत आले. त्यांत ज्वर, व्रण, अतीसार श्वास, कास, कृमी, त्वक्व्याधी, अग्निमांद्यादि विविध व्याधींचे रुग्ण होते. रोजची सरासरी ७८ इतकी होती.

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.

सूचिपत्र मागवा.

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापक:— अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

अनुभवसिध्द

अर्कशाळा औषधें

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन

रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण

जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन

बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन

मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृध्दिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्र मित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

ऑक्टोबर] [१९५३.

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

: कार्यकारीं संपादक :
ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत........

वातज ग्रहणी — गो. वि. जोशी
अथ ध्यानः — गो. आ. फडके
The Late Mrs. Laxmibai Agashe. — S. D. Limaye.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माता मारी निजबाळा, तरि शरण कुणा जावें ?

भारताच्या स्वायत्ततेंत त्याचीं सर्वहि शास्त्रें, विद्या, कला आपल्या पूर्वीच्या वैभवास पोंचणें सहज शक्य आहे ह्या आशेनें इतर शास्त्र-विद्या-कला-कोविद उल्हसित झाले होते. त्याचप्रमाणें परकीय राजवटींत भारताच्या बोकांडीं बसलेलें परकीय वैद्यकहि त्यांच्या निर्गमनानंतर येथून निघून भारताचें वैद्यक म्हणून आयुर्वेदास सरकारी साह्य तळमळीनें मिळणार ह्या न्याय्य अपेक्षेनें अखिल भारतीय वैद्यवर्गहि स्वायत्त सरकारच्या कृतीकडे पाहात होता. परंतु एका हातांत भाकरीचा तुकडा पुढें करून जवळ बोलवायचें आणि जवळ येतांच नाकाडावर दुसऱ्या हातांत लपवून ठेवलेल्या काठीचा तडाका हाणायचा अशा प्रकारच्या लहानपणीं वाचलेल्या खट्याळ, मुलाच्या वर्तनाचाच जणूं सरकारनें अनुभव आणून दिला. आणि "हे परमेश्वरा ! माझ्या मित्रांपासून माझें रक्षण कर." या इंग्रजी म्हणीची आठवण भारतीय सरकारनें करून दिली. आमचे प्रांतीय मुंबई सरकार तर कांहीं बाबतींत त्याचेवरहि ताण करून दाखवीत आहे असें म्हणावें लागतें.

आयुर्वेदीय प्रवाही औषधें म्हणजे टिकाऊ तयार काढे, आसवारिष्टें यांना परदेशी दारूच्या वर्गांत समाविष्ट करून त्यांचेवर रुपयास एक आणा विक्रीकर लादणें व शिवाय आसवारिष्टांची मादक म्हणजे बेहोष करणाऱ्या द्रव्यांत गणना करून त्यांवर रुपयास ४ आणेप्रमाणें जबरदस्त कर लादणें ह्या गोष्टी सरकारच्या आयुर्वेदविषयक मारक वृत्तीवर चांगलाच प्रकाश पाडीत आहेत. आयुर्वेद पद्धतीनें बनवलेलीं आसवारिष्टें भरमसाट पिऊन दारुड्याप्रमाणें झिंगून बेहोष झाल्याचीं कितीं उदाहरणें दारूबंदी कायदा अमलांत आल्यापासून घडलीं आहेत हें जर हा कायदा अमलांत आणण्यापूर्वी सरकारनें सिद्ध करून दिलें असतें तर मात्र कुणासहि ह्या कायद्याबद्दल मुळींहि वाईट वाटलें नसतें. परंतु तसें न करतां केवळ विशिष्ट प्रमाणांत अल्कोहोल सांपडतो याच सबबीवर सब घोडे बारा टक्के न्याय लागू करणें म्हणजे बुद्धिपूर्वक आयुर्वेदाच्या गळ्यास नख लावण्याचें पातक करणें नव्हे तर काय ?

शेंकडों वर्षांपासून आसवारिष्टें प्रचारांत असतांहि त्याचे दुष्परिणाम (बेहोषी आणण्याचे दृष्टीनें) एकदांहि आढळले नाहींत. असें असतांहि त्यांचे बोकांडीं हा दुष्ट कायदा बसविण्यांत हीं औषधें प्रचारांतून कायमची नष्ट व्हावीं व त्यांची जागा विदेशी टिंक्चर्सनीं उजळ माथ्यानें भरून काढावी हा तर सरकारचा हेतु नाहीं ना अशीहि शंका आल्याविना राहात नाहीं.

तरी सरकारनें प्रत्यक्ष वाटल्यास आयुर्वेदीय पद्धतीच्या आसवारिष्टांच्या अतिरिक्त सेवनानें बेहोषी येतें कीं काय ही खात्री करून घ्यावी व मगच ह्या कायद्यास प्रत्यक्षांत आणावें हें बरें. पण तसें न करतां केवळ आपला दुराग्रह सिद्धीस न्यायचा चंग बांधून जर सरकार हा कायदा अमलांत आणणार असेल तर जनतेच्या आरोग्यविषयक उपचाराचें एक फार मोठें अंग तोडून टाकल्याच्या पापाचे अधिकारी त्यास व्हावें लागणार आहे; व त्यामुळें जनता, वैद्यवर्ग आणि औषधी निर्माणशाळांची फार हानि होणार असून हा संपूर्ण वर्ग अत्यंत असंतुष्ट होणार आहे.

अजूनहि सरकार विचार करून हा कायदा मागें घेईल व जनतेचा दुवा घेईल अशी आशा आहे.

सरकार ही प्रजेची माता होय. तिनेंच आपल्या बाळास असें निष्ठुरतेनें मारण्याचें मनांत आणले तर प्रजेचा वाली कोण ? तिनें कुणास शरण जावें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

दत्तात्रेयशास्त्री जळूकर

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा.

रिफ्रेशर कोर्स

संक्षिप्त माहितीपत्रक.

मुंबई स्टेट मेडिकल फॅकल्टीतर्फे हा अभ्यासक्रम या महाविद्यालयामध्यें मे व ऑक्टोबर या महिन्यांत चालविण्यांत येतील. विद्यार्थ्यांची संख्या अपेक्षेइतकी असली तरच हा कोर्स सुरूं होईल.

१) हा अभ्यासक्रम चार आठवड्यांचा राहील. त्यांत रोज चार तास अध्यापनाचें कार्य चालेल.

२) या अभ्यासक्रमासाठीं मर्यादित विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल.

३) प्रत्येक विद्यार्थ्यास तीस रुपये फी आहे व ती त्यानें अर्जासोबत मनीऑर्डरीनें पाठविली पाहिजे. त्याशिवाय त्यास प्रवेश मिळणार नाहीं. प्रवेश मिळाल्यावर कोणत्याहि सबबीवर ही फी परत केली जाणार नाहीं. प्रवेश अर्जाची शेवटची तारीख ८ ऑक्टोबर १९५३ ही आहे.

४) राहण्याची व भोजनाची सोय ज्याची त्यानेंच केली पाहिजे. संस्थेतर्फे ती होणार नाहीं.

५) एस्. एम्. पी. सेंटर्स, डि. लो. बोर्ड्‌स, सरकारी खातीं, म्युनिसिपॅलिटया, यांत काम करणाऱ्या वैद्यवर्गाला या कोर्सला प्रवेश मिळेल. तसेंच १९३८ सालच्या कायद्यानुरूप, जे रजिस्टर वा नोंदलेले वैद्य आहेत त्यांनाहि प्रवेश मिळेल. सरकारी संस्थांतून नोकरी करींत आहेत पण जे डी. ए. एस्. एफ्. नाहींत त्यांना या कोर्सला प्रथम प्रवेश मिळेल.

अभ्यासक्रमांतील विषय व व्याख्यानें

१)	महत्त्वाच्या रोगांचे, अर्वाचीन व आयुर्वेदीय पद्धतीनें निदान व आयुर्वेदीय चिकित्सा.	२५ व्याख्यानें
२)	शस्त्रक्रियेंतील प्रगतीचे सामान्य ज्ञान व (मायनॉर ऑपरेटिव्ह वर्क) किरकोळ शस्त्रकर्माचे संपूर्ण ज्ञान.	१५ व्याख्यानें
३)	स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र या विषयांतील खाचाखोचा, अर्वाचीन व आयुर्वेदीय विभाग.	१० व्याख्यानें
४)	रोगांचा प्रतिबंध व स्वस्थवृत्त.	१० व्याख्यानें
५)	निवडक वनस्पतींची ओळख, त्यांचे कल्प आणि उपयोग.	२० व्याख्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रवेश अर्ज

रिफ्रेशर कोर्स

श्री. प्रमुख, आयांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा यांसी:-

आपल्या विद्यालयांत रिफ्रेशर कोर्ससाठीं मी ____________________

____________________ दाखल होऊं इच्छितों.

महाविद्यालयाचे नियम मला मान्य आहेत. ते मी पूर्णपणें पाळीन. या कोर्सची फी रुपये तीस (३० रु.) मनीऑर्डरनें सोबत पाठविली आहे.

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता ____________________

जन्म तारीख __________ वय ______

१९३८च्या कायद्यानुसार रजिस्ट्रेशनची तारीख __________ नंबर ______

पूर्व शालेय शिक्षण ____________________

पूर्वीचें वैद्यकीय शिक्षण ____________________

खासगी वैद्यकीय व्यवसाय अथवा नोकरी ____________________

किती वर्षें व कोठें ____________________

आपला नम्र,

तारीख सही ____________________

सूचना :- १) अर्जाची सर्व सदरें भरणें आवश्यक आहे. अपूर्ण अर्जाचा विचार होणार नाहीं.
२) अर्जदारास प्रवेश दिल्यावर कोणत्याहि सबबीवर प्रवेश फी परत केली जाणार नाही.
३) राहण्याचीं व भोजनाची सोय ज्याची त्यालाच करावी लागेल.
४) हा अर्ज भरून पाठवावा.

येथें कापावे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

— आयुर्मीमांसा —

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १६वें] ऑक्टोबर १९५२. [अंक ७वा.

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणा-विषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्या-बद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महि-न्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व व्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा. अर्कशाला बिल्डिंग, सातारा.' या पत्त्यावरच करावा.

आसवारिष्टांवरील अन्याय्य कर

मुंबई सरकारनें १९५२ सालच्या विक्रीकर कायद्याखाली आयुर्वेदीय आसवारिष्टें व काढे यांना 'परदेशी दारू' या वर्गांत समाविष्ट करून त्यांच्यावर रुपयास एक आणा या प्रमाणांत खास विक्रीकर आकारला आहे. हीं औषधें 'दारू' नव्हेत आणि त्यांना परदेशी दारूच्या जोडीस बसविणें ही त्याची थट्टा आहे हें कोणाहि सुजाणास सहज मान्य होईल. पण या प्रक-रणीं सरकारकडे आयुर्वेदीय औषधी निर्मात्यांनीं अनेक निवेदनें पाठविलीं असूनहि सरकार अद्याप मुग्धच आहे.

आसवारिष्टांना सरकार परदेशी दारूंत समाविष्ट करील ही कल्पनाच इतकी असंभाव्य आहे कीं या कलमाकडे औषधी कारखानदारांचें लक्ष गेलें नाहीं व त्यांनीं हा कर ग्राहकांच्यावर आकारलेला नाहीं. सरकार मात्र कारखानदारांकडून १ नोव्हेंबर १९५२ साला-पासून हा कर वसूल करून घेऊं इच्छिते. या एक प्रकारें दंडयोजनेच्या इराद्यानें कित्येक कारखानदारांच्या ताळे-बंदाचा तोल जाईल आणि आधीच मंदीमुळें खालावलेली ही कारखानदारी नामशेष होण्याच्या पंथाला लागेल अशी भीति वाटते.

मादक पदार्थांवरील आणखी एका कायद्यान्वयें सर्व आसवारिष्टांवर रुपयास चार आणे या प्रमाणांत जबरदस्त कर बसण्याचा धोका प्राप्त झाला आहे. याहि बाबतींत न्याय मागण्याचा कारखानदारांचा प्रयत्न चालू आहे. पण हा आघात केवळ आयुर्वेदीय औषधी निर्मात्यां-वर आहे असे नसून तो आयुर्वेद, आयुर्वेदीय चिकित्सा-प्रणालि व वैद्यकीय व्यवसाय यांनाहि हानिकारक आहे हें लक्षांत घेऊन आयुर्वेदाचा पुरस्कार करणाऱ्या वैद्य श्रेष्ठांनींहि या अन्यायनिवारणार्थ प्रयत्न केला पाहिजे. आयुर्मीमांसेनें महाराष्ट्रांतल्या प्रमुख वैद्यवरांना या प्रकरणी मत व्यक्त करण्याची विनंति केली होती. दुर्दैव असें कीं, आयुर्वेदाचा शिक्षणक्रम, पदव्या आणि संशोधन यांच्या चळवळींत अग्रभागीं असलेल्या व आयुर्वेदाच्या उद्धारासाठीं परिषदा भरविणाऱ्या कांहीं श्रेष्ठ वैद्यांनीं या आमच्या विनंतीची पोंच अद्यापहि दिलेली नाहीं. ज्यांचीं उत्तरें आलीं आहेत त्यांचे आम्ही आभारी आहों. या अंकांत वैद्य जळूकर यांचें पत्र प्रसिद्ध करीत आहों.

—व. ल. वष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सौ. लक्ष्मीबाई ऊर्फ वहिनीसाहेब आगाशे
यांचें
दुःखद-निधन

सातारा आयुर्वेद प्रसारक मंडळीच्या संबद्धित लोकांना आणि विद्यार्थी बंधूंना आज कळविण्यास अत्यंत दुःख होत आहे कीं, गुरुवर्य डॉ. मो. ना. आगाशे यांच्या सुविद्य व ख्यातनाम पत्नी सौ. लक्ष्मीबाई या शुक्रवार दिनांक ११-९-१९५३ रोजीं दुपारीं तीन वाजतां पुणें मुक्कामीं दिवंगत झाल्या. परिणाम-शूलानें कित्येक वर्षे त्यांच्या देहांत ठाणें केलें होतें. पण त्याला न जुमानतां त्या आपला दैनंदिन व्यवहार पार पाडीत होत्या. पण शूलानें आपलें सामर्थ्य अधिक वाढविलें. त्यावर औषधी उपचारांची मात्रा कांहीं चालेना. त्यांना शूल असह्य होऊं लागला. अन्नपाण्याविना राहून पाहिले. त्यांच्या जिवाला होणारी तळमळ बघवेना; शेवटीं नाइलाजानें शस्त्रकर्म करून घेण्याचा निर्णय घेण्यांत आला.

पुण्याचे सुविख्यात सर्जन डॉ. घारपुरे एम्. एस्., एफ्. आर. सी. एस्. यांनी दि. १६ ऑगस्ट १९५३ रोजीं " गॅस्ट्रोजेजुनॉस्टमी " चें शस्त्रकर्म त्यांचेवर केलें. शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडली. जखम भरून आली. पुढें त्यांना टेकून बसण्याची व इकडे तिकडे वळण्याचीहि परवानगी मिळाली. अशी क्रमाक्रमानें आशावादी सुधारणाहि त्यांच्या प्रकृतींत होऊं लागली. पण दिनांक ९ सप्टेंबर रोजीं अचानक दैव उलटलें, मूत्राचें प्रमाण कमी झालें. मूत्रदोष रक्तांत वाढून त्यानें प्राणावर मात करून मूर्च्छा आणली. मूत्राघात वाढू लागला. मूत्रदोष (यूरीमिया) वाढून महाहिध्मा वारंवार त्रास देऊं लागली. मूर्च्छा आली. शरिराची सर्व हालचाल बंद होऊं लागली. फक्त पापण्यांची उघड-झाप मधून मधून होत राहिली. ज्वर वाढू लागला. मूत्रोत्पत्ति कमी होत होती. मानवी प्रयत्नांची सर्व कांहीं पराकाष्ठा झाली. पण ते सर्व अपुरे पडून त्यांतच त्यांचा अंत झाला.

सौ. वहिनींच्या निधनामुळें डॉ. मो. ना. आगाशे यांच्यावर त्यांच्या उतार वयांत फार मोठा आघात झाला. गृहलक्ष्मी निघून गेल्यामुळे आगाशे यांचे कुटुंबांतील मंडळी पोरकी झाली. डॉ. मो. ना. आगाशे यांनीं आपल्या धंद्यांत जी प्रसिद्धी मिळविली, त्यांना जें सार्वजनिक कार्य पुढारीपणानें करता आलें. किंवा आपल्या आवडीचा अभ्यास आजपर्यंत करता आला त्याचें निम्में अधिक श्रेय त्यांच्या आदर्श पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांना आहे. पैसे मिळवून घरांत आणून देण्याखेरीज डॉक्टरांच्या मागें प्रपंचाचा कांहींहि व्याप वहिनींच्यामुळें नव्हता. घरांतील समानाची टापटीप, व्यवस्था, पाहुण्यांचे आदरातिथ्य, मोठ्या कुटुंबांतील मुलांची जोपासना, आजारीपणांत सुश्रुषा, बाजारहाट, सुगृहिणी म्हणून करण्याची सर्व कर्तव्यें लग्न झाल्यापासून आज सतत तीस वर्षे वहिनींनीं अत्यंत कौशल्यानें व जबाबदारीनें पार पाडलीं. व्यक्तिशः डॉक्टरनां घरांतील काम म्हणून कधीं कांहीं करावें लागलें नाहीं. किंवा बाजारांतून कोथिंबिरीची काडीहि त्यांनीं आणली नाहीं. सर्व संसार-शकट उत्तम तऱ्हेनें वहिनींनीं आतांपर्यंत चालवून नेला. घरांत सौख्य नसतें तर आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाची धुरा वाहणें, वेस्टर्न इंडियाचे अध्यक्ष म्हणून काम करणें इत्यादि सार्वजनिक सेवा डॉक्टरनां करता आली नसती. समाजाची अशी बहुमोल सेवा करणारा पुरुष समाजाला लाभून देणारी अशी सुशिक्षित आणि आदर्श गृहिणी आज नाहींशी झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका सुविख्यात डॉक्टरांची पत्नी म्हणूनच केवळ वहिनींचा मोठेपणा नव्हता तर स्वतःचें स्वतंत्र असें स्थान साताऱ्याच्या समाजांत त्यांचें होतें. त्यांच्या बोलण्यांत, वागण्यांत गोडवेपणा होता तसा निर्भीडपणाहि होता. त्यांचे प्रामाणिक मतभेद त्या स्पष्ट शब्दांत सांगत असत. त्यांच्या अंगांत वक्तृत्त्वाचा मोठा गुण होता. त्यामुळें साताऱ्याच्या भगिनीवर्गास त्यांनीं आपल्याकडे आकर्षून घेतले होते. अधिकारवाणीनें योग्य तो सल्ला सर्वांना त्या देत. गरिबापासून तों श्रीमंतापर्यंत त्यांचा निकट संबंध असे. सुशिक्षितापासून तों अडाणी स्त्रियांपर्यंत त्या सर्वांच्या परिचयाच्या होत्या. सर्वांची विचारपूस त्या श्रीमंतीचा गर्व न धरतां करीत. यामुळें साताऱ्याच्या सर्व जनतेला त्या प्रिय होत्या. कन्याशाळा सातारा, या संस्थेच्या सल्लागार मंडळांत त्या होत्या. तारामंडळ या स्त्रियांच्या क्लबाच्या त्या एक संस्थापिका होत्या. सातारा नगरपालिकेच्या गेल्या निवडणुकींत शनवार वॉर्डतर्फे त्या बहुमतानें निवडून आल्या. यावरून साताऱ्याच्या स्त्रीपुरुषांचा केवढा विश्वास त्यांचेवर होता हें कळून येतें. रिमांड होममध्यें त्यांची मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक होती. तेथील मुलांना त्या मातृप्रेमानें वागवीत. अशा अनेक संस्थांत त्यांचें अस्तित्व दिसून येत आहे. कोणतेहि सार्वजनिक काम असो तें करण्याची त्यांना मनापासून हौस व तळमळ असे. व तें करीत असतांना मानाला त्या कधींच हपापलेल्या नव्हत्या.

डॉक्टर आगाशे यांच्यामुळें वैद्यक विद्यालयाशीं त्यांचा निकट संबंध आला होता. महाविद्यालयाचें कोणतेहि काम निघाल्यास त्यास त्यांनीं तनमनधनानें अर्पून घेतले होते. त्यांचा प्रत्यक्ष संबंध संस्थेशीं नसला तरी संस्थेंतील कार्यकर्त्यांना त्यांचें सदैव प्रोत्साहन लाभे. संस्थेच्या लहान थोर कामांत त्या बारकाईनें लक्ष घालीत. गेली चार वर्षें त्या आयुर्वेद प्रसारक मंडळींच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सभासद होत्या. त्या वेळांत संस्थेला योग्य तें मार्गदर्शन त्यांनीं निर्भिडपणें केलें आहे. वैद्यक विद्यालयाला नेहमीं पैशाची अडचण भासते. ती कमी व्हावी म्हणून त्यांनीं आयुर्वेदीय अर्कशाला काढली व ती लिमिटेड कंपनी झाली तेव्हां अधिक लाभलेल्या पैशाचा म्हणजे तेरा हजार रुपयांचा ट्रस्ट त्यांनीं केला. त्या रक्कमेवरील व्याजाचा विनियोग आयुर्वेद प्रसारक मंडळी व आयुर्वेदाचें कार्य यासाठीं केला जावा असा दंडक त्यांनीं घालून दिला. त्यांच्या अकाली मृत्यूमुळें त्यांच्या कुटुंबीयांप्रमाणें आयुर्वेद प्रसारक मंडळी, व अर्कशाला या व इतर संस्थांचीहि फार मोठी हानी झाली आहे. व या संस्थांतील सर्व कार्यकर्त्यांना अत्यंत दुःख होत आहे.

त्यांचें उतार वय पहातां डॉ. मो. ना. आगाशे यांच्यावर हा फार मोठा व अकल्पित आघात झाला आहे. हा आघात सहजासहजीं भरून निघणारा नाहीं. आयुर्वेद प्रसारक मंडळी, आयुर्वेदीय अर्कशाला लि. या संस्था म्हणजे डॉ. आगाशे कुटुंबीयांचीच उपांगें होत. डॉ. मो. ना. आगाशे यांच्यावर हा जो आघात झाला आहे तो हलका करण्याची धडपड करणें हेंच या उभय संस्थांच्या आजच्या कार्यकर्त्यांचें कर्तव्य ठरतें! हें कर्तव्य ते पार पाडतील अशी आशा व्यक्त करून कै. सौ. लक्ष्मीबाई आगाशे यांना प्रणाम करीत आहोत.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य

यांस लागणारीं औषधी द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर, मौक्तिक(मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद व मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य!!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.

टे. नं. ३१७९६ Telegram-AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

: लेखक :

वैद्य गो. वि. जोशी,
आयुर्वेद विशारद,
लोणंद.

निवडक रुग्ण चिकित्सा

वातज ग्रहणी

नांव : - दत्तात्रय वाडकर. वय ३२ वर्षे.
राहणारः- लोणंद जात व धंदा- कासार.

रोगी चिकित्सेसाठी मे १९५१ मध्ये आला. त्यावेळी रोग्याला खालील उपद्रव होत होता.

१. तोंड आलेले आहे. व सर्व जीभ लाल झालेली आहे. तिखट खाता येत नाहीं.

२. दिवसांतून ७।८ वेळा जुलाब होतात व त्यामध्ये आव पडते. व पोटांत वेदना येते.

३. प्रकृति पुष्कळ खालावलेली आहे व त्यामुळें अशक्तपणा बराच वाटतो.

४. खोकला आहे. बडका पडतो.

रोग्याचा वैयक्तिक इतिहासः-

रोगी विवाहित, तंबाखू खाण्याचे व्यसन आहे. धंद्यानिमित्तानें हिंडावे लागते त्यामुळें अन्नपाणी बदलते व अवेळीं भोजन होते.

रोग्याच्या घरचा इतिहासः-

रोग्याच्या घरामध्ये रोग्याची बहीण व आई ह्यांना आव जुलावांचा विकार होऊन गेलेला होता. मुखपाक सर्वांना थोड्यावहूत प्रमाणांत आढळला.

रोगाचा इतिहासः-

दोन महिन्यापूर्वी जुलाब आव वगैरे सुरूं झाल्यावर बारामतीस सरकारी दवाखान्यांत प्रकृति दाखवून खालील उपचार घेतले.

Strichnine– $\frac{1}{60}$ gr.
Emetine– 1 gr. } Injections

रोज एक, ह्याप्रमाणें एक आठवडा. त्यानंतर Entero vioform गोळ्या १० दिवस; रोज तीनप्रमाणें.

ह्या दहा दिवसानंतर Vitamin B12 व Folic acid and B complex (Unichem). अशी ४।५ इंजेक्शन्स.

ह्या सर्व चिकित्सेनें रोग्याची प्रकृति सुधारली जुलाब थांबले व बरे वाटले.

परंतु लगेच दोन महिन्यांनीं पुन्हा रोग उलटला. व वर लिहिलेल्या लक्षणांप्रमाणें उपद्रव सुरूं झाला.

ह्या रोग्याच्या खालील परीक्षा केल्या.

X- Ray Picture.-
Chest clear

Stool Examination:-
Amoeba not found.

Urine :-
Nothing Abnormal

Blood Examination
Microcybtic Anaemia.

ह्या परीक्षा केल्यानंतर पुष्कळ जुलाब होऊं लागले; म्हणजे २५-३०, मोठ मोठे व पातळ. व वेदना बरीच येऊ लागली. ज्वर नाहीं.

परंतु डाव्या पायाचा घोटा सुजला व रोग्यास उठता येईना.

म्हणून सातान्यास आयांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या रुग्णालयामध्यें पाठवून आयुर्वेदीय चिकित्सा सुरूं केली.

रुग्ण परीक्षाः-

रोगी-कफ प्रकृतीचा, मेदसार. डाव्या पायाचा घोटा सुजलेला, उदर स्पर्श परीक्षेंत प्राकृत, उरःस्थान प्राकृत. जिव्हा लिप्त. अग्निमांद्य (प्रश्न परीक्षेवरून).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोग परीक्षा

रोग्याचा पुराण अतिसार, मुखपाक, अग्निमांद्य ह्यावरून ग्रहणी हा रोग उघड होत होता.

रोगविनिश्चयासाठीं

अतिसार, ग्रहणी, क्षय ह्या तीन रोगांचा विचार करावयाचा होता. परंतु अतिसार हा विकार कधी जुनाट नसतो. तो नुकताच असतो व उत्तान आहार दोषांमुळें अग्निबल कमी पडून अतिसार होतो. अग्नि उत्पन्न होणाऱ्या स्थानामध्यें दोष नसतो, व त्यामुळें अतिसार लवकर बरा होतो. तीच कारणें पुढें राहिली तर त्यापासून खोल रोग ग्रहणी हा संभवतो, व त्यामुळें हा रोग अतिसाराचीच कारणें जीर्ण होऊन ग्रहणी ह्या स्थितीला पोहोचला होता.

क्षय

बल–मांसहानि तितक्या प्रमाणांत नव्हती.

रोग्यास ज्वर नव्हता. व X Ray picture ह्यावरून क्षय निवृत्ति होत होती.

ह्यावरून ग्रहणी हें निदान नक्की होत होते.

वेदना, अतिसारच्या पुष्कळ वेळा, अनियमित स्वरूप, व कास ह्या लक्षणांवरून वातज ग्रहणी असे निदान होत होते. एक मुखपाक येवढें पित्ताचे लक्षण होते. तेव्हां खालील चिकित्सा सुरू केली.

आहार–	ताक व भात	
विहार–	विश्रांति	
औषध–	पंचामृतपर्पटी	१ गुं.
	वार्विडिंग चूर्ण	१ गुं.
	सौवर्चल	४ गुं.

२ पुड्या, अनुपान ताक. समान कालीं.

२. महायोगराज गुग्गुळ २ गुंज. आल्याचे रसाबरोबर, २ पुड्या, व्यान काली.

३. सांध्यावर शोथहर लेप– रोज सकाळीं. ह्या प्रमाणें ४२ दिवस औषधोपचार केला. रोग्याच्या सर्व तक्रारी कमी होऊन वजन वाढले. संधिशोथ कमी झाला.

गेली दोन वर्षे रोगी नजरेखाली आहे ह्या काला-मध्ये रोग उलटला नाहीं अगर अतिसार वा मुखपाक आढळला नाहीं.

सारांश

१. Dysentry असे Alopathic निदान करून व त्याप्रमाणें पूर्ण चिकित्सा देऊन उपशय आला परंतु रोग २ महिन्यांतच उलटला.

Stools Negative असून अग्निमांद्य व अतिसार कमी झाले नाहीं. ह्यावरून ह्या औषधी उपायांनीं जरी जंतुचा नाश होत असला तरी शरीराची रोग प्रतिकारक शक्ती वाढली नाहीं.

३. आयुर्वेदीय चिकित्सेनें दोन वर्षांत रोग उलटला नाहीं. ह्यावरून ते बल प्राप्त झालेले दिसते.

४. जंतुनाशाबरोबरच इतर प्रतिकाराचा विचार जो पाश्चात्य चिकित्सेंत आज Antibiotics मुळें मागे पडला आहे त्याचे महत्व रोगपरिहाराचे दृष्टीनें जास्त आहे.

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.

सूचिपत्र मागवा.

साचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः– अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)

वसंत मिश्रण

सुवर्णयुक्त टॉनिक

४० गोळ्या किंमत ४ रुपये

पोस्टानें मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

★ ★ ★ अथ व्यानः...।

ले०– गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

व्यान शब्दाची निरुक्ति–

अन् या गत्यर्थक धातूपुढें वि हा उपसर्ग लागून व्यान हा शब्द झाला आहे. जो विशेषकरून नेतो तो व्यान.

व्यानाचें अवस्थिति स्थान–

व्यानो हृदि स्थितः।

व्यानाचें वास्तव्य स्थान हृदय हें आहे.

विचरण स्थान–

कृत्स्न देहचारी।
देहे व्याप्नोति सर्वं तु
व्यानःशीघ्रगतिर्नृणां

प्रत्यक्ष हृदयांत व्यान असतो. तरि त्याचें संचार क्षेत्र सर्व शरीर हें आहे. शरीरांतील सर्व अवयव पाहिलें, तर त्या सर्वांत हालचाल-जिवंतपणा हा मुख्यतः हृदयांत आढळतो.

हृदयं चेतनास्थानम्

स्वयंस्फूर्त, स्वयंशासित अशी हालचाल हृदयांतच आहे.

चेतना, जिवंतपणा, गती यांचे मुख्य केंद्र हृदय आहे. येथूनच सर्व शरिराला चैतन्याचा, जिवंतपणाचा आणि गतीचा पुरवठा मिळतो. सर्व प्राणद्रव्यें, रसादि भोज्यधातु यांचेहि स्थान हृदय हेंच आहे. हृदयाच्या गतीमुळेच सर्व शरीरअवयवांना प्राणद्रव्यांचा, पोषक द्रव्यांचा पुरवठा होतो. बाह्य ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें कार्यकारी दिसतात पण त्यांना प्रेरणा अथवा गति हृदयाकडून हृदयाश्रयी सूक्ष्म इंद्रियाचे कडूनच मिळते. अशा रीतीनें अखिल देहांत प्राण द्रव्यांचे गमन आगमन वायु, अन्न, पाणी यांचे वहन चैतन्य–प्रत्यक्ष दर एक अवयवाची हालचाल ह्या सर्व क्रिया हृदयस्थ व्यानाच्या आहेत.

कोणत्याहि बाह्य हालचाली वा कर्मेंद्रियाच्या क्रिया-ज्या आपणाला दिसतात त्यांना मुख्य प्रेरणा किंवा गति हृदयस्थ व्यानाकडून मिळते. कोणत्याहि भागाची हालचाल व्हावयाची म्हणजे गति आली. गति म्हटली कीं कांहीं तरि द्रव्य-ज्वलन चाललें पाहिजे. द्रव्यज्वलना खेरीज गति नाहीं. द्रव्याची झीज झाली. झीज झाली कीं त्या ठिकाणीं परत पूर्तता राखण्यासाठीं त्या हालचालीचे ठिकाणी पोषण-द्रव्यांचा, व अग्नि, वायु या प्राणद्रव्यांचा अधिक व जोरानें पुरवठा करावा लागतो, व तो करावयाचा म्हणजे हृदयाला अधिक व जोरानें संकोचविकास केले पाहिजेत म्हणजे तेथेंहि गती आली. झीज, ज्वलन-त्यासाठीं तात्काळ द्रव्यें पुरविणें हें व्यानाचें कार्य आहे.

शरीरस्थ कोणत्याहि भागाची हालचाल अथवा त्या भागांत गति निर्माण करावयाची असल्यास, त्यास प्रथम प्रेरणा व्यानामार्फत होते, व त्याच क्षणीं हृदयस्थ व्यानाचीही क्रिया अधिक प्रमाणांत वाढवावी लागते. आपण नुसत्या एका हाताच्या बोटाची हालचाल करूं लागलों तरी त्या ठिकाणी बोटाच्या हालचालीवरून आपणाला वायु दिसतो. गति दिसते. पण या गतीमागें हृदयस्थ वाढलेली हालचाल चालूंच असते. बोटाची हालचाल चालू राहण्यास शरीरस्थ आशयांत असलेली प्राणद्रव्ये अधिक प्रमाणांत वर खाली खेचण्याची क्रिया हृदयाला अधिक प्रमाणांत करावी लागते. ही व्यानक्रिया झाली नाहीं तर कोणत्याहि भागाची हालचाल होणार नाहीं.

बाह्य स्नायूंना कर्मेंद्रियांना प्रेरणा व्यानामार्फत मिळते. अनेक स्नायू आहेत. त्या सर्व ठिकाणीं त्यांच्या हालचाली होतात. ह्या सर्व :हालचालींचें रूपानें सर्व शरीरभर व्यान वायु आहे. पण त्याचे मूळ गति केंद्र हृदय हें आहे.

" व्यानो हृदि स्थितः।"

रसादिधातूंचा संचार सर्व शरीरभर आहे. रस रक्त या धातूंत सारखी ही जी गती मिळते ती व्यानामुळेंच मिळते. नारदाप्रमाणें रसरक्त हे धातु एका घटकाकडून दुसऱ्या घटकाकडे सारखे फिरत आहेत. हे परिभ्रमण व्यान वायुमुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राप्त झाले आहे. व्यानप्रेरित रस रक्त हे सर्व शरीरव्यापी आहेत. त्यामुळे व्यान वायु हा त्यांच्या अभिसरणद्वारां सर्व शरीरभर दिसत असतो.

व्यानाचीं कार्यें—

रससंवहन, असृक्स्रावण.

अन्नपचनांत निर्माण झालेला अन्नरस हृदयस्थ व्यानरूपी पंपानें आंत्राश्रयी रसविहिरींतून वर खेचला जातो, हा रस उर्ध्वगामी, अधोगामी, तिर्यक्गामी वाहिन्यांद्वारां सर्व शरीरभर टाकला जातो व मग सर्व शरिराचे पोषण होते. पण रसाचा वर उपसा करणें, व त्याचीं सर्व शरीरभर व्याप्ती करणें हे महत्वाचे कार्य उरस्थ हृदय करिते. या रसाबरोबर रक्तादि धातूंचेंहि वहन चालूं असते. रस घेऊन त्यापासून रक्तधातूनें निर्माण केलेले मांसपोषक घटक, मांसधातूंने निर्माण केलेले मेदोधातु-पोषक घटक,अस्थिपोषणार्थ निर्माण केलेले मेदांतील घटक, शुक्रपोषणार्थ मज्जाधातूनें बनविलेले घटक यांचे ही अभिसरण व्हावे लागते. त्या शिवाय त्या त्या धातूंना ते ते पोषक अंश मिळणार नाहीत. हे घटक त्या त्या धातूंकडे पोचविण्याची जबाबदारी व्यानावरच असते.

संतत्याभोज्यधातूनां परिवृत्तिस्तु
चक्रवत् ॥ वा. शा.

रहाटचक्राप्रमाणें एकसारखे अभिसरण या धातूंत चालूं असते. धातूंना ही गति व्यानामुळे मिळते,

मुखावाटे आंत्रांत आलेला अन्नाचा परमाणू पचवून त्याचे ग्रहण या शोषण करण्याचें कार्य समान वायु करितो. ग्रहणीमार्फत ग्रहण केलेला हा परमाणू लगेच व्यानाच्या चक्रांत सांपडतो. रसधातु गमनशील आहे. त्याचे समवेत हा अन्न परमाणू सर्व शरीरभर जातो. तो ज्या ज्या धातूचे सान्निध्यांत जातो त्या त्या धात्वग्नीकडून त्याचे परत पचन-पृथक्करण होते. व त्याला तें तें पुढील पुढील धातु-स्वरूप प्राप्त होते. हा घटक कांहीं काळ धातु म्हणून राहतो पण पुढे त्या धातूचें पचन होऊन त्याला मल हें रूप प्राप्त होते. शरीर धातूपासून वियोजित झालेला हा परमाणू मल म्हणून शरिरांत वावरतो व पुढें त्याची जशी योग्यता असेल त्याप्रमाणें त्या त्या मलायनाकडे खेचला जातो. आणि त्या त्या मलायनांतून त्या त्या वायू-मार्फत शरिराबाहेर मल म्हणून बाहेर टाकला जातो. यांत रसाचें अभिसरणांत शिरल्यापासून त्याला मलिन स्वरूप प्राप्त होऊन मलाशयाकडे जाईपर्यंत जी गती लाभली ती व्यानामुळे लाभलेली गति होय. व्यान वायू कार्यशील नसता तर आहार्य परमाणूंची व्याप्ती, प्रसार, व पुढे मल म्हणून त्यांची बोळवण या देहांत घडली नसती. अन्नाप्रमाणें अग्नि, पाणी, वायु या बाह्य प्राणद्रव्यांची गरज शरिराला असते. बाह्य जगांत प्राण म्हणून असलेला वायु रक्ताच्या आश्रयानें सर्व शरीरभर संचार करितो म्हणूनच दर एक शरीरस्थ घटक जिवंत राहूं शकतो. रक्ताला चालवा व्यानवायूमार्फत नसली तर सर्व प्राणद्रव्यांचीं व्याप्ती — प्रसार शरिरांत घडणार नाहीं व असा प्रसार झाला नाहीं तर. जीवनच चालणार नाहीं. यास्तव, रसरक्तापासून ओजापर्यंत भोज्य घटकांचे संचरण जे जीवनाला अत्यंत आवश्यक आहे ते घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य व्यान हा वायु करितो. एका स्थानापासून दुसऱ्या स्थानीं प्राण द्रव्यें व शरीरस्थ व्यापारांत बनलेले पदार्थ वाहून नेण्याचे कार्य याचेकडे आहे.

पंचव्यापार अथवा पंचकर्मे—

चावणें, बसणें, धावणें, उठणें, हातपाय लांब व जवळ करून अनेक व्यापार शरीर करीत असते. पण या सर्व व्यापारांचा समावेश, प्रसारण, आकुंचन, विनमन, उन्नमन तिर्यग्गमन, या पांच क्रियांमध्यें होतो. एकादा पदार्थ घेण्यासाठीं आपण स्वइच्छेनें आपला हात लांब करितो, तो हातानें पकडतो, मग तो पदार्थ आपल्या जवळ घेतो. आपण चालतो, पळतो. या सर्व ऐच्छिक क्रिया बाह्यस्नायुप्रतान, व अंतरस्नायुप्रतान या दोन तऱ्हेच्या स्नायूंचे मुळें चालतात. पण या स्नायूंना प्रेरणा व्यान वायूचो असते. व्यान कार्यकारी असला म्हणजे या सर्व क्रिया किंवा हालचाली स्नायूंचे कडून घडून येतात. स्नायूंचे संकोच व विकास हाच वायु करितो. एका स्थानापासून दुसऱ्या स्थानीं जाणें याला गति म्हणतात. हातानें लिहीत असतां आपला हात ओळीचे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सरसर लिहीत जातो व परत दुसऱ्या ओळीवर येतो. यांत जी गति आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ती व्यानाचीच आहे. आपण उठून उभे राहतो, पुढें पावलें टाकतो. चालतो पळतो, जोर बैठका काढतो, डावीकडून उजवीकडे, किंवा उजवी कडून डावीकडे आपल्या अवयवांची आपणाला पाहिजे तशी हालचाल घडवून आणतो ती सर्व व्यानामुळें. संधींची हालचाल व्यानामुळेंच होते.

डोळयाच्या पापण्या झाकणें याला निमेष म्हणतात. त्या उघडणें याला उन्मेष म्हणतात. ही निमेषोन्मेषणाची क्रिया करणारे जे स्नायु आहेत त्यांना गति अथवा चालना व्यान वायुमुळें मिळते. रूपग्रहण करणारा प्राणवायू, अंतःकरणांतील प्रेम, क्रोध इत्यादि भाव नेत्रावाटें प्रगट करणारा उदान वायू, व पापण्यांची उघडझाप करणारा व्यान वायु अशा त्रिविध वायूंचे गतीचे नेत्राचे व्यापार चालतात.

रस व रक्त धातु हे दोन धातु अतिशय गतिमान आहेत हें आपण पाहिले. हे ज्या वाहिनींतून गमन करितात त्यांना वाहिन्या अथवा सिरा असें म्हणतात. मुखाखेरीज शाखेंतील रसरक्ताच्या वाहिन्यांचा जरूरीप्रमाणें विकास करणें, अथवा संकोच करणें हें कार्य वायू करितो. त्यामुळे त्वचेला रसरक्तांचा पुरवठा कमी अधिक प्रमाणांत होतो. ऊष्णकालांत त्वचेकडोल वाहिन्या विकसित असतात त्यामुळें रसरक्तांतील वाढलेली ऊष्णता बाह्य वातावरणांत मिसळून अन्तर्भाग थंड राखिले जातात. याचे उलट थंडीचे काळांत त्वचेंतील वाहिन्यांचा संकोच केला जातो व त्यामुळे शरिरांतून अधिक प्रमाणांत ऊष्णता त्वचेवाटे बाहेर टाकली जात नाही – तो ऊष्मा रोखला जातो. हे ऊष्मा कमी अधिक करण्याचे कार्य रसरक्तवाहिन्यांचे संकोच विकास घडवून आणून व्यान वायू करीत असतो. ऊष्णता नियंत्रण करण्याचे मोठे कार्य व्यानाकडे आहे. कित्येक वेळा सर्वांगाचा दाह होतो. किंवा सर्वांग गार अथवा बधिर होते. ह्या क्रिया व्यानप्रकोपाच्याच द्योतक होत.

ऊष्णतेप्रमाणें स्वेदावरही नियंत्रण व्यानाचेच असते. स्वेद हा पचनाच्या व्यापारांत निर्माण होतो पण बाहेर टाकण्याचे कार्य त्वचेमधील स्वेदवह स्रोतसावाटे होत असतें. स्वेद हा मेदाचा मळ आहे. मेदोवह स्रोतसांकडून तो बाह्य मार्गापर्यंत वाहून आणण्याचे कार्य व्यान करितो. त्या प्रमाणें तो त्वचेवाटे टाकण्याचे ही कार्य त्याचेच आहे. तिर्यग्गामी ज्या धमन्या आहेत त्यांच्या त्वचेंत असंख्य शाखा उपशाखा होतात.

तासां मुखानि रोमकूपप्रतिबद्धानि ।
यैः स्वेदं अभिवहन्ति ।

व या शाखा स्वेदवह स्रोतसांवाटें स्वेद बाहेर टाकतात. स्वेदवह स्रोतसांचा संकोच करून स्वेद बाहेर टाकण्याची क्रिया कमी करणें अथवा त्या स्रोतसांचा विकास घडवून स्वेद प्रवृत्ति करणें ह्या क्रिया शरिराच्या गरजेप्रमाणें व्यान वायूमार्फत घडत असतात.

रोमहर्ष–

अंगावर रोमांच उभे राहणें, अंगावर कांटा येणें या क्रिया रोम कूपाचे ठिकाणीं संबद्धित असणारा व्यान वायु घडवून आणतो. शीत वारा अथवा शीत स्पर्श यामुळें आपल्या अंगावर काटा येतो. शीत स्पर्श हा त्वग्गत प्राणवायूमुळें स्पर्शनेंद्रियद्वारा कळतो पण त्याची प्रतिक्रिया करण्याचें कार्य मात्र व्यानाला करावे लागते. थंडीच्या प्रतिकारार्थ तोंडाचा जवडा वाजतो. स्नायूंचे संकोच होतात. आक्षेप येतात. त्यानें अंगावर रोमांच उभे राहतात. हा सर्व प्रकार म्हणजे थंडीप्रतिरोधी व्यान व्यापार आहे.

अप्राकृतिक खर स्पर्शामुळें किंवा कर्कश आवाजानेही रोमांच उभे राहतात. तेथेंही असाच व्यान प्रकोप असतो. बाह्य वातावरण, ऋतुमान याप्रमाणें आपल्या शरिरांतही फेरबदल घडवून आणावे लागतात. हे फेरबदल व्यान वायूच्या व्यापारानें घडवून येतात. ऋतुमानाप्रमाणें, सकाळ दुपार सायंकाळ या दिवसांतील फरकांमुळेंहि आपल्या शरिरांत फेरबदल घडत असतात. व्यायामामुळें शाखेतील रसरक्तांचें गमन व्यानद्वारां अधिक होते. व त्यावेळीं अंतःकोष्ठातील रसरक्तांचा पुरवठा कमी होतो. याचे उलट अंतःकोष्ठांत ज्या वेळीं पचन व्यापार चालू असतात त्या वेळीं शाखेतील रक्ताचा तदाश्रयी पित्ताचा प्रवाह कमी करून त्याचा उपयोग अंतःमार्गाकडे –समानाचे व्यापाराचेकडे अधिक प्रमाणांत केला जातो. म्हणूनच पचन व्यवस्थित होते. असे दोषांचे धातूंचे गमागम एक सारखे घडत असतात व हे स्रोतसांचे संकोच-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विकास या शब्दांत बोलले जातात. पण हे घडवून आणण्याचे कार्य व्यानाचें असते. रस रक्ताप्रमाणें शुक्र हाहि एक धातु सर्व शरीर-व्यापी आहे व त्याचेही नियंत्रण हृदयस्थ व्यानाकडे थोडे फार येते. जनन हें शुक्राचें कार्य आहे. हे जनन कार्य दर एक सजीव परमाणूचे ठिकाणीं अव्याहत चालू आहे. दर एक क्षणाला हे सजीव परमाणू मृत होत मल म्हणून बाहेर पडत असतात व त्यांची जागा त्यांचे नवीन वारस घटक घेत असतात. त्यामुळें शरिरांत सारखी संतानपरंपरा चालू आहे. ती चाल-ण्यास रोज नित्य नवे घटक उत्पन्न व्हावे लागतात. हे जनन कार्य दर एक धातूमध्यें चालू आहे. हे कार्य शुक्रामुळे घडते. प्रत्येक धातूंत शुक्राची व्याप्ति आहे. हें अंतर्गत शुक्र स्वतःचे शरीर जिवंत राखते. तें राखण्यास शुक्रधातूचे गमागम एकसारखे चालू ठेवावें लागतात. त्यामुळे तो तो धातु गुणवान अथवा सारवान राहूं शकतो.

पुरुष देहामध्यें मुष्कांत शुक्र तयार होते व ते शुक्राशयांतून शुक्र वाहिन्यांचे द्वारा बस्तिद्वारांतून बाहेर पडते व त्यापासून अपत्य निर्माण होतें. शरिरांतून मुष्कद्वारा शुक्र बाहेर टाकण्याचे कार्य अपान वायु करितो. पण वृषणांत शुक्र निर्माण होण्यास शरीरस्थ अनेक घटकांना अथवा धातूंना भाग घ्यावा लागतो. हृदयस्थ ओज, शिरस्थ मज्जा धातू यांच्या बलावर शुक्रोत्पादनाची क्रिया अवलंबून असते. मज्जा धातूपासून सूक्ष्म व सार अंश शुक्रधातूचे पोषणार्थ यावे लागतात. मज्जेकडे मेद अस्थिकडून यावें लागतात. अशा रीतीनें सर्व शरीरस्थ घटकांचा वा धातूंचा बीजरूपानें अनुग्रह व्हावा लागतो म्हणजे मग वृषणाकडून बहिर्गामी गर्भोत्पादक शुक्र निर्माण होऊं शकते. हे त्या त्या धातूंचे सूक्ष्म अंश सर्व शरीरव्यापी शुक्रधरा कलेकडे पोचवावे लागतात. हे कार्य व्यानाचे आहे. इतर अवयवांची प्रेरणा होऊन त्यांचे प्रेरित बीज-घटक कमी अधिक प्रमाणांत संकोच वा विकास निर्माण करून व्यान वायु वाहून आणेल त्याप्रमाणें शुक्रोत्पादन घडते. बाह्य शुक्रस्खलन ही अपानाची क्रिया पण तो वेग थोप-वून धरला तर मग त्याचे परिणाम जसे अपानाचे प्रकोपांत घडतात तसे व्यानाचेहि प्रकोपांत घडतात. शरीरस्थ अंतर्यामी धातूमध्यें जे धातुघटक उत्पन्न अथवा जनन कर-ण्याचें शुक्रकार्य सर्व देहभर आहे तें मंदावते. शरीराची वाढ होत नाहीं. या प्रमाणें रस, रक्त, शुक्र, ओज व चेतना हे व्यानाच्या संबंधित धातु समजले जातात.

व्यान वायु व मन

हृदयाचे ठिकाणीं राहून सर्व शरीरांतर्गत पदार्थांना चालना अथवा गति देणें हें जसे व्यानाचे कार्य आहे त्याचप्रमाणें त्याच हृदयाश्रयी असणाऱ्या मनालाहि चालना देणें हें व्यानाचे कार्य आहे. मनाला एकदा गति मिळाली म्हणजे रजोगुण वाढला कीं मन स्थिर राहात नाहीं. ते एका विषयावरून दुसऱ्यावर, दुसऱ्याकडून तिसऱ्यावर एकसारखे उडया मारत राहते. त्याला स्थिरता लाभतच नाहीं. ही मनाची चंचलता व्यानाधीन सम-जली जाते. भीति, शोक, यांचे परिणाम मनावर होतात. तसेच हृदयावरहि होतात. हृदयाश्रयी व्यानव्यापारावरहि होतात. त्याच प्रमाणें शरिराचे परिणामहि मना-वर होतात. रसदौर्बल्याचा परिणाम, ओज, शुक्र, रक्त यांच्या दौर्बल्याचे परिणाम सर्व शरिरावर घडतात. विशेषत: ते हृदयावर घडतात. हृदयावर घडले कीं हृदयाश्रयी मनावरहि घडतात. ओजक्षय, शुक्रक्षय, रक्तक्षय यामुळें उन्माद, वेड, अपस्मार, मनोदौर्बल्य असे मनोरोगहि निर्माण होतात. ह्या मानसिक रोगांचे कारण कित्येक वेळां व्यान प्रकोप हे असते.

नित्योपयोगीं अर्कशाला औषधें

एग्युमिक्श्वर

कोणत्याहि ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, एग्यूमिक्श्वरचा उपयोग करणें हितावह आहे.
सर्दी, पडशामुळें यणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्वर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय द्राक्षासवाबाबत

मुंबई सरकारास अनावृत पत्र.

द्राक्षासव हा एक आयुर्वेदीय औषधी कल्प आहे. तो तयार करण्यांतील हेतु:–

मन:शरीराग्निबलप्रदानाम् ।
अस्वप्नशोकारुचिनाशनानाम् ॥
संहर्षणानाम् प्रवरासवानाम् ।
अशीतिरुक्ता चतुरुत्तरेषां ॥ च. सू. अ. १५

शारीरिक व्यापार बिघडले असतां ते शारीरिक इंद्रियांकडून सुधारून घेण्याची कल्पना आयुर्वेदांत प्रमुख मानली गेली आहे. त्यामुळें आयुर्वेदीय औषधांचें संयोजन शारीरेंद्रियांना सहाय्य देणारा कल्प निर्माण करण्याच्या हेतूनें घडत आलें आहे. त्यामुळे अशा औषधांचे स्वरूप नेहमीं सौम्यच रहाते. उत्तेजक औषधांना अवसादक प्रतिक्रिया असते. अशींहि औषधें आयुर्वेदांत आहेत. पण ती आणीबाणीचे प्रसंगींच वापरावयाची असतात. द्राक्षासव हा पदार्थ नेहमींच्या चिकित्सेंतील असल्यानें तो मादक, उत्तेजक अगर अवसादक यांपैकीं कोणत्याच सदरांत बसूं शकत नाहीं. सरकारचें धोरण अशा वर्गांतील द्रव्यास आळा घालण्याचें आहे तें आम्हांसहि संमत आहे. पण केवळ कोहल, अफू, चरस इत्यादि पदार्थ त्यांत आहेत म्हणून तो निर्बंधार्ह असें सर्वसामान्य धोरण ठेवून भागावयाचें नाहीं. कारण आयुर्वेदीय औषधी कल्प रचतांना या दोषिक द्रव्यांच्या अवगुणी स्वभावांचे परिमार्जन व्हावें, अशी उपाय योजना आधींच करून ठेवलेली असते, हें द्राक्षासवाची घडण लक्षांत घेतां सहज स्पष्ट होण्यासारखें आहे.

सर्वसामान्य जनतेस द्राक्षांचा परिचय म्हणजे तीं ओलीं अगर सुकी खातात. तो एक सुक्या मेव्यांतील पदार्थ आहे. अगर या पासून एक प्रकारची दारू होते, इतकाच. पण आयुर्वेदानें या पदार्थाचा उपयोग एवढाच पर्याप्त मानला नाहीं. त्यानें ज्वर, रक्तक्षय, शुक्रक्षय,-ओजक्षय, बलक्षय इ. दुस्तर रोगांत त्यास अत्यंत बहुमोल मानून त्याचे निरनिराळे कल्प बनवून ते रुग्णजनांना सादर केले.

द्राक्षाफलाचे गुणधर्मः–

१. तृष्णादाहज्वरश्वासरक्तपित्तक्षतक्षयान् ।
वातपित्तमुदावर्तं स्वरभेदं मदात्ययम् ॥
तिक्तास्यतामास्यशोषं कासं चाशुव्यपोहति ।
मृद्वीका बृंहणी वृष्या मधुरा स्निग्धशीतला ॥
च. सू. अ. २७, १२९–१६

२. तेषां द्राक्षा सरा स्वर्या मधुरा स्निग्धशीतला ।
रक्तपित्तज्वरश्वासतृष्णादाहक्षयापहा ॥
सू. अ. ४६।१९–३

द्राक्षा फलोत्तमा वृष्या चक्षुष्या सृष्टमूत्रविट् ।
स्वादुपाकरसा स्निग्धसकषाया हिमा गुरुः ॥
निहन्त्यनिलपित्तास्र तिक्तास्यत्वं मदात्ययान् ।
तृष्णाकासश्रमश्वासस्वरभेदक्षतक्षयान् ॥
अ. हृ. सू. ६/१९५।११६-२

आयुर्वेदाचे सर्वांत उत्तम आधारग्रंथांतील वर्णनांत एकवाक्यता आहे. यांत द्राक्षें मादक असतात असें कोठेंहि म्हटलेलें नाहीं. आयुर्वेदीय आसवकल्पांत सर्वांत श्रेष्ठ म्हणजे द्राक्षासव. त्या संबंधानेंच चरकाचार्यांनी फक्त "द्राक्षासवो दीपयति" एवढेंच म्हटलेलें आहे. आयुर्वेदेतर वर्गानें दारू हा पदार्थ पूर्वीच निर्माण केला असल्यानें, तो यांना उपद्रवी वाटल्यानें त्यांनीं निरुपद्रवी असा हा आसवविधी बसविला आणि त्यांतील मदाचे सर्व दोष टाळले, त्यामुळें दारूवर्ज्य अशा ठिकाणींहि आसवकल्प उपकारक ठरतो.

आधुनिक विज्ञानशास्त्राचे दृष्टीनें त्याकडे पाहिलें तरीहि हा कल्प अत्यंत अनपायी असल्याचें निदर्शनास येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसवांतील घटक व त्यांचे प्रयोजनः-

१. पाणी- Water.
२. कोहल- Alcohol.
३. अम्ल- Acid.
४. मधुरद्रव्य- Carboydrates.
५. औषधीसार- Vegetable Extracts.

प्रयोजनः-

१. पाणी हा सर्वांचा आधार (BASE) होय. व इतर सर्व पदार्थ पाण्यांत विद्रुत स्थितींत असतात म्हणून त्याला द्रावक (SOLVANT) म्हणतां येईल. हे पदार्थ पाण्यांत विरविल्यानें तें औषध सेवन करण्यास सोयीचें पडतें.

२. कोहल- ALCOHOL हा पदार्थ या द्रवांत आपोआप तयार होतो, म्हणून त्याला स्वयंभू अथवा SELF GENERATED म्हणतात. त्याचें प्रमाण जास्तीत जास्त ९ ते १०% असते. आसवांतील परिवर्तनांसंबंधानें 'Fermentation Comes to a natural end and when the Alcohol in the Fermenting liquids reaches a concentration of 12 to 14 P. C. असें म्हटलें असल्यानें, व "If higher concentrations are desired, these can only be obtained through the process of distillation" अधिकमानाबाबत असा विधि सांगितल्यानें व तो विधि करण्यास कायद्यांत बंदी घातली असल्यानें आसवांत कोहलचें मान अत्यंत परिमित असतें. कोहलनें औषधाचें वीर्य टिकते. व तें अधिक कार्यक्षम ठरतें. "Alcohol preserves the Asava & pontentises its properties" असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. आसवांत कोहल असते पण एकवार त्याचें मान मादकत्त्वाच्या दृष्टीनें अगदींच कमी आणि तेही पुन्हा पूर्ण सुरक्षित असते. उदा.-

"The presence of food of any kind in the digestive tracts lessens the rate of absorption (of alcohol) but, all foods do not do so to the same degree. Fats are greater deterrants than proteins or carbohydrates and milk is still more so."-

दुसरे कारण म्हणजे-

"Greater dilution of alcohol delays absorption"

अशा या कारणानीं आसवकल्प मादक पदार्थांमधून वगळलें जाणे आवश्यक आहे.

३. अम्ल- हें २% असतें. याचा उपयोग औषव पाचनाकडे होतो.

४. मधुर पदार्थ- याचा उपयोग पदार्थास गोडी आणणे व कोहल दोषांपासून प्राणी शारीरिक घटकांचें संरक्षण करणें.

५. औषधि सार- खरे कार्यकारी घटक हेंच. इतर कोणी त्यांचे संरक्षक तर कोणी वीर्यवर्धक अगर संवाहक होत.

आसवांतील घटक व त्यांचे प्रयोजन लक्षांत घेतां द्राक्षासवानें दारूची तलफ भागते म्हणणें शक्यच नाहीं. द्राक्षासवावर बंदी घातल्यानें तें चोरून करण्याची अगर पिण्याची प्रवृत्ति निर्माण झाली नाहीं, किंबहुना आजारांत उघड उघड विक्रीस ठेवलेलें द्राक्षासव घेणेचें माव कमीच झाले.

अशा स्थितींत द्राक्षासव बंदिस्त ठेवणें अगर त्यावर जादा कर बसविणें म्हणजे दोरीला साप समजून भुई थोपटणें होय, असें म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें होईल काय ?

आमचे माहितीप्रमाणें मनुकांचे काढ्यांत अल्कोहोल घालून तें एक उत्तेजक पेय कांहीं लोकांनी विकले व द्राक्षांपासून उत्तम दारू होते ती हीच अशा कांहीं विकृत गोष्टी सरकारचे कानीं घातल्यानें द्राक्षासवाबावत सरकारचें मन दूषित झालें असावें. पण आम्हांस असा विश्वास आहे कीं, द्राक्षासवाची प्रक्रिया व त्याचे स्वरूप यांतील शास्त्र लक्षांत घेतलें तर सरकारचा दृष्टीकोनही बदलण्यास फारसा उशीर लागणार नाहीं. तरी सरकारला आमची विनंती आहे कीं, सरकारनें द्राक्षासवाचे परीक्षण शास्त्रीय दृष्ट्या करावे व त्याकडे त्रयस्थ या नात्यानें पहावें व आपला निर्णय परत घ्यावा आणि आणि असंख्य रुग्णांचा दुवा घ्यावा.

कार्यालय, भुसावळ २०-८-५३

-निवेदक
वै. ब्रह्मदत्त शर्मा
मंत्री, महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ,
भुसावळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

The Late Mrs. Laxmibai Agashe.

(An humble tribute from an humble friend).

The news of the death of Mrs. Laxmibai Agashe came as a shock to all the citizens of Satara. Every one felt as if a very near and dear relative of his own has passed away. Her death has caused a void in the public life of this city which it may take many years to fill; and the enormity of loss caused to her family is beyond measure.

If one were to view in the retrospect the whole career of her private and public life in this city, one would find that she had worked wonders. We can very well imagine what her state of mind might have been when about thirty years ago, she had just entered the threshhold of her married life. As a grown up educated and intelligent girl, it was but natural that she must have some very definite views, some ideal, some dream as to what she was going to make of her life in future. And with this psychological background she found herself married to a widower – the only son of a distinguished lawyer, and had to take over the responsibility of three young step-children and an aged mother-in-law. Her husband also was a very strong-willed, intelligent and assertive person – with a markedly idealistic bent of mind. She had thus not only to enlist the sympathies of her step-children but to win their affection and at least the confidence if not the admiration of her mother-in-law. The structure of the family which she entered by her marriage was already complete. She had not only to fit in with, but also to reshape it suitably to her own and her husband's ideas of an ideal family.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

This was a sufficiently discouraging prospect. It would have been enough to crush the spirit of an ordinary woman. But she was made of a different stuff and that of a very high order. She had tact. She had a love of orderliness; she was devoted, she was generous, she was impartial and she had a vigilent and active matchfulness. She loved her children intensely, but she was by no means over-indulgent, so that while the children were warmly attached to her – they dared not disobey or displease her. By her selfless, impartial and generous behaviour towards her step-children she had won an abiding place in their hearts, and had thereby once for all silenced the malicious tongues of the evil spirits that had been busy in sowing the seeds of discontent and discord in the family. And by her devotion, service, submission and silent endurance during a long and glorious partnership with her husband, she has so far succeded in chastening his spirit and shaping his life that what might otherwise have been an eccentric, erratic,, untamed and unpopular personality, has been transformed into a very kind, generous, selfless and tenaciously devoted servant of the public. In short, she was responsible in no small measure in bringing to the surface all the nobler elements that were dormant and latent in her husband's character.

And yet she never allowed herself to be contented with her achievements as a successful housewife. She knew when to submit to avoid a clash. And in the early stages, such occasions must have been very many. But she was not slavish. It appears that she has had her own way, of expressing her disapproval in a soft, indirect and unagressive manner. And in the long run this must have proved effective. She had the foresight to realize that her views and her ideals had to be complementary to her husband's, so that they ought not to be allowed to clash. She therefore carved out for her-self quite a different sphere in the public life of this city and has won an

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

abiding place in the hearts of the citizens of this city. She was great, not as the wife of a great man but in her own right.

She believed in God but lacked the bigotry of the orthodox. She believed in social reform, and especially in the emancipation of women, but was never challenging or agressive in the expression of her views. She had her own moral code of conduct based as much on reason as on faith; and she had the necessary moral courage to act accordingly. She never indulged in idle gossip of the malicious Mrs. Grundys nor was she ever afraid of any public criticism that might be levelled against her. She had a very sensitive heart, so that she could genuinely weep in sympathy with those who suffered and could equally rejoice in the fortunes of others. She was altogether free from any tinge of malice. She was at once the friend, philosopher and guide of so many young girls and old ladies that had come in contact with her. In short the qualities of the head and heart had been so happpily blended and balanced in her, that it would be no exaggeration to say that in her we could find a clear illustration of the Aristotelian maxim viz. Virtue is mean. And now that she has passed away one is tempted to speak of her in the same terms in which Antony described Brootus-after the latter's death; " She was the noblest woman of all. Her life was gentle and the elements so mixed in her that Nature might stand up and say – This was a Woman ".

May her Soul rest in peace !

S. D. Limaye,
Satara.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

अनुभवसिध्द
अर्कशाला औषधें

युटोन
गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन
रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण
जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन
बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन
मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृध्दिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्र मित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, मालाड, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

आयुर्मीमांसा

नोव्हेंबर] [१९५३.

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

: कार्यकारी संपादक :
ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत........

धात्रीगैरिक	(अनुभविक योग)
मातृपदापूर्ती	दत्तात्रेयशास्त्री जळूकर
धात्रीलोह	म. बा. दीक्षित
अथ समानः ।	गो. आ. फडके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वार्षिक वर्गणी ३ रु.] [किरकोळ अंक ८ आणे.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नूतन वर्षाभिनंदन !

卐

यंदाची दिवाळी व नूतन वर्ष आयुर्मीमांसेचे ग्राहक, आ. वै. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व आ. प्र. मंडळीचे आश्रयदाते यांना सुखाचें व उत्कर्षाचें जावो.

卐

– संपादक
'' **आयुर्मीमांसा** ''

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

— आयुर्मीमांसा —

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १६वें] नोव्हेंबर १९५२. [अंक ८ वा.

वार्षिक वर्गणी	किरकोळ अंक
३ रुपये	८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणा-विषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्या-बद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महि-न्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व व्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा. अर्कशाला बिल्डिंग, सातारा.' या पत्त्यावरच करावा.

संपादकीय

आसवारिष्टांवरील अनावश्यक कर !

मुंबई सरकारनें आयुर्वेदीय प्रवाही औषधांना परदेशी दारूच्या वर्गांत समाविष्ट करून १९५२ सालच्या विक्रीकर कायद्याखालीं त्यांच्यावर रुपयास एक आणा याप्रमाणें खास विक्रीवर लादला असल्याची माहिती गेल्या अंकांत दिली होतीच. हा कर अन्याय्य म्हणूनच अनावश्यक आहे हें सांगण्याची वस्तुतः जरूरी असूं नये. आसवारिष्टें आणि काढे यांच्यामध्यें अल्कोहोल असतो खरा, पण तो पांच सात टक्क्यांहून अधिक नसतो व त्याची औषधांच्या टिकाऊपणासाठींच काय ती जरूरी असते. या औषधांत अनेक वनस्पतींचे औषधी अंश विरलेले असतात. त्यामुळें मुळांतच पांच सात टक्के म्हणजे अत्यल्प अल्कोहोल असलेल्या या औषधांचे कोणी मद येण्याच्या इच्छेनें वाजवी प्रमाणापेक्षा अधिक सेवन केल्यास त्याची प्रकृति मात्र विघडेल, मद निश्चित येणार नाहीं. सरकारनें ही माहिती प्रत्यक्ष प्रमाणांनीं पडताळून पाहावी अशी आमची विनंति आहे.

योध समितीचा निर्णय माना.

१९४९ सालीं मुंबई सरकारचा आसवारिष्टांच्या प्रक-रणीं असाच गैरसमज झाला होता. त्याहि वेळी चळव-ळीची यातायात करावी लागली (किंबहुना हल्ली कोण-ताहि व्यवसाय चालवावयाचा म्हणजे सरकारचे गैरसमज काय होतात इकडेच लक्ष देण्यांत आणि ते गैरसमज दूर करण्यांत अधिक शक्ति खर्च होते). पुढें डॉ. योध यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे हा प्रश्न सोपविला गेला. त्या समितीनें द्राक्षासवादि कांहीं औषधें खेरीज करून बाकीची सर्व आसवारिष्टें निर्बंधमुक्त ठरविलीं. ही माहिती त्यावेळच्या दि. १६ जून १९४९ गॅझेटमध्यें जाहीर झाली आहे. सरकारचें आम्ही त्या निर्णयाकडे लक्ष वेधूं इच्छितों. तो निर्णय लक्षांत घेऊन सरकारनें आसवरिष्टांना परदेशी दारूच्या यादींतून काढावें व त्यांवर कसलाहि खास कर लादूं नये.

देशी औषधांवर करच नको.

वास्तविक देशी औषधें ही विक्रीकरांतून सरसकट मुक्त करण्यांत आली पाहिजेत. गोरगरीब जनता या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधांचा मोठ्या प्रमाणांत उपयोग करते. जनतेच्या जीवनाशीं नित्य संबंध असलेल्या या एक प्रकारे जीवनावश्यक वस्तूवरील विक्रीकर माफच केला जावा. वैद्य मंडळींनी व जनतेतल्या जागृत व्यक्तींनीं या प्रकरणीं मुख्य मंत्री, आरोग्य मंत्री व अर्थमंत्री यांना पत्रें लिहून मुद्दाम आपलें मत कळवावे. आजच्या लोकशाहीच्या युगांत पुरेसे लोकमत व्यक्त झालें तर सरकार तें मान्य करते निदान सरकारनें या लोकमताला मान्यता दिली पाहिजे.

सुबुद्ध लोकमत

या प्रकरणीं आयुर्मीमांसेच्या विनंतीनुसार ज्या थोर गृहस्थांनीं आपली मतें स्पष्टपणें कळविलीं आहेत त्या पैकीं वैद्य जळूकरशास्त्री यांचे पत्र गेल्या अंकीं प्रकाशित केले होते. येथें दोन पत्रे प्रसिद्ध करीत आहोत.

डॉ. ए. लक्ष्मीपति बी. ए., एम्. बी. मद्रास

"Asawas and Arishtas are never used as intoxicants. They are used only for medicinal purpose. It is not right that any Government should put restrictions on their use by the Ayurvedic Physicians."

डॉ. आशुतोष मुजुमदार, दिल्ली

Dear sir,

I am in receipt of your letter dated 1st September 1953. I quite agree with the views expressed by you therein. It is down right जबरदस्ति on the part of Bombay Government to classify Asawas and Arishtas as liquors and intoxicants. There should be a regular and well organised propaganda against this unfortunate move of the Bombay Government which will cause a set back to the Ayurvedic Science.



Western India House, Poona

WILICO
STRONGHOLD OF PROTECTION

कंपनीच्या वाढत्या वैभवाचे
नवे भव्य व उत्तुंग प्रतीक
वेस्टर्न इंडिया हाऊस,
पुणें
उद्घाटन समारंभ
उपराष्ट्राध्यक्ष
डॉ. एस्. राधाकृष्णन्
यांचे हस्तें
दिनांक २७-१०-५३ रोजीं
करण्यांत आला आहे.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.
पुणें शाखा- लक्ष्मी रस्ता, पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक योग

—: धात्रीगैरिक :—

अत्यंत सुलभ पण उपयोगी असे कल्प कोणालाही आवडतात. अशाच एका कल्पाचा विचार आज करावयाचा आहे. हा कल्प चिपळूणचे वैद्य पटवर्धन फार वापरीत असत. हा कल्प अत्यंत सोपा आहे. तो म्हणजे सुवर्णगैरिकाला ताज्या व पक्व आवळचाच्या रसाच्या एकवीस भावना देऊन ठेवावयाच्या व ही धात्रीरसभावित गेरू वापरावयाची. हिच्या दोन दोन गुंजेच्या गोळचाही करून ठेवाव्यात व त्यापैकीं एक ते दोन गोळचा दर वेळी अनुपानपरत्वे वापराव्यात.

उपयोग–

हा योग अत्यंत पित्तशामक आहे. सर्व रोगांत ज्या वेळीं पित्ताचा उद्रेक असतो त्यावेळी ही गेरू वापरावी. विशेषतः पुढील व्याधींत हिचा चांगला उपयोग झाला आहे.

१) रक्तपित्त, रक्तस्राव–

रक्तगुल्माखेरीज योनी– शोथामुळे, गर्भाशयावाटे रक्तस्राव अधिक प्रमाणांत होत असतां, किंवा मासिक स्राव नेहमीपेक्षां जास्त जात असतां हा कल्प दर वेळीं आठ गुंजाप्रमाणें दर तासाला साखर पाण्याबरोबर द्यावा. सामान्यतः सहा तासांत स्राव कमी झालेला आढळून येतो. गर्भिणी अवस्थेंत पुष्पदर्शन असतांही हा उपयोगी पडतो. मूळव्याधींतून रक्तस्राव होत असतां किंवा गुदावाटे अन्य कारणांनीं रक्तस्राव होत असतांही हा कल्प चांगला उपयोगी पडलेला आहे. मूत्रमार्गातून रक्तस्राव होत असतां तो थांबविण्यासही हा योग चांगला उपयोगी पडतो.

२) शूल–परिणाम शूल–

जेवल्यानंतर तीन चार तासानें "पोट दुखणें" ही व्यथा असतां हा योग उपयोगी पडतो. विशेषतः या शूलांत दाह, आग, जळजळ, तृषा ही पित्तप्रधान लक्षणें मात्र बरोबर असावीत. या साठीं हा कल्प दिवसांतून दोन वेळां जेवण्यापूर्वी दोन तीन तास म्हणजे सकाळ सायंकाळ वापरावा. प्रमाण चार ते सहा गुंजा दर वेळीं ठेवावें व अनुपान तूप मध हें असावें. परिणाम शूल यानें थांबतो.

३) झोंप येण्यास–

झोंप येण्यासही या गोळचांचा चांगला उपयोग होतो. अतिश्रम, दगदग यामुळे निद्रा नाश असतां रात्रीं झोंपतांना चार गुंजा प्रमाणांत ही गुटी दूध साखरेबरोबर घेण्यास द्यावी. बहुधा यानें रोग्यास झोंप येते.

संतत ज्वरांत, किंवा आंत्रपाकी ज्वरांत रोग्यास निद्रा येत नाहीं अशी तक्रार असतां दोन गुंजेची एक गोळी स्वप्नकाळीं साखर पाण्यांतून दिली तर झोंप लागते असें प्रायः आढळून येते.

स्वापजनक औषधें विविध तऱ्हेची असतात. ती विविध अवस्थेंत वापरावी लागतात. मेंदूचा शिणवठा कमी करून त्याला विश्रांति देणें व परत तो ताजातवाना ठेवणें ही दोनीहि कार्यें हा धात्रीगैरिकयोग करीत असतो. शामक पण त्याबरोबर बल न देणारे असेच स्वापजनक योग अफूसारखे–असतात. पण हा शामक व बल्य योग आहे. जखम झाली आहे, व ती दुखत आहे; कान दुखी उठली आहे, दाढ अत्यंत ठणकत आहे, व अशा कारणामुळे तीव्र वेदना व त्यामुळे निद्रानाश असतां हा कल्प उपयोगी पडणार नाहीं. किंवा आम वातांत सांधे दुखी तीव्र स्वरूपाची असतानांही हा उपयोगी पडत नाहीं. ज्वर हे कारण आहे, व त्यांत निद्रानाश असतां बरी झोंप येते. कित्येक वेळा रात्री "आपणांला झोंपेची गोळी दिली आहे ती झोंपतांना घ्या" ही सूचना या गोळीवर जी दिलेली असते तीही कदाचित् उपयोगी पडत असेल. रोगी धावतो-बडबडतो आहे व भ्रमप्रलाप ही वाताची लक्षणें आहेत तेव्हां या कल्पाचा तात्कालिक उपयोग कांहींही नाहीं प्राकृतिक माणसांना रात्रीं एक एक गोळी दिली तर ही माणसे अधिक काळ–प्रमाणांत व गाढ निद्रा अनुभवतात असेंही नाहीं. केवळ पित्त प्रकोपामुळे निद्रा येत नसेल तर त्याचा शम करून याचा उपयोग होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४) तीव्र ज्वर–

वेग आटोक्यांत ठेवण्यास ही गैरिक उपयोगी पडते. संतत किंवा विषमज्वरांत ज्वरवेग भरला कीं त्यावर कांहीं उपाय नसतो. कित्येक रोग्यांना तापाचा त्रास मात्र जास्त वाटत असतो. ताप वाढला कीं छातींत गच्च होते, धडधडते, ओकाऱ्या होतात, डोकें दुखते, पित्त वाढते अशा वेळीं ज्वरावेग आटोक्यांत ठेवणारे हें औषध आहे. तापाचे उपद्रव यानें रोग्यास होत नाहींत. असें शांतता राखणारें हें औषध आहे.

ओकारी, पित्त पडणें, जुलाब दाह, जळजळ यांत उपयोगी पडतो. पित्तवाढीचा परिणाम म्हणून आंवट, कडवट पित्त घशाशीं येणें, छातींत जळजळणें ह्या अवस्थेंत हिचा उपयोग होतोच पण या जुनाट अवस्थें-पेक्षा तीव्र अवस्थेंतहीं ह्या योगाचा उपयोग पाहण्या-सारखा आहे. असात्म्य अन्न सेवनाचा परिणाम म्हणून, किंवा, मलावष्टंभ, जागरण, शरदऋतु यामुळें कोठयांत पित्त वाढून आमाशय व ग्रहणी यांचा क्षोभ होत असतो. त्यामुळें पित्ताच्या उलटया व जुलाब सुरू होतात; चक्कर येतें, ताप येतो, डोकें दुखतें, हीं लक्षणें होतात; अशा अवस्थेंत मोरावळा अथवा दाडिम पाकांतून ही गुटी दिली असतां पित्ताचा उद्रेक कमी होऊन अन्तकोष्ठाचे उपशमन व उपलेपन होते. व ही पित्ताचीं लक्षणें लवकर कमी होतात. अजीर्ण, विषूचिका यांत कफ वाताची लक्षणें असतां तीक्ष्ण रसोनकल्प, भल्लातक कल्प वापरावे लागतात. त्या ठिकाणीं धात्रीगैरिक हा कल्प उपयोगी पडणारा नाहीं.

५) अंगावर पित्त उठणें– गांधी उठणें–

उदर्द, शीतपित्त कोठ यांत धात्री गैरिक कल्प चांगला उपयोगी पडतो. लहान मुलें अथवा तरुण माणसें यांना वारंवार पित्त उठण्याची संवय असते. मिनिटांत सर्व अंगावर लाल लाल चकंदळे उटतात. प्रथम एका स्थानीं उठून त्यावर खाज सुटते व हात पाय मांडया, पोट, पाठ, कपाळ सर्वांगावर लाल रंगाची सूज येते. गांधी उठतात. याला प्राय: कारण मलावष्टंभ हें असते. किंवा खाण्यापिण्यांत बदल होणें, दहि, मत्स्य असे पित्तकारक वा विरुद्ध पदार्थ पोटांत जाणें असेहि कारण असते. अशा ठिकाणीं मळमळ हें लक्षण असता मीठ गरम पाणी पाजून रोग्याला प्रथम ओकवावे व त्यानंतर पुढें चार पांच दिवस हा धात्री कल्प द्यावा. बहुधा तिसरे दिवशीं अंगावरील पित्त मावळते. यासाठीं दर वेळीं दोन गुंजा हे औषध साखर पाण्याबरोबर दिवसांतून तीन वेळां द्यावें.

६) वीर्य, दोष, स्वप्नावस्था–

स्वप्नांत रेतस्खलन होणें, या पुरुषांच्या तक्रारीवर धात्री योग एक उत्तम औषध आहे. एकदोन दिवसांनी किंवा दर आठवडयांत स्वप्नावस्था होऊन कित्येक तरुण बेजार झालेले असतात. त्यामुळे त्यांचे सर्वांग दुखते, डोक्यांत हलकेपणा वाटतो. हातापायांची जळजळ होते. अंग रसरसते, लघ्वीला कडक होते अशा त्या बरोबर अनेक तक्रारी असतात. त्या सर्व तक्रारी या धात्री कल्पानें पुष्कळ लोकांच्या बऱ्या झाल्या आहेत. स्वप्नावस्थेचे कित्येक वेळां कारण मलावष्टंभ हें असतें. किंवा ज्यावेळीं मलाशयांत उत्तर गुदांत पुरीष येतो, व त्याच्या पुढील भागांतील मूत्राशय हा मूत्रानें भरलेला असतो, त्यावेळी प्राय: स्वप्नावस्था होते. मूत्राशयांतील मूत्राचा दाब पुढून पडतो, व खालून पक्काशयस्थ मलाचा दाब शुक्राशयावर पडतो. त्यामुळे शुक्राशयांतील शुक्राला बाहेर पडल्याखेरीज गत्यंतरच नसते. यासाठीं स्वप्नावस्था टाळावयाची असल्यास मनानें ब्रह्मचर्याची जशी जरूरी आहे तशीच मलमूत्र-अवरोध टाळण्याचीहि जरूरी आहे. हा मल मूत्र संचय एकाच वेळीं प्राय: पहाटेच्या वेळीं होत असतो, व या काळीं प्राय: स्वप्नावस्था होत असते. यासाठीं वीर्य व आयुष्य रक्षण करण्यासाठीं ब्राह्म मुहूर्तावर सूर्योदयापूर्वी म्हणजे पहाटे उठण्याची संवय लागणें आवश्यक असते. कित्येकांना रात्रीं दूध दही, गूळ असे अभिष्यंदी पदार्थ पोटांत गेल्यामुळें स्वप्नावस्था होत असते. कित्येक वेळां उपवास, श्रम, दगदग अधिक काळ पडणें, शारीरिक व मानसिक त्रास होणें यामुळें ही हा त्रास होत असतो. यासाठीं स्वप्नावस्थेचें कोणते कारण आहे तें नीट शोधून काढून प्रथम दूर करावें लागते. त्यांत वृषण, शुक्राशय यांचा क्षोभ होऊन अथवा दौर्बल्य आल्यामुळे त्यांची धारणाशक्ति मंदावल्यानें शुक्रस्राव होत असेल व त्यांत पित्ताची लक्षणें असतील तर धात्री कल्प अथवा केवळ धात्री चूर्णही उपयोगी पडते. धात्री वाताला शामक व शुक्रस्थानाचीं बल धारणा वाढविणारे एक बऱ्यापैकीं औषध आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[ऑगस्ट अंकावरून पुढें चालूं]

मातृपदापूर्वी

लें०— वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

(५)

प्रसूति व नंतरचे दहा दिवस,

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें योग्य प्रकारच्या आहार विहार व उपचारांच्या दक्षतेमुळें गर्भिणीच्या गर्भाचें यथायोग्य पोषण व संवर्घन झाल्यानंतरचा काळ म्हणजे प्रसूतीचा काळ होय. सर्वसामान्यतया ९ महिने ९ दिवस पूर्ण होऊन २८० वा दिवस हा योग्य प्रसूती दिन मानला आहे. तथापि या कालगणनेंत चूकहि होण्याचा संभव असतो. अर्थातच गर्भसंभवाच्या निश्चित दिवसापासून २८० व्या दिवसाच्या १०।१२ दिवस मागेपुढें हा काळ समजण्यास अडचण नाहीं. शास्त्रकारांनीं या दिवसांच्या गणनेपेक्षांहि प्रसूतिसमय जवळ आला हें ओळखण्याचीं चिन्हेंच सांगितलीं असल्यानें

"जाते हि शिथिले कुक्षौ मुक्ते हृदयबंधने।"
"सशूले जघने नारी ज्ञेया सा तु प्रजायिनी॥
सुश्रुत

म्हणजे गर्भवृद्धीनें वाढलेलें पोट कुशींच्या बाजूंनीं उतरल्यासारखें वाटून, गर्भ व गर्भिणीचा अनुबंध राखणारी हृदयनाडी (नाळ) सुटून पोटाकडून ओटींत व मांड्यांत कळा सुरूं झाल्याचें पाहून प्रसव समयाचें निश्चित अनुमान करून तयारीस लागतां येतें.

तयारीचे दृष्टीनें सूतिकेसाठीं म्हणजेच बाळंतिणीकरतां खोली कशी असावी, बाळंतपणासाठीं आवश्यक साधन सामुग्री कोणती असावी इ. बद्दल सविस्तर वर्णनहि आयुर्वेदीय ग्रंथांत आहे. तें वाचलें म्हणजे हवा, उजेड, स्वच्छतेच्या दृष्टीनें त्यांत किती दक्षता घेतली आहे हें सहज दिसून येईलच. विस्तारभयास्तव तें वर्णन येथें न देणेंच बरें वाटतें. अशा त्या सूतिकागारांत बाळंत होण्यासाठीं गर्भिणींचा प्रवेश झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रसूती चिन्हें सुरूं होण्याची वाट पहावयाची असते.

"उपस्थित प्रसवायाः कटिपृष्ठं प्रति समन्ताद्वेदना भवत्यभीक्ष्णं, पुरीषप्रवृत्तिः मूत्रं प्रसिच्यते योनिमुखात् श्लेष्मा च॥ सु. शा. १०॥

वेदना, शूळ किंवा ज्यांना वेणा म्हणतात त्या सुरूं होणें, योनिमार्गांतून रक्तयुक्त चिकट पदार्थ (श्लेष्मा) स्रवूं लागणें, वारंवार मलमूत्रप्रवृत्ति होणें व गर्भोदक प्रसेक हें चरकाचार्यांनीं वर्णिलेलें महत्त्वाचें लक्षण-अशा सर्व चिन्हांवरून प्रसूती क्रिया प्रत्यक्ष सुरूं झाल्याचें अनुमान करतां येतें. प्रसूति म्हणजे बाळंतपणांत मुख्य तीन गोष्टी व्हावयाच्या असतात. १ गर्भाशय विस्तृत होऊन गर्भ बाहेर पडण्याच्या मार्गास लागणें २ बालकाचा जन्म आणि ३ अपरा पतन म्हणजे वार पडणें. ह्या तीन गोष्टी व्यवस्थित घडून प्रसूती कार्य समाप्त होतें. या प्रसंगीं गर्भिणीच्या सर्वांगाला तैल लावून कोमट पाण्यानें स्नान घालावें. अंगाला व योनिमार्गालाहि स्नेह लावावा. व पुढें प्रसूतीचे कष्ट करण्याचे श्रम सहन व्हावेत म्हणून तूप घालून पेज पाजावी. नंतर मृदु शय्येवर गुढघे उभे ठेवून निजवावे. या वेळीं होणारा स्राव जर बुळबुळित व गुळवेलीच्या स्वरसाप्रमाणें पांढरट असला तर पुत्र जन्मणार व तांबूस स्राव असला तर कन्याजन्म होणार असें अनुमान करतां येतें. भूर्जपत्र, वेखंड, गुग्गूळ, वेलची यांचें चूर्ण वरचेवर हुंगण्यास देणें, किंवा यांचा धूर करणें हा एक कष्टावांचून शीघ्रप्रसव होण्याचा उपाय आहे. तसेंच या वेळीं वारंवार वरगड्या, कमर, पाठ व योनिमार्ग या ठिकाणीं कोमट स्नेह लावावा यानें वायु अनुलोम होतो; गर्भ गर्भिणीचें हृदय व उदरप्रदेशांतून बस्तिप्रदेशांत येतो व अधोमुख होतो; व वेणा वेगानें येऊं लागतात. यावेळीं सुईण किंवा परिचारिकेनें गर्भिणीचें नितंब, व पायांवर हळुं हळूं थोपटावें व कुंथण्यास सांगावें. वेणा नसतांना मात्र मुद्दाम कुंथवूं नये. गर्भिणीस प्रसववेदना न जाणवाव्यात म्हणून तिचें मन प्रसन्न राखण्याजोग्या गोष्टी, मुलगाच होण्याचीं लक्षणें दिसतात इ. बोलून कराव्यात; व वेणा आली कीं कुंथण्यास सांगावें अशा प्रकारें उत्तम तऱ्हेनें प्रसूति होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या नंतर एका सेविकेनें बालकाची व एकीनें बाळंतिणीची व्यवस्था करावी. यानंतरची मुख्य गोष्ट अपरापतन किंवा वार बाहेर येणें ही असते. उजव्या हातानें बाळंतिणीच्या नाभीच्या वर उराकडे व डाव्या हातानें पाठीकडून असें दोन्ही बाजूनें सावकाश दाबून चोळावें म्हणजे वार बाहेर पडण्यासाठीं गर्भाशयाला गति मिळते व इष्ट कार्य सुकर होतें. पण तसें न झाल्यास कडूभोपळा, बेल व सापाची कात यांची धुरी द्यावी म्हणजे योनीचें उद्वेजन होऊन वार चटकन् बाहेर येते. वार कोणत्याहि उपायानें बाहेर नच आली तर हाताला तेल लावून गर्भनाडीचे अनुरोधानें योनींतून गर्भाशयांत हात घालून हळूंहळूं वार सोडवून बाहेर काढावी. गर्भनाडीनें ओढून वार कधींहि बाहेर काढूं नये. ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

बाळंतिणीची चिकित्सा

बाळंत झाल्यानंतर स्त्रीला खूपच ग्लानि येत असते. यासाठीं सुइणीनें जलसिंचन करून व गोड बोलून तिला धीर द्यावा, समाधान करावें. श्रमानें वाढलेला वात शमून थकवा नाहींसा व्हावा व वेदना शांत व्हाव्या यासाठीं बाळंतिणीच्या सर्वांगाला बला तैल किंवा लाक्षादि अथवा नारायण तैल लावावें.

पट्टबंधन

गरोदरपणीं गर्भाशयांत गर्भ असतो. तो आतां निघून गेल्यामुळें गर्भाशय व त्याचीं स्रोतसें रिकामी व शिथिल होतात. अर्थातच रिकाम्या जागेंत शिरण्याचा वायूचा स्वभाव येथेंहि लक्षांत घेऊन बाळंतिणीच्या पोटावर तेल अथवा तूप सावकाश चोळून कापडाचा जाड पट्टा बांधावा. म्हणजे गर्भाशयस्थ दोषांचा स्राव होऊन उदर मूळच्या स्थितींत आकसतें.

बाळंतपणासंबंधीं प्रत्यक्ष प्रसूती समयीं स्वच्छता व इतर कोणतीहि दक्षता घेण्यांत यत्किंचितहि चूक – मग ती सुइणीची असो, बाळंतिणीची असो किंवा अन्य कुणाचीहि असो– महाभयंकर, कष्टसाध्य किंवा असाध्य विकाराला कारण होत असल्यानें नीट बारकाईनें सर्व गोष्टी पाहून कांहीं दोष आढळल्यास तावडतोब त्यावर उपचार करावेत.

बाळंतिणीचे पहिले १० दिवस.

वातनाशक सर्व उपचार हे बाळंतिणीच्या आहार विहार व औषधांतील तत्त्व सर्वत्र लक्षांत ठेवावयाचें असतें. या दृष्टीनें बला तैल, नारायण तैल, किंवा नुसतें शुद्ध तिल तैल हरिद्रायुक्त ऊन करून आंगास रोज मर्दन करावें, वातनाशक काढा द्यावा. पिंपळी, पिंपळीमूळ, गजपिंपळी, चित्रक, व आलें यांचें मिश्रण गुळांतून ऊष्णोदकाशीं पाजावें. सामान्यतः २।३ दिवसपर्यंत गर्भाशयांतून दुष्ट रक्त वाहात असेतों हें द्यावें व नंतरचे ३ दिवस भुइकोहळा, आस्कंदयुक्त कण्हेरी तूप घालून शक्तिसाठीं अग्निबल पाहून पाजावी. मागें वर्णन केलेली जीवनीय गणांतील औषधांनीं सिद्ध केलेली कण्हेरी किंवा दूध अथवा अन्न द्यावें व नंतर २।३ दिवस उत्तम साळीचा भात, जव, बोरें, कुळीथ यांचे कढणाशीं किंवा जांगलप्राण्यांच्या मांसरसाशीं द्यावा. अंगाला वातशामक व सुगंधि (चंदन, वाळा, कापूर, कचोरा, नागर मोथे, हळद इ.) द्रव्यांचीं उटणें लावावीं. शक्य तर वातशामक अशा दशमूलादि द्रव्यांचा काढा करून त्यांत कमरेइतके पसरावें. पाठ, कमर शेकावी. कोष्ठ कोरांजन, अगरू, गुग्गूळ, ओवा इ. द्रव्यांची धुरी द्यावी. म्हणजे वायुशमन पावून स्वस्थानीं येतो.

या पहिल्या दहा बारा दिवसांत जड पदार्थ बाळंतिणीला देऊं नये. मांसाहारहि करूं नये. तर तो क्रमशः अग्निबल पाहून वाढवावा. या दृष्टीनें 'पथ्याचें' म्हणून सरसकट तुपाचा शिरा इ. बाळंतपणांत प्रारंभीच्या दहा दिवसांत देण्याची प्रथा कितपत श्रेयस्कर ठरते हा प्रश्नच आहे. अलीकडच्या काळीं तरी हा देतांना बाळंतिणीची प्रकृति, पचनशक्ति यांचा विचार अवश्य केला पाहिजे. व पचन शक्ति तीव्र नसेल तर 'पथ्याचे' म्हणून शिरा वगैरे न देतां तांदळाची कण्हेरी तूप घालून किंवा साबुदाणा इ. देणेंच श्रेयस्कर होय. शिवाय हा आहार देतांना हवामान व देशकाल इ. सुद्धां विचारांत घेऊनच योग्य तो सात्म्य आहार दिला पाहिजे. नाहीं तर कोंकणांतील बाळंतिणीला गव्हाचें जडान्न व उत्तर हिंदुस्थानी स्त्रीला भाताची कण्हेरी दिली जायची.

बाळंत स्त्रीच्या गर्भाशयांतून कांहीं दिवसपर्यंत स्राव जात असतो. पहिल्या दिवशीं तांबडा, नंतर तांबडा पण द्रव, तिसरे दिवसापासून तपकिरी रंगावर व सातवे दिवसाचे सुमारास पिवळा हिरवट व नंतर पुढें धूसर पांढरा असा त्याचा रंग होत जातो. प्रसूतीनंतर उत्तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बस्तीनें गर्भाशय स्वच्छ केल्यास हा स्राव कमी जातो. परंतु जर सुइणीचे चुकीनें किंवा अस्वच्छतेमुळें कांहीं, विषार गर्भाशयांत राहून गेला तर हा स्राव बंद पडतो, किंवा त्याला घाण येऊं लागते. व त्यामुळें बाळंतिणीला पुढें ज्वर वगैरे उपद्रव होतात.

बाळंतिणीची निगा राखतांना ३ गोष्टींकडे लक्ष द्यावें. (१) स्वच्छता राखून जंतूंचा उपसर्ग न होऊं देणें. (२) पूर्ण विश्रांति (३) दुग्धोत्पत्ति.

बाळंतिणीला वापरावयास द्यावयाचा पट्टा व इतर फडकीं घाणेरडीं नसावींत. योनिप्रदेशावर जी घडी ठेवतात तीहि स्वच्छ व जंतुघ्न औषधांची धुरी देऊन वापरावी व बस्ति देऊन गर्भाशय स्वच्छ ठेवावा. योनिमार्गांत जखम वगैरे सुइणीच्या नखांनीं वगैरे झाली आहे कीं काय ही खात्री करून घ्यावी. असेल तर तात्काळ योग्य ती चिकित्सा करावी.

२. संपूर्ण विश्रांति ही केवळ शारीरिकच नव्हे तर "क्रोधायास मैथुनादीन् परिहरेत्" म्हणजे राग, शोक इ. मानसिक विकारांचे बाबतींतहि संभाळलें पाहिजे. विश्रांतीचा अर्थ अगदीं अंथरुणावर पडूनच राहावयाचें असा नसून गर्भाशयावर व शरीरशक्तीवर ताण पडेल असे श्रम नसावेत एवढाच याचा अर्थ आहे. दुसरे तिसरे दिवशीं बाळंतिणीनें शक्य तर कांहीं वेळ बसून काढावा; म्हणजे विटाळ वाहून जाण्यास मदत होते.

३. प्रसूतीनंतर तिसरे किंवा चवथे दिवशीं बाळंतिणीला दूध येतें. आरंभीं सांगितलेंच आहे कीं, स्त्रीच्या आयुष्याची पूर्ति अपत्य प्राप्तींत होते व अपत्यानें स्तनपानानिमित्त ओठांचा स्पर्श स्तनाला केला कीं मातेला स्वर्गतुल्य आनंद होतो व या चित्तप्रसन्नतेनें स्तनगत शिरांचा अधिक विकास होऊन तिचें दूध धाराप्रवाहानें वाहूं लागतें. मातेचा रसधातु गर्भावस्थेंतच गर्भाला सात्म्य झालेला असतो. अर्थातच त्याच रसधातू पासून निर्माण होणारें आईचें दूध हें बाळाला सात्म्य असल्यास काय आश्चर्य ? व म्हणूनच 'मातुरेव पिबेत् स्तन्यम्' म्हणजे बालकाला आईचेंच दूध पाजावें अशी शास्त्राज्ञा आहे.

या प्रमाणें या तीनहि गोष्टींकडे बाळंतिणीचे बाबतींत लक्ष दिलें पाहिजे.

गर्भावस्थेप्रमाणें प्रसूती अवस्थेंतील विशेषतः पहिल्या दहा दिवसांतच ह्या सर्व गोष्टींचें ज्ञान अवश्य असल्यानें बाळ बाळंतीण दोघांच्याहि स्वास्थ्याचे दृष्टीनें बाळंतिणीचा आहार-विहार कसा ठेवावा हें तर सांगितलेंच पण आतां त्यानंतरहि बाळंतिणीस कोणताहि विकार होऊं नये, बालकाच्या पोषणासाठीं भरपूर दूध व तेंहि निर्दोष यावें यासाठीं औषधोपचारांचें दिग्दर्शन केल्यावांचून हें प्रकरण समाप्त होऊं शकत नाहीं. म्हणून आतां तिकडेच वळूं–

१. बाळंत रोगांचें भय न उरण्याकरितां–

बाळंत लिंबाच्या (कडूनिंबाचा) पंचांगाचा काढा किंवा घन सत्त्व पहिल्या १० दिवसांत रोज द्यावें.

२. बाळंत झाल्यावर गर्भाशय पूर्वस्थितींत येण्यास–

१ निर्गुंडीच्या पानांचा शेक द्यावा. २ सागरगोटा भाजून त्याच्या गिराचें चूर्ण तुपांतून द्यावें.

३. योनिव्रणास–

पळसपापडी व उंबराचीं फळें वाटून तिळ तैलांत त्यांचा योनीस आंतून लेप द्यावा.

४. बाळंतिणीस आंचके आल्यास–

कापूर २ गुं. टंकण २ गुं. किंवा ओव्याचा अर्क द्यावा डोक्यावर थंड पाण्याची पट्टी नवसागरयुक्त ठेवावी.

५. दहा दिवसांतील उपचार–

(१) रोज १ मासा केशर मधांत द्यावें. म्हणजे कोणताहि उपद्रव होत नाहीं. (२) प्रथम ३ दि. नंतर भुईकोहळा, एरंडमूळ, मेढशिंगी, पुनर्नवा, देवदार, कुहिली, दशमुळें, उपळसरी, लाजाळू यांच्या काढ्यांत कण्हेरी तयार करून द्यावी. (३) दशमूळ क्वाथ किंवा देवदार्व्यादि क्वाथ द्यावा. (४) वावडिंग, ओवा, धायटी फुलें, लसणीचा कोंडा, आंबेहळद, बाळंत निंबाचा पाला, यांची सांजसकाळ बाजेखालीं धुरी द्यावी.

६. स्तनाच्या दुःखास–

तंबाखूची राख जुन्या गुळांत कालवून लेप द्यावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. दूध शुद्ध होण्यास–

पहाडमूळ, किराईत, गुळवेल, देवदार, मोरवेल, सुंठ, इंद्रजव, उपळरी, तगर, कुटकी यांचा काढा–निकाढा द्यावा.

८. दूध येण्यासाठीं–

(१) शतावरीच्या मुळयांचा रस गाईच्या किंवा शेळीच्या दुधांतून प्यांवा (२) कोष्ठ, आस्कंद, गर्जपिपळी वेखंड पाण्यांत उगाळून स्तनांस लेप दिल्यानेंहि दूध सुटतें. (३) आळवाची भाजी नित्य खावी म्हणजेहि दूध येतें. (४) आस्कंद, भुइकोहळा, ज्येष्टमध यांचा काढा गाईच्या दुधांतून प्यावा म्हणजे दूध येतें.

या सर्वंहि औषधांचें तात्पर्य एकच लक्षांत ठेवावयाचें म्हणजे वातनाशक, शामक, रक्तप्रसादक, गर्भाशय-संकोचक, अग्निदीपक, पाचक मूत्रल, शोथनाशक अशाच स्वरूपाचे हे सर्व उपचार असणें इष्ट आहे. त्या दृष्टीनें गेल्या प्रकरणांतहि उंबराचीं फुलें, आस्कंद, शतावरी, अशोक, काटेमाठ, इंद्रजव, धायटीचीं फुलें इ. औषधांचा उल्लेख केला आहे तो तारतम्य भावानें व तज्ज्ञांचे विचारें उपयोगामध्यें आणण्यास हरकत नाहीं.

एवंच आयुष्यांतील अति महत्त्वाचा एक प्रसंग जें 'मातृपद' तें प्राप्त होऊन यशस्वी होण्याचे दृष्टीनें प्रत्येक स्त्रीला उपयुक्त अशी माहिति ह्या पांच प्रकरणांतून फारसा विस्तार न करतां दिली आहे. आशा आहे कीं, 'मातृपदा' वर आरुढ होण्यापूर्वी ही पुस्तिका प्रत्येक तरुण स्त्रीनेंच काय पण तिच्या पतीनेंहि लक्षपूर्वक वाचल्यास उभयतांनाहि उपयुक्त ठरेल!

॥ इति शम् ॥

कास्फोच्या मदतीनें तो आपण सहज दूर करूं शकतां.

★ कास्फो हा खोकला, सर्दी, घशाची खवखव, ब्रान्कायटिस इ० विकारांवर खात्रीशीर उपाय आहे.

★ कास्फो वड्या चवदार असून गुणकारी आहेत.

★ १२ गोळ्यांच्या टयूबला ७ आणे, ३५ गोळ्या १ रु., ९५ गोळ्या १॥ रु. ह्या भावानें सर्व केमिस्टांकडे कास्फो मिळूं शकतो.

कास्फो

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.

EVEREST

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धात्री लोह

(रक्तचंडांशु–पित्तविकार)

लेः– म. बा. दीक्षित आयुर्वेदाचार्य.

लोहाचा औषध म्हणून उपयोग फार प्राचीन काळापासून केला जात आहे. पारद, गंधक इत्यादि रसायन चिकित्सा व्यवहारांत येण्याच्या पूर्वकालीं सुद्धां लोहाचे अनेक औषधीकल्प वापरले जात होते. आज उपलब्ध असलेल्या ग्रंथांत सर्वांत प्राचीन असलेल्या चरक संहितेंतही नवायस चूर्ण, मंडूर घटक इत्यादि अनेक लोहकल्प सांगितले आहेत. प्राचीन काळापासून असलेलें लोहाचें हें औषधांतील महत्व आजही यत्किंचित् कमी झालेलें नाहीं. उलट आयुर्वेदाप्रमाणें इतर चिकित्सा-पद्धतीतही लोहाचे उपयुक्त कल्प नवीन नवीन तयार होत आहे.

कारणें

लोहभस्माचें किंवा कोणत्याही लोहकल्पाचें एवढें महत्त्व असण्याचें कारण उघड आहे. शरीरांतील सर्व धातूंना योग्य प्रमाणांत योग्य तें द्रव्य योग्य वेळी पोचविण्याचें काम रक्ताकडून केलें जातें; म्हणून रक्त हें शरीराचें जीवन आहे. 'रक्तं जीव इति स्थितिः' असें शास्त्रवचन आहे. प्रत्येक धातूचें श्रेष्ठ कार्य सांगत असतांना वाग्भटांनी रक्ताचें जीवन म्हणजे प्राणधारण हें मुख्य कार्य सांगितलें आहे. पण अशा तऱ्हेनें शरीराचा असा महत्वाचा घटक असलेलें हें रक्त जर सकस आणि निरोगी असेल तरच त्याचें कार्य योग्य रीतीनें होईल.

रक्तांतील तांबडे कण कमी झाले म्हणजे वा त्यांतील लोहघटक कमी झाले म्हणजे त्वचेला फिकटपणा किंवा पांडुता येते; यालाच पांडुरोग असें म्हणतात. याला पुष्कळ कारणें आहेत. संग्रहणींत किंवा पुष्कळ दिवस टिकून राहणाऱ्या अतिसारांत अन्नाचें सारकिट्टविभजन नीट न झाल्यामुळें रसधातु नीट बनत नाहीं; अर्थात पुढील रक्तधातूही सकस होत नाहीं, त्यामुळें पांडुता येते. यकृताची क्रिया नीट न चालल्यामुळें किंवा रसधातूचें रक्तांत रूपांतर करण्याचें रंजक पित्ताचें कार्य नीट होत नसेल तर पांडुता येते. शीतज्वर पुष्कळ दिवस टिकून राहिल्यानें प्लीहावृद्धि होते. प्लीहावृद्धीनें पांडुता येते. कोणताही आजार बरेच दिवस राहिला असतां रक्त निकस बनतें व पांडुरोग होतो. रक्तार्श, रक्तप्रदर, रक्तपित्त इत्यादि रोगांमध्यें शरीरांतील रक्त बाहेर गेले तरीही पांडुता येते.

वर सांगितलेल्या कारणांनीं किंवा त्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणांनीं पांडुरोग झाला म्हणजे त्वचा फिकट फुटीर किंचित फुगीर रूक्ष अशी होते. छातींत धडधडतें; जरा चाललें, जरा बोलले, जरा श्रम केले कीं, छातींत धडकी भरून जीव कासावीस होतो. हातपायास गोळे येतात. नाडीचे ठोके जोरानें व अनियमित पडतात.

याप्रमाणें होणाऱ्या त्रासदायक लक्षणांवर लोहभस्माचा किंवा कोणत्याही लोहकल्पाचा फार उत्तम उपयोग होतो. पांडुरोगामध्यें कमी झालेलें रक्त भरून काढण्यासाठीं प्रत्यक्ष रक्तापासून किंवा यकृतापासून तयार केलेल्या सूचिकभरणांचा किंवा औषधांचा उपयोग करण्याकडे प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढत आहे. त्यानें कमी झालेलें रक्त तावडतोब भरून आल्यामुळें रोगनाशही त्वरित होतो; पण त्यामुळें यकृतांतील रंजक पित्ताचें कार्य व्यवस्थित रीतीनें करून निरोगी व सकस रक्ताची उत्पत्ति करणाऱ्या लोहभस्माचें महत्व मुळींच कमी होत नाहीं. उलट पुष्कळ दिवसांपासून असलेल्या पांडुरोगामध्यें वरील औषधांनीं किंवा इंजेक्शनांनीं तात्पुरता गुण वाटला तरी कायमचा गुण येण्यासाठीं लोहभस्म किंवा लोहकल्प द्यावेच लागतात.

पांडुरोगामध्यें किंवा अशक्ततेवर लोहभस्म नुसतें पुष्कळ वेळा वापरतात; पण लोहभस्माचें हें पांडुरोग शमवाचें कार्य पाहिजे असून त्याशिवाय आणखी वेगळ्या गुणांची अपेक्षा ज्यावेळीं असते त्यावेळीं नुसतें लोहभस्म वापरण्यापेक्षां त्या त्या गुणांचीं इतर औषधें मिसळून केलेलें संयुक्त लोहकल्प वापरणें अधिक योग्य ठरतें. जसें संग्रहणीजन्य पांडुरोगामध्यें नुसतें लोहभस्म वापरण्यापेक्षां लोहपर्पटी वापरणें अधिक योग्य होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीर्णज्वर, अग्निमांद्य, अपचन कांहीं दिवस राहून त्यापासून पुढें झालेल्या यकृताच्या अशक्ततेमुळें उद्भवलेल्या कावीळीमध्यें किंवा पांडुरोगामध्यें सुंठ, मिरे, पिंपळी, चित्रक यासारखी दीपक पाचक औषधें असलेला लोहकल्प–नवायसचूर्ण वापरणें जास्त योग्य. पक्षाघात अपस्मार इत्यादि वातविकारांत विकारशमनासाठीं व त्यापासून उत्पन्न झालेल्या पांडुतेसाठीं रौप्य शिलाजित, सुवर्णमाक्षिक इत्यादिकांनीं युक्त असलेला मधुररस-प्रधान लोहकल्प 'ताप्यादिलोह' वापरणें जास्त सयुक्तिक होईल. त्याचप्रमाणें पाचक पित्ताच्या विकृतीमुळें उत्पन्न होणाऱ्या परिणामशूल, अन्नद्रवशूल, आम्लपित्त इत्यादि पचनसंस्थेंतील पित्तविकारांवर **धात्रीलोह** देणें गुणाच्या दृष्टीनें जास्त योग्य होईल.

धात्रीलोहाचीं घटक द्रव्यें व कृति

आवळकाठीचें चूर्ण ३२ तोळे, लोहभस्म १६ तोळे व ज्येष्ठमधाचें चूर्ण ८ तोळे एकत्र मिसळावें. आवळकाठीचें चूर्ण तसेंच ज्येष्ठमधाचें चूर्ण अगदीं वस्त्रगाळ केलेलें असावें. वरील मिश्रण खलामध्यें घालून त्यांत आवळ-काठीचा काढा मिसळून घोटावें. घोटून घोटून सुकल्यावर पुन्हां आवळकाठीचा काढा घालावा व घोटावें. याप्रमाणें आवळकाठीच्या काढ्याच्या सात भावना द्याव्या. नंतर तो खल कडक उन्हांत ठेवावा. खलांतील औषध चांगलें खडखडीत वाळल्यावर पुन्हां वस्त्रगाळ करून ठेवावें. म्हणजे **धात्रीलोह** तयार होईल.

धात्रीलोहाचे गुणधर्म

कोणत्याही औषधाचे गुणधर्म समजावून घेण्यासाठीं त्यांतील घटक द्रव्यांचे गुणधर्म प्रथम पहावे लागतात व त्या घटकद्रव्यांचा संयोग कशानें केला आहे, त्यांत कोणता हेतु आहे हें पहावे लागते. त्या दृष्टीनें प्रथम आपणांस धात्रीलोहांतील घटक द्रव्यांकडे पहावे लागेल. यामध्यें आवळकाठीचें प्रमाण सर्वांत जास्त आहे व घटक द्रव्यांचा संयोगही आवळकाठीच्या काढ्यानें साधला आहे. तेव्हां धात्रीलोहामध्यें मुख्यतः आमलकीचे गुण उतरणार हें उघड आहे.

आमलकी रसायन आहे; म्हणजे रस रक्त इत्यादि सात धातु योग्य तऱ्हेनें साम्यावस्थेंत ठेवण्याचें कार्य आमलकी करतें. दीर्घायुष्य, स्मृति, मेधा, आरोग्य, कांति वाढविणें हे रसायनाचे गुण आवळ्यामध्यें उत्कटत्वानें आहेत म्हणून च्यवनप्राशावलेहासारखे अनेक रसायन प्रयोग आवळ्यापासून तयार होतात. आवळा त्रिदोषहर असला तरी शीतवीर्य व मधुरविपाकी असल्यामुळें त्याचें कार्य मुख्यतः पित्तदोषावर शोधक व शामक असें होतें. म्हणून पित्तप्रधान विकार तृष्णा, वांति, डोकेदुखी, कामला, पांडु इत्यादि यकृताच्या विकृतीमुळें उद्भवणारे विकार, व आम्लपित्त, अरुचि, परिणामशूल, अन्नद्रवशूल इत्यादि पाचकपित्ताचे विकार यावर आवळ्याचें कार्य फारच उत्तम असें होतें; आणि म्हणूनच वरील परिणामशूल, अन्नद्रवशूल, आम्लपित्त, तृष्णा इत्यादि पित्तविकारांवर उत्तम कार्य व्हावें यासाठीं धात्रीलोहामध्यें आमलकीचें प्रमाण जास्त असून त्याला आमलकीच्या काढ्याच्या सात भावना दिलेल्या आहेत.

धात्रीलोहांतील दुसरें घटक द्रव्य लोहभस्म असून त्याचे गुणधर्म वर येऊन गेले आहेत. आमलकीमुळें मलबद्धता करण्याचा लोहाचा अवगुण नाहींसा झाला असून पांडुरोग शमनाबरोबर पित्तविकारावर कार्य करण्याचा गुण वाढला आहे.

यांतील तिसरें घटक द्रव्य ज्येष्ठमध असून त्याचें प्रमाण वरील दोन औषधांचे मानानें कमी आहे. ज्येष्ठमध मधुर, शीत, बलवर्धक, वात पित्त शमन करणारा असून तृष्णा वांति इत्यादि विकार नाहींसा करणारा आहे. त्याची जोड या धात्रीलोहाला असल्यानें तहान नाहींशी करण्याचा गुण अधिक वाढला आहे.

आवळकाठी, लोह व ज्येष्ठमध यांना आवळकाठीच्या काढ्याच्या सात भावना देऊन हें औषध सूर्याच्या कडक उन्हांत ठेवण्यास सांगितलें आहे. सूर्यकिरणानें अनेक रोग नाहींसे होतात; पांडुरोग जातो. तो गुण अधिक मिळावा हा यामध्यें उद्देश आहे. अशा रीतीनें तयार झालेला हा धात्रीलोह घटक द्रव्यांतील गुणांप्रमाणें पित्तदोषावर कार्य करतो. विशेषतः अन्नाच्या विपाककालीं उद्भवणारा परिणामशूल, पित्त ओकून पडल्याशिवाय चैन पडूं न देणारा अन्नद्रवशूल, तहान, छातींतील व घशांतील जळजळ, आम्लपित्त इत्यादि पाचकपित्ताच्या विकृतीपासून उत्पन्न होणाऱ्या रोगांवर याचें कार्य चांगलें होतें. शिवाय हा लोहकल्प असल्यामुळें पांडुता नाहीशी होऊन शक्ति येते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचें कार्य मुख्यतः पाचक व रंजकपित्त आणि रस रक्तधातु यांवर होतें.

धात्रीलोहाबरोबर प्रवाळपंचामृत, कामदुधा, शंख, शौक्तिक, कर्पादिक हीं भस्में इत्यादिकांचा उपयोग आवश्यकतेनुसार करावा.

शेवटीं धात्रीलोहाचा एक अनुभव उधृत करून हा लेख संपवितों.

रुग्ण क्ष. वय ५२ वर्षें. शिक्षकाचा व्यवसाय; इतर वेळीं पोवाडे, कीर्तनें, व्याख्यानें देण्याचा नाद. त्यामुळें नेहमीं होणारें जागरण व पोटावर पडणारा ताण. यांना अलीकडे २।३ वर्षांत नेहमी पोटांत बारीक दुखत असे. जेवणानंतर २-२॥ तासांनीं दुखत असे. सोडा, लिंबू वगैरे घेतल्यानंतर तेवढ्यापुरते थांबत होतें; पण पुन्हां दुसरे दिवशीं तें दुखत असें. पोटांत दुखण्याची व्यथा फारशी तीव्र नव्हती पण दररोज ठराविक वेळीं नियमित होती.

तारीख १८।५।१९५३ रोजी औषध देण्यास सुरुवात केली. सकाळीं धात्रीलोह २ गुंजा तूपमधांतून घेण्यास दिला व जेवण्यापूर्वीं १ तास तो घेण्यास सांगितलें.

जेवणानंतर २ तासांनीं दुपारीं प्रवाळपंचामृत १ गुं. व कर्पादिक भस्म २ गुंजा मिसळून पाण्याबरोबर दिले. प्रवाळपंचामृतांत कर्पादिक भस्म आहेच; पण पोट दुखणें, पोट फुगणें, वारंवार ढेकर येणें, ठराविक वेळीं पोट दुखणें, यावर प्रवाळपंचामृतांतील इतर औषधांपेक्षां कर्पादिकाचा उपयोग जास्त चांगला होत असल्यामुळें कर्पादिकाचें प्रमाण या ठिकाणीं जास्त असावें या हेतूनें कर्पादिकभस्म पुन्हां २ गुंजा मिसळून दिलें.

रात्रीं घेण्यास खास औषध असें दिलें नाहीं. शौचास साफ होत नसेल तर ऊन पाण्यांत तूप टाकून घेण्यास सांगितलें. किंवा चमचा दोन चमचे एरंडेल घेण्यास सांगितलें.

याप्रमाणें २१ दिवस चिकित्साक्रम ठेवला. तेव्हांपासून अलीकडे पोट दुखण्याची तक्रार नाहीं.

घृतेव मधुना युक्तं भोजनाद्यन्तमध्यतः
त्रीन् वारान् भक्षयेन्नित्यं पथ्यं दोषानुबंधतः।
भुक्तस्यादौ नाशयेच्च दोषान्पित्तकृतानपि
मध्ये च आनाहविष्टब्धं तथान्ते चाग्निमांद्यताम्
रक्तपित्तसमुद्भूतान रोगान् हन्ति न संशयः ।

(रसचंडांशू पित्तरोग चिकित्सा)

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.

सूचिपत्र मागवा.

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः— अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य

यांस लागणारीं औषधी द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर, मौक्तिक(मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद व मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.

टे. नं. ३१७९६ Telegram-AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

★ ★ ★ वेस्टर्न इंडियाची

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या उज्वल इतिहासांत स्मरणीय भर घालण्यांत येत आहे. पुणें शाखेकरितां सुंदर व गगनचुंबी इमारत बांधण्यांत आली असून तिचें उद्घाटन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तत्वज्ञानी व भारताचे उपराष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे हस्तें करण्यांत आलें आहे. अशा प्रसंगीं कंपनीच्या आजपर्यंतच्या यशस्वी कामगिरीची आठवण होणें अपरिहार्य आहे.

वेस्टर्न इंडिया आज जवळ जवळ ४० वर्षें विमा क्षेत्रांत काम करीत असून, तिची उत्कृष्ठ सांपत्तिक स्थिति, काटकसरीची चोख व्यवस्था, मृत्यूचें अल्प प्रमाण, जास्तींत जास्त बोनस, सर्व वर्गास सोयीचें होतील असे विम्याचे माफक दर व आकर्षक विमा योजना, संतुष्ट व कार्यक्षम नोकरवर्ग वगैरे कारणांमुळें आज वेस्टर्न इंडियाची भारतांतील मोठ्या विमा कंपन्यांत प्रामुख्यानें गणना होते. आकारमान वगळलें तर इतर सर्वच बाबतींत महाराष्ट्राच्या या कंपनीनें अखिल भारतांत श्रेष्ठतम दर्जा मिळविला आहे, व एक आदर्श भारतीय विमा कंपनी असा वेस्टर्न इंडियाचा सार्थ उल्लेख केला जातो.

कंपनीची पहिली शाखा कचेरी पुण्यास सन १९२५ सालीं मोठ्या समारंभानें सुरू करण्यांत आली. १९४४ सालापासून श्री. के. जी. खांडेकर, एम्. ए. हे शाखाधिकारी म्हणून काम पहात आहेत. सुरुवातीपासूनच शाखेचा जम चांगला बसून हळूहळू व निश्चितपणें कामाचा व्याप वाढूं लागला; येथें असलेल्या इतर विमा कंपन्यांच्या शाखांचें कार्यक्षेत्र प्रादेशिक आहे तर कंपनीच्या शाखेचें कार्यक्षेत्र पुणें जिल्ह्यापुरतेंच मर्यादित आहे. हें या शाखेचें वैशिष्ठ्य आहे. असें असतांनाहि कामाच्या दृष्टीनें या शाखेची प्रमुख म्हणून गणना करण्यांत येते.

अध्यक्ष
श्री. रा. ग. सोमण

ही शाखा सुरू झाल्यानंतर दोन तीन वर्षांतच जागतिक आर्थिक मंदीची लाट उसळली व ती अनेक वर्षें राहिली. त्यामुळें या शाखेमार्फत दरसाल मिळणाऱ्या नवीन कामाचा आंकडा सन १९४०, १९४१ पर्यंत अकरा लाखांपर्यंतच जाऊं शकला. या बाबत गेल्या दहा वर्षांत बरीच प्रगति करतां येऊन दरसालच्या नवीन कामांत दुपटीच्यावर वाढ करण्यांत आली. गेल्या सालीं २३ लाखांचें नवीन काम पूर्ण करण्यांत आलें. विशेष म्हणजे ह्या शाखेनें आपल्या कामाचा दर्जा नेहमीं इतका उत्कृष्ठ राखला आहे कीं, त्यामुळें अकाली विमे बंद होण्याचे व अल्पकालीन क्लेम्स येण्याचें प्रमाण अत्यल्प राहिलें आहे.

विमेदारांचें कर्ज, वयमान्यता, पेडप्, सरेंडर, विम्यांतील बदल वगैरे सर्व तऱ्हेचें विमा विषयक व्यवहार येथेंच करण्यांत येतात.

पुणें शहराचें वाढतें व्यापारी महत्त्व व शाखेची संभाव्य प्रगति विचारांत घेतां शाखेकरितां स्वतःची इमारत असण्याची गरज कंपनीस अधिकाधिक भासूं लागली. त्याप्रमाणें शाखेच्या इमारतीकरितां प्रमुख रस्त्यांवर मोक्याच्या ठिकाणीं जागा पहाण्याचें प्रयत्न सुरू करण्यांत आले. सन १९४८ सालीं लक्ष्मी रोडवर उंबऱ्या गणपती चौकाजवळ असलेला पुराणिकांचा वाडा मुक्रर करण्यांत आला. सरकारी नियंत्रणाप्रमाणें वाड्यांत पूर्वी असलेल्या बिऱ्हाडकरूंची सोय केल्याशिवाय कंपनीस आपली योजना अमलांत आणणें शक्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रगति

चेअरमन
श्री. मो. ना. आगाशे

नव्हतें. म्हणून टिळक रोडवर चिमणबागेजवळ दुसरी एक जागा घेऊन तेथें आधुनिक पद्धतीची तीन मजली इमारत बांधण्यांत आली.

टिळक रोडवरील इमारतीची वास्तुशांत व लक्ष्मी रोडवरील इमारतोची पायाखोदणी असे दोन्हीं समारंभ सन १९५१ सालीं गुढी पाडव्याचे सुमूहूर्तावर करण्यांत आले.

दोन्हीं इमारतींचें काम पुणें येथील सुप्रसिद्ध वास्तुशास्त्रज्ञ श्री· उद्धव आपटे यांजकडे सोंपविण्यांत आले होतें. श्री. आर. डब्ल्यू. नेने यांची आर. सी. सी. तज्ञ म्हणून नियुक्ति करण्यांत आली होती. दोन्ही इमारतींच्या बांधणीचें काम मुंबईचे सुप्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर मे. एस्. जी. फडके अँड सन्स यांना देण्यात आले होते.

कंपनीतर्फे कामावर दैनंदिन देखरेख श्री. ए. एम्. तांबे यांनीं अतिशय समाधानकारकपणें केली. वरील सर्वांनीं आपलें काम चांगल्या प्रकारें पार पाडलें.

दोन्हीं इमारतींचें बांधकाम सिमेंट काँक्रीटचें असून सुबक झालें आहे. लक्ष्मीरोडवरील इमारतीच्या पुढील भागाचा रॅफ्ट पद्धतीनें पाया तयार करतांना विन्‌व्हायब्रेटरचा उपयोग करण्यांत आला होता. टिळक रोडवरील इमारत टुमदार तर आहेच पण लक्ष्मी रोडवरील इमारत इतकी भव्य सुंदर व झाली आहे कीं, तिच्या बरोबर तुलना करतां येण्यासारखी पुण्यांत बहुधा दुसरी इमारत नाहीं. अशा तऱ्हेच्या दोन अिमारती बांधून पुण्याच्या सौंदर्यात व वैभवांत कंपनीनें स्पृहणीय भर घातली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

या इमारतीद्वारां कंपनीनें आपल्या वाढत्या लोकप्रियतेचा व उत्कर्षाचा पुनःप्रत्यय दिला आहे. त्याकरितां कंपनी आपल्या असंख्य विमेदारांची व हितचिंतकांची अत्यंत आभारी असून त्यांस आपल्या शुभकामना अर्पण करीत आहे.

▲ वेस्टर्न इंडियाचा भरभक्कम पाया ▲

● माफक हप्ते; ● भरपूर राखीव निधी; ● काटकसरीचा व्यवहार;
● पैसा गुंतविण्यांतील दूरदृष्टी व काळजी ● साध्या व सोप्या विमा योजना;
● अत्यंत प्रामाणिक कर्तव्यनिष्ठा; ● कंपनीच्या कारभारावर विमेदारांचें नियंत्रण;
● विमेदारांना नफ्यांतील जास्तींत जास्त हिस्सा; ● विमेदारांच्या हिताविषयीं जागरूकता;
● सेवेविषयीं निष्ठा; ● मूल्यमापनाचा कडक आधार व त्यामुळें भरपूर लाईफ फंड;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

★ ★

अथ समानः ...।

लेः– गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

निरुक्तिः—

अन् या धातूला सम हा शब्द जोडून समान शब्द झाला आहे.

"समं नयनात्समानः।"

शरीर समावस्थेंत म्हणजे स्वस्थावस्थेंत ठेवण्यास कारणभूत हा वायु आहे म्हणून याला समान असें म्हणतात.

"नाभीदेशं परिवेष्टच समन्तात् नयनात् समानः।"

शरीराचा जो मध्यभाग नाभी, म्हणजे केन्द्र स्थानांत राहणारा व या शरीरमध्य भागांतून आसमन्तात म्हणजे सर्व सभोवतालच्या प्रदेशांत अन्नरसाची व्याप्ती करणारा म्हणून याला समान असें म्हणतात.

पहिल्या निरुक्तींत स्वस्थावस्था अथवा आरोग्य याचेवर अवलंबून आहे असें दाखविलें आहे. याचे कारण मनुष्याचें आरोग्य बहुतांशीं त्याच्या पचन शक्तीवर अवलंबून असते. पचन शक्ति अथवा अग्नि बिघडला म्हणजे प्रायः माणसाला रोग होतात. किंवा मनुष्य प्रज्ञापराधामुळे मिथ्याहार घेतो व त्याचा परिणाम म्हणून त्याचें पचन बिघडते व पचनाच्या वैगुण्यामुळें आरोग्य बिघडते. हे पचन कार्य करणारा वायु समान आहे. किंवा या वायूवर शरीराची समावस्था अवलंबून आहे म्हणून याला समान असें म्हणतात.

पचनाप्रमाणें तितक्याच महत्वाचें कार्य म्हणजे पचन करून तयार झालेला अन्नरस–त्याचें ग्रहण करून तो सर्व शरीरभर पोचविण्यासाठीं हृदयाकडे पाठविणें हें होय. ही क्रिया समान वायु करितो. असे महत्वाचें कार्य या वायुकडे आहे म्हणून याला समान असें म्हणतात.

समानाचें स्थानः—

अन्तरग्नेश्च पार्श्वस्थः। च.चि.२८.
समानोऽग्निसमीपस्थः। वा. सू. १२
आमपक्वाशयचरः समानो
वन्हिसंगतः। सु. नि. १

समान वायूचें स्थान अन्तराग्नीच्या जवळ आहे. अग्नीला मदत करणारा हा वायु असल्यामुळें त्याचेच जवळ याचें वास्तव्य ठेविलें आहे. अग्नीचें मुख्य स्थान नाभी हें आहे. नाभी म्हणजे नाभीच्या आसमन्तांतील सर्व भाग अथवा ज्याला ग्रहणी असें म्हटले जाते तो अवयव. यांत मुख्यतः आमाशय, लघ्वंत्र, व पक्वाशयाचा कांहीं भाग यांचा समावेश होतो. यकृत, अग्न्याशय, हेहि अवयव पचन करणाऱ्या अवयवांत म्हणजे ग्रहणी या अवयवांत समाविष्ट आहेत. यांतील पित्त लघ्वंत्रांत अन्न पचविण्यास येत असते. व याच ठिकाणीं सर्वांत अधिक पचन चालते, हे सर्व समान वायूच्या कक्षेंतील अवयव आहेत. आमाशय, लघ्वंत्र, पक्वाशय यांचे भितींत, ज्या सुषिर स्नायूंनीं घटित हे अवयव झाले आहेत त्यांत समान वायु आहे.

समानाचें संचार क्षेत्रः—

"कोष्ठे चरति सर्वतः।" सू. १२ वा.

समानाचें मुख्य स्थान लघ्वंत्र हें जरी असले तरी त्याचा संचार वर, खालीं व आडवा होत असतो. वर आमाशयांत थोड्याफार प्रमाणांत अथवा प्राथमिक पचन होत असते, तेथें हा वायु आहे. खालीं पक्वाशयांत शेष पचन चालतें तेथें समान वायु आहे. तसेच कित्येक वेळां गुदावाटे पक्वाशयांत बस्ति दिला जातो. बस्तीवाटें घातलेली औषधी द्रव्यें यांचें पचन पक्वाशयांत होते, तेथेंही समान व्यापार चालतात. कोष्ठाग्निप्रमाणें, सर्व शरीरभर धात्वग्नि आहेत. धात्वग्नींना बळ कोष्ठाग्नीकडूनच मिळत असते. पण या सर्वांस सहाय्यभूत समान वायु आहे. पचनाच्या ठिकाणीं ऊर्ध्व, अधः व तिर्यक् त्याचा संचार होत असतो.

समानाचें कार्यः—

"अन्नं गृह्णाति पचति विवेचयति मुंचति ॥" वा.

समानोऽग्निबलप्रदः। च. चि. २८.
सोऽन्नं पचति तज्जांश्च विशेषान्विविनक्ति हि। सु०

१. अन्नं गृह्णाति।

मुखांत अन्नाचा प्रवेश झाला कीं वायूचे व्यापाराला प्रारंभ होतो. पण हा वायु प्राण हा असतो. प्राण वायु अन्न चर्वण, नंतर तें अन्न गिळण्याचें व पुढें अन्न नाडींत तें प्रविष्ट करण्याचें कार्य करितो. हृदयापर्यंत प्राणाचे व्यापार चालतात. हृदय सन्निध असलेले आमाशय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्वार लागले कीं समान वायूचें क्षेत्र सुरू होतें. अन्न या द्वारापर्यंत प्राणानें आणल्याबरोबर हें द्वार उघडून अन्न आमाशयांत घेणें हे पहिले कार्य समान वायूचें होते. म्हणून "अन्न गृह्णाति" असें याचें वर्णन केले आहे. अन्ननाडीमधून आमाशयांत अन्न घेणें, पुढें आमाशयांतील कार्य संपल्यावर ते अन्न ग्रहणी अथवा लहान आंत्रांतील अर्गला उघडून त्याला लघ्वंत्रांत प्रवेश देणें, हेंहि कार्य याच वायूचें आहे. लघ्वंत्रांतील पचन व्यापार झाल्यावर पक्वाशय अथवा उंडुक यांतील द्वार उघडून त्याला प्रवेश देणें हें कार्य समान वायु करितो. ज्या ज्या ठिकाणीं द्वार-प्रवेश आहेत त्या ठिकाणीं द्वारें मोकळी करणें व प्रवेश देणें हे कार्य समानाचे आहे.

२. पचति।

'पचति' हें समानाचेच कार्य आहे. पचनाच्या स्थूल मानाने तीन अवस्था कल्पिलेल्या आहेत. त्यांना पाक असें म्हणतात. प्रथमावस्थेंत अन्नांतील पांचभौतिक घटकांपैकीं सर्वांत स्थूल अशा पार्थिव व जलीय अंशांचे पचन होते. या अंशांचे रूपांतर अथवा रसांतर केले जाते. हें करण्यास आमाशयांत कफोत्पादन व्हावे लागते. हें उदीरण करण्याचे कार्य हा समान वायु करितो. अन्नाच्या योग्यतेप्रमाणें व प्रमाणाप्रमाणें योग्य असा कफ निर्माण व्हावा लागतो. हें कार्य समावस्थेंतील समान वायु करितो. या कफाचा व अन्नाचा संबंध जोडून देण्यासाठीं आमाशयाच्या हालचाली, संकोच विकास घडवून आणावे लागतात. म्हणजे अन्नाचे संघात भिन्न होतात व त्यांनी स्निग्धत्व व मार्दव येते. हें रूपांतर होण्यास कांहीं काळपर्यंत आमाशयांत अन्न धरून ठेवावे लागते. हेहि कार्य समानाचें आहे. हे कार्य समानानें नीट केले नाहीं तर कफाचें कार्य अन्नावर होण्यास अवसर सापडणार नाहीं. व अन्न भरकन अपक्क स्थितींत लघ्वंत्रांत दुसऱ्या अवस्थान्तरासाठीं पाठविले जाईल. पहिला पाक नीट न झाल्यानें पुढील दुसरा पाकही नीट होणार नाहीं. किंवा याच्या उलट स्वाभाविक कालापेक्षा अधिक काल पर्यंत अन्न आमाशयांत समान वायूनें थोपवून धरले तर त्या अन्नास पुढील गती व पचन लाभणार नाही. ते अन्न सडेल, अंबेल, त्याचा शुक्तपाक होईल. अम्लपित्त निर्माण होईल. किंवा या विकृत अन्नाचा परिणाम आमाशयावरही होऊं शकेल. पण या सर्व क्रिया साम्यावस्थेंतील वायु सम करितो. व त्यामुळे प्रथम पाक नियमीत घडतो.

पचनाची दुसरी अवस्था घडवून आणणारा समान वायूच आहे. आशयांतून अन्न क्रमाक्रमानें च्यवन करणें, व ते होण्यासाठीं आमाशय व ग्रहणी यांतील अडसर (अर्गला) खुला करणें, अन्न आणणें, व आलेल्या अन्नाचें पचन करण्यासाठीं "अच्छ." पित्ताचें उदीरण करणें हें कार्य वायु करितो. अन्न आले आहे ही संवेदना वायुमुळेच ग्रहणी, अग्न्याशय, व यकृत यांना पोचते. व त्यामार्फत पित्ताचा स्राव सुरू होतो. आलेल्या अन्नाचा व पित्ताचा संयोग घडवून आणण्यासाठीं चलनवलन या वायूलाच घडवून आणावे लागते. त्यामुळें अन्नाचें घटक रूपांतरित होऊं शकतात. द्वितीय अवस्थेंत अग्नीच्या कोशांचे विभजन होते. ही पाकाची दुसरी अवस्था.

तिसऱ्या अवस्थेंत शेष वायवीय व आकाशीय अंशाचें पचन व्हावयाचें असते. त्यासाठीं ते पक्वाशया प्रत न्यावे लागते. व उर्वरित अग्निकडून त्यांतील अंशांचे पचन घडते.

आमाशयांतील स्नायु सुशीर आहेत. त्यांत संकोच विकास सारखे चालू असतात. ग्रहणीमध्ये पचन चालू असल्यास आमाशयांतील अन्न आमाशयांत अधिक काळ धरून ठेविलें जातें. पुर्वी उपास घडला असेल तर अर्गला लवकर उघडली जाते. अन्नाच्या आकारावर जठराची हालचाल जलद होणें वा उशीरा होणें ही गोष्ट अवलंबून असते. चर्वण न करितां मोठमोठे अन्नाचे तुकडे गिळले असतील तर जठरांत ते दीर्घकाल पडून राहतात. सामान्यतः २ ते ६ तास जठरस्थ पचनास लागतात.

वायु पचन करितो. म्हणजे प्रत्यक्ष पचन अथवा रूपांतर करण्याचें कार्य अग्नीचेंच असतें. पण या पचन क्रियेवर ताबा ठेवण्याचें कार्य हा वायु करितो. पचनासाठीं योग्य प्रमाणांत पित्ताचे उदीरण व्हावे लागते. त्या अन्नात योग्य प्रमाणांत क्लेद व स्नेह मिसळला पाहिजे. त्या अन्नास गती मिळाली पाहिजे. व ती सर्व क्रिया होण्यास अन्न आशयांत कांहीं काल धरून ठेवले पाहिजे. या सर्व भावांचा सम्यग्योग घडवून यावा लागतो-म्हणजे मग चांगला पाक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं तर विकृत पाक होतात. या भावांचा हीन योग झाला तर पाक कच्चा अथवा आम होतो. अधिक अथवा 'तीक्ष्ण पाक झाला तर भस्मक होतो. किंवा विकृत झाला तर विषम किंवा दोष पाक होतो. हा पाक विविध व्याधि निर्माण करीत असतो. या साठीं अन्न प्रवेशापासून रूपांतरित होण्यापर्यंत सर्व जबाबदारी या वायुकडे असते. व या सर्व क्रियेला 'पचति' असें म्हणतात.

३. विवेचयति।

अन्नपचन झाल्यानंतर किंवा ते होत असतांना जेवढा भाग पचला आहे तेवढा वेचून घेणें हे कार्यही समानाकडेच आहे. शरीराला जो ग्राहक भाग आहे तोच घेतला जातो. व जो नको आहे तो पुरीष म्हणून टाकला जातो. यासाठीं ग्रहणी या अवयवाला जागृत राहावें लागते. वाटेल त्या अंशाला शरिरांत प्रवेश मिळू शकत नाहीं.

रूपांतरित, व उपयोगी असाच अन्नांतील भाग ग्रहण केला जातो. या ग्रहित भागाला "रस" असें म्हणतात. अन्नांतील रस शोषून घेणें यांस एक प्रकारची गतीच आहे. तो आंत्रांतून उचलावयाचा व रसवाहिनींत त्याला पोचवावयाचे. यांत विवेचन आहे. विवेक आहे. ही क्रिया समान वायु करितो. ह्या अन्नपाकांतील शरिरांत घेण्यास योग्य जे भाग आहेत त्यांना "विशेष" असें म्हटले जाते. यात शरीर धातुपोषक अंश असतात. ग्रहण केलेल्या अंशांना गति देऊन ते रसाभिसरणांत लोटले जातात व ते अंश पुढें हृदयाकडे जाऊन सर्व देहाचें पोषण करितात. या क्रियेंत जे अंश नको आहेत ते उंडुकाकडे किंवा मलाशयाकडे नेले जातात. पण शरिराच्या काटकसरी व्यापारांत ज्या अंशाची गरज आहे त्यांचे ग्रहण केले जाते व जे अगदीच निरुपयोगी असतील, किंवा जे शरिराला इजा करतील त्यांना टाकून दिले जाते. ही क्रिया याच वायूच्या कक्षेतील आहे. पाचित अन्नरस ग्रहण करण्याचे कार्य हा वायु ग्रहणी या अवयवामार्फत करीत असतो. पचनाप्रमाणेंच रस शोषून घेणें ही क्रिया महत्त्वाची आहे. ती नीट झाली नाहीं तर अन्न पचून त्याचा काय उपयोग? ही शोषण क्रिया होण्यास कांहीं काळपर्यंत पाचक अन्न ग्रहणींत राहावे लागते म्हणजे अवसर सांपडतो. नाहीं तर हे अन्न शीघ्रगतीनें पक्वाशयाकडे लोटले गेले तर पक्वांश ग्रहण करण्यास ग्रहणीला अवसर सापडत नाहीं व ते अंश मलाबरोबर गुदावाटे शरीराबाहेर निघून जातात व शरीरपोषण नीट होत नाहीं. अतिसार ग्रहणी असे रोग निर्माण होतात.

समान वायूचे स्थान, पचन करणारे आमाशयादि अवयव असल्यानें त्याचा संबंध मुख्यत: अन्नाशीं येतो. समानाला चालना मुख्यत: अन्नाकडून मिळते. योग्य वेळीं योग्य प्रमाणांत योग्य तें अन्न आमाशयांत घातले गेले म्हणजे समानाचे व्यापार प्राकृत राहतात. असात्म्य अन्नाचा स्पर्श समानाला झाला कीं समान प्रकुपित होऊन त्याचे व्यापार बिघडतात. आपण ज्या तऱ्हेचे अन्न पोटांत घालू त्यावर आपल्या पचन मार्गाची शक्ति व समानाचे व्यापार बरे वाईट चालणें ही गोष्ट अवलंबून असते. भोजनाची वेळ ठरली म्हणजे त्या वेळी समान वायु कार्य करण्यास तत्पर असतो. पण अन्य वेळीं पोटांत अन्न घातले तर वायूचे व्यापार इतरत्र चालू असल्यामुळे पचन कार्याकडे त्याला आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजें ओढाताण होते. त्यामुळे अवेळीं भोजन हे समानाचे क्षोभ करणारे महत्त्वाचे कारण समजले जाते. पहिले अन्न आमाशयांत जे आहे तें पचण्यापूर्वी दुसरे अन्न आमाशयांत घातले तर एकाच वेळीं दोन्ही अन्नांची व्यवस्था लावण्यास समानास अवघड जाते. त्यामुळे एकही धड कार्य त्याचेकडून होत नाहीं. ताजे गरम अन्न योग्य वेळीं पोटांत घातले म्हणजे समानाचे व्यापार व्यवस्थित चालतात. शिळें, थंड अन्न पोटांत घातले तर पचन व्यापार मंदावतात. विकृत होतात. समानाचे व्यापार चालू असताना व्यानादि इतर वायूंचे व्यापार अधिक वाढले तर समानाच्या पचन व्यापारास अडथळा येतो. भोजनानंतर लगेच संभाषण, अभ्यास, व्यायाम केल्यास म्हणजे व्यान व्यापार चालू केल्यास समानाकडे वातशक्ति कमी पडते. व त्यामुळे पचन ठीक होत नाहीं. अकालीं निद्रा वा जागरण यांचेही परिणाम पचनावर होतात. पक्वाशय व आमाशय हें समानाचें मुख्य संचार क्षेत्र असल्यानें समान विकृतीचे परिणाम या अवयवांतील व्यापार विकृत होण्यांत होतात. किंवा त्यांच्या शरिरांत विकृति होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय
०२९५१८
गुरुकुल कांगड़ी

शुभचिंतन

卐

अर्कशालेचे
ग्राहक, वैद्य, डॉक्टर व विक्रेते यांना
यंदाची दिवाळी व नूतन वर्ष
आनंदाचे, उत्कर्षाचे व आरोग्यपूर्ण जावो.

卐

आयुर्वेदीय अर्कशाला लिमिटेड, सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

078418

अनुभवसिध्द
अर्कशाळा औषधें

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन

रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण

जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयाचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन

बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन

मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृध्दिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्र मित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Compiled
1999-2000

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar